
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2220

# जुने दोर नवे धागे



REFBK-0018418

प्र. न. जोशी

संदर्भ / निबंध
२८३।७३ । १००६०
2220

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकमा:
अनुक्रम ................ दि: ........
स्थलांक ................ नोंद दि:

प्रसाद प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम १००६० वि: निबंध
2220 25/3/63

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १८०१८
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# जुने दोरे नवे धागे

REFBK-0018418

डॉ. प्र. न. जोशी

' प्रसाद ' रौप्यमहोत्सवी प्रकाशन

प्रकाशक :
मनोहर य. जोशी, B.A., B. Com.
प्रसाद प्रकाशन
१८९२, सदाशिव, पुणे ३०
★
डॉ. प्र. न. जोशी
★
किंमत सात रुपये
★
रौप्यमहोत्सवी प्रकाशन
१९७२
★
मुद्रक :
र. भ. निगुडकर
प्रकाश मुद्रणालय
३९५/४, सदाशिव, पुणे ३०

# मनोगत

'जुने दोरे नवे धागे' या एका नव्या पुस्तकात मी एक अभिनव विषय मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आपण आज अतिशय नव्या अथवा आधुनिक काळात वावरत आहोत. विज्ञानयुग, यंत्रयुग, औद्योगिक युग अणुयुग अथवा अवकाश युग अशा नावांनी शोभणाऱ्या आजच्या आपल्या युगात मानवी जीवन अत्यंत धावपळीचे व गुंतागुंतीचे झाले आहे. जुन्या श्रद्धा, जुनी मूल्ये यांवरील आपल्या श्रद्धा नष्ट होत आहेत. देवधर्म, जुने आचारविचार यांवरील नव्या पिढीचा विश्वास ढासळत आहे.

नव्याचे स्वागत मुक्त मनाने होत असले तरी जुन्याचे संबंध एकदम सोडावेत असेही घडत नाही. जुन्याचे नाते तोडू म्हटल्याने तुटत नाही. आपले नित्याचे बोलणे, वागणे, आपल्या चालीरीती, आपले सण व उत्सव, आपले प्रमुख संस्कार, आपली देवदैवते, आपले कुलाचार यांचे अज जे काय अवशिष्ट स्वरूप उरले आहे त्याचे धागेदोरे फार जुन्या घटनांशी गुंतलेले दिसतील. अत्याधुनिक आज अति प्राचीन काळाशी अनेक बंधनांनी जोडलेला दिसेल. आजच्या आपल्या वर्तनाची पाळेमुळे आपल्या प्राचीन संस्कृतीत असलेली आपणांस दिसतील. जुन्या पण भक्कम व चिवट अशा दोऱ्यांच्या अनेक सूक्ष्म धाग्यांचे जतन आपण आज कधी अजाणता, कधी जाणीवपूर्वक करीत आहोत. असे अनेक क्षेत्रांतील 'जुने दोरे – नवे धागे' व त्यांची गुंफण यांचे या पुस्तकात वर्णन केले आहे.

वाचकांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी की, सण, उत्सव, व्रते, कुलाचार देवदैवते, इत्यादींचें वर्णन या पुस्तकात वस्तुस्थितीचे दर्शन म्हणून केले आहे. त्या सर्वांचाच पुरस्कार करून त्यांचे माहात्म्य वाढवावे असा हेतू माझ्या मनात नाही. लोक–संस्कृतीच्या प्रगतीच्या ओघात जे चिवट व अतूट असेल ते टिकेलच. त्यास माझ्या पुरस्काराची जरूरी नाही. काळाच्या ओघात जे अनावश्यक आहे त्याचा मलाही तसा लोभ नाही. पण त्याच्या इष्टानिष्टतेच्या चर्चेसाठी हे पुस्तक नाही. मी फक्त येथे आजच्या आपल्या वर्तनाचा प्राचीन संदर्भ स्पष्ट केला आहे. वर्तमान काळातील अनेक पारंब्या

भूतकाळात कशा रुजल्या गेल्या आहेत त्यांचे हे दर्शन आहे. आजच्या आपल्या अनेक प्रेरणांचा व त्यांनुसार होणाऱ्या वर्तनाचा सांस्कृतिक वारसा कसा प्राचीन आहे त्याचे संक्षेपाने दर्शन या पुस्तकात घडविले आहे.

दुसरी एक महत्त्वाची बाब अशी की, मराठी वाचक माझ्या नजरेसमोर असल्यामुळे मी मराठी माणसाच्या वर्तनाचाच प्रामुख्याने आढावा घेतलेला आहे. अर्थात काही ठिकाणी जागतिक वा भारतीय संदर्भात मराठीचा सांस्कृतिक वारसा येतो; तेवढ्या प्रमाणात विवेचन भारतीय वा जागतिक पातळीवरूनही झालेले दिसेल. तरी मराठी वाचक दृष्टीसमोर आहे हे ध्यानात असावे.

'प्रसाद' प्रकाशनचे तरुण व उत्साही चालक श्री. मनोहरपंत जोशी यांनी रौप्य महोत्सवी प्रकाशनयोजनेत या पुस्तकास स्थान दिल्यामुळे मी त्यांचा आभारी आहे. या त्यांच्या लोभातून आणखी काही चांगले व संस्कृतिसंपन्न असे मराठी वाचकांना देण्याची मनीषा आहे.

'रेणुका' नवी पेठ
पुणे ३०

—प्र. न. जोशी

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | प्राचीन मानव आणि आपण | ७ |
| २ | आपला सांस्कृतिक वारसा | २२ |
| ३ | आपला वाणी विलास | ३६ |
| ४ | आपला लेखन विलास | ५४ |
| ५ | आपले सण–आपले उत्सव | ६३ |
| ६ | व्रते आणि कुलाचार | ८१ |
| ७ | जयंती आणि पुण्यतिथी | ९१ |
| ८ | असे देव–अशी दैवते | १०० |
| ९ | भारतीय क्षेत्रे आणि तीर्थे | ११० |
| १० | महाराष्ट्रीय क्षेत्रे आणि तीर्थे | १२५ |
| ११ | चालती बोलती संस्कृती | १३८ |
| १२ | संस्कारांतून इतिहासदर्शन | १४९ |
| १३ | अशी आपली प्रतीके | १५९ |
| १४ | भूपाळी ते शुभं करोती | १६८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकम
अनुक्रम ९००६० वि: ९
क्रमांक 2220 नों. दि: 28/3/63
मराठी ग्रंथ सं...
दा. क्र. 98...
... शाखा

# १ : प्राचीन मानव आणि आपण

आज विसाव्या शतकाच्या अखेरीस मानवाने भौतिक क्षेत्रात फार मोठी प्रगती केली आहे. विविध प्रकारच्या शास्त्रीय शोधांनी त्याने सुधारणांचा फार मोठा पल्ला गाठला आहे. आजचा माणूस रोज नव्या फॅशनचे कपडे वापरतो, डोक्यावरील केसांची ठेवण नव्याने करतो, वहातुकीसाठी नवे वाहन वापरतो, नव्या चवदार पदार्थांचा हव्यास धरतो, सर्व सुखसोयींनी युक्त अशा निवासस्थानात तो राहतो. आपण स्वत: इतरांपासून वेगळे, पुढारलेले आहोत असे तो दाखवितो. त्याचे वागणे, बोलणे नव्या सभ्यतेस धरून असते. इतके जरी असलें तरी आजही माणसाच्या वागण्याबोलण्यातून, त्याच्या विविध प्रकारच्या वर्तनांतून, त्याच्या आचारविचारांतून इतिहासपूर्व असा त्याचा प्राचीन पूर्वज अनेकदा डोकावून पाहतो. कित्येक हजारो अथवा लाखो वर्षांपूर्वीचा मानवसदृश प्राणी आजच्या माणसात दिसून येतो. आजच्या माणसास आजही कमरेच्या मागे मध्यभागी 'माकड-' हाड आहे. आजही तो 'जंगली' वर्तन करू शकतो. आजही त्याचे 'माकड चाळे' थांबले नाहीत. त्याच्या 'माकड' चेष्टा अद्यापही चालू आहेत. अनेक बाबतींत फार प्राचीन काळचा जंगली मनुष्य आजही माणसात निवास करून आहे.

प्राण्यांच्या संग्रहालयांतील माकडे पाहण्यासारखी असतात. ही माकडे बसली म्हणजे पुढच्या दोन हातांनी शेंगा सोलताना दिसतात. मध्येंच हाताच्या



पंजाने पाठ, डोके खाजवतात, वेडावणं दाखवितात, दात विचकतात, छातीशी धरून त्यांची मादी पोरांना गच्च आवळून ठेवते. या साऱ्या मर्कट-लीला अगदी आजच्या माणसासारख्या नव्हेत काय ? ही माकडे किंवा वानरे कित्येक वर्षांपासून शास्त्रज्ञांच्या अभ्यासाचा विषय बनली आहेत. मनुष्य एकाएकी निर्माण झाला असे आता कोणी मानीत नाही. सूक्ष्म आदिजीवा-पासून हळुहळू उत्क्रांत होत मनुष्य तयार झाला हे शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी सांगितलेले डार्विनचे मत आज पुष्कळ अंशांनी ग्राह्य धरले जात आहे. परमेश्वराने प्रथम अदाम निर्माण केला, त्याच्या सुखासाठी सहा दिवस प्रचंड मेहनत घेऊन ईश्वराने अदामसाठी सृष्टिरचना केली हे मत आता टिकण्यासारखे नसले तरी सातव्या दिवशी परमेश्वराने विश्रांती घेतली, तिची साक्ष आजही आपण सातव्या दिवशी रविवारी विश्रांती घेऊन कायम ठेवीत आहोत.

माकडे अथवा वानरे नाना प्रकारची असून ती आपली पूर्वपीठिका असावी की काय ? असा एक तर्क शास्त्रज्ञ करतात. पुच्छविहीन माकड अथवा कपी याचेही नाना प्रकार असून यांशी आताच्या माणसाचा संबंध जुळतो की काय ? गोरिला, गिबन, ओरँग-ओटँग इत्यादी पुच्छहीन माकडे आपल्यासारखीच हालचाल करताना दिसतात. ही माकडे सर्कशीत साय-कल चालवितात, टायपिंग करतात, उपयुक्त साधनांची जुळवाजुळव करतात, थोडे शिकविले की चित्रे काढतात. काही वर्षांपूर्वी नॅशनल जिऑग्रफिक मासिकाच्या एका अंकात चिंपाझी माकडाने काढलेल्या चित्रांचे आश्चर्यकारक नमुने आले होते ! आणि नवलाची बाब अशी की, त्यातील काही चित्रे आजच्या नवचित्रकलेशी स्पर्धा करणारी होती ! दक्षिण अमे-रिका, आफ्रिका, आशिया इत्यादी देशांतील या पुच्छहीन माकडांचा वा कपींचा अभ्यास आजही चालू आहे. त्यांचे 'मानसशास्त्र' बरेचसे आजच्या माणसाच्या वर्तनाशी जुळते की काय; याचा शोध शास्त्रज्ञ घेत आहेत. या माकडांचा वा कपींचा आजच्या माणसाशी साक्षात् संबंध नसला तरी ही माकडे व आजचा माणूस यांचा एक समान पूर्वज असावा असा शास्त्रज्ञांचा तर्क आहे.

म्हणूनच पुच्छहीन कपींचा, त्यांच्या वर्तनाचा अभ्यास आज होत

राहिला आहे. अजूनही जेन गुडॉलसारखी एखादी युवती आफ्रिकेच्या जंगलात निर्भयपणे राहते आणि चिपांझींच्या वर्तनाचा अभ्यास करते. त्यांचे राग लोभ, त्यांची वत्सलता, त्यांचे बसणे-उठणे, त्यांची समूहप्रियता, त्यांची संग्रहवृत्ती, त्यांची संकटांवर मात करण्याची धडाडी, त्यांची कल्पकता व धिटाई यांचा अभ्यास करता करता या प्राण्यांचे आजच्या माणसाशी असलेले नाते तिच्या लक्षात येते. हनु म्हणजे हनुवटी थोडी पुढे आलेली आहे असा हनुमान आपला आजचा एक प्रमुख देव आहे. हा हनुमान केसाळ आहे, त्याला पुच्छही आहे. तो बुद्धिमान व शक्तिमान असा असून वानरप्रमुख आहे. वाली, सुग्रीव, अंगद ही प्रमुख मंडळी 'वानर-' जमातीची मुख्य असावीत. हनुमंताने पुढाकार घेऊन अनेक 'वानरां'च्या साह्याने रामचंद्रास सेतुबंधनाच्या कामी मदत केली. हनुमंताने सीतेचा शोध घेतला. 'पडत्या फळाची आज्ञा' घेऊन रावणाचे उद्यान उध्वस्त केले. आपले आजचे दशावतारही या संदर्भात पाहण्यासारखे आहेत. मत्स्य, कूर्म म्हणजे कासव, वराह, नृसिह यांतून एक प्रकारची उत्क्रांतीच दिसून येत असल्याचा जाणत्यांचा तर्क आहे. मंदिराच्या प्रवेशद्वारी कूर्मास स्थान आजही आहे. नृसिंह तर अनेकांचे कुलदैवत बनला आहे.

आजच्या माणसाशी नाते जडेल असे काही प्राचीन मानव शास्त्रज्ञांनी शोधून काढले आहेत. आजच्या माणसाप्रमाणेच हातपाय असलेला, सपाट डोके पण मेंदूची वाढ झालेला आणि अग्नीचा उपयोग माहीत असलेला 'होमो इरेक्टस' शास्त्रज्ञांना सापडला आहे. आधुनिक माणसाशी आणखी जवळचे नाते सांगणारा व थोडा ताठ झालेला 'अर्ली होमो सॅपिअन्स'ही शास्त्रज्ञांच्या माहितीत आहे. आफ्रिकेतील ऱ्होडेशियन मॅन, जर्मनीतील निआँडरथेल मॅन, युरोपमधील क्रोमॅग्नॉन मॅन, जावा मॅन, पेकिंग मॅन इत्यादि विविध नमुन्यांवरून प्राचीन मानवाचा शोध शास्त्रज्ञ कसून घेत आहेत. त्यांच्या संशोधनामागे जिज्ञासा तर आहेच, पण आजचा मनुष्य अधिक चांगल्या रीतीने समजावा म्हणून ही सारी धडपड आहे. या संशोधनासाठी अनेक ठिकाणी उत्खनने सुरू आहेत. प्राचीन माणसाची हाडे त्याच्या कवटया, त्याची भांडीकुंडी, त्याची हत्यारे, त्याचे दागदागिने इत्यादींच्या अवशेषांबरोबर त्याची संस्कृती तर कळतेच, पण आज आपण

त्याच्याशी कसे संबंधित आहोत तेही ध्यानात येते. लक्षावधी वर्षांपूर्वी जमिनीत गाडले गेलेले प्रस्तरीभूत अवशेषही (Fossils) मानवाची प्राचीन कथा सांगण्यास उत्सुक असतात. जमिनीच्या पोटातील विविध स्तर वा थर म्हणजे पृथ्वीची एक प्रकारची दैनंदिनीच आहे. या दैनंदिनीच्या प्रत्येक पानावर आजच्या माणसाचे नाते दिसते. नव्या 'कार्बन–१४' या किरणोत्सारी साधनामुळे माणसाच्या अस्तित्वाचा काळही नक्की करता येतो. शास्त्रज्ञ सांगतात की, सुमारे १,७५०,००० वर्षांपूर्वी माणूस अस्तित्वात होता !

इतिहासपूर्व काळातील युगे मोजण्याची पद्धत ठरत आहे. सुमारे १०००,००० वर्षां पूर्वीचा अंदाज वरील साधनांनी काहीसा घेता येतो. तीनचार हिमयुगे होऊन गेली असावीत. प्राचीन प्रस्तरयुग, मध्य प्रस्तरयुग, नव प्रस्तरयुग अशी कालगणना आपल्या आजच्या पंचांगातील युगांच्या हिशेबासारखी वाटते. ब्राँझ, तांबे, लोखंड इत्यादी धातूंच्या उपयोगावरूनही नंतरच्या युगांचा अंदाज बांधला जातो. प्राचीन माणसाने वापरलेली दगडी हत्यारे त्याची कल्पकता स्पष्ट करणारी सापडली आहेत. फोडणे, तोडणे, खणणे, संरक्षण करणे या त्याच्या गरजा आजच्याप्रमाणेच होत्या. निरनिराळ्या उपयोगांसाठी निरनिराळी दगडी हत्यारे त्याने तयार केली. लक्षावधी वर्षांपूर्वी माणसाने तयार केलेली दगडी हत्यारे आज आपण वापरीत नसलो तरी दगड फेकून मारण्याची कला आजही आपल्या मुलांना अवगत आहे. दगडी वरवंट्यानेच आजही अनेक घरांतून चटणी वाटली जाते आणि दगडी उखळातच धान्य कांडले जाते. अनेक घरांतील जाती दगडाचीच आहेत. भाले, तिरकामठे, धनुष्यबाण, त्रिशूळ अशी काही जुनी हत्यारे वापरणारी वनवासी वा आदिवासी मंडळी आजही पृथ्वीच्या पाठीवर वावरताना दिसतात.

आदिमानवाचे वास्तव्य प्रामुख्याने गिरिकंदरांतील गुहांत होते. आजच्या आपल्या उंच हवेल्यांचे मूळ स्वरूप म्हणजे प्राचीन काळातील या गुहा. या गुहांच्या भिंतींवर आपल्या पूर्वजांनी काही चित्रे काढलेली आज आढळात आली आहेत. त्यासाठी आपल्या हाताच्या रचनेची उत्क्रांती झालेली दिसते. गोरिला, चिंपाझी यांच्यापेक्षा आपला हात अधिक कार्यक्षम झाला. बोटे सुटी झाल्यामुळे निरनिराळी कामे सुलभ झाली. त्यांचे चलन-

वलन वाढले, त्यांची पकड भक्कम झाली. पायांचा उपयोग आता मुख्यत: उभे राहण्यासाठी वा चालण्यासाठी होत राहिला. आपले माकडहाड, आपला जबडा, आपला मेंदू अशाच क्रमाने बदलत राहिला. आपल्या उंचीत फरक पडला. निसर्गाच्या उत्पातानंतर आपली फार प्राचीन काळी भटकंती सुरू झाली. परंतु गुहेत आणि गुहेच्या आसपास प्राचीन माणसाने ठेवलेल्या सांस्कृतिक खाणाखुणा आपल्यासाठी आज उपलब्ध आहेत. हत्यारांच्या वाढीबरोबर खरे म्हणजे माणसाचा विकास झाला. दगडी हत्यारापासून अणुबाँबपर्यंत माणसाने जी प्रगती केली ती संरक्षणाच्या मूलभूत प्रवृत्तीतून. थोडा अवसर मिळाला तेव्हा, जीवन स्थिर झाले तेव्हा, त्याने गवताची, झाडांच्या पानांची झोपडी बांधली, दूध व मांस देणारे प्राणी पाळले, साधे साधे धान्य जमिनीतून पेरायला सुरुवात केली. लांब पल्ल्याची हत्यारे तयार केली. साध्या साध्या होड्या बांधून मासे मारायला प्रारंभ केला. प्राचीन माणसाचे हे सारे अवशेष अगदी जसेच्या तसे खेड्यातून आजही पाहायला मिळतात.

प्रथम प्रथम त्याने गर्द जंगल साफ केले असावे. नदीच्या पाण्याच्या आसऱ्याने त्याने वस्ती केली असावी. जीवनकलहात टिकून राहण्यासाठी मारामारी, झोंबाझोंबी ही तर नित्याची बाब होती. झाडांच्या फळांचा व कंदमुळांचा स्वाद त्याच्या ध्यानी आला असावा. मांसासाठी प्राण्यांच्या शिकारीची नवी नवी साधने त्याने शोधली. लहान पक्षी, लहान मासा, लहान ससा यांच्यापासून हरीण आणि हत्ती यांसारख्या मोठ्या प्राण्यांच्या शिकारीत त्याने प्रगती केली. हाताच्या चारही बोटांपासून अंगठा अलग झाल्याने हत्यारावरील त्याची पकड भक्कम झाली व हत्यारांचा विकास सुलभ बनला. त्याच्या मेंदूची वाढ होत राहिल्याने तो अधिक कल्पक झाला. त्याच्या दातांची, नखांची शक्ती कमी झाली तरी त्याचे हत्यार अधिक कल्पकतेने बनत राहिले. काठी, सोटा अशी काही प्रारंभीची संरक्षणाची हत्यारे त्याने वापरली असावीत. पुढ त्यांनाच टोकदार बनवून फेकून देण्याची सोय झाली. मोठे हिंस्र पशू पिटाळून लावण्यासाठी या साधनांचा त्याने उपयोग केला. दगडी हत्यारांचेही प्रकार वाढीला लागून माणसाने त्यांपासून विविध सोयी निर्माण केल्या.

आज आपण नित्याच्या व्यवहारासाठी कितीतरी शब्द बोलतो. आपले मनोगत व्यक्त करण्याचे वाणी हे एक प्रमुख साधन आहे. आदिमानवाने पहिले पहिले शब्द कसे व कोणते उच्चारले, वस्तू, शब्द, अर्थ यांचे संकेत कसे ठरले ? इत्यादी प्रश्नांचा विचार भाषाशास्त्र करीत असते. माणसाची पहिली भाषा, मनोगत व्यक्त करण्याची पद्धत प्रामुख्याने हावभावांचीच होती. वाणीचा वा भाषेचा विकास नंतरचा आहे. डोळे वटारणे, मिचकावणे, नाक उडविणे, दात दाखविणे, हातांनी, मानेने खुणा करणे, ओठांची हालचाल करणे, ही त्याची प्राथमिक साधने आजही टिकून आहेत. हाताचे एक बोट दाखवून, दोन बोटे दाखवून, तीन बोटे दाखवून आजही आपण कधी कधी आपल्या प्राचीन पूर्वजांप्रमाणेच संख्या दाखवीत असतो. आपला राग, लोभ, मत्सर आजही आपण आपल्या चर्येवरून दाखवितो. आपल्या वाणीचा वा भाषेचा विकास पाहावयाच्या असेल तर लहान मूल भाषा कशी शिकते ते पाहावे. ब, ब, प, प करीत त्याचे शब्द आकारास येतात, त्यांतूनच बाबा-पापा, मामा या शब्दांची निर्मिती होते.

लहान मुलांच्या अनेक प्रवृत्तींचा विकास पाहिला की मानव, जातीचा इतिहास आपणांस मिळेल. इतकेच नव्हे तर गर्भधारणेच्या पहिल्या दिवसापासून नऊ महिन्यांचा गर्भविकास आपण पाहिला तर जीवाच्या उत्क्रांतीची थोडक्यात उजळणी आजही करता येण्यासारखी आहे. भाषेचे अथवा वाणीचे असेच आहे. तीही उत्क्रांत झालेली दिसते. आज आपणांजवळ पुष्कळ अंगाई गीते आहेत. पण गुहेतील आदिमातेने आपल्या रडव्या पोरास झोपविण्यासाठी जे पहिले वत्सल गीत एका सुराचे वा शब्दहीन म्हटले असेल ते सहज ध्यानात येण्यासारखे आहे. स्त्री-पुरुष यांच्या मानसिक संबंधांचे एक नवे शास्त्रच आज तयार झाले असले तरी पहिल्या पहिल्या दांपत्यांनी रंगात येऊन जी स्वरबद्ध गाणी म्हटली असतील तीच भाषेची उगमस्थाने मानणारे शास्त्रज्ञ आजही आहेत. शेतामधील धान्य काढताना आज 'भलरी दादा' चे गीत गातात. उसाच्या रसाच्या गुऱ्हाळात चरक फिरविण्याचे श्रम वाटू नयेत म्हणून रंगात येऊन फिरविणारे गाणे गुणगुणतात. डोक्यावरील भारा अव-

जड वाटू नये म्हणून लचकत मुरडत लोक आजही गाणे गातात. श्रम हलके वाटावेत म्हणून गाणे म्हणण्याची, तालबद्ध स्वरात गुणगुणण्याची प्रवृत्ती फार प्राचीन काळापासून आहे. जात्यावरील ओव्या याच प्रवृत्तीतून निर्माण झाल्या. श्रमपरिहारार्थ म्हटल्या गेलेल्या या प्राचीन गीतांतून आजची भाषा निर्माण झाली असावी असा हा एक तर्क आहे. आजच्या प्रमाणेच प्राचीन मनुष्य अनुकरणप्रिय होता. त्याने निसर्गातील ध्वनींचे अनुकरण करून अनेक शब्दांची देणगी आपणांस दिलेली आहे. चिवचिव करणारी चिमणी, कावकाव करणारा कावळा, म्याव म्याव करणारी माऊ, भोभो करणारा कुत्रा हे शब्द प्राचीन माणसाने आपणांस दिलेले आहेत. पालापाचाळयातून सर् सर् आवाज करीत जाणारा 'सर्प' आपणांस माहीत आहे. खूप उंचावरून कोसळणाऱ्या पाण्याचा धब्धब्धब् असा आवाज आपल्या पूर्वजांनी ऐकला व धबधबा हा सुंदर शब्द आपणांस दिला.

आज अग्नी निर्माण करण्याची अनेक साधने आपणांस माहीत आहेत. या उपयुक्त अग्नीस आपण काडयाच्या पेटीतील गुलात बंदिस्त व हुकमी करून ठेवले आहे. प्रकाश व उष्णता देण्याची मुख्य कामे आज विजेसारखी शक्ती करीत आहे. तरी प्राचीन माणसाने अग्नीचा लावलेला शोध हा फार फार महत्त्वाचा होता. त्याने बहुधा जंगलात लाकडावर लाकूड घासून तयार झालेला अग्नी पाहिला असावा. गारगोटीवर लोखंड आपटल्यावर निघालेली चमक त्याने पाहिली असावी. हा अग्नी धरून ठेवण्यासाठी त्याने विविध उपाय केले असावेत. पालापाचोळा, काटक्याकुटक्या जमवून त्याने अग्नी दीर्घकाल व हुकमी टिकावा म्हणून प्रयत्न केले. यातूनच अग्नीहोत्र वा यज्ञकल्पना उदयास आली असावी. उष्णता व प्रकाश यांचा लाभ त्याला अग्नीपासून झाला. अर्धेकच्चे मांस व धान्य अग्नीवर शिजविल्यास रूचकर लागते हाही अनुभव त्याला आला असावा. वीज, अणू, सूर्य यांची शक्ती उद्या मोठ्या प्रमाणावर वापरता येण्यासारखी असली तरी आज आपल्या घरी अग्नी हाच आपला प्रमुख सेवक आहे. त्याला आपण तर देव मानले आहे. या अग्निमुखातूनच आपण हविर्भाग देऊन इतर देवदेवतांना संतुष्ट करतो. या अग्नीसाठी शेकडो सूक्ते वैदिक काळात निर्माण झाली. आपण रोज जेवण करतो ते काही नुसते उदरभरण नाही, तेही एक

यज्ञकर्म असल्याची आपली श्रद्धा आहे. ही अग्निपूजा आजही वैश्वदेवाच्या रूपाने कोठे कोठे शिल्लक आहे. अग्निरूपी यज्ञ आजही जेव्हा केला जातो तेव्हा अरणीच्या साह्यानेच प्राचीन माणसाप्रमाणे आपण अग्नी तयार करीत असतो. पूर्वीप्रमाणेच आजही आपण प्रेताबरोबर धरूनच शिलगावलेली गोवरी नेण्याची चाल पाळीत असतो. आजही आपण अग्नीस नारायणस्वरूप मानतो.

थंडीचे दिवस आले की आपण केसाळ लोकरीचे शोभिवंत कपडे घालतो. सील माशाच्या केसाळ कातड्याचा देखणा गळपट्टा करतो. पण ही चाल प्राचीन माणसानेच पाडलेली दिसते. बर्फ पडू लागले की रेनडियर अथवा सीलच्या कातड्याची उबदार पांघरूणे आजही त्या त्या प्रदेशांत दिसतात. कपडे म्हटले की थोडे बेतणे, शिवणे, टाके घालणे आलेच. आज शिलाई यंत्रे दिसत असली तरी प्राचीन माणसाने यासाठी ओबडधोबड साधने बनविली होती. कातडे कमावण्याची त्याची पद्धत ओबडधोबडच असावी. गवे, म्हशी, रेडे, अस्वले इत्यादींची केसाळ कातडी कमावून त्याने ती लवचिक व हव्या त्या आकाराची बनविली. मेलेल्या अथवा मारलेल्या प्राण्यांची कातडी काढणे, त्यांचे मांस बाजूला करणे, हाडांचे दागदागिने करणे, चरबीचे दिव्यासाठी तेल बनविणे हे त्याचे उद्योग घरबसल्याच होत असावेत. कातड्याचाच दोरा दाभणासारख्या सुईत ओवून झोपडीत स्त्री कपडे शिवत असावी. टाके मोठे मोठे असले तरी भक्कम असावेत. शिवलेल्या कपड्यापासून शरीराच्या प्रमुख भागांचे थंडीवाऱ्यापासून रक्षण होत असावे.

प्राचीन माणसाचे घर अर्थातच गुहा अथवा फार तर एखादी लहानशी झोपडी असावी. झोपडी आज सर्वत्र टिकून आहे. गुहेच्या दाराशी अग्नी पेटलेला असून घरची धणीन मालकाने आणलेली शिकार त्यावर भाजत असल्याचे चित्र आपणांस कल्पिता येण्यासारखे आहे. पुरुषाने कमवावे व घरातल्या बाईने शिजवावे ही श्रमविभागणी फार पूर्वीपासून चालत आली आहे. स्त्रियांची संख्या कमी असेल तर एकेकीचे धनी एकापेक्षा अधिक असण्याची चाल द्रौपदीपर्यंत काही प्रदेशांत टिकून राहिलेली दिसते. प्राचीन माणसाच्या झोपडीत वा गुहेत ओबडधोबड लाकडांचे वा

दगडांचे ‘ फर्निचर ’ही असावे. त्यांची अंथरूणे मऊ पानांची उबदार व सुखावह बनली असावीत. कधी जमिनीखाली खड्डा खणून त्यावर झोपडी बांधून प्राचीन माणसाने तळमजला अथवा तळघर केले असावे. झाडांच्या फांद्यांचे त्याचे छप्पर आजही प्रचारात आहे. कुडाच्या भिंती मातीने सारवण्याची कल्पना भक्कमतेसाठी व देखणेपणासाठी त्याला सुचली असावी.

माणसाचे प्राचीन घर आजच्या अनेक खुणा सांगणारे असावे. चंद्र-सूर्य या देवतांची चित्रे काढून त्याने पूजा केलेली असावी. बारीक पांढरे शुभ्र दगड कुटून त्याने घरापुढे काही नक्षीदार रांगोळीकामही केले असावे. फुरसतीच्या वेळात, आनंदाच्या भरात त्याने गाणी गाईली असतील. आकाशातील तारकांकडे पाहून त्यांच्या निर्मितीविषयीचा प्रश्न त्याच्या मनात सहज आला, स्फुरला असेल. एकाएकी वादळ सुटले असेल, आकाशात काळेभोर ढग जमून विजांचा कडकडाट झाला असेल. या चमत्काराने तो प्रथम भांबावला असला तरी हा काय प्रकार आहे ? हा प्रश्न त्याच्या मनात उभा राहिला असेल. सूर्य रोज एक दिशेकडे उगवतो व मावळतो हे त्याला माहीत असले तरी सूर्याचे उगवणे व मावळणे एकाच स्थानावर होत नाही हेही हेरले असावे. चंद्राच्या वाढत जाणाऱ्या कला पाहून त्याला अचंबा वाटला असावा. चंद्राचे, सूर्याचे ग्रहण पाहून तर तो भयभीत झाला असावा. या प्राथमिक माणसाच्या जिज्ञासेपोटीच खगोलशास्त्राचा जन्म झाला आहे. झोपडीचे माप त्याने आपल्या हाताचा अंगठा वा करंगळी लांबवून घेतले असावे. कधी कोपरापासून पुढच्या हाताचा मापासाठी त्याने उपयोग केला असावा. वीत आणि हात ही त्याची मापे आजही प्रचारात आहेत. वस्तू मोजण्यासाठी, दिवस मोजण्यासाठी हातांच्या बोटांचा उपयोग प्राचीन माणसाप्रमाणे आजही आपण करतो. दोऱ्यात फुले ओवून प्रियकराच्या वियोगाचे दिवस मोजण्यातील काव्य अनेक कवींनी सांगितले आहे.

प्राचीन माणसाच्या जीवनास थोडे स्थैर्य आले तेव्हा त्याची संग्रहवृत्ती वाढली असावी. प्रतिकूल काळात उपयोगी पडणारे अन्न मुंग्यासारखे कीटकही साठवून ठेवतात. अपरिग्रहाचा म्हणजे जरूरीपुरताच संग्रह करण्याच्या व्रताचा सात्त्विकपणा सांगितला गेला असला तरी संग्रह

करण्याची प्रवृत्ती माणसात पूर्वीपासून आहे. उद्याची चिंता तो आज करीत असतो. अन्नाचा, धान्याचा, दागदागिन्यांचा संग्रह वाढला की भांड्याची गरज वाढते. मोठी भांडी जरूरीची वाटतात. ही भांडी पूर्वीपासूनच बहुधा भाजक्या मातीची, क्वचित प्रसंगी लाकडाची असावीत. खापरांच्या भांड्याचा हा थोर वारसा आजही खेड्यापाड्यात टिकून आहे. झाडांच्या सालीच्या अथवा कांबींच्या टोपल्या विणण्याची कलाही प्राचीन माणसास माहीत होती. याच कलेचा विकास करून त्याने जमिनीवर चटई अंथरिली आणि भिंतीस आडोसा निर्माण केला. पक्ष्यांची घरटी पाहूनही कदाचित त्यास ही विणकला प्राप्त झाली असावी. याच सुमारास संरक्षणासाठी त्याने शिकारी कुत्रे पाळले असावे. कुत्री, गाई, म्हशी, कोंबड्या, बकरी असा त्याचा संग्रह व परिवार वाढत गेला असावा. संरक्षण, सोबत, मांस, अंडी, दूध इत्यादींचा लाभ त्याला या पाळीव प्राण्यांपासून मिळाला असावा. घोडी आणि गाढवे ओझी वाहण्यासाठी त्याला उपयुक्त वाटली असावीत. बैलांकडून शेती करण्याचा त्याचा शोध तर आजही महत्त्वाचा मानला जातो. या बैलांसाठी आपण काही स्वतंत्र सण राखून ठेविले असल्याचे पुढे पाहूच.

आजच्या तुलनेने संस्कृतीची वाटचाल त्याने केव्हा चालू केली हे सांगता आले नाही तरी त्याने प्राचीन काळी गाणी गायिली, रांगोळीची चित्रे काढली, झोपडीच्या वा गुहांच्या भिंती चित्रित केल्या, आकाशातील तारकांविषयी कल्पना केली; ही त्याची एक संस्कृतीच. नग्नावस्थेतील मनुष्य कपडे वापरू लागला, अर्धेकच्चे मांस खाणारा मनुष्य अन्न शिजवू लागला. या संस्कृतीच्या प्राचीन वाटाच होत. एखाद्या दिवशी एखाद्या झोपडीतील मूल आजारी पडले असावे. त्यांना सडकून ताप आला असावा, त्या प्राचीन माणसाने झाडपाल्याचे औषध केले असावे. मुलाला गुण येत नाहीसे पाहून तो चिंताग्रस्त बनला असावा. त्याच्या मनात एक चमत्कारिक कल्पना येऊन गेली असावी. काही वर्षांपूर्वी त्याच्याच घरातील वडील मनुष्य मरण पावल्यावर त्याने त्याला शेजारीच कोठेतरी पुरून टाकले असावे. पुरताना प्रेताशेजारी काही धान्य वा अन्न ठेवले असावे. थोड्याच दिवसांत ते अन्न संपून गेल्यामुळे तो मरण पावलेला मनुष्य रागावला की

काय ? त्यानेच तर आपल्या मुलास ताप आणला नाही ? असे त्याचे विचारचक्र सुरू झाले असावे. यातूनच जादूटोणा, लोकभ्रम, अंगारेधुपारे, भूतपिशाचांच्या कल्पना उदयास आल्या आणि त्या आजही टिकून आहेत. भूतपिशाचे काहीतरी वाईट करतात आणि देव चांगले करतात या त्याच्या अनुभवातून वा विश्वासातून देवधर्माच्या कल्पना तयार झाल्या. जलप्रलय, स्वप्ने, रोगराई, मृत्यू इत्यादी घटनांशी त्याचे हे लोकभ्रम निगडित झाले व त्यांची परंपरा दीर्घकाल टिकून राहिली.

या देवदैवतांच्या व भुताखेतांच्या संतुष्टतेसाठी प्राचीन माणसाने नाना प्रकारच्या प्रार्थना रचिल्या. उत्सव सुरू केले. नृत्य व गायन यांची पद्धत बसविली. ड्रमसारखे प्राथमिक वाद्य तयार झाले. चेहऱ्यावरील चित्र-विचित्र मुखवटे तयार करून तो प्रसंगविशेषी नाचू लागला. नाचताना त्याचा पोषाख अधिक रंगीबेरंगी झाला. त्याच्या दागदागिन्यांत भर पडली. कान व नाक टोचण्याची आजची प्रथा फार पूर्वीच सुरू झाली. आपण आहोत त्यापेक्षा अधिक सुंदर दिसावे ही त्याची वृत्ती पूर्वीपासूनची आहे. हातात, गळ्यात, पायात त्याने हाडकांचे, चमकणाऱ्या गारगोटीचे दागिने घातले असावेत. केसांत रंगीबेरंगी पिसे खोवली असावीत. आजही आपणांकडे स्त्रिया अंगावर गोंदतात ना ? ही प्रथा फार जुनी आहे. अंगावर विविध रंगांनी चित्रे काढण्याची कल्पना पुरातन आहे. प्राण्यांचे दात, त्यांची हाडे इत्यादींचा उपयोग नवे दागिने करण्यासाठी त्याने केला असावा. विविध रंगांची कल्पना त्याला इंद्रधनुष्यावरून आली असावी. त्याची चित्रकला फार पूर्वीपासून रंगीत बनली आहे.

सामानसुमान वाहून नेण्यासाठी त्याला पुढे नवे साधन शोधावे लागले. वाहत्या पाण्यावरून लाकडाचा ओंडका तरंगत जात असल्याचे त्याने पाहिले. प्रसंगी त्याचा आधार घेऊन तो पाण्यावर तरंगलाही असावा. त्याच्या मनात सहज कल्पना आली – लाकडाच्या ओंडक्यातील मधला भाग खरवडून काढला तर ? खरवडून काढण्यासाठी त्याच्या जवळ प्रभावी हत्यार नव्हते. त्याने एक मोठी मशाल पेटविली असावी व तिच्या साह्याने ओंडक्याच्या गर्भातील बराचसा भाग जाळून काढला. ओंडका खोलगट बनला. ही या माणसाची पहिली होडी. या होडीपासून पाणबुडीपर्यंतचा

प्रवास मोठा मनोरंजक व उद्बोधक आहे. जलपृष्ठावरून प्रवास करण्यास, मासे धरण्यास त्याला आता सुलभ झाले. वजनदार वस्तू वाहून नेण्यास सोपे झाले, पण जमिनीवर वजन तो कसे वाहणार ? दर वेळी ओझे वाहणारा प्राणी उपलब्ध नव्हता. सरपटणाऱ्या गाडीसारख्या वाहनास दोरी बांधून ओढणारा प्राचीन मानव डोळ्यांसमोर आणता येईल. मारलेले सावज या सरपटणाऱ्या वाहनातून नेताना त्याला फार कष्ट होत होते. एकदा त्याने सहज डोंगराच्या पायथ्याशी उभे राहून पाहिले असावे. डोंगरउतरणीवरून झाडाचे एखादे खोड गडगडत येताना त्याने पाहिले. झाडाच्या या खोडाचा आधार घेऊन अवजड वस्तू पुढे ढकलण्याचा प्रयत्न त्याने केला असावा यातूनच त्याला चाकाची कल्पना सुचली असावी. दोन भली मोठी ओबडधोबड चाके, त्यांना जोडणारा आस; ही त्याची पहिली गाडी होय. प्राचीन माणसाने लावलेल्या चाकाच्या शोधानेच संस्कृतीची प्रगती होत राहिली. अवजड चाके वजनाने हलकी व्हावयास पाहिजेत, म्हणून त्याने चाकांच्या केंद्रबिंदूपासून काही अंतरावर परिघापर्यंतचा भाग खरवडून काढला. चाक हलके बनून त्याचे आरे तयार झाले. याच चाकावर पुढे लोखंडी धावा बसल्या, रबरी टायर्स बसले. बारीक घड्याळांपासून ते मोठमोठ्या कारखान्यापर्यंत आज जेथे तेथे चाकांचे राज्य दिसते. या गतिमान चाकाचा शोध प्राचीन माणसाने लावला तेव्हा एक मोठीच क्रांती झाली असे मानिले पाहिजे.

याच सुमारास त्याने आपल्या झोपडीभोवतीचे शेत नीट न्याहाळून पाहिले. पावसानंतर थोड्याच दिवसात हिरवेगार गवत उगवून आलेले त्याने पाहिले. धान्यकण पेरल्यावर, चांगली कणसे येतात हे त्याच्या ध्यानात आले. त्याने आपल्या धनिणीबरोबर पहिल्याने शेती सुरू केली, लाकडाच्या वा दगडाच्या अणकुचीदार साधनाने त्याने जमीन नांगरली असेल. हाताच्या मुठीने बी पेरले असेल. फुले, फळे देणारी झाडे त्याच्या ओळखीची झाली असावीत. पाळीव प्राण्यांची संख्या वाढली. शेती वाढली, संग्रह वाढला आणि यांतूनच मालकी हक्काची कल्पना उदयास आली. मालकी हक्कातून मतभेद, मत्सर, लोभ, वैरभाव निर्माण होऊन परस्पर झगडे झाले असतील. दोन गट तयार झाले असतील. समुदायात राहण्यातील

फायदे अनुभवास आले असतील. समुदायाचा नेता ठरून 'राजा' या कल्पनेचा जन्म झाला असेल. या 'राजा'ने काही नियम केले असतील. ही त्याची 'राज्यव्यवस्था'च म्हणा ना. त्याच्या वाणीस वा भाषेस सफाई-दारपणा आला. काही कथा, लोककथा, गीते यांची निर्मिती मौखिक स्वरूपात वाढली असावी. कोणी कोणते काम करावे याची विभागणी होऊन वर्णकल्पनेचा आरंभ झाला असावा. त्याच्या भांड्याकुंड्यांना विविध प्रकारचे आकार व रंग आले. त्यांच्यावर सुरेखशी नक्षी आली. ही भांडी तयार करण्याचे काम काही माणसांकडे आले. त्याच्या कपड्या-तून सुधारणा झाली. सूत कातणे, कापड विणणे या कलांत त्याने वाढ केली.

दूर गावी आपला निरोप पोचविण्यासाठी त्याने काही युक्त्या शोधून काढल्या. टेकडीवर जाळ करून, मशाली पेटवून त्याचे संदेशवाहन सुरू झाले. संदेशवाहनाची ही रीत अजूनही कोठे कोठे आहे. सिंहगड सर झाल्याचे शिवाजी राजांना जाळ झाला तेव्हाच समजले. कधी मोठमोठे ड्रम वाजवून, शंख वाजवून संदेश दिले, घेतले गेले. ब्रांझ, तांबे, लोखंड या धातूंशी त्याचा परिचय झाला तेव्हा तर त्याच्या जीविताची दिशाच पालटली. नदीच्या पात्रांतून, खाणींतून धातूंचा शोध घेण्याचा त्याचा हा नाद तर आजही वाढत्या प्रमाणावर आहे. लोहार, सुतार, सोनार, शिंपी यांची कामे निर्माण होऊन श्रमविभागावर समाज तयार झाला. गटागटाने प्रवास होत राहिला. वस्तूंची देवाणघेवाण होऊन व्यापाराचे सूतोवाच झाले. सूर्याच्या, चंद्राच्या उदयास्तावरून त्याला वेळेचे व वेळेच्या विभाजनाचे रहस्य समजू लागले. एका गटाने आकाशाचे निरीक्षण करून खगोल-शास्त्राचा प्रारंभ केला; एका गटाने प्राथमिक चित्रातून व्यक्त केलेले मनो-गत कायम राखण्यासाठी प्राथमिक लिपी तयार केली.

आजच्या माणसाचे अधिक ज्ञान व्हावे म्हणून शास्त्रज्ञ अशा प्रकारे प्राचीन माणसाचा शोध कसून घेत आहेत. प्राचीन माणसाच्या अभ्यासाचे आणखी एक महत्त्वाचे साधन म्हणजे अजूनही पृथ्वीच्या पाठीवर ज्या वन्य जमाती सुधारणेचा वारा न लागलेल्या आहेत त्यांचे निरीक्षण हे होय. सैबेरिया-ग्रीनलंडमधील एस्किमो, उत्तर अमेरिकेतील मोहॉक आदि रेड


इंडियन्स, नॉर्वे–स्वीडनमधील लाप्स, आफ्रिकेतील पिग्मीज अथवा बुशमेन, हिमालयातील शेरपा, नागा, ऑस्ट्रेलियातील आदिवासी यांच्या चाली-रीतींचा, देवधर्मांचा, भाषांचा, राहणींचा अभ्यास वाढत आहे. यांच्यापैकी पुष्कळांची सुधारणा आज होत असली तरी अजून त्यांच्या घरांत व वागण्यांत प्राचीन मानवाच्या खुणा दिसतात. आजच्या सुधारलेल्या माणसाचे रागलोभ अनेकदा प्राचीन काळाच्या वन्य वा जंगली माणसासारखे वाटतात. वरवर सभ्य दिसणारा मनुष्य एकदम एकेरीवर येतो, झुंज देण्यास प्रवृत्त होतो, मुठी आवळून हल्ल्यास तयार होतो, तेव्हा त्याचे नाते प्राचीन माणसाशी जडते. विविध धातू दळणवळणाची साधने, वाङ्मय, संगीतादि कला, शास्त्रीय शोध इत्यादी वगळून आधुनिक मनुष्य पाहाल तर तो बराचसा अजूनही प्राचीन मानवासारखा वाटेल. प्रेम, साहस, वात्सल्य, भीती, आश्चर्य, संग्रही वृत्ती, युद्ध करण्याची वृत्ती, अद्‌भुतावर विश्वास, भक्तीची भावना इत्यादी त्याच्या मूलभूत प्रवृत्ती थोड्याफार प्रमाणावर आहेत तशाच आहेत. प्राचीन माणसाचा शोध घेताना आपण एक प्रकारे आजच्याच माणसाचे निरीक्षण करीत असतो. आपली नृत्ये, गाणी, ग्रामीण गीते, व्रतेवैकल्ये अद्यापही प्राचीन माणसाशी संबंधित आहेत. पाऊस पडेनासा झाला की आपल्यांतले काही लोक अद्यापही लिंबाचा पाला कमरेस गुंडाळून देवास साकडे घालतात. सभ्यतेकडे वाटचाल करणारा अमेरिकन इंडियन अजूनही प्रसंगी जुन्या संदर्भातील ईगलडान्स्, वॉरडान्स करील. धूम्रपानासारखी व्यसने आधुनिक माणसाने प्राचीन माणसापासून घेतली आहेत. माणसाचे भावनिक विश्व तपासताना या प्राचीन माणसाचे ज्ञान शास्त्रज्ञांना फारच उपयुक्त होत आहे. भावनेच्या अतिरेकी उद्रेकाने शारीरिक बदल होतात, त्यांच्या अध्ययनास प्राचीन माणसाचा अभ्यास उपयुक्त होत आहे. आजच्या माणसाच्या शरीरातील विविध ग्रंथींचा अभ्यास करता तो प्राचीन माणसाप्रमाणेच संग्राहक वृत्तीचा, युद्धपिपासू असल्याचे आढळून आले आहे. मोठमोठ्या शहरांतून उंच इमारतींत ऐश्वर्याने राहणारा आजचा माणूस मूळ प्रकृतीने म्हणूनच प्राचीन माणसाचा वंशज शोभण्यासारखा आहे असे शास्त्रज्ञांना वाटते.

* * *

# २ : आपला सांस्कृतिक वारसा

आपल्या घरात भिंतीवर एखादे घड्याळ टांगलेले असते. त्यावरचे आकडे थोडे निरखून पाहा एकदा. I, II, III, IV, V म्हणजे एक, दोन तीन, चार, पाच असे ते आकडे असतील. X म्हणजे दहा, L म्हणजे पन्नास, C म्हणजे १००, D म्हणजे ५०० आणि M म्हणजे १००० अशा संख्या दर्शविणाऱ्या खुणा आपल्या परिचयाच्या आहेत. A. B. C. अशी इंग्रजी अक्षरे आज आपली मुले शिकतात, अंकांच्या या खुणा व ही अक्षरे रोमन आहेत हे तुम्हांस माहीत आहे? कोठे इटली, कोठे रोम, कोठे भारत; पण आजही आपण भारतीय या रोमनपरंपरेचे वारसदार आहोत. इंग्रजी बारा महिन्याच्या नावांतील मार्च, एप्रिल, मे, जून इत्यादि शब्द रोमन इतिहासाशी संबंधित आहेत. ज्यूलियस सीझर व ऑगस्टस सीझर या दोन थोर रोमन नेत्यांच्या नावांवरून आपले आजचे जुलै व ऑगस्ट महिने आले आहेत. ऑक्टोबर, नोव्हेंबर इत्यादि महिन्यांची नावेही रोमन आहेत. सॅटरडे म्हणजे शनिवारचे नाव रोमन देव सॅटर्न याच्याशी संबंधित आहे. एखाद्या छापील पुस्तकात मध्येच वळणदार पण तिरका टाईप लक्ष वेधण्यासाठी आपण वापरतो तो 'इटॅलिक' म्हणजे इटलीशी संबंधित आहे.

अशा प्रकारे रोम व इटलीमधील सांस्कृतिक वारसा आपण भारतीय आजही जपून ठेवीत आहोत. भारतीय ख्रिश्चनांपैकी अनेकजण रोमन कॅथॉलिक असून त्यांची प्रार्थनामंदिरे रोमन चर्च म्हणूनच प्रसिद्ध आहेत.



रोमचे प्राचीन साम्राज्य नष्ट झाले तरी त्याचा प्रभाव जागतिक संस्कृतीवर आजही दिसून येतो. रोमन कायद्यांची अजूनही वाखाणणी केली जाते. नेपोलियनची कायद्याची व्यवस्था फार महत्त्वाची मानली जाते, पण तिला आधार रोमन कायद्यांचा होता. रोमन साम्राज्याची वाढ, रोमन लोकांचे खेळ, त्यांची रोम, व्हेनिस्, नेपल्स इत्यादी शहरे, त्यांनी बांधलेले रस्ते यांचे आदर्श अनेक बाबतींत आजही मानले जातात. ‘ पब्लिक फोरम ’ हा शब्द आजकाल सर्वत्र ऐकू येतो. ‘ फोरम ’ म्हणजे कोणत्याही विषयावर मनमोकळी चर्चा करण्याचे स्थान. या स्थानावर कोणीही विचारवंत निर्भयपणे आपली मते मांडून राजकीय, सामाजिक सुधारणा सुचवू शकतो. राज्यसत्तेला वळण देणारी, मार्गदर्शन करणारी ‘ पब्लिक फोरम’ची परंपरा रोमन आहे. रोम येथे या संस्थेची पडझड झालेली असली तरी आपल्या सार्वजनिक आयुष्यात ती आपण जिवंत ठेविली आहे. भव्य पुतळे, चौकाचौकातील कारंजी, मंदिरे, चर्चेस, सार्वजनिक बागा व स्नानगृहे, स्मारकस्तंभ इत्यादींचा रोमन आदर्श आजही अनेक ठिकाणी पाळला जातो. कापड, काचेची भांडी, दागिने, मद्याचे पेले, लोखंडी हत्यारे, शिरस्त्राणे, शस्त्रे यांची निर्मिती रोमन असली तरी भारतीयांशी त्यांचा परिचय प्राचीन काळी होता. मूर्तिकला, चित्रकला, स्थापत्य इत्यादींची चर्चा करताना आपण लिओनार्दो व्हिची, मायकेलांजेलो, राफेल इत्यादी कलावंतांची व मोनालिसा, लास्ट सपर, डेव्हिडचा पुतळा, मोझेसचा पुतळा, व्हॅटिकन सिटीमधील छतावरील कारागिरी, लाओकूनचा पुतळा इत्यादी कलाकृतींची नावे रोमच्या इतिहासाशी संबंधित आहेत. ‘ अँफी थिएटर ’ आजही आपण पाहतो. पण त्याचा संबंध रोममधील वर्तुळाकार प्रेक्षागृहाशी, कलोझियमशी आहे. सिसॅरोचे वक्तृत्व, व्हर्जिलचे महाकाव्य, प्लुटार्कची चरित्रे, गेलनचे शरीरविज्ञान, मार्क्स ऑरिलिअसचे तत्त्वज्ञान यांचा प्रभाव आजही मानवी विचारधारेवर आहे. साऱ्या युरोपची सांस्कृतिक भाषा परवापरवापर्यंत लॅटिनच होती. अजूनही शास्त्रीय परिभाषेतील शब्द लॅटिनच असून ते साऱ्या जगात मान्य आहेत.

ख्रिश्चन धर्मास जोराचा विरोध रोमन परंपरेने प्राचीन काळात जरी केला असला तरी याच रोममध्ये शेवटी ख्रिस्ती धर्माचे आद्यपीठ निर्माण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ६००६० दि: ..१७......
क्रमांक ..२२२० ... नों: दि: २१/३/५५

झाले. रोम येथील व्हॅटिकन सिटीमधील पोप हा सार्वभौम धर्मप्रमुख आहे. भारताचा व रोमचा संबंध प्राचीन काळापासून व्यापाराच्या निमित्ताने असे. हस्तिदंत, मिरे, दालचिनी, सोन्यारुप्यांचे दागिने यांचा व्यापार प्रामुख्याने असे. तांदूळ, तूप, साखर, सुती व रेशमी कापड भारतातून निर्यात होई. मसाल्याचे पदार्थं, हिरे व माणके, मोर, पोपट, हत्ती, सिंह, गेंडे, सर्प इत्यादींची निर्यात व्हेनिसकडे होई. रोमन बादशहांची सुवर्णाची अनेक नाणी भारतात सापडली आहेत. नेवासे, नाशिक, कोल्हापूर, कऱ्हाड, तेर येथील उत्खननांत सापडलेल्या अवशेषांवरून रोमन संबंध ध्यानात येण्यासारखा आहे. उंची व कडक मद्य, काचसामान, उत्कृष्ट झिलईची तांबडी खापरे, त्यांवरील वेली व फुले यांची नक्षी, नानाप्रकारचे मद्यकुंभ, नाणी, थाळ्या इत्यादि वस्तूंचा संबंध या रोमनपरंपरेशी आहे. रोमन साम्राज्याचे व बायबलवर आधारलेले अनेक भव्य चित्रपट आजही आपणांस आवडतात. रोमन साम्राज्य हा एक दरारा वाटणारा शब्द आपणांस वाटतो. चांगल्या ठिकाणी नकळत आपण म्हणी वापरून जातो. काही म्हणी रोमशी संबंधित आहेत. रोम काही एका दिवसात बांधले गेले नाही. सर्व रस्ते अखेर रोमलाच मिळातात. रोमला गेल्यावर तेथील लोकांसारखे कपडे करावेत, वागावे. रोम जळत असताना नीरो फिडल वाजवीत होता– असे आपले आजचे वाक्चातुर्य रोमन परंपरेशी संबंधित आहे. रोमान्स किंवा रोमँटिक या नित्य वापरल्या जाणाऱ्या शब्दांचा अर्थही कोशांतून शोधण्यासारखा आहे.

आपण भारतीय म्हणवून घेतो. भारत ही आपली प्राचीन काळापासून मातृभूमी. आपणांपैकी बहुसंख्यांचा धर्म हिंदू, भाषा संस्कृत वा विविध प्राकृत वा वर्तमान बोली. समान देवदैवतांचा वारसा; असे थोडे एकजिनसी स्वरूप भारतीय संस्कृतीचे वाटले तरी ते अनेक अंगांनी संमिश्र आहे. आपल्या संस्कृतीवर आर्यांचा मोठा प्रभाव असला तरी त्यांच्याही आधी येथे स्थायिक झालेले नाग व द्रविड यांचाही वाटा भारतीय संस्कृतीच्या उभारणीत कमी नाही. नव्या संशोधनानुसार निरनिराळी हिमयुगे, जुने प्रस्तरयुग, नवे प्रस्तरयुग, ताम्रयुग, ब्राँझयुग, लोहयुग इत्यादि काळांतील प्राचीन माणसाचा अभ्यास भारताच्या संदर्भातही होत आहे.

तज्ज्ञांच्या मताने नेग्रिटो, प्रोटो ऑट्रोलॉईड, मंगोलॉईड, मेडिटेरियन, नॉर्डिक इत्यादि वंशांच्या लोकांनी प्राचीन काळात भारतात वसाहती केल्या असाव्यात. यांपैकी प्रथम कोण आले हे सांगता येण्यासारखे नसले तरी आर्यांच्या आधी पुढारलेलें व संस्कृती असलेले मानवसमूह भारतात होते असा निष्कर्ष आजच्या संशोधकांचा आहे. कदली, नारिकेल, तांबूल, वार्तिगण म्हणजे वांगे, जंबू कार्पास, शाल्मली, कुक्कुट, मातंग, बाण अशा संस्कृत वाटणाऱ्या शब्दांचा संबंध ऑस्ट्रिक परंपरेशी आहे राका म्हणजे पौर्णिमा ऑस्ट्रिक आहे. आपल्या अनेक पौराणिक कथा व रूपककथा ऑस्ट्रिक परंपरेतील आहेत. ब्रह्मांडाची कल्पना, अवतारांची कल्पना, कूर्माचा अवतार, मत्सगंधा; असे काही संदर्भ नव्या संशोधनानुसार ऑस्ट्रिक परंपरेशी निगडित आहेत.

कोल, मुडा, संथाल, इत्यादि आजचे आदिवासी समाज याच ऑस्ट्रिक अथवा द्रविडियन परंपरेतील आहेत. तमीळसारखी द्राविड भाषा संस्कृतपेक्षाही जुनी असल्याचे सांगितले जाते. आणि प्राकृत भाषांचीं परंपरा संस्कृतपेक्षा प्राचीन मानणारा एक पंडितांचा वर्ग आहेच. होमात हविर्भाग अर्पण करण्याची पद्धत आर्यांची व आपली आजची पूजाअर्चा द्रविडांची आहे हे आपण पुढे पाहणार आहोतच. महादेव, पार्वती, खंडोबा, जोतिबा, गणपती, हनुमान या दैवतांची प्रतिष्ठा द्रविडांनी वा नागांनी वाढविली. 'पूजा' हा शब्दच मुळी 'पू'- फूल या द्राविडी शब्दापासून झाल्याचे जाणते सांगतात. 'पत्रं, पुष्पं, फलं, तोयम्' ही पूजेची कल्पना गीतेत जरी रूढ झाली तरी ती द्रविडांशी संबंधित आहे. लिंगपूजा आजही जी प्रचारात दिसते ती द्रविडांकडून आली. आपल्या अनेक रूढी आजही द्राविड परंपरेमधील आहेत.

आजही आपण घरात व परिवारात मराठी भाषा बोलतो. तिच्यात अनेक शब्द व वाक्प्रयोग द्राविडी आहेत. भाषेतील प्रयोगासंबंधी पुढल्या प्रकरणात आपण विस्ताराने विचार करणार असलो तरी येथें द्राविडी परंपरा आपण आजही कशी जिवंत ठेविली आहे याचा विचार करू. 'द्राविडी प्राणायाम' तर आपल्या भाषेत वाक्प्रयोग म्हणून कायम झाला आहे. आपणा सर्वांचा एक श्रेष्ठ देव विठ्ठल अथवा पांडुरंग हा कर्नाटकी

असल्याचे प्रसिद्ध आहे ' कानडा हो विठ्ठलु कर्नाटकु । येणें मज लावियला वेधु ' असे ज्ञानेश्वरांनीच या देवासंबंधी म्हटले आहे. ' कानडें परब्रह्म ' म्हणून नामदेव याचे वर्णन करतात. महाराष्ट्र हा देशच उत्तरेकडील आर्य व दक्षिणेकडील द्रविड यांच्या संगमावर उभा आहे. अनेकदा दोनही ठिकाणची राजसत्ता एकच असे. शहाजी राजांची दक्षिणेकडे जहागिरी असल्यामुळे व त्या सुमारास कर्नाटकात बरीच घराणी गेल्यामुळे कन्नड-मराठीचा संबंध वाढीस लागला. आपल्या भाषेत ट्, ठ्, ड, ढ, ण, ळ् हे मूर्धन्य उच्चार द्राविडी भाषेतून आल्याचा तर्क भाषाशास्त्रज्ञ करतात. चेंडूफळीचा खेळ, विटीदांडूचा खेळ, कन्नड परंपरेतील आहे. वकट, लेंड, मुंड हे शब्द कन्नड आहेत. झक्कू, झूर्यो हे शब्द मराठीने अद्याप कायम ठेविले आहेत. 'अरिंगमिरिंग लवंगा तिरिंग', 'आपडीथपडी', 'आडगुळे मडगुळे' 'औंडक चौंडक दामाडू', ' आटक माटक चन्ने चाटक' इत्यादि खेळकर गीते कन्नड भाषेतून आली. ' ऐलोमा पैलोमा ' हे भोंडल्याचे गीत कन्नड परंपरेतील आहे. हरकांचफू व हप्पी कन्नड आहे ! अण्णा, अप्पा, आई, काका ही नात्यांची शब्दावली कन्नड आहे. बंडी, टोपी, लंगोटी, चिरगूट, उडीद, मटकी, कलिंगड, पडवळ, ओगराळे, गाडगे, तांब्या, कडबोळे, कडबू, कणीक, चुरमुरा, चिमटा, तागडी, पासंग, अडकित्ता, बांगडी, खिडकी, गच्ची इत्यादि शब्दांची मूळे कन्नड भाषेतील आहेत. इतकेच नव्हे तर आपल्या मराठीतील पहिले वाक्य ' चामंडरायें करविलें ' हे दक्षिणेकडे श्रवण बेळगोल येथील जैन परंपरेतील गोमटेश्वराच्या पुतळ्याच्या चौथऱ्यावर आहे,

अशा रीतीने आजच्या आपल्या आर्य अथवा हिंदू संस्कृतीवर अनेकांचे परिणाम झाले असल्याने आपल्या आचारविचारांत व वागण्याबोलण्यांत अनेक प्रकारच्या जुन्या दोऱ्यांचे धागे आपण आजही पकडून ठेविले आहेत. आपल्या ज्ञात इतिहासाच्या आरंभी सिंधूच्या काठची हडप्पा अथवा मोहेंजोदाडोची संस्कृती येते. याही संस्कृतीने फार मोठी देणगी आपणांस दिली आहे, ती आपण अनेक ठिकाणी जतन करून ठेविली आहे. वृक्षपूजा, वृषभपूजा, लिंगपूजा इत्यादि प्रकार या हडप्पा संस्कृतीमधून आपण आज कायम ठेविले आहेत. या परंपरेतील लोक द्रविडच असावेत

असा संशोधकांचा आजचा तर्क आहे. सिंधूच्या तीरावरील या संस्कृतीच्या शोधाचे पान अलीकडेच आपल्या ध्यानात आले आहे. सन १९२२ च्या सुमारास पुराणवस्तुसंशोधनखात्याचे राखालदास बॅनर्जी सिंधू नदीच्या परिसरात कुशाणकालीन एका स्तूपाचा शोध घेत असताना त्यांना पडक्या अवस्थेत एक विटांचे बांधकाम आढळले. काही मुद्राही मिळाल्या. अधिक खणून शोध घेता जमिनीखाली दडलेले एक टुमदार शहर सापडले. मोहेंजो-दाडो म्हणजे मृतांची टेकडी. हे सार्थ नाव या ठिकाणास मिळाले. दुसरे रावी नदीच्या काठी हडप्पा येथे याच संस्कृतीचे ठिकाण मिळाले. आणि भारताच्या इतिहासाचे एक नवे अद्भुत असे पान उलगडले गेले. संस्कृतीचा एक नवा धागा हाताशी आला. चांगले प्रशस्त वाडे, बांधीव रस्ते, प्रशस्त स्नानगृहे, बंदिस्त गटारे, पाणीपुरवठ्याची चांगली सोय, रस्त्यावरील रात्रीसाठी दिवाबत्तीची सोय, दुमजली–तिमजली घरे, विहीरी. बाजारपेठा, प्रार्थनामंदिरे इत्यादि आधुनिक थाट या शहरांतून होता. गहू, जव, तीळ, वाटाणा, खजुर, फळे, सोन्याचे, तांब्याचे दागिने, कर्णफुले, बांगड्या, पैंजण, कमरपट्टे, गळ्यातला हार, आंगठ्या असा नवलपूर्ण देखावा या संस्कृतीचा आहे. बैल, म्हैस शेळी, मेंढी, डुक्कर, कुत्रा, हत्ती, उंट या प्राण्यांची जपणूक होत असावी. प्राण्यांची चांगली खेळणी होती. नक्षीदार भांडी आणि विविध उपयोगांची हत्यारे असा थाट होता. पशुपतीचे उपासक असणारे हे लोक वृक्ष व सर्प यांची पूजा करीत. ही परंपरा आजही आपण कायम ठेविली आहे. यांच्या चित्रलिपीचे वाचन करण्याचे प्रयत्न आज होत आहेत. पुढे आर्यांचे ज्यांच्याशी सतत युद्धे झाली ते दस्यू हेच होत असा काही संशोधकांचा तर्क आहे.

हडप्पा संस्कृतीचा नाश कसा व केव्हा झाला याची नोंद इतिहासात नाही. आर्यांच्याशी केलेल्या युद्धात हे लोक संपले की एखादी नैसर्गिक आपत्ती या लोकांवर आली याचा अंदाज लागत नाही. एवढे मात्र खरे की, द्रविड व हडप्पा यांच्या परंपरांनंतर आर्यांचा प्रभाव भारतीय जीवनावर फार मोठ्या प्रमाणावर पडू लागला. याच पुस्तकात पुढे हिंदू सण, व्रते, उत्सव यांची माहिती येणार आहे. आर्यांचा वाङ्मयवारसाही आपण स्वतंत्रपणे पाहणार आहोत. येथे फक्त ठळक बाबींचा निर्देश करू. आजचे

आपले बहुतेक धार्मिक व सांस्कृतिक जीवन आर्यसंस्कृतिमय आहे. ब्रह्म निरूपण, तत्त्वचिंतन, धर्मविचार, अध्यात्म, भौतिक शास्त्रे यांच्या विकासाच्या खुणा आर्यांच्या वैदिक परंपरेत दिसतात. वैदिक धर्मच आज बहुतांशी आपल्या हिंदू धर्माच्या स्वरूपात उभा आहे. पुढे कालाच्या ओघात आधीच्या लोकजीवनाशी व धर्मकल्पनांशी काही मिळतेजुळते वैदिक धर्माने घेतले तरी तोच आजच्या हिंदू धर्माचा व लोकजीवनाचा गाभा आहे. चार वेद, सहा वेदांगे, सहा शास्त्रे, गीता, रामायण, महाभारत, भागवत आणि इतर पुराणे यांचाच विलक्षण प्रभाव आजही जनमानसावर आहे. गीतेचे पाठांतर होत आहे. तिच्यावरील देशी भाषांतील टीकांचे पारायण होत आहे. भागवतसप्ताह चालू आहेत. याच भागवतातून पुष्ट झालेला भागवतधर्म जनसामान्यांचा म्हणून लोकप्रिय बनला आहे. आजही लहान मोठे यज्ञ होत असताना दिसतात.

अग्नी, इंद्र, वरुण, मरुत्, सविता इत्यादि देवतांचे माहात्म्य आज जरी मागे पडले असले तरी भग-सूर्य-विष्णू यांचे महत्त्व वाढलेले दिसते. याच विष्णूचे दशावतार, विशेषतः परशुराम, राम, कृष्ण यांची महती वाढत आहे. हीच नावे आपल्या मुलांची आपण अनेकदा ठेवितो. मर्यादापुरुषोत्तम रामचंद्रास तुलसीरामायणाच्या निमित्ताने गोस्वामी तुलसीदासांनी गरिबांच्या झोपडीपर्यंत नेऊन पोचविले. सूरदासांनी कृष्णकथांना संगीताचा पेहराव चढवून भक्ती आणि गीतवाद्यादि यांचा उत्कृष्ट संगम साधला. चातुर्वर्ण्य व आश्रमपद्धती ही आर्यांच्या समाजरचनेची खास अंगे आज टीकेचा विषय झाली असली तरी त्यांचा प्रभाव या नाही त्या स्वरूपात टिकून आहे. आपला भक्तिविचार द्वैतावर आधारला असला तरी त्याला अद्वैताचे भक्कम असे अधिष्ठान आहे. शंकराचार्यांच्या अद्वैती तत्त्वज्ञानामुळे सामाजिक ऐक्यासही मदत झाली आहे. त्यांची स्तोत्रे व भाष्य यांचा अभ्यास आजही विद्यापीठांच्या स्तरावर होत असतो. शिव, विष्णू, गणेश, देवी व सूर्य या देवदेवतापंचायतनास आजही घरोघरी स्थान मिळालेले दिसेल. पंचायतनाची ही पूजा आचार्यांनी चालू केली. त्यांनी स्थापन केलेल्या द्वारका, बद्रिकेदार, जगन्नाथपुरी व शृंगेरी या चारही पीठांच्याबद्दल प्रतिष्ठित लोकांच्या मनात आदरबुद्धी आहे. आज वेदविरोधी

जो आवाज दिसतो त्याचेही धागेदोरे जुनेच आहेत. वेन, नहुष, चार्वाक इत्यादींची नावे या संदर्भात लक्षात येण्यासारखी आहेत.

आज भारतीय भूमीवर गौतमबुद्धाच्या धर्मास नव्याने उधाण येत आहे. जैनांचीही परंपरा वाङ्मय व तत्त्वविचार या दृष्टींनी भक्कम होत आहे. वैदिक धर्मातील अतिरिक्त कर्मकांड व यज्ञीय हिंसा यांच्या विरोधातून हे दोन धर्मपंथ उदयास आले व लोकमानसात घर करून बसले. मैत्री, करुणा, प्रेम, सद्भाव, अहिंसा, अस्तेय इत्यादि मानवी सद्गुणांचा पुन: पुरस्कार या दोन धर्मपंथांनी केला. त्याची साक्ष आजही पदोपदी पटते. 'सर्वं क्षणिकं क्षणिकम्' 'सर्वं दु:खं दु:खम्' 'शून्यं शून्यम्' इत्यादि थोर तत्त्वे आज लोकप्रिय होताना दिसतात. 'बहुजन सुखाय बहुजन हिताय' हा तर आजच्या राजकारणाचा परवलीचा शब्द बनला आहे. आजच्या आशियाने 'पंचशील' तत्त्वे स्वीकारली ती याच परंपरेतून. मोठमोठी लेणी, स्तूप, चैत्य, विहार, मंडप इत्यादींना आपण आज भेटी दिल्या तर या दोन संस्कृतींचा थोर वारसा ध्यानात येतो. यांच्याच प्रयत्नाने आपली जातिसंस्था शिथिल झाली. बौद्ध ग्रंथकार अश्वघोष यांच्या 'वज्रसूची' ग्रंथाचा पुरस्कार वीर सावरकर आजही करताना दिसतात. दिगंबर व श्वेतांबर या दोन जैनपरंपरा आज वाढताना दिसतात. बौद्ध धर्माची अनेक प्रतीके आपल्या शासकीय यंत्रणेने आज स्वीकारलेली आपण पुढे पाहूच. भारताचा इतर शेजारच्या देशांशी संबंध, शांततेविषयी आग्रह, तीर्थयात्रा, दानधर्म, मंदिरे, विवाह, मठ, स्तूप इत्यादींची वाढ, स्त्रियांचे स्वातंत्र्य, बहुजनात धर्मजागृती, स्थापत्य व शिल्पकला यांची वाढ; हा वारसा या दोन धर्मपंथांचा आजही लक्षात येण्यासारखा आहे. नालंदासारख्या विद्यापीठाची भग्नावस्थाही सहस्रमुखांनी या संपन्न वारशाचे निवेदन आज करू शकेल. याच बौद्ध धर्माच्या अवनतीपासून तांत्रिकांचे वाममार्ग काही काळ निर्माण झाले. त्यांचाही कोठेकोठे आविष्कार आजही दिसतो.

इतिहासकाळात लक्षात येण्यासारखा परकीय संस्कृतीशी आपला संबंध आला तो ख्रि. पू. चौथ्या शतकात ग्रीकांनी भारतावर आक्रमण केले तेव्हा. त्याआधी इराणच्या दरायसने स्वारी केली होती. व्यापारी संबंधांची

वाढ, शिल्पकलेत सुधारणा, खरोष्टी लिपीचे आगमन असा काहीं इराणी वारसा आपणांस मिळाला तो पुढे इस्लामी परंपरेत खूप वाढला. शिकंदराच्या स्वारीमुळे वैभवशाली ग्रीस राष्ट्राशी आपला संबंध आला. पाश्चात्य युद्धनीतीचा व प्रभावी हत्यारांचा आपला संबंध वाढला. शिस्तीचे माहात्म्य आपल्या ध्यानात आले, व्यापारात वाढ झाली, नाणी पाडण्याची कला सुधारली, गांधार शिल्पामधील पुतळयांच्या वस्त्रांवर चुण्या आल्या त्यांचा संबंध ग्रीक शिल्पकलेशी आहे. ताजिक हा ज्योतिषशास्त्रातील विषय आपण ग्रीकांपासून घेतला. पौलिश व रोमक ही दोन सिद्धान्तनामेही यावनी संस्काराची द्योतक आहेत. ग्रीक सौंदर्यदेवता व्हीनसशी आपला परिचय होऊन तिच्या नग्नप्राय पुतळयांची आवड आपल्या मनात निर्माण झाली. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉट्ल या त्रयीचा तात्त्विक विचार व वादपद्धती आजही आपण महत्त्वाची मानतो. लोकशाहीची प्राथमिक कल्पना ग्रीक परंपरेत होती. ती आपल्या गणराज्यांशी ताडून पाहण्याची सोय झाली. युक्लिड व आर्किमिडीज् यांची ओळख आपल्या मुलांना आजही करून घ्यावी लागते. अलेक्झांडरने तर आपणांस 'शिकंदर' हा शब्द बहाल केला आहे. राजकारण, शिक्षण, तत्त्वविचार, नाटयादि साहित्यकला, समाजसंस्था, सौंदर्याभिरुची यांवर ग्रीकांचा परिणाम साऱ्या जगातच झालेला दिसतो. ग्रीक परंपरेतील 'ऑलेंपिक' सामन्यांमुळे आपली मुले आजही नादावून जातात.

ग्रीकानंतर कुशाण, शक, हूण इत्यादि लोकांनी भारतावर आक्रमण केले, थोडेफार राज्य केले; आणि आजचा आपला भारत यांचाही थोडाफार वारसा सांभाळून आहे. 'क्षत्रप' ही छत्रपतीसारखी संज्ञा भारतीय राजकारणात याच वेळी सुरू झाली. तक्षशिला व मथुरा येथे शक-क्षत्रपांची राज्ये होती. क्षहरात, नहपान, रुद्रदामन, दक्षमित्रा ही परकीय नावे भारतीय झाली. या मानवी लोकांचे येथील लोकांशी शरीरसंबंध जडले. कुषाणांपैकी कनिष्काने तर काही काळ येथे साम्राज्य उभे केले. याच्या नावे काश्मीरमध्ये कनिष्कपुरा नावाचे शहरही निर्माण झाले. याची नाणी उत्तर भारतात पुष्कळ सापडतात. या कानिष्काची राजधानी पुरुषपूर आज पेशावर म्हणून प्रसिद्ध आहे. याने बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे त्याच्या नाण्यांवर ग्रीक,

इराणी, हिंदू व बौद्ध देवतांची चित्रे दिसू लागली. नागार्जुनसारखा रसायनवेत्ता व चरकसारखा धन्वंतरी याच्याच काळात उदयास आला.

भारतीय जीवनावर परकीय संस्कृतीचा सर्वांत मोठा परिणाम झाला तो इस्लामी धर्माचा. आजच्या लोकजीवनावर या पंथाचा एवढा मोठा खोल परिणाम आहे की, या पंथास परकीय म्हणणेही अशक्य आहे. इ. स. च्या आठव्या शतकापासून इस्लाम धर्मीयांनी भारतावर स्वाऱ्या करण्यास प्रारंभ केला. अरब, तुर्क, सुलतान, खिलजी, घोरी, मुघल इत्यादींनी वारंवार स्वाऱ्या करून येथे आपला प्रभाव पाडला. बाबर, हुमायून, अकबर, जहांगीर, शहाजान, औरंगजेब अशा समर्थ बादशहांनी येथे आपल्या संस्कृतीची वाढ केली. कत्तल, मूर्तीची, मंदिराची विटंबना, सक्तीचे धर्मांतर अशा अतिरेकातून देवाणघेणीच्या व सामंजस्याच्या मार्गावरही दोन जमाती आल्या. निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही इत्यादि राज्यपरंपरांतून इस्लामी धर्माची प्रतिष्ठा वाढली. पोषाख, रीतिरिवाज, भाषापद्धती, वाङमय, तत्त्वज्ञान, धार्मिक आचार इत्यादींवर फार मोठा परिणाम इस्लामी परंपरेचा आहे. सरकारी कागदपत्रे, बखरी, न्यायनिवाडे, कोर्टदरबारची भाषा यांवर फार्सी भाषेचा प्रभाव पडला तो याच काळात.

मराठी भाषेवर फार्सी भाषेचा इतका मोठा परिणाम आहे की, अनेक शब्द हे फार्सी आहेत याची ओळखही आपणांस नसते. बाब, मिळकत, दानत, सरकार, किल्ला, इनाम, तारीख, मजकूर, जिन्नस, वजा, बाकी, माफक, खुद्द, फलाणा, देखील, पुणे ते मुंबईमधील ते, ऐवजी, बद्दल, शिवाय, बरहुकुम, व, अगर, अबब, बस, अलबत्, शाबास, खबरदार, बिलकूल, हमेशा असे कितीतरी शब्द आज आपण वापरतो ते फार्सी भाषेतील आहेत. कीर्दखत, गोषवारा, ताळेबंद, अनामत, बेरीज, रुपये, आणे हे आपल्या जमाखर्चातील शब्द याच इस्लामी प्रभावातील आहेत. मुनसफ, नाझर, कारकून, फिर्याद, दावा, कैफियत, अर्ज, हुकुनामा हे न्यायालयीन शब्द फार्सी आहेत. सुभा, जिल्हा, तालुका, पेटा, परगणा, कसबा, पेठ, मौजे इत्यादि देशवाचक राज्यविभाग मुसलमानी परंपरेतून आपण आत्मसात केले. दौलताबाद, औरंगाबाद, अहमदनगर, अहमदाबाद, इलाहाबाद, बेगमपेठ इत्यादि आजची गावे जुना इतिहास सांगून जातात.

स्थापत्य, सार्वजनिक बागा, कलाकुसर, चित्रकला, संगीत, ऐष-आरामी वृत्ती यांवर आजही इस्लामी प्रभाव मोठा दिसतो. फत्तेपूर शिक्री, ताजमहाल, लालकिल्ला, गोलघुमट आणि अनेक मशिदी व दर्गे यांनी भारतीय जीवनावर संस्कार केलेला दिसतो. जिलेबी, रसगुल्ला, बिर्याणी, पुलाव, गुलाबजाम इत्यादि खाद्यपदार्थ आजही आपले आवडते आहेत. नाना प्रकारचे गुलाब, अत्तरे, गुलाबपाणी ही सारी इस्लामी परंपरेची देणगी आहे. आपल्या काजळाबरोबर सुरमा आला. तुळशीबरोबर सब्जा आला. पोवत्याबरोबर गंडा आला. विजार, सुरवार, ओढणी, पायजमा, चोळणा ही पोषाखपद्धती नव्याने आपण आत्मसात केली. तराणा, गझल, कवाली, इत्यादि संगीतप्रकार इस्लामी परंपरेने आपणांस दिले. आपली पूजाअर्चा, देवधर्म, पोथीपठण यांवरही इस्लामचा प्रभाव आहे. आपण आजही पीराला नवस करतो. दत्तोपासनेतील पादुकापूजेचे माहात्म्य आणि थोडा छानछोकीपणा या इस्लामी परंपरेतील आहे. जनार्दन स्वामी, एकनाथ यांना दत्ताचे दर्शन मलंगाच्या वा फकिराच्या वेषात होते. अनेक अवलियांना आजही आपण आपल्या सत्पुरुषांप्रमाणे मान देतो. इराणी आणि मुघली चित्रकला आजही आपल्या आवडीची आहे. जीवनाकडे ऐहिकतेने व रसिकतेने पाहाण्याचे शिक्षण या मुसलमानी परंपरेने दिल्याचे दिसून येईल. जातिभेदाचे उच्चाटण करण्याची प्रेरणा इस्लामपासून काहींनी घेतलेली दिसते. स्त्रीविषयक रंगेलपणा जगन्नाथ पंडित–लवंगी, बाजीराव मस्तानी यांच्या संदर्भात शोभून दिसतो असे मानण्याची वृत्ती आपली आहे. इस्लामी जीवनाचा मोठा मजेदार प्रभाव सातार्‍याच्या शाहू महाराजांच्या जीवनावर दिसून येतो. पेशवे रंग खेळतात, फुलांचा, प्राण्यांचा, अत्तरांचा, कपडयांचा, नाचगाण्याचा षोक करताना दिसतात. याच काळात ऐहिक प्रेमावर अथवा इष्कावर लावणीही तयार झालेली दिसते.

आपली आजची धार्मिक विचारधाराही नीट तपासून पाहिली तर तिचाही इस्लामशी संबंध दिसेल. नानकांचा शीखधर्म इस्लामला तोंड देण्यासाठी आक्रमक बनला तरी त्याने अनेक प्रेरणा या इस्लामपासूनच घेतलेल्या दिसतात. कबीरावर तर जन्मतःच इस्लामचा प्रभाव होता, आणि सूफी पंथाच्या प्रभावी प्रचाराने आपल्या धार्मिक आचारविचारांवर परिणाम

केलेला दिसतो. हिन्दी साहित्यातील प्रेमधारा या इस्लामी सूफींच्या परंपरेत विकसित झाली. मलिक महंमूद जायसीचे 'पद्‌मावत' काव्य आपणांस आजही आवडते. रसखान आणि श्रीगोंद्याचे शेखमहंमदबाबा आपलीच पुराणे देशी भाषेत सांगताना दिसतात. रानी केतकीची कहाणी, गुलबकावली, हतीमताई यांची गोडी आजही आपणांस आहे. आपल्या चित्रपटात तर उर्दूफार्सीमिश्रितच हिंदीचा वापर असतो. दिल्ली, गुलबर्गा, हैदराबाद. गोवळकोंडा येथील उर्दूचा प्रभाव आजही ध्यानात येण्यासारखा आहे. सूफींचे अनेक दर्गे आज आपणांस पूज्य वाटतात. ईश्वराविषयी स्त्रीभावाने आपण प्रेम करीत होतो; पण ईश्वर स्त्री व आपण तिचे प्रियकर हा प्रकार सूफी साधूंनी आपणांस दिला. प्रेमातील कडवेपणा, आत्मार्पण, हृदयाची धडधड, अश्रूंचा अतिरेक, हाय, हायची भाषा, विरहाची आग इत्यादि भाषा या परंपरेत वाढली. 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' आपली मुले आजही मोठ्या आवडीने वाचतात व या गोष्टींवरील चित्रपट हौसेने पाहातात.


आज आपण आधुनिक कालात विसाव्या शतकाच्या अखेरीस आहोत. आजची आपली अगदी मॉडर्न वाटणारी नवी संस्कृतीही अशी संमिश्र असून तिचे धागेदोरे फार जुन्या काळापर्यंत पोचतात हे आता स्पष्ट झाले असेल. अनेक अर्थांनी व अंगांनी आपण आज जुनीच संस्कृती जगत आहोत. संस्कृती या शब्दातच प्राचीनकाळाचे जतन व संवर्धन येते. युरोपीय राज्यकर्ते दीडशे वर्षांपूर्वी येथे आले तेव्हा तर त्यांनी आपले जीवनच पूर्णपणे पालटून टाकले. आपला दृष्टिकोण बदलला, रीतिरिवाज व वागण्याच्या पद्धती बदलल्या. आपला पोषाख बदलला. कोट, पँट, बूट, स्कर्ट, फ्रॉक यांची आवक झाली. आपल्या केसांची ठेंवण बदलली. आपली स्वयंपाकाची पद्धत बदलली. आपले जेवण टेबलावर होत आहे. इंग्रजी हटावच्या या काळात आपण झपाट्याने युरोप, अमेरिकेचे अनुकरण करीत आहोत. आपली मुले आज कॉन्व्हेंटमध्ये शिकायला जातात. रेल्वे, विमाने, रेडिओ, टेलिफोन, चित्रपट, वाङमय, टेलिव्हिजन इत्यादि आधुनिक प्रकारांनी आपले जीवनच पालटून जात आहे. आपल्या खाद्यपदार्थांत बदल होत आहे. आपल्या जेवणाच्या वेळा व पद्धती बदलत आहेत. एकमेकांना

अभिवादन करण्याची पद्धत बदलत आहे. असे असले तरी आपण आजही जुन्या भक्कम दोऱ्यांचे नवे धागे पकडून ठेविले आहेत. टेबलावर आपण जेवायला बसलो तरी पानाभोवती पाणी फिरवण्याची आणि चित्राहुती घालण्याची अडचण आपल्या आजही ध्यानात येते. आपल्या स्त्रियांनी पोषाखाच्या बाबतींत अजून परंपरा सोडलेली नाही. आपल्या नव्या इमारतींच्यासाठी अजूनही आपण भूमिपूजन करतो, वास्तुशांती करतो. घराच्या चौकटीला तोरण बांधतो, केळीचे खुंट उभे करतो. विजेच्या दिव्यांची आरास चांगली केली तरी समईची, पणतीची, निरांजनाची ज्योत अजूनही आपणांस प्रिय आहे. नव्याच्या स्वागताला तयार असलेले आपले मन अनेकदा जुन्या संस्कारांत रेंगाळत असते.

* * *

# ३ : आपला वाणीविलास

मुलांच्या हातात काचेच्या गोटया आल्या की कधी प्रत्येक गोटी ती डोळयांपुढे धरून पाहतात. त्या काचेच्या गोटीच्या पोटात त्यांना नाना रंगांच्या चित्रविचित्र रेषा दिसतात. गोटीच्या गर्भातील या विविध रंगी रेषा पाहून यांचे चित्त खुलून जाते. आपणही कधीकधी लहान मुलांसारखा हा छंद लावून घ्यावा. काचेच्या गोटीऐवजी रोजच्या व्यावहारिक बोलण्यातला एखादा शब्द निवडावा. त्याकडे निरखून पाहावे, त्यावर थोडी जिज्ञासेची फुंकर घालावी. मग त्या शब्दाच्या पोटातील रंगीत धागेदोरे आपणांस दिसतील. त्यांतले काही चिवट दोरे फार फार जुन्या काळापर्यंत रुजलेले दिसतील. ज्यांचे काही धागेच आपल्या हातात आज आहेत त्यांचे दोरे प्राचीन भूतकाळाच्या उदरात सापडतील. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक जीवनातील अनेक खुणेचे शब्द प्राचीन काळची आठवण करून देतील. आज आपण विसाव्या शतकाच्या अखेरीस आलो असून एकविसाव्या शतकाची स्वप्ने पाहात आहोत. औद्योगिक, यांत्रिक, अणू, अवकाश अशांसारखे नाव आज आपण या युगाला देत असतो. नवे विज्ञान, नवे संशोधन, नवी भौतिकसृष्टी, नवा तर्कवाद अथवा बुद्धिवाद या परिभाषेत आपण आजच्या काळाचे वर्णन करीत असलो तरी या वर्तमान काळाची पाळेमुळे प्राचीन इतिहासात फार खोलवर रुजलेली दिसतील. रोज शब्दांचा वापर करताना आपणांस जाणवत नाही, पण शब्द डोळयांसमोर


दत्त

धरावा. त्याला जिज्ञासेची टिचकी मारून बोलता करावा. आपल्या ध्यानी मनी नसलेल्या संदर्भाच्या कथा तो बोलू लागेल. आजच्या वर्तमानाचा धागा धरून या शब्दाच्या साह्याने आपणांस रामायण-महाभारताच्या, उपनिषदांच्या अथवा वेदांच्या काळापर्यंत प्रवास करता येईल. कधी वेदपूर्व संस्कृतीचाही धागा आपण अद्याप जपून ठेवल्याचे ध्यानात येईल.

लग्नाच्या वेळी नवरा-नवरीच्या डोक्यावर बाशिंग बांधतात हे आपणांस माहीत आहे. हा 'बाशिंग' शब्द जरा निरखून पाहा. 'विवाहाच्या वेळी काही जातींत वधू आणि वर यांच्या कपाळांवर भूषण बांधतात ते' असा शब्दकोशांतला अर्थही आपणांस माहीत असेल. पण या 'बाशिंगा'कडे थोडे अधिक चौकस बुद्धीने पाहा. बाशिंग या शब्दाच्या पोटात वेदसंस्कृतीच्या पूर्वीचे धागेदोरे सापडण्याचा संभव आहे. लग्नाच्या प्रसंगी नवरा हा नवरदेव असतो. त्याला देवाप्रमाणे सजवावयाचे असते. कोणाच्या देवाप्रमाणे ? या प्रश्नाचे उत्तर आर्यपूर्व संस्कृतीत सापडेल. सिंधू नदीच्या खोऱ्यात हडप्पा आणि मोहेंजोदाडो येथे जे उत्खनन झाले आहे त्यावरून तेथील लोकांच्या देवांच्या मूर्ती सापडल्या आहेत. हडप्पा येथील लोक मूर्तिपूजक होते. निसर्गशक्तीची पूजा करणाऱ्या आर्यांत मूर्तिपूजा नव्हती. नंतर आलेल्या आर्यांचे आधीच्या लोकांशी झगडे झाले. आर्यांचे शत्रू अथवा दस्यू म्हणजे सिधू संस्कृतीतील लोक. यांच्या देवांच्या कपाळावर दोन मोठी शिंगे असत. कपाळावरची दोन शिंगें आणि देवत्व यांची खूणगाठ बांधून तिची स्मृती आजही आपण 'बे-बाशिंगा'मध्ये जतन केली आहे. कपाळावर बांधलेली शिंगे 'भालशिंग' बनले. यातून बाशिंग आजही टिकून राहिले. अशा रीतीने आजचे बाशिंग हडप्पा संस्कृतीमधील देवांच्या 'भालसिंगा'चा अवशेष आहे. पाच हजार वर्षांपूर्वीच्या या भक्कम अशा सांस्कृतिक दोऱ्याचा धागा आजही आपण पकडून ठेविला आहे. एखादा मुलगा वडील माणसाचे न ऐकता आपल्याच नादात वा तंत्रात वागू लागला की आपण त्याला छांदिष्ट म्हणतो. या छांदिष्ट शब्दाकडेही जरा टक लावून पाहा. याचे मूळ वैदिक परंपरेत दिसून येईल. छंदस म्हणजे थोड्याफार नियमांचे बंधन असणारे वैदिक वृत्त. नंतरच्या काळात निर्माण झालेले काटेकोर व्याकरणाचे नियम वैदिक छंदांना लागत नाहीत. म्हणून

नियमात जखडून न राहणारा, स्वैरपणे वर्तन करणारा जो कोणी असेल त्यास अजूनही आपण छांदिष्ट म्हणतो. भरपूर, पूर्ण काठोकाठ यांसाठी आपण ओतप्रोत शब्द आजही वापरतो. याही शब्दाचे मूळ वैदिक परंपरेत सापडेल. विणकामातील आडव्या धाग्याला ओत व उभ्या धाग्याला प्रोत (तंतू) असे म्हणतात. 'कस्मिन्नु खल्वाप ओताश्चप्रोताश्च,' 'कस्मिन्नु खलु वायुरोतश्च प्रोतश्च', 'एताभिः सर्वमिदमोतप्रोतम्', 'ओतश्च प्रोतश्च ओंकारः' अशा उपनिषदकालीन शब्दयोजनेत आजचा ओतप्रोत शब्द आपणांस सापडेल.

दोन भावाभावांत अथवा कुटुंबांत सख्य राहिले नाही, भांडणे आणि कटकटी वाढू लागल्या, मारामारी होत राहिली की आपण म्हणतो, काय यादवी माजली आहे ? या 'यादवी'चा संबंध कृष्णाच्या आयुष्याच्या अखेरीस पिंडारक क्षेत्राच्या ठिकाणी मदिरेने बेभान होऊन यादव आपापसांत भांडत राहिले व या भांडणापायीच त्यांचा नाश झाला, या महाभारतकालीन शोककारक घटनेशी आहे. भावाभावांत अथवा मित्रामित्रांत तीव्र कलह झाला व ते एकमेकांस मारावयास उठले की आपण म्हणतो त्यांची सुंदोपसुंदी जुंपली, अथवा सुरू झाली. सुंदोपसुंदी हे काय प्रकरण आहे ? शब्द उच्चारतांना आपणांस या शब्दातील प्राचीन कथेचा संदर्भ ध्यानात नसतो. पण थोडया विचारान्ती हा शब्द आपली जन्मकथा सांगेल. हिरण्यकशिपूच्या वंशातील निकुंभ नावाच्या दैत्याचे पुत्र सुंद व उपसुंद होत. यांनी विंध्य पर्वतावर तप करून ब्रह्मदेवापासून वर मिळविला. या वरामुळे उभयता एकमेकास न मारतील तरच ते अजरामर राहतील. यामुळे हे बंधू अतिशय तापदायक व जुलमी बनले. यांचा नाश होण्याशाठी इंद्राने विश्वकर्म्याकडून जगातील तिळातिळाएवढे सौंदर्य एकवटून तिलोत्तमा नावाची एक लावण्यवती स्त्री निर्माण केली. हिच्या प्राप्तीसाठी सुंद व उपसुंद एकमेकाशी भांडले, मरून गेले. आणि आजच्या आपल्या भाषेत सुंदर स्त्रीचे रूप 'तिलोत्तमा' शब्दात राहिले व हिच्यासाठी भांडण करून मरण पत्करणाऱ्या भावांच्या झगडयास सुंदोपसुंदी हे नाव मिळाले. एखाद्या सुंदर स्त्रीसाठी झगडा करणाऱ्या भावाभावांच्या वैरास आपण कित्येक शतकांपासून सुंदोपसुंदी या शब्दात पकडून ठेविले आहे.

भांडण वाढवून कोणी आदळआपट केली, थयथयाट केला की आपण म्हणतो, त्याने अकांडतांडव केले. या शब्दातील तांडव शब्द प्रलयकारी शिवशंकर करीत असलेल्या तांडव नृत्याशी संबंधित आहे. अकांड म्हणजे अकस्मात. तांडव म्हणणे शिवाचे स्मशानातील भूतापिशाच्यासमवेत भयंकर नृत्य ! आज नित्याच्या परिचयात असलेला ' सागर ' शब्द जरा निरखून पाहा. इक्ष्वाकू कुलातील एक प्रसिद्ध व पराक्रमी राजा सगर हा होय. याच्या अश्वमेध यज्ञाचा श्यामकर्ण अश्व इंद्राने हरण केला. सगर व त्याचे पुत्र त्याचा शोध करू लागले. अश्वाचा कोठेही पत्ता लागेना म्हणून त्यांनी समुद्रही खणून काढला. समुद्राचा शोध केला सगरपुत्रांनी, म्हणून या पराक्रमाची साक्ष आपण सागर शब्दात जपून ठेविली आहे. एखाद्याने फार मोठे जिवापाड प्रयत्न केले की आपण त्याने भगीरथ प्रयत्न केले असे म्हणतो. सगरपुत्रांच्याच वंशात राजा भगीरथ जन्मला. आपल्या पूर्वजांना मोक्ष मिळावा म्हणून भगीरथाने दीर्घ तपश्चर्या करून स्वर्गातील गंगा पथ्वीलोकावर आणली. भगीरथाने अतिशय प्रयत्नाने गंगेच्या काठी वसाहत केली. त्याच्या या महान वसाहतकर्माची खूण आपण आजही 'भगीरथ प्रयत्न ' या शब्द प्रयोगात जपून ठेविली आहे. याच भगीरथाची आठवण म्हणून आपण गंगेस भागीरथी म्हणतो. स्वर्ग व थोर पुण्य देणाऱ्या या गंगेचे वा भागीरथीचे केवढे माहात्म्य आजही रोजच्या नित्य व्यवहारात आपण जपून ठेविले आहे !

गंगेच्या पाण्याची अंघोळ म्हणजे केवढे आपले सद्भाग्य ! आपल्या घरी स्नानाचे पाणी आपण ज्या भांड्यात घेतो त्यास 'घंगाळ' असे नाव आहे. डोक्यावर पाण्याने भरलेली तपेली घेताना व गंगा, गोदा, यमुना इत्यादि तीर्थांचे स्मरण करताना जरा या 'घंगाळा'कडे पाहा ना. तुम्हांला तेथे 'गंगालय' दिसेल ! या पवित्र गंगेस आपण आजही अनेक शब्दप्रयोग व वाक्प्रयोग यांत साठवून ठेविले आहे. गंगाजमनी, गंगाभागीरथी, डोळ्यांतील गंगायमुना, आळशावर गंगा येणे, वाहत्या गंगेत हात धुणे, गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास, वाहिली ती गंगा राहिले ते तीर्थ, अशा अनेक वाक्प्रयोगांत आपण आपली पुरातन गंगासंस्कृती जतन करून ठेविली आहे. एखाद्या गोष्टीची अगदी सीमा अथवा हद्द झाली की आपण म्हणतो

'गंगेत घोडे नहाले.' हा वाक्प्रयोगही तुम्हांस मराठ्यांचा इतिहास सांगेल. मराठेशाहीत भीमथडीची तट्टे गंगेचे पाणी पिऊन पराक्रमाची शर्थ करीत.

आपल्या नित्याच्या बोलण्यातील असे शेकडो शब्द व वाक्प्रयोग आपणांस प्राचीन काळातील संस्कृतीचे दर्शन घडवतील. एखादा मुलगा फार बुद्धिमान व कर्तबगारी दाखविणारा दिसला की आपण म्हणतो, हा पोरगा चाणाक्ष आहे. हा चाणाक्ष शब्द आपले नाते आर्य चाणक्याशी सांगताना दिसतो. एखाद्या व्यक्तीने काही फार चांगली कृत्ये केली की आपण म्हणतो 'शाब्दास आहे तुझी.' या बोलण्यातील शाब्बास म्हणजे इराणचा फार चतुर बादशहा शहा अब्बास आपल्या डोळ्यांसमोर यावयास हवा. रागीट मनुष्यास आजही आपण जमदग्नी म्हणतो. उदार माणसास कर्णाचा अवतार म्हणतो. मत्सरी स्त्रीस कैकेयी म्हणतो. फार झोपणाऱ्या माणसास कुंभकर्णाचा अवतार समजतो. धड इकडे ना तिकडे असणाऱ्या माणसाची अवस्था 'त्रिशंकू' सारखी असते. भांडणे लावणाऱ्या माणसास आपण कळीचा नारद म्हणतो. धनाढ्य माणसास आपण कुबेर म्हणतो. रागाने आरडाओरडा एखादा मनुष्य करू लागला की आपण म्हणतो त्याने नृसिंहाचा अवतार धारण केला आहे. एखाद्याची लांबत चालणारी गोष्ट आपणास मारुतीच्या शेपटीप्रमाणे वाटते. कठोर प्रतिज्ञा करणारा आजचा मनुष्य आपणांस भीष्म वाटतो. अंथरुणावर मरणयातना भोगणाऱ्या माणसाबद्दल बोलताना आपण म्हणतो–तो शरपंजरी पडलेला आहे. या शरांच्या म्हणजे बाणांच्या अथवा शर नावाच्या गवताच्या अंथरुणाचा संबंध भीष्माचार्यांशी आहे हे आपण जाणीत नाही. द्वेष, मत्सर करणारा व कपटनीती जाणणारा शकुनीमामा आजही आपल्या परिचयाचा आहे. कपटाने प्राण घेणारी पूतनामावशी आज आपल्या भाषेत टिकून आहे. एका डोळ्याने आंधळ्या असणाऱ्या माणसास आपण शुक्राचार्य म्हणतो. बुटक्या माणसास आपण वामनमूर्ती म्हणतो. एखाद्याचे चांगले नशीब पाहिले की आपणास शिकंदराची म्हणजे अलेक्झांडरची आठवण होते. विद्वान बापाच्या मूर्ख मुलास पाहून आपणांस सूर्यापोटी शनीश्वर आठवतो. भयानक स्त्री पाहून आपणांस रामायणकाळातील हिडिंबा लक्षात येते, शूर्पणखेची आठवण होते. गबाळ आणि धष्टपुष्ट स्त्री पाहिली की आपण

तिची तुलना खंडोबाच्या स्त्रीशी– म्हाळसेशी करतो. कपटी आणि कारस्थानी स्त्री आपल्यामते पेशवाईतील राघोबाची आनंदीबाई असते.

तुमच्याआमच्या बोलण्यात फार जुन्या काळच्या घटना, व्यक्ती, स्थळे, परंपरा यांना आजही आपण जिवंत करून ठेविले आहे. पडत्या फळाची आज्ञा घेऊन एखादा घरातून जातो तेव्हा आपण रामायणातील कथासंदर्भाचा उल्लेख करीत असतो. मारुती सीतेच्या शोधासाठी अशोकवनात जातो. सीतेची भेट घेतो. यावेळी त्याला भूक लागलेली असते. फक्त पडलेली फळे खा, झाडावरची तोडू नकोस, अशी सीतेची परवानगी घेऊन तो अनेक वृक्षच मुळांसकट उपटून टाकतो. थोडीशी परवानगी मिळताच वाटेल ती अचाट गोष्ट करण्याची वृत्ती अशा रीतीने रामायणाशी संबंधित आहे. राम आणि रामायणकथा तर आपल्या रोज बोलण्यात कधी स्पष्टपणे तर कधी सूचितपणे येत असते. मारुतीच्या एकंदर कामगिरीवर सीता प्रसन्न झाली व तिने त्याला एक रत्नमाला दिली. रामभक्त मारुतीने एकएक रत्न फोडून त्यात राम आहे का हे पाहण्यास सुरुवात केली. ज्यात राम नाही तो पदार्थ कितीही मूल्यवान असला तरी त्याची किंमत शून्य मानताना आपण 'राम नसणे' हा शब्दप्रयोग आजही वापरतो. रामाचा बाण कधीही व्यर्थ जात नसे. हे ध्यानात घेऊन व्यर्थं न जाणारे, हटकून गुण देणारे औषध आपणांस रामबाण वाटते. आयुष्याच्या अखेरीस मुखातून राम-नाम यावे अशी आपली इच्छा असते. ' हे राम ' हे गांधींच्या मुखातले शेवटचें शब्द होते. अखेरीस त्याने राम म्हटला, असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा अंतकाळी रामाच्या स्मरणाने जीविताची सार्थकता व्यक्त करीत असते. ' राम बोला भाई राम ' या गजराचा ध्वनी स्मशानवाटेकडे आजही होत असताना आपण पाहतो. सुखी आणि समृद्ध राज्याचा आदर्श रामराज्य मानला जातो. कृष्णाने एकदा एका गवळ्याच्या दाढीची व त्याच्या बायकोच्या वेणीची गाठ मारली होती, ती सुटता सुटेना. यावरून जी गुंतागुंत सोडविता येत नाही तीस कृष्णग्रंथी असे म्हणतात. कपटाचरणाने एखाद्यास फसवायचे झाले तर कृष्णकारस्थान करावे लागते. कृष्णाने सांगितलेली गीता कोणास समजेनाशी झाली तर गाढवापुढे वाचली गीता या शब्दांनी आपण त्याचे अनाडीपण व्यक्त करतो.

असे आपले रोजचे बोलणे वेद, उपनिषदे, गीता-भागवतादि पुराणे आणि अनेक ऐतिहासिक प्रसंग यांत गुंतलेले असते. एखाद्याने फार मोठ्या आपत्ती पचवून टाकल्या तर आपण म्हणतो त्याने हालाहल पचविले. समुद्रमंथनाच्या वेळी उत्पन्न झालेले भयंकर विष शिवाने प्राशन करून देवासुरांची भीती दूर केली. आज आपल्यांपैकी कोणाचे तरी नाव नीलकंठ असेल. परंतु या नावाचा इतिहास या समुद्रमंथनाशी जाऊन भिडतो. हालाहल प्राशन केल्याने कर्पूरगौर शरीराचा शंकर नीलकंठ झाला ! राम, कृष्ण, शिव, दत्त या प्रमुख दैवतांशी आजही आपले धागे-दोरे घट्ट आहेत. साधुत्वाचा डौल आणून कोणी फसवू लागला तर त्याला आपण माभळ-भट म्हणतो. याचे मूळ बालकृष्णाच्या चरित्रात आहे. एक राक्षस महाबळ-भट्टाचे सोंग घेऊन कृष्णाला मारण्यासाठीं गोकुळात आला असल्याची कथा प्रसिद्धच आहे. दत्तात्रेय भिक्षेस केव्हाही अकल्पितपणे येतात अशी समजूत असल्यामुळे कोणी अवचितपणे आल्यास आपण हा दत्त म्हणून उभा ! असे म्हणतो. 'गुरुदेव दत्त' असे म्हणून दाराशी उभे राहणारे फकीर, गोसावी आजही आपणांस दिसतात. मायाबाजार अथवा घटोत्कची माया हे शब्द अजूनही आपल्या प्रचारात आहेत. भीम व हिंडिबा राक्षसी यांच्या मुलास, घटोत्कचास आपण विसरलेलो नाही. वत्सला व अभिमन्यू यांच्या विवाहप्रसंगी कौरवांना फसविण्यासाठी एक मायाबाज़ार भरविला होता. त्या बाजारात जुनी वस्तू देऊन नवी मिळत असे. पण ती नवी वस्तू घरी आली की नाहीशी होत असे. असा फसवा-फसवीचा व्यवहार पाहिला की त्याला आपण मायाबाजार म्हणतो.

एखाद्याचे ज्ञान बेताचेच असेल तर आपण त्याच्या ज्ञानास अथवा अध्ययनास अकटोपासून विकटोपर्यंत म्हणतो. एखाद्या चांगल्या शुभका-र्याच्या वेळी संकल्पास सुरुवात करताना, गणपतीस वंदन करताना 'सुमुखश्चैक-दंतश्च कपिलो गजकर्णकः । लंबोदरश्च विकटो विघ्ननाशो गणाधिपः ॥' असा पहिला मंत्र म्हणतानाही एखादा सामान्य अडाणी माणूस विकटो-पर्यंतच थांबतो म्हणून त्याचे ज्ञान अकटोपासून विकटोपर्यंत समजावयाचे. कधीही पुरा न करण्याचा वायदा अगस्तीचा म्हणून प्रसिद्ध आहे. फार पूर्वी केव्हा तरी हिमालयपर्वत व विंध्यपर्वत यांच्यांत उंचीबद्दल स्पर्धा लाग-

लेली होती. विंध्यपर्वताच्या वाढीमुळे लोकांच्या व्यवहारात अडचणी आल्या. विंध्य हा अगस्तीचा शिष्य त्यामुळे लोकांनी अगस्तीकडे विनवणी केली. विंध्याने त्यांना लोटांगण घातल्यावर अगस्ती त्याला म्हणाले, 'मी दक्षिणेकडे जात आहे. तोवर तू असाच पडून रहा' अगस्ती दक्षिणेतच राहिले. परत उत्तरेस येण्याचा वायदा त्यांनी कधीच पुरा केला नाही. ही कथा आपण आजही आपल्या शब्दप्रयोगात जपून ठेविली आहे.

वेदान्ताची शुष्क चर्चा चालली असली की न्यायशास्त्रातील घट आणि पट या शब्दांवर बराच खल होतो. यावरून निरर्थक चर्चेला आपण घटपटादी खटपट आजही म्हणतो. एखाद्याचे रटाळ व कंटाळवाणे लांबलचक भाषण सुरू झाले की आपण म्हणतो, याने काय चर्पटपंजरी लावली आहे ? कोठून आला हा चर्पटपंजरी शब्द ? 'भज गोविंदं भज गोविंदं' अशा आरंभाचे एक लांबलचक असे शंकराचार्यांचे स्तोत्र आहे. काहींना हे स्तोत्र कंटाळवाणे वाटते. म्हणून कंटाळवाणी कर्मकथा कोणी सांगू लागला की आपणांस ती चर्पटपंजरी वाटते. लहान मूल ऐकेनासे झाले की आपण त्याला चौदावे रत्न दाखवितो. समुद्रमंथनातून निघालेले चौदावे रत्न खरे म्हणजे अमृत होय. पण याच अमृतामुळे देवदैत्यांत घनघोर युद्ध झाले. म्हणून मार बसणे, चोप बसणे या अर्थाने आपण चौदावे रत्न आजही आठवीत असतो लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरा, धन्वंतरी, चंद्रमा, कामधेनू, ऐरावत, रंभा, उच्चैःश्रवा, कालकूट, शार्ङ्ग धनुष्य, शंख व अमृत ही चौदा रत्ने आपल्या अजूनही परिचयाची आहेत. चंद्रास चांदुमामा का म्हणतात ? त्याला भाऊ समजून गृहिणी का ओवाळतात ? एकाच समुद्रातून लक्ष्मी व चंद्र यांचा जन्म म्हणजे ही दोघे बहीणीभाऊ. घरी आलेली सून ही लक्ष्मीस्वरूपाची व तिचा भाऊ स्वाभाविकपणे चंद्रमा या लक्ष्मीच्या मुलाचा तो मामा नाही का झाला ? हवी ती मनीषा पुरविणारी वस्तू आपणांस सतत लाभली की आपण कामधेनू अथवा कल्पवृक्षाची आठवण करतो. 'कोठे इंद्राचा ऐरावत व कोठे श्यामभट्टाची तट्टाणी' या म्हणीत आपण ऐरावताची आठवण ठेविली आहे. अंत लागत नाही, माहीत नाही अशा अर्थाने आपण नेति नेति–न इति न इति अशी फार प्राचीन काळातील शब्दावली वापरतो.

कोठूनतरी कसातरी संबंध जोडला गेला की आपण त्यास बादरायण संबंध म्हणतो. यातही एक प्राचीन काळची कथा सापडते. कोणी एक मनुष्य एका श्रीमंताच्या घरी पाहुणा म्हणून गेला. श्रीमंतास वाटले, हा आपल्या बायकोच्या नात्यातला असावा. बायकोला वाटले, हा पतीच्या नात्यामधील असावा. बरेच दिवस ह्या लुच्चा मनुष्य पाहुणचार घेत होता. शेवटी एकदा कोणी तरी त्याला विचारले, 'काय हो ? तुम्ही कोण ?' त्यावर तो म्हणतो. 'तुमचा व आमचा बादरायणसंबंध आहे. 'अस्माकं बदरीचक्रं युष्माकं बदरी तरुः । बादरायणसंबंधात् यूयं यूयं वयं वयम्' म्हणजे आमच्या गाडीचे चाक बोरीच्या लाकडाचे आहे व तुमच्या दारात बोरीचे झाड आहे.' असा हा कसातरी, कोठून तरी जुळवलेला बादरायण संबंध ! सती जाणे, सतीचे थडगे, सतीचे वाण हे शब्द आजही आपल्या प्रचारात आहेत. निश्चयाने, कितीही कष्ट झाले तरी करावयाचा निश्चय सतीचा असतो. साध्वी, पतिव्रता स्त्रीस आपण सती म्हणतो. मृत पतीच्या शवाबरोबर स्वतःस जाळून घेणारीही सतीच. या सर्व शब्द प्रयोगात आपण एका प्राचीन सतीची स्मृती कायम करीत असतो. ब्रह्मदेवाचा मानसपुत्र दक्षप्रजापती याच्या सोळा कन्यांपैकी कनिष्ठ कन्या सती नावाची होती. तिने शिवास वरले होते. शिवाचे व दक्षाचे पुढें बिनसले. दक्षाने एक मोठा यज्ञ केला. पण या वेळी शिव व सती यांशिवाय त्याने सर्वांना बोलाविले. बोलावणे नसतानाच सती दक्षप्रजापतीच्या घरी गेली. परंतु तेथे तिचा फार अपमान झाला. म्हणून तिने शिवनिंदकोत्पन्न देहास अग्नीच्या स्वाधीन केले. या पहिल्या सतीची आठवण आपण अजूनही विसरलेलो नाही.

एखाद्या सुंदर पुरुषाचे वर्णन करताना आपण त्यास मदनाचा पुतळा म्हणतो. हा मदन म्हणजे ब्रह्मदेवाचा पुत्र, सर्वांगसुंदर कामदेव होय. एखादी सुंदर स्त्री दिसली की तिचे रूपलावण्य रतिसारखे आहे असे आपण म्हणतो. ही रती कामदेवाची वा मदनाची सुंदर स्त्री होय. या रतिमदनाच्या कितीतरी कथा लोकवाङ्मयात रूढ झालेल्या दिसतील. धड ना पुरुष ना स्त्री अशा व्यक्तीला आपण शिखंडी म्हणतो. शंभूच्या प्रिय सखीला शांभवी म्हणतो. शंभूला भांग प्रिय समजून आपण त्याच अर्थाने महाशिवरात्रीस शांभवीचा आदर करीत असतो. एखादा बावळा व निर्बुद्ध

मनुष्य पाहिला की आपण त्याला शुंभ म्हणतो. शुंभ हा एक पुराणकाळातील दैत्यच. त्याचा वध दुर्गा देवीने केला. महिषासुराचा वध करणारी देवी महिषासुरमर्दिनी बनली. आणि महिषासुराचा धागा आजच्या म्हैसूरशी निगडित झाला. याच देवीने कोलासुराचा वध जेथे केला ते कोलापूर आज कोल्हापूर म्हणून प्रसिद्ध आहे. चंडी किंवा चंडिका अथवा चामुंडी ही देवीची नावे तिने चंडमुंडांचा नाश केल्यामुळे तिला मिळालेली आहेत. आजचे नासिक व पंचवटी रामासाठी प्रसिद्ध असले तरी शूर्पणखेच्या नासिकाछेदनाशी नाशिकचा संबंध असावा. बंगलोर अथवा बेंगळूर शहरासही अशीच एखादी कथा सांगावी लागेल. कोणी केंपे गौडा नावाचा सरदार या भागात एकदा भुकेने व्याकुळ झाला. त्याला एका म्हातारीने आपल्या झोपडीत शिजविलेली घेवड्याची डाळ (कानडी भाषेत बेंदेकाळुरू) दिली. या म्हातारीच्या उपकारस्मरणार्थ त्या सरदाराने एक नगरी 'बेंदे काळुरू' नावाची बसविली. याचे पुढे बेंगळुरू वा बंगलोर अथवा बँगलोर झाले.

आज व्यक्तींची, कुलांची, स्थलांची जी नावे आहेत ती फार जुन्या संस्कृतीशी निगडित झालेली दिसतील. आपला पुराणकाल व इतिहासकाल या दृष्टीने तपासून पाहण्यासारखा आहे. पुरोहित हे आडनाव आजही आहे. भिक्षुकी करणारा आजचा पुरोहित खऱ्या अर्थाने पूर्वी नेता असावा. आर्यप्रमुखांची वसती होण्याआधी त्यांचे पुरोहित – पुढे धाडलेले, पाठविलेले – प्रथम येत असत. राज्यप्रसाराच्या आरंभी पुरोहितांचे विशिष्ट असे कार्य असे. 'वस्' धातूपासून प्रथम वसती करणारा एक पुरोहितांचा वर्ग 'वसिष्ठ' या नावाने झाला. याच वस्‌वरून धन साठवून ठेवणारी वसुधा बनली. वसाहतकारांचा कोश जेथें जमा झाला ते स्थान कोशल म्हणून उदयास आले. विवस्नान् हा पहिला राजा झाला. याचा मुलगा मनू. याने समाज व राज्य यांच्या व्यवस्थेचे नियम घालून दिले. याचा धाकटा पुत्र नेदिष्ट. याने शालि नावाचे धान्य पिकत असणाऱ्या देशात 'वैशाली' ची वसाहत केली. मनूच्या मोठ्या मुलाने उसाची लागवड करून इक्ष्वाकू कुलाचा उदय साधला. शत्रूस युद्ध करून जिंकता न येण्यासारखी याची राजधानी म्हणजे अयोध्या. इक्ष्वाकूच्या एका मुलाने विदेह देशाचे राज्य उभारले. हिमालयाच्या उतरणीस इलावर्त नावाचा देश होता. मनूचा मुलगा इल व नंतर

याची मुलगी झाली ती इला. म्हणून इलावर्त नाव. सोमरस पिणारे सुतसोम झाले. इलेची मुले चार-पुरुरवा वडील मुलगा. याने गंगायमुनासंगमापर्यंत राज्य उभारले. गय नावाच्या मुलाने गयेची स्थापना केली. उत्कलाने उत्कल देश वसविला. आजही भारतात प्रचलित असणारी काही देशांची व स्थलांची नावे ही अशी प्राचीन इतिहासात दिसतात. गंधर्व व गांधर्वविवाह हे शब्द आपण आजही वापरतो. पुरूरव्याची एक पत्नी उर्वशी ही गंधर्वदेशातील होती. परस्परांच्या प्रेमामुळे झालेला हा पहिला गांधर्वविवाह. गायनाशी, नृत्याशी गंधर्वांचा संबंध असे. पुरूरव्याच्या एका पुत्राने खुज्या स्त्रियांच्या देशात कान्यकुब्ज नावाचे राज्य निर्माण केले.

अशीच देशांची व व्यक्तींची नावे जी आजही दिसतात. त्यांचा उगम प्राचीन इतिहासात आहे. भृगू, सूत, विरजा, ययाती, देवयानी, शर्मिष्ठा, हैहय, जमदग्नी, परशुराम, रेणुका, विश्वामित्र, हरिश्चंद्र, सगर, भगीरथ, दुष्यंत, शकुंतला, दिलीप, नंदिनी, नळ, दमयंती; अशा अनेक नावांपैकी आजही काही लोकप्रिय आहेत. रामचंद्र, लक्ष्मण, शत्रुघ्न, सीता, उर्मिला, दशरथ, कौसल्या, ही रामकाळातील नावे आजही परंपरेने टिकून आहेत. सहदेव, नकुल, श्रीकृष्ण, वसुदेव, बलराम, अर्जुन, अभिमन्यू, सुरथ, रोहिणी, सुभद्रा, चित्रलेखा, शंतनू, पराशर, सत्यवती अशा अनेक व्यक्तिनामांचा संदर्भ प्राचीन इतिहासाशी आहे. अक्रूर, दुर्योधन, कर्ण, धर्मराज, अंगद, वाली, रावण, मंदोदरी, बिभीषण, अंबालिका, अंबा, अरुण, अरुंधती, इंद्र, उत्तरा, उद्धव, एकलव्य, कच, कंस, कार्तवीर्य, कीचक, कुंती, कुशलव, रुक्मिणी, चंद्रहास, जनक, जनमेजय, जरासंध, द्रोणाचार्य, ध्रुव, प्रल्हाद, अजामेळ, शिबी, नरकासुर, नहुष, पंडू, पिंगला, बभ्रुवाहन, माधव, यदुनाथ, लक्ष्मी, लोपामुद्रा, वत्सला, विदुरा, वेदवती, शिखंडी, सत्यवान, सावित्री, हनुमान, हंसध्वज अशा कित्येक नावांभोवती गुंफलेले भावबंध आजही कीर्तनांतून, गोष्टींतून, कादंबऱ्यांतून, काव्यांतून, नाटकांतून आपल्या परिचयाचे आहेत. यांच्या रूपाने आपण जुनीच संस्कृती आजही जगत आहोत.

जी गोष्ट व्यक्तिनामांची तीच स्थलनामांची. आपल्या देशातील आजचे पर्वत, देश, नद्या, सरोवरे, नगरे पुराणकाळातील रम्य कथा सागणारी आहेत. अयोध्या, मिथिला, कुरुक्षेत्र, इंद्रप्रस्थ, हस्तिनापूर, प्रतिष्ठान

लंका, किष्किंधा, काशी, रामेश्वर, मथुरा, प्रयाग, प्रभासपट्टण, द्वारका, गोकुळ, वृंदावन, चित्रकूट, पंचवटी, चंपा, इत्यादि स्थानांच्या नावांचा उच्चारही सहस्त्रमुखांनी पौराणिक काळाचे रूप वर्णन करून सांगतो. कित्येक भाविक लोक या नगरांत गेले की पुराणकाळातील स्मृतींनी गहिवरून जातात. दक्षिणदेशातील दंडकारण्याचा उल्लेख आजही आपल्या पूजेच्या संकल्पात येत असतो. दंडक हा इक्ष्वाकूचाच मुलगा. हा थोडा मूढ व उन्मत्त म्हणून यास विंध्याद्री व शैवलपर्वत यांच्यांमधील राज्य दिले गेले. याने आपल्या गुरूच्या कन्येस, अरजेस भ्रष्ट केल्यावरून गुरूने याला शाप दिला. या शापाने हा व याचा देश भस्म होऊन अरण्यप्राय झाला. हेच दंडकारण्य. गंगा, यमुना, नर्मदा, तापी, गोदावरी, कावेरी, तुंगभद्रा, कृष्णा, वेण्णा ही नद्यांची जुनी नावे आजही आपण मुलींना ठेविलेली पाहातो. भगीरथाने पृथ्वीलोकावर आणलेली भागीरथी जन्हू राजाची शेतजमीन बुडवू लागली म्हणूनच त्याने तिला बांध घालून तिचे पाणी उपयुक्त होईल अशा रीतीने सोडण्याची व्यवस्था केली. या जन्हू राजाच्या नावावरून गंगेस जान्हवी म्हणतात. हिमालय, सह्याद्री, विंध्याद्री, मलयाचल, महेंद्र इत्यादि पर्वतांच्या नावांभोवती अनेक सुरसकथा आजही आपणांस ऐकावयास मिळतील.

चातुर्वर्ण्य समाजरचना व आश्रमपद्धती आज अनावश्यक असली तरी प्राचीनकाळी समाज व व्यक्ती यांच्या नियोजनाची एक पद्धती म्हणून तिचा निर्देश करावा लागतो. आजचे आपले पूजाविधी, मंत्र, सण, उत्सव, व्रते, अनुष्ठाने, कर्मकांड इत्यादींचा संबंध प्राचीन संस्कृतींशी भरभक्कम असा आहे. आपली आजची नुसती गोत्रावळी जरी पाहिली तरी एकेका ऋषीचे कर्तृत्व तीत दिसून येईल. अत्री, अंगिरस, कश्यप, कौंडिण्य, जमदग्नी भारद्वाज, मुद्‌गल, वत्स, वसिष्ठ, शांडिल्य, गार्ग्य इत्यादी गोत्रांची नावे प्राचीन काळातील कर्तृत्वाचा इतिहास उभी करणारी आहेत. अग्निहोत्री, आचार्य, उपाध्ये, जोशी, द्विवेदी, त्रिवेदी, चतुर्वेदी, भागवत, अधिकारी, अध्यापक, आयाचित, गोसावी, देशभक्त, ऋषी अशी आपली आडनावेही अनेक हकीकती सांगून जातात.

असे आपले सारेच जीवन श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे. आजच्या आपल्या बोलण्यांत, वागण्यांत, चालीरीतींत, धर्मकार्यांत, उत्सवसमारंभांत

विचारपद्धतीत प्राचीन संस्कृतीची मुळे खोलवर रुजलेली आहेत. प्राचीन काळातील या भरभक्कम मुळांमुळे जमिनीवरील आकाशगामी वृक्ष टवटवीत आहे. आजच्या आपल्या नवीन वाटणाऱ्या जीवनरसाचे उगमस्थान प्राचीन काळातील आहे. ब्रह्म, परब्रह्म, माया, ब्रह्मघोटाळा, ब्रह्मस्व (कर्ज इ. ), ब्रह्मांड आठवणे, ब्रह्मसूत्राची गाठ, ब्रह्म सत्य जग मिथ्या, फट् म्हणता ब्रह्महत्या, ब्रह्मदेव बोलून चुकला असणे, आनंद ब्रह्मांडात न मावणे, ब्रह्मानंद होणे, ब्रह्मानंदी टाळी लागणे, ब्राह्ममुहूर्त, ब्राह्मसमाज, ब्राह्मण अशा आज प्रचलित असलेल्या शब्दांचा व शब्दप्रयोगांचा संबंध प्राचीन काळाशी नाही का ? आजही आपण आपल्या मुलांना मार्कंडेयाचे आयुष्य मागतो. वृद्धावस्थेत आजही आपणांस 'च्यवन'प्राश घ्यावा लागतो. आजही आपल्या वैद्यकीय विद्यालयांचा संबंध धन्वंतरीशी आहे. आपल्या शिक्षणसंस्थांची ब्रीदवाक्ये पुराणकाळातील संस्कृतामधील आहेत. 'सत्यमेव जयते' हे आजच्या भारताचे ब्रीदवाक्य पाहा ना. आपला भारत, यातील 'भारत' शब्दास नीट विचारा म्हणजे तो भरतखंड, भरतवर्ष यांची कथा, दुष्यन्तपुत्र भरत याची जन्मकथा व पराक्रमकथा सांगेल. यजमान शब्द आज आपण अनेक अर्थांनी वापरीत असलो तरी तो 'यज्ञमान' म्हणजे यज्ञ करणाऱ्याची आठवण करून देणारा आहे. स्वत: केलेल्या कृत्याची जबाबदारी एखाद्याने नाकारली की आपण त्याने विश्वामित्री पवित्रा घेतला असे आजही म्हणतो. आपल्या मुलांचे अध्ययन 'श्रीगणेशायनमः' पासून सुरू होते. आपल्या घराच्या दरवाज्यावर 'गणेशपट्टी' असून गणेशाचे चित्र आजही शोभून दिसते. सर्व मंगलकार्यारंभी गणेशपूजा आपण आजही करतो. अजूनही आपण विजयी वीराच्या स्वागतार्थ गुढ्यातोरणे उभारतो. आजही आपणांस 'लक्ष्मणरेषा' बरी वाटते.

आपल्या रोजच्या बोलण्यात अनेक सुभाषिते येतात, चटकदार वाक्यांश येतात, म्हणी वा वाक्संप्रदाय येतात. यांच्यांपैकी अनेकांचा उगम प्राचीन काळातील वाङ्मयपरंपरेत दिसून येईल. 'न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः' श्रम न करणाऱ्यास परमेश्वर साह्य करीत नाही. 'न वै स्त्रैणानि सख्यानि सन्ति' स्त्रियांचे सख्य हे सख्य नव्हे. अशी म्हणीवजा वाक्ये वैदिक वाङ्मयाशी संबंधित आहेत. 'चक्षुर्वै सत्यम्' हा मराठीसारखा वाटणारा शब्द-

प्रयोग याच परंपरेशी निगडित आहे. ‘अति चंचलं चित्तम्’, ‘मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः’, ‘विद्ययामृतमश्नुते’, ‘नेह नानास्ति किंचन’, ‘धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा’, ‘शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः’ ही आजकाल वापरली जाणारी वचने वैदिक परंपरेशी संबंधित आहेत. ‘मनःपूतं समाचरेत्’, ‘बालादपि सुभाषितम्’, ‘यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः’ या म्हणी स्मृतिग्रंथांशी निगडित आहेत. रामायण व महाभारत आणि भागवतादि पुराणे तर अशा सुभाषितांचे व म्हणींचे आगरच असून त्यांतील कित्येकांचा उपयोग आजही आपण करीत असतो. ‘कालो हि दुरतिक्रमः’, ‘आत्मानं सततं रक्षेत्’, ‘आचारप्रभवो धर्मः’ ‘राजा कालस्य कारणम्’, ‘यः क्रियावान्स पंडितः’, ‘न हि ज्ञानेनसदृशं पवित्रमिह विद्यते’, ‘सुखस्यानंतर दुःखम्’, ‘अर्थस्य पुरुषो दासः’ अशी वचने कोणत्याही चांगल्या मराठी निबंधात शोभून दिसणारी आहेत. करावासातील मुक्ततेनंतर टिळकांनी ‘पुनश्च हरिः ॐ’ याच वैदिक शब्दप्रयोगाने आपल्या कार्यास पुनः प्रारंभ केला होता. गीतेचा परिणाम व प्रभाव आजही समाजावर फार मोठा आहे. ज्ञानेश्वर, वामनपंडित, टिळक, गांधी, अरविंद, राधाकृष्णन् इत्यादि भाष्यकारांनी गीतेचे तत्त्वज्ञान व तिची शिकवण यांना सतत उचलून धरले आहे. ‘कर्मण्येवाधिकारस्ते’, ‘योगः कर्मसु कौशलम्’, ‘चंचलं हि मनः कृष्ण’, ‘जातस्य हि ध्रुवो मृत्युः’, ‘स्वधर्मे निधनं श्रेयः’ अशी अनेक वचने आजही लोकांच्या तोंडी आहेत. ‘योगक्षेम वहाम्यहम्’ हे आयुर्विम्याचे ब्रीदवाक्य गीतेमधील आहे. ‘हा सूर्य हा जयद्रथ’ या उक्तीने महाभारतामधील संदर्भ आजही आपणांस आठवावा लागतो. ‘इंद्राय स्वाहा । तक्षकाय स्वाहा’ या नित्य वापरात येणाऱ्या उक्तीमुळे जनमेजयाच्या सर्पसत्राची आणि इंद्राचा आश्रय घेणाऱ्या तक्षकाची आठवण व्हावी. मल्लीनाथी करण्यावरून प्रसिद्ध टीकाकार मल्लीनाथ याची स्मृती होते. ‘अव्यापारेषु व्यापारा’वरून पंचतंत्रातील खटपटे वानर ध्यानात यावयास हवे. ‘ऋणं कृत्वा घृतं पिबेत’ वरून आजही चार्वाकाचा नास्तिकवाद ध्यानात येतो. अशा वाक्प्रचारांची वा म्हणींची यादी आणखीही लांबविता येईल. ‘अजापुत्रं बलिं दद्यात्’, ‘परोपदेशे पांडित्यम्’, ‘अतिपरिचयादवज्ञा’,

अनुक्रम ........ दि: ...10/... क्र. 2220 ........ नों. दि: 21/3/

'अधिकस्य अधिकं फलम्', 'औषधं जान्हवीतोयम्', 'प्रथमग्रासे मक्षिकापात:', ' येन केन प्रकारेण ', ' शुभस्य शीघ्रम् ' अशा अनेक शब्दसंहतींनी आपण प्राचीन काळातील अनुभवगम्य ज्ञान आजही जतन करून ठेविले आहे.

संस्कृतमधील या विद्येचा वारसा भारतीय संतांनी देशी भाषांतून सर्व जनांस सुलभ केला. महावीर जैन आणि गौतम बुद्ध यांनी प्रथम प्राकृत भाषांतून धर्मप्रसार करून जनमानसावर प्रभाव पाडला. ' ओनामासि धं ' हा कालपरवाचा मुलांचा धडा ' ॐ नमः सिद्धम् ' या जैनपरंपरेचा वारसा आहे. ' बहुजन सुखाय बहुजन हिताय ' हे आजच्या आकाशवाणीचे ब्रीद-वाक्य बुद्ध धर्माच्या परंपरेतील आहे. चार तोंडी सिंहाचा पुतळा, धम्मचक्र ही भारतीय राष्ट्रीय प्रतीके बौद्ध धर्माशी संबंधित आहेत. पं. नेहरूंची आवडती ' पंचशील ' तत्त्वे बुद्धाच्या परंपरेतील आहेत. ज्ञानेश्वर, एकनाथ रामदास, तुकाराम इत्यादींच्या कितीतरी चटकदार व समर्पक ओळी आजही आपल्या भाषणास रुची आणताना दिसतात.

आज आपण आपल्या नित्याच्या व्यवहारात पुराणकाळच जगत असतो असे नाही तर ऐतिहासिक काळही आपण अगदी निकटचा करून ठेवलेला आहे. नामदेव, एकनाथ, ज्ञानदेव, तुकाराम, रामदास ही आपल्या मुलांची नावे आहेत. शिवाजी, बाजीराव, संभाजी, तानाजी, येसाजी अशी नावे आजही दिसतात. झाशी, ग्वाल्हेर, कानपूर, दिल्ली, आग्रा, चितोड, उदेपूर, सोरटी सोमनाथ, रामगिरी, देवगिरी, पन्हाळा, रायगड, प्रतापगड, सिंहगड, सातारा, पुणे, अहमदनगर, औरंगाबाद, हैदराबाद अशी किती तरी स्थळे इतिहासातील अनेक रोमांचकारी कथा आपणांस ऐकवतील. कर्तव्यदक्षतेचा उल्लेख करताना आजही आपण म्हणतो, ' आधी लगीन कोंडाण्याचे.' एका अर्थी विजय तर दुसऱ्या अर्थी पराजय वर्णन करताना 'गड आला पण सिंह गेला' ही म्हण आपणांस ताजी टवटवीत वाटते. आता ठरलेल्या मार्गावरून मागे नाही फिरायचे हे सांगताना 'मागचे दोर केव्हाच कापून टाकले आहेत.' हाच दाखला आजही आपण देतो, ' होता जिवा म्हणून वाचला शिवा' ही म्हण एका ऐतिहासिक समरप्रसंगाची आठवण करून देते. 'बचेंगे तो और भी लढेंगे' ही सुभाषितासारखी चटकदार ओळ पानिपतच्या रणांगणावरचा एक चित्तथरारक प्रसंग सांगून जाते. कर्तृत्वाची

९१६९८

सीमा गाठणे म्हणजे अटकेवर झेंडे मिरविणे हा मराठी वाक्प्रचार आता प्रसिद्ध आहे. गनिमी कावा खास ऐतिहासिक असला तरी वर्तमान काळात तो जिवंत आहे. पेशवाई, मोगलाई, अनागोंदी कारभार इत्यादि शब्दांना आज परंपरेने अर्थ प्राप्त झाले आहेत.

'कत्तलची रात्र' हा मराठी वाक्संप्रदाय असून त्याचा संबंध इस्लामी मोहरमच्या दहाव्या तारखेस हसन व हुसेन यांच्यांत झालेल्या भयानक लढाईशी आहे. मराठीतील हायदोस याच परंपरेतील, 'हाय दोस्त' या शोकप्रदर्शनाच्या शब्दांशी संबंधित आहे. 'गोमागणेश पितळी दरवाजा' या म्हणीशी संबंधित एखादी चमत्कारिक कथा इतिहास काळातील असणार. औट घटकेचे राज्य करणारा शिराळशेट आज आपल्या मराठी परंपरेत रुजला आहे. एखाद्या क्षुल्लक गोष्टीत नापत झाली म्हणजे ती कितीही मोठी गोष्ट करूनही भरून येत नाही; यासाठी 'बुंदसे गई वो हौदसे आती नहीं' या म्हणीचा वापर आपण करतो. या उक्तीशीही एक चटकदार कथा ऐतिहासिक प्रसंगाशी निगडित आहे. घोडे पेंड खाते कुठे? असे आपण मराठीत विचारतो. येथे घोडे पेण म्हणजे मुक्काम मागते. देशावरून कोकणात व कोकणातून देशावर येताना जेथे मुक्काम करावा लागत असे ते पेण गाव आजही या जुन्या हकीकती सांगायला समर्थ आहे. 'तुकोबांची मेख' म्हणजे काय हे आपणांस माहीत आहे. एखादी पोक्त पण पुढे पुढे करणारी बाई असेल तर तिला आपण ढालगज भवानी म्हणतो. याचाही संबंध ऐतिहासिक प्रथेशी आहे. सैन्याच्या अग्रभागी डुलत डुलत चालणारा व गंडस्थळावर ढाल धारण करणारा गज म्हणजे हत्ती असे. हा खरा म्हणज ढालगज भवानी.

मानवी मनाचा हा स्वभावधर्मच आहे की, त्याला उपरेपणा मानवत नाही. भूतकाळाच्या आधारावर तो जगतो, वाढतो. पूर्वपरंपरेचा चिवट धागा त्याला सोडवत नाही. त्याच्या भाषेत अनेक अर्थगर्भ शब्द न कळतच रुजले जातात. साडेतीन शहाणे आणि बारभाईचे कारस्थान म्हटले की त्याला पेशवाई आठवते. पुणेरी पगडी, गांधी टोपी, नेहरू शर्ट मागील पिढीमधील तत्त्वज्ञान सांगण्यास नव्या युवकांना तयार असतात. 'हरहर महादेव'ची गर्जना आजही स्फुरणदायी ठरते. भारतमाताकी जय, शिवाजी


महाराजकी जय, इनक्विलाब झिंदाबाद यांसारख्या घोषणा इतिहासकाळातील असल्या तरी कधी शिळ्या होत नाहीत. प्राचीन संस्कृतीच्या चिवट दोऱ्यांचे सूक्ष्म धागे हाती धरून बाळगण्यात एक प्रकारची सुखद अशी अनुभूती आहे.

* * *

# ४ : आपला लेखनविलास

वाणीविलासाच्या आजच्या धाग्यांतून आपण फार पूर्वीच सांस्कृतिक दोऱ्यांचे जतन अजाणता का होईना पण कसे करतो हे आपण पाहिले. आता ही वाणी जेव्हा लेखणीच्या साह्याने शब्दबद्ध, लेखनबद्ध होऊ पाहते तेव्हा या वाङमयाच्या द्वारे प्राचीन संस्कृतीची जपणूक आपण कशी करीत असतो हे थोडक्यात पाहू. वाङमय अथवा ग्रंथद्वारे आपण विचारांचा, तत्त्वचर्चेचा धागा परिपुष्ट करीत असतो. एकदम नवा असा विचार जगात क्वचितच निर्माण होतो. प्रत्येक नव्या वाटणाऱ्या विचारास मागील संदर्भाचा धागा असतोच. वेद, उपनिषदे, गीताभागवतादि ग्रंथ, विविध पुराणे ही आपल्या आजच्या विचारांची उगमस्थाने आहेत. वाल्मीकी आणि व्यास यांच्या प्रतिभेने मानवी विश्व एवढे व्यापले आहे की व्यासांनी सांगितले नाही असे या जगात काही नाही. सूर्याच्या तेजाने जसे सारे विश्व उजळून निघते त्याप्रमाणे 'व्यासमती कळविलें। मिरवें विश्व' असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. आणि वेद-उपनिषदे यांच्यांमधील विचारांचा ओघच पुढे सतत वाढत राहिलेला दिसतो. 'हें धर्मजात आघवें। युगायुगीं म्यां रक्षावें। ऐसा ओघ हा स्वभावे। आद्य असे' या ओवीप्रमाणें आपल्या विचारांचा ओघ आद्य, सनातन व नित्य वाटणारा म्हणून विकासशील आहे.

आजही लोकप्रिय आणि प्रेरक असणाऱ्या लेखनविलासाच्या वाङमय प्रकाराकडे पाहा. काव्य, महाकाव्य, नाटक, प्रबंध, कथा, चरित्र इत्यादि


रामायण
महाभारत
ज्ञानेश्वरी
भागवत

विविध वाङ्मयप्रकारांचे नाते प्राचीन परंपरेशी निगडित आहे. व्यास, वाल्मीकी, माघ, कालिदास, भवभूती इत्यादींचे स्मरण मराठी कवी करताना दिसतात. भोळ्या अशा गीतारूपी ईश्वराने व्यासोक्तिकुसुममाळा स्वीकारल्या असल्या तरी माझ्या दूर्वादळांना तो नाही कसा म्हणणार ? श्रीगणेश, सरस्वती, व्यास-वाल्मीकीसारखे महाकवी यांच्या स्मरणानंतरच मराठीतील कवी आपल्या ग्रंथास सुरुवात करतात. ज्ञानेश्वरांचे गणेशस्तवन प्रसिद्ध आहे. शारदाविश्वमोहिनीला, त्यांनी 'चातुर्यार्थ कलाकामिनी' म्हटले आहे. महाभारताला त्यांनी 'अभिनव उद्यान विवेकतरूचें' म्हटले आहे. महाभारत म्हणजे त्यांच्या मते 'सकळ धर्मांचे माहेर। सज्जनांचे जिव्हार। लावण्यरत्न भांडार। शारदेचें' होय. महाभारतामधील गीताग्रंथच ज्ञानेश्वरांनी आपल्या भाष्यासाठी निवडला. कारण 'गीता जाणा हे वाङ्मयी। मूर्ति श्रीप्रभूची' अशी त्यांची खात्री होती. वेद, उपनिषदे, गीताभागवतादि ग्रंथांवरच प्राचीन मराठी वाङ्मय पोसले आहे. अगदी आजचा आपला 'कादंबरी' शब्दसुद्धा बाणभट्टाच्या विख्यात कादंबरीशी नाते सांगून जातो.

आज लोकप्रिय असलेले प्राचीन संतांचे वाङमय प्रामुख्याने ब्रह्मनिरूपण करणारे आहे. आत्मज्ञान, तत्त्वचर्चा, अध्यात्मज्ञान, वेदान्तविचार हे त्यांचे विषय असून त्यांना पूर्वपरंपरेचा बळकट धागा आहे. वेदांतील व उपनिषदांतीलच ब्रह्मविद्येचे दर्शन गीतेत घडते. आणि याच गीतेवर पुढे अनेकांनी टीका लिहिलेल्या दिसतात. प्रमुख उपनिषदे या गाई, त्यांची धार गोपालकृष्ण काढणार, अर्जुन वत्सरूपाने त्या गीतामृताच्या दुग्धाचा आस्वाद घेऊन जगाच्या उद्धाराची सोय करणार; ही गीतेची बैठक पुढे सर्वांनाच मान्य झाली आहे. आपल्या आत्मविचाराचा उगम वेदात आहे. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी 'पैं अहितापासौनि काढिती। हित देऊनि वाढविती। नाहिं श्रुतीपरौती। माउली जगा' असे म्हटले आहे. श्रुती ही आपली माऊली आहे. याच वेदबीजांतून गीतेचा उगम झाला. 'म्हणौनि वेदांचें बीज। श्रीगीता होये हें मज' असा ज्ञानेश्वरांचा अभिप्राय आहे. पुढे तुकोबाही 'वेदांचें गव्हार'च अभंगरूपाने सांगतात. 'वेदांचा तो अर्थ आम्हांसचि ठावा' अशी त्यांची ग्वाही आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद;

शिक्षा, कल्पसूत्रे, व्याकरण, निरुक्त, छंदाशास्त्र, ज्योतिष ही वेदांची सहा अंगे; न्यायशास्त्रे, वैशेषिक मत, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा, सांख्यदर्शन, योगदर्शन, स्मृतिग्रंथ, इतिहास, पुराणे ही उपांगे यांचाच आधार आपल्या संतवाङमयात आहे

सर्व तत्त्वविचारांचे मथित अशा गीतेवर मराठीत अनेकांनी भाष्ये लिहिलेली दृष्टीस पडतात. योगी अरविंद, म. गांधी, लो टिळक, डॉ. राधाकृष्णन्, विनोबा भावे यांसारख्या विचारवंत कार्यकर्त्यांना भगवद्गीतेचा आधार आजही घ्यावा लागतो. गीतेवर मराठीत टीका लिहिणारांची नावे किती म्हणून सांगावीत ? महानुभावांच्या परंपरेत विश्वनाथ पंडित, ज्ञानेश्वर, दासोपंत, रंगनाथ मोगरेकर, रामावल्लभदास, वामनपंडित, शामाराध्य, शिवरामस्वामी, उद्धवचिद्घन, मोरोपंत इत्यादि कवी गीतेवर भाष्य अथवा टीका लिहिताना दिसतात. शंकराचार्य, रामानुजाचार्य इत्यादि आचार्यही ब्रह्मसूत्रे, उपनिषदे व गीता या प्रस्थानत्रयीवरच भाष्य लिहून आपल्या कार्याची आखणी करतात. गीतेत तत्त्वज्ञान व आत्मविचार आहे. तत्त्वज्ञान वा ब्रह्मनिरूपण सर्वसामान्य लोकांना रूक्ष वाटते. म्हणून हे तत्त्व ज्यांच्या चरित्रांत साकारलेले दिसते त्या रामकृष्णांच्या चरित्रकथा सांगण्यासाठीही अनेक आख्यानक कवी पुढे आलेले दिसतात. रामकथा व कृष्णकथा यांची अवीट गोडी मराठी माणसास आजही आहे.

मोरोपंत, कृष्णदास मुद्गल, शिवकल्याण, मुक्तेश्वर, माधव, श्रीधर, विष्णुदासानामा इत्यादि कवींनी महाभारतातील कथाभाग मराठीत आणून लोकरंजनाबरोबर उद्बोधनाचे कार्य केले आहे. मोरोपंतांनी रामकथा अनेकदा गाइलेली दिसते. श्रीधर, मुक्तेश्वर, गिरिधर, वेणाबाई, रामदास, माधवस्वामी इत्यादींनी गाइलेली रामकथा सर्वांना प्रिय आहे. गीतरामायण, गीतगोपाळ, अभंगभारत इत्यादि आधुनिक वाङ्मयकृतीही रामायण-भारताचा आपल्यावरील प्रभाव स्पष्ट करणाऱ्या आहेत. एकनाथांचे भागवत व भावार्थ रामायण हे दोन ग्रंथ जनमानसावर आपला प्रभाव आजही दाखविताना दिसतात. श्रीकृष्णाच्या बाललीला, रासक्रीडा, रुक्मिणीस्वयंवर, शिशुपालवध, सीतास्वयंवर, रुक्मिणीहरण, गोपीवस्त्रहरण, वनक्रीडा इत्यादि कथाभाग मराठीतील पंडित कवींनी अमर केला आहे. नरेंद्र, गंगाधर,

ज्योतिपंत, रमावल्लभदास, श्रीधर, मोरोपंत इत्यादि कवींनी भागवतातील कथा मराठीत आणून आबालवृद्धांना श्रीकृष्णचरित्र सुलभ करून दिले आहे. वामनपंडितांचा सुश्लोक कृष्णकथेमुळे अवीट बनला आहे. पुढे पेशवाईच्या अखेरीस शाहिरांनीही आपल्या कवितेसाठी श्रीकृष्ण, राधा, गौळण, गोपी, वसंतोत्सव, चंद्रावळ असेच पौराणिक विषय निवडलेले दिसतात.

आपल्या पौराणिक धाग्यादोऱ्यांची टोके सोडायला आजही आपण तयार नाही. सौभद्र, स्वयंवर, द्रौपदी, ययाति आणि देवयानी, पहिला पांडव, कीचकवध, शाकुंतल, रामराज्यवियोग, मत्स्यगंधा यांसारख्या पौराणिक नाटकांचा लोभ अजून कमी झालेला नाही. भाव तोचि देव, तुका म्हणे मी निराळा, गीता गाती ज्ञानेश्वर अशी संतजीवनांवरील नाटके अजूनही रंगतात ययाती, मृत्युंजय, पांचाली अशा पौराणिक कादंबऱ्यांचा लोभ आजही आपणांस वाटतो. पौराणिक चित्रपट आजही सर्वांच्या आदरास पात्र ठरतात. मंदिरांतून आजही पुराणिक व कथेकरी पौराणिक आख्यानांत श्रोत्यांबरोबर रंगून गेलेले दिसतात. पांडवप्रताप, रामविजय, हरिविजय यांच्या वाचनात आजही लोक दंग आहेत. इतिहासकाळातील अनेक धागे आज आपण वाङ्मयाच्या साधनाने आणखी बळकट करीत आहोत. गड आला पण सिंह गेला, चंद्रगुप्त, स्वामी,झेप, झुंज यांसारख्या कादंबऱ्या आजही आमच्या मनास भुरळ पाडीत आहेत. तोतयाचे बंड, बेबंदशाही, आग्र्याहून सुटका, रायगडला जेव्हा जाग येते, वीज म्हणाली धरतीला, दुसरा पेशवा इत्यादि नाटकांतील ऐतिहासिक वातावरणात आजही आपल्याला बरे वाटते. ‘छत्रपती शिवराय’सारख्या महाकाव्याची ओढ आपणांस असू शकते. शिवाजी, बाजीराव, नानासाहेब, माधवराव, शेवटचा बाजीराव, महादजी शिंदे इत्यादि ऐतिहासिक व्यक्तींच्या चरित्रांवर आजही आपल्या ललितकृती सजत आहेत.

आपली नाटके,आपल्या कथाकादंबऱ्या,आपली महाकाव्ये इत्यादिकांना अनेक पौराणिक अथवा ऐतिहासिक संदर्भापासून स्फूर्ती मिळालेली जशी दिसते तशीच ती आपल्या लोकवाङ्मयाच्या प्रकारातही दिसते. साध्याभोळ्या व अशिक्षित बायाबापड्यांनीही आपल्या लौकिक काव्यातून अलौकिक विषयांना स्पर्श केलेला दिसून येईल. राम व कृष्ण या दोन दैवतांवर

मुक्तकंठाने आजही साधी भाबडी बाई आपली भावपुष्पे भक्तीने अर्पण करू शकते. 'पहिली माझी ओवी । पहिला माझा नेम । तुळसीखाली राम ।' ही ओवी कोणत्या मराठी मायमावशीला माहीत नाही ? रामाने शेवटी सीतेला अरण्यात लक्ष्मणाबरोबर सोडून दिल्याची कथा वाल्मीकी व भवभूतीपासून कवी गात आहेत. सीतामाईचे हे दुःख मराठी बायांनी ओळखले आहे. 'पोटी गरभाची छाया' असताना राम सीतेचा त्याग करतो हे पाहून 'नाहीं रामराया माया' म्हणायलाही ती कचरत नाही. वनवासास सीता निघते, रामाच्या मनाचे कपट तिला माहीत नाही. ती आपली स्त्रीस्वभावास अनुसरून निरवानिरव करते आहे. रामाच्या समईला तेल पुरवण्यास तेलणीला सांगते. रामाच्या पूजेला ताजी फुले देण्यासाठी ती माळणीला बजावते. परटिणीला सांगते, 'धुजो हलक्या हातांनी रामाचा रेशमी शेला.' लक्ष्मण भावजीबरोबर ती रथातून थोडी जाते न जाते तोच म्हणते, 'भाऊजी लक्षीमणा ! ठेवा रथ जरा उभा ! म्हणे सीता विसरली घरी कुंकवाचा डबा.' अशी ही पतिपरायणा सीता आमच्या लोकवाङ्मयात कायमची आहे. भयानक वनात तातोबाचे म्हणजे वाल्मी-कीचे घर तिला भेटते. तेथे 'केला गवताचा पाळणा। आत निजवला राणा' अशा कष्टात सीतेचे दिवस जात असतात. 'हरिकथा सांगे सीता। वनीं आपल्या कर्मीची। राम नगरात पोथी। लावतो देवधर्माची' अशा मोठ्या चटकदार भाषेत सीतेचे दुर्दैव आजही लोकभाषेत व्यक्त होताना दिसते.

राम आणि सीता यांचे उभे आयुष्य शोक, करुणा, प्रेम, वात्सल्य या रसांनी भरलेले असल्याने मराठी बायांना या चरित्राचा लोभ सतत वाटलेला आहे. 'राम लक्षीमण सीता। तिघे चालले वाटेनं। येता रामराया घाम। पुसे सीता पदरानं' यातील प्रेम लक्षणीय नाही का ? 'गेले राम शिकारीला। हाती शिकार लागली। घरी जोग्याच्या मिषानं। फेरी रावणाची आली' तेव्हा सीतेचे अपहरण झाल्याची कथाही बायका सांगून जातात. पापी रावणाची लंका कशी जाळून जाते याचीही हकीकत त्या सांगतात 'सकाळच्या पारी। काय वाजतं भराभरा। राम तुळशीला घाली वारा' अशी आठवण आजही रामाची केली जाते. 'सीता सैंयवर। राजांची भरली सभा। रामचंद्र राजा।' ऋषी मंडळीत उभा असून त्यावर

सीतामाईचे लक्ष असल्याची हकीकतही सांगितली जातें. 'शिंदेशाही तोडे । सीताबाईच्या हातायात । उजेड पडयीला । रामचंद्राच्या रथयात' असा रामसीतेचा महिमाही कधीकधी गाईला जातो 'राम नि लक्षुमन । राजा दशरथाची मुलं । बाई गुलाबाची फुलं' अशी एखादी चटकदार ओवीही सापडून जाते. 'मांडव सोन्याचा घातला । चांदवा मोत्याचा वो दिला । हिरे रत्ने जोडिली त्येला । राजे आले पहायला । गादीवर बसवा श्रीरामाला ।। कैकईला कुरुंद आला । राम ढकलूनी वो दिला । तुम्ही जावे वनवासाला । गादीव बसवा भरताला' असे मग सारे रामायण लोकभाषेत अवतरतें.

रामाप्रमाणेच मारुतीवरही या बायांची अलोट भक्ती दिसते. हनुमंतांच्या पराक्रमाच्या, सख्य भक्तीच्या कथा लोकगीतांतून प्रकटल्या आहेत. 'रावनानी नेली सीता । मारुती देतो कान । मुद्‌रुकाची अंगठी । मुखींचा रामराम' अशा भावनेने व भक्तीने रामाच्यासाठी मारुतीने सीतेचा शोध केला. 'चौघडा वाजताना । सारा डोंगर दणाणला । देव मारुती जागा झाला अशा थाटात मारुतीची वाक्पूजा होत असते. 'माता अंजनीच्या पोटी । बाळ जन्मले जगजेठी । गुप्त सोन्याची कासोटी । मुखी रामनाम ।। नको जाऊ मारुती । जरा थांब थांब थांब । आमी जातो लंकेच्या तटी । सीतबाई माऊलीसाठी ।। नको जाऊ मारुती । जरा थांब थांब । ह्या वनात बहुफलं दिसती । तिथे राक्षसाची वस्ती' अशी प्रार्थनाही मधून मधून रामभक्त मारुतीची होत असते. 'कुटं बसते सीता, कुटं बसतो राम । कुटं बसतो माजा भक्त हनुमान ?' या प्रश्नास उत्तर देताना ही एक अडाणी कवयित्री म्हणते 'ओटी बसते सीता, पाटी बसतो राम । उबा न्हातो माजा भक्त हनुमान ।।... लाडू जेवते सीता, पेडा जेवतो राम । पर्साद जेवतो माजा भक्त हनुमान.'

जसे रामाचे, सीतेचे, हनुमंताचे कौतुक आजही लोकगीतांत आहे तसेच ते श्रीकृष्णाचेपण आहे. श्रीकृष्णाचे चरित्र तर आणखी शृंगाराने भरलेले असल्याने त्याचा लोभ सर्वच कवींना वाटणे स्वाभाविक आहे. गोकुळामधल्या साऱ्या बालक्रीडा आजही लोकगीतांत साकार होताना दिसतात. 'पाण्याला जाऊ गडचा । कृष्ण धरतो पदर । मंदिरात बाळ तानं । फार मांडला गजर ।। पाण्याला जाऊ गडचा । पितळी गुंड नवा । झाला उशीर सडचाला, सोडा वाट कृष्ण देवा !' अशी विनवणी तर

नित्याची आहे. ‘ कृष्णाचा जन्म झाला । अंधार झमझम । गोकुळ नगरात । झाल्या विजा चमचम ।। कृष्णाचा जन्म झाला । वाजे गगनात भेरी । गवळयांच्या वेटाळात । आनंद घरोघरी ।। गोकुळ अष्टमीला । कृष्णाचा जन्म झाला । पोळा देवकीबाईनं । सण आनंदाचा केला’ असे श्रीकृष्णजन्म-कथन अनेकदा आलेले आहे. ‘ सूर्व्या आगाशी येतो गगनी । बाई उठूनी जेवू मागीतो चक्रपाणी ’ या ओळीने सुरू झालेली ‘ कृष्णाची न्याहरी ’ अनेकदा चविष्ट बनलेली दिसते. ‘ किष्ण मंदिरी वाजावितो पावा ’ अशा प्रकारचे गाणे आजही खेडयापाडयात गाइले जाते. ‘ यशोदा म्हणे श्रीहरी नको जाऊं तू भाईरी । गौळणी कुभांडया करी । घेती तुफान तुझ्यावरी’ अशा भाषेत यशोदा माता आपल्या पोरास बाहेर जाण्यापासून परावृत्त करते. कृष्ण बाहेर गेला की मग एकाएका गोपीची तक्रार ऐकताना आईस नकोसे होऊन जाई. मग आईही कंटाळून म्हणते, ‘ घईदूधलोणी खाती चोरुनी । शिक्यावरच्या दुडी फोडुनी । वाकडं दावितो बाई मजला । मग मी बांदिते त्येला खांबाला.’ श्रीकृष्ण–रुक्मिणी यांच्या विवाहाची ओढ आजही नवोढा कुमारिकांना आहे. आजही इष्ट वरप्राप्तीसाठी कुमारिका नाथांचे रुक्मिणी-स्वयंवर वाचतात. कधीकधी त्यांची मुग्ध प्रतिभा गाऊ लागते. ‘ नेत्रीचे अंजन । हाताची लेखणी । पत्रिका रुक्मिणी । लिहीतसे ।। लिहूनी पत्रिका देऊं कोणा हाती । यावे रातोराती । यादवराया ।। येऊनी ऊतरावे । अंबिकेच्या स्थळी । शृंगार पाठवावा । रुक्मिणीसी ।।’ कधी कृष्णाचे खेळ वर्णन करताना या मुली म्हणतील, ‘ कृष्णान् मांडली चेंडूफळी ’, कधी ‘ कृष्णाचं आंगडं ऽबाई कृष्णाचं टोपडं ’ सारख्या या पदांत कृष्णाचे कौतुक मनापासून होत असते. हे कृष्णाचे आंगडं टोपडं म्हणे ‘ चंद्रभागेत खळबळलं । जाईजुईवर वाळवलं ’ आणि मग ‘ चंदनाच्या पाटावर घडी घातली’!

याच कृष्णाचा अवतार म्हणजे पंढरीचा देव विठ्ठल. विठ्ठल, पंढरपूर पाहिले की मराठी मनाची चंद्रभागा आजही भरून दुथडी वाहते. ‘ बाई पंढरपुरात विठुराजा लखपती । बिलोर रुक्माबाई लेते सोनियाचे हाती ।। बाई! पंढरपुरात नांदे विठोबा दलाल । सोन्याच्या तागडीत मोजे रुक्मिणी गुलाल ’ यांसारखी शेकडो गीते आजही मराठीत नित्य होताना दिसतात. ‘आला चंद्रभागे पूर । दाटे पाणी दोन्ही थडया । चालत्या पुरात पहा मारे पुंडलीक बुडया ’

अशा प्रकारची अनेक गाणी आज पंढरपूर, चंद्रभागा, देव विठ्ठल, राहीरखुमाबाई यांच्याशी संबंध जोडताना दिसतात. विठ्ठल व रुक्मिणी यांच्यांत जनाबाईवरून झालेला रुसवा आजही मोठ्या चविष्टपणे सांगितला जातो. विठोबा रुक्मिणीला सारखे विचारतो आहे. ' सांगा काहून रुक्मिणी ! मुख तुहे असे जड ?' तशी रुक्मिणी देवळामागे जाऊन बसते. मग मोठ्या प्रेमाने रुक्मिणीच्या गळ्यात हात घालून प्रीतीचा पांडुरंग हनुवटी धरून विचारतो,


देव विठोबा बोलला ' रुक्मिणी ! पान आण '
देवी रुक्मिणी बोलली ' तुमची जनी कोण ?'
देव विठोबा बोलला ' रुक्मिणी ! कर विडा '
देवी रुक्मिणी बोलली ' जनीचा संग सोडा '
देव विठोबा बोलला ' रुक्मिणी सार पाणी '
देवी रुक्मिणी बोलली, ' बोलवा तुमची जनी '

असे भांडण शेवटी वाढत जाते तेव्हा ' बोल विठोबा बोलला, नको गडे ! असे बोलू । जनी अपंग बिचारी होय आपले लेकरू ' मग रुक्मिणीची समजूत पटते. असे हे विठ्ठलाचे, पंढरीचे, चंद्रभागेचे माहात्म्य लोकगंगेत अनेकदा साकार झालेले दिसते. ' पंढरी पंढरी । इठू राजाची नगरी । राईबाई रुक्माबाईच्या । भरल्या अबीर बुक्यानं घागरी ' असे महिमान आजही विठुरायाच्या या नगरीचे गाइले जाते. ' पंढरीच्या वाटं । टाळ वाजे झुनू झुनू । आईचे बाळ । साधुसंत आले जनू ' असा साक्षात्कार आजही गावोगाव होण्यासारखा आहे. आणि वारी पंढरीला पोचताच, ' भरली चंद्रभागा उतार दे ग माय । देवा माझ्या विठ्ठलाचे । मला पाहू दे ग पाय ' म्हणून प्रार्थना केली जाते. कधी या नगरीमधल्या विठोबास पाहून आजही एखादी बाई म्हणून जाते, ' ईटवरी ईट । उभा युगं अठ्ठाईस । देवा इठ्ठला । कोनी म्हनना खाली बस ' या पंढरपूरच्या विठोबाला भेटायला कसे जावयाचे असते ? ' पंढरीला जातें ओटीला काय घेऊं ? देवा विठ्ठलाला तुळशी बुक्याची प्रीत बहू ' अशी जाणीव सर्वत्र आजही दिसते, अशी शेकडो गाणी लोकवाङमयाच्या दरबारात असून राम, सीता, लक्ष्मण, श्रीकृष्ण, रुक्मिणी, द्रौपदी, हनुमान, हरिश्चंद्र, पार्वती, शिवशंकर इत्यादींची आठवण करून देणारी आहेत.

* * *

## ५ : आपले सण-आपले उत्सव

आज गुढीपाडवा. वर्षप्रतिपदा. नव्या वर्षाचा पहिला दिवस. नगरात घरोघरी स्वच्छता होत आहे. सडे टाकले जात आहेत. रांगोळ्या काढल्या जात आहेत. नवे कपडे घालून लहान मुलांना शाळेचा पहिला दिवस साजरा करण्याची घाई आहे. घराच्या चौकटीस आंब्याच्या नवपल्लवांची तोरणे बांधली आहेत. कळकाची उंच काठी घेऊन ती धुऊन, पुसून, स्वच्छ करून, तिच्या शेंड्याला एखादे चांदीचे भांडे, भरजरी वस्त्र, साखरेची सुरेखशी गाठी, कडू लिंबाचा डाहळ्या इत्यादींनी सज्ज झालेली गुढी उभारली जात आहे. तिची पूजा होत आहे. तिच्या पायथ्याशी असलेल्या शेणामातीच्या पाच पांडवांची पूजा होत राहिली आहे. कडू लिंबाच्या कोवळ्या पानांत मिरी, ओवा, मीठ असे साहित्य घालून, ती वाटून भक्षण केला जात आहे. नव्या पंचांगाची पूजा होत आहे. सुख, विद्या, ऐश्वर्य यांसाठी प्रार्थना केली जात आहे. 'श्रीगणेशायनमः ।। श्री सरस्यत्यै नमः । स जयति सिंधुरवदनो देवो' म्हणून पंचांगवाचनाची सुरुवात गणशस्तवनापासून होत आहे. नव्या वर्षाचे भविष्यकथन होत आहे. जगाची सुरुवात होऊन किती वर्षे झाली याचा मती गुंग करणारा हिशेब होत आहे महाविष्णूच्या नाभिकमलापासून ब्रह्मदेव निर्माण झाल्याचे व त्याच्या एक दिवसातील वर्षाचे मोजमाप होत आहे. युगे किती, मनू किती, महायुगे किती, कृतयुगाची १७ लक्ष २८ हजार वर्षे, त्रेतायुगाची १२ लक्ष ९६ हजार वर्षे, द्वापार युगाची



८ लक्ष ६४ हजार आणि चालू कलियुगाची ४ लक्ष ३२ हजार वर्षे झाल्याचे सांगितले जात आहे. इंद्रप्रस्थातील युधिष्ठिर, उज्जयनीचा विक्रम, पैठणचा शालिवाहन या पूर्वी होऊन गेलेल्या शककर्त्यांचा उल्लेख केला जात आहे. व्यक्तीचे, राजाचे, देशाचे भविष्य सांगितले जात आहे. 'पंचांगां'च्या श्रवणाने काय होते? तिथीच्या श्रवणाने लक्ष्मी प्राप्त होते. वाराच्या श्रवणाने आयुष्याची वृद्धी होते. नक्षत्राच्या श्रवणामुळे पातकांचा नाश होतो. योगाच्या श्रवणामुळे रोगांचे निवारण होते. करणाच्या श्रवणाने चिंतिलेले मनोरथ पूर्ण होतात. सर्वांच्या श्रवणाने नित्यमंगल असे गंगास्नानाचे फल मिळते;

असा हा थाट शालिवाहनशकाच्या प्रत्येक वर्षाच्या पहिल्या दिवशी सर्वत्र होत असतो. आजही घरोघरी हे दृश्य दिसेल. हा सारा थाट कशासाठी? हा सण कशासाठी? गुढ्यातोरणांची उभारणी कोणत्या कारणासाठी? या प्रश्नांचे उत्तर असे की, जुने वैभवाचे दिवस नवीनांना उत्साह वाटावा म्हणून साजरे करायचे असतात हेच होय. प्राचीन काळातील कर्तृत्वाची, पराक्रमाची, कृतज्ञतापूर्वक अशी खूण म्हणजे आजही घरोघरीं उभारली जाणारी गुढी. कोणते कर्तृत्व, कोणता पराक्रम? या गुढीपाडव्याचीहीं एक सुरस कथा आहे. स्फूर्तिदायक हकीगत आहे. शतकानुशतके अभिमान बाळगावा अशीं परम्परा आहे. यासंबंधीहीं अनेक कल्पना केल्या जातात. ब्रह्माण्डपुराणात सांगितले आहे की, चैत्र शुद्ध प्रतिपदेस ब्रह्मदेवाने हे जग उत्पन्न केले. त्याची आठवण नको ठेवायला? प्रभू रामचंद्राने दुष्ट रावणाचा वध करून दक्षिण देशाचे संकट दूर करून सुग्रीव, बिभीषण यांना राज्यावर बसवून, विजयी होऊन अयोद्धेत फार कालानंतर प्रवेश केला तो याच दिवशी. या रामचंद्राचे केवढे स्वागत त्यावेळी अयोध्यानिवासी लोकांनी केले असेल! गुढ्यातोरणे उभारून, केशरकुंकुमाचे सडे घालून, नवीन वस्त्रे परिधान करून सारी अयोध्या रामचंद्र, लक्ष्मण, सीता, हनुमान यांना सामोरी गेली. यापूर्वीच्या चौदा वर्षांचे केवढे 'रामायण' घडले होते!

ऐन राज्यप्राप्तीच्या वेळी रामचंद्र व सीता यांना वनवासास जावे लागले. लक्ष्मणही त्यांच्याबरोबर गेला. खर, दूषण, वाली, रावण इत्या-

दींचा नाश करून रामराय परत अयोध्येस विजयी होऊन आले. वनवासी वृत्तीने राहणाऱ्या भरतास अतिशय आनंद झाला. त्याने व्यवस्था केली की ‘लोकांनी शुचिर्भूत होऊन नगरातील सर्व देव आणि देवालये यांचे सुवासिक पुष्पे व वाद्ये यांनी पूजन करावे. स्तुती, पुराण जाणणारे सूत, भाट, वाद्यवादनकार, गणिका, राजभार्या, अमात्य, सैन्य, सेनासमुदाय, स्त्रीगण, क्षत्रिय इत्यादीसहित ब्राह्मणांबरोबर रामाचे चंद्रतुल्य मुख पाहण्यास बाहेर, पडावे. लोकांनी नंद्रिग्रामापासून आयोध्येपर्यंत बर्फासारख्या शीतल उदकांनी भूमीवर सडा टाकावा. इतर श्रेष्ठ लोकांनी नगरातील ध्वज उभारलेले सर्व मार्ग लाह्या व पुष्पे यांनी सुषोभित करावे.गृहे सुशोभित करून लोकांनी पंचरंगी भूषणे, पुष्पमाला आणि सुवर्णाची सुटी फुले यांची राजमार्गावर उधळ करावी.’ या सूचेनेनुसार सारे नगर लतापल्लवांनी, पुष्पांनी, ध्वजातोरणांनी सुशोभित झाले. प्रभू रामचंद्राचे सर्वांनी मनापासून स्वागत केले. या एका मंगलकारक व उत्साही अशा ऐतिहासिक विजयाची स्मृती आजही आपण गुढ्यातोरणे उभारून साजरी करीत आहोत.

वर्षप्रतिपदेसंबंधी आणखीही काही कथा पुराणांतून सांगितल्या आहेत. नारद ऋषींचे साठ पुत्र म्हणजे साठ संवत्सरे मानतात. प्रत्येक संवत्सराचा पहिला दिवस गुढया आणि तोरणे उभारून साजरा करण्याची रीत होती; आणि हा दिवस चैत्र शु. प्रतिपदा म्हणून सांगितला जातो. चेदी देशाचा राजा वसू याच्या तपश्चर्येने संतुष्ट होऊन इंद्राने हमखास विजय देणारी एक वैजयंती माळ त्याच्या गळयात घातली. साधूंच्या रक्षणासाठी एक वेळूची काठीही त्याला दिली. त्याने ही काठी गंधपुष्प, वस्त्रालंकार यांनी सुशोभित करून तिची पूजा केली. हाही दिवस चैत्र शु. प्रतिपदा असल्याचे सांगितले जाते. ही सजविलेली काठी म्हणजे आज आपण उभारीत असलेली गुढी.

वर्षप्रतिपदेच्या दिवशी शककर्ता शालीवाहन राजाची आठवण ठेवणे अगत्याचे आहे. आज भारतीय शक म्हणून राष्ट्रीय ठरलेला शालिवाहन शक १८९४ वर्षांपूर्वी सुरू झाला. हे शालिवाहन कुल पहिले ऐतिहासिक असे महाराष्ट्रीय घराणे होय. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातच सातवाहन कुलाचा महाराष्ट्रात उदय झाला. विद्या, कलकौशल्य, राजकारण यांची

वाढ त्यांच्याच राजवटीत झाली. 'गाथासप्तशती' सारखा अप्रतिम प्राकृत ग्रंथ हाल या सातवाहन राजाने तयार केला. अशोकाच्या मृत्यूनंनर उदयास आलेल्या या घराण्याने अखंडपणे ४६० वर्षे राज्य उपभोगिले. एकूण बत्तीस तरी राजपुरुष या घराण्यात झाले. महाराष्ट्रात राज्यघटना अशी यांनीच निर्माण करून लोकशासनाचे कार्य केले. पुणे जिल्ह्यातील आंध्रमावळ अथवा आंध्रा नदीचे खोरे हे यांचे मूलस्थान, कर्ल्याच्या लेण्यांच्या पिछाडीचे हे ठिकाण असून येथून जवळच असलेल्या नाणेघाटात यांचे आद्य शिलालेख सापडतात. श्रीसातकर्णी, मेघस्वाती, पुलोमायी, यज्ञश्री सातकर्णी इत्यादि पराक्रमी राजे याच राजघराण्यातील होत. राजसूय व अश्वमेध यांसारखे यज्ञही यांनी केले. 'दक्षिणापथपती' म्हणून या सातवाहनांचा गौरव केला जातो. राणी महादेवी गौतमी ही याच परंपरेतील असून ती 'सत्यवचनदानक्षमाहिंसानिरत, तपोदमनियमोपवासतत्पर' अशा बिरुदावलीने प्रसिद्ध आहे. हिचा पुत्र सातवाहन हा शककर्ता होय. याचे वर्णन 'क्षत्रियदर्पमानमर्दन शकयवनपल्लवनिषूदन अपराजित विजयपताक' अशा शब्दांत केले जाते. याच्याच नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील घोड्यांनी तीन समुद्रांचे पाणी चाखले. म्हणून 'त्रिसमुद्रपीततोयवाहन' असेही याचे वर्णन केले जाते. हाच प्रजेच्या सुखदु:खांशी समरस झाला असल्याने 'पौरजननिर्विशेष समसुखदु:ख' असेही त्याचे वर्णन केले जाते.

मराठवाडा, अपरान्त, विदर्भ, महाराष्ट्र, सौराष्ट्र व अवंती इतक्या मोठ्या देशांवर त्याचे राज्य होते. याचा पुत्र पुलमायी यानेही सागरावर प्रभुत्व मिळविले. असे हे सातवाहन राजे मोठे पराक्रमी, राजकारणी, व विद्याप्रेमी होऊन गेले. 'बृहत्कथा,' 'कथारित्सागर' असे ग्रंथ यांच्याच काळात निर्माण झाले. मुंबई अगर घोडबंदर, भरुकच्छ म्हणजे भडोच, पैठण, जुन्नर, सोपारा, कल्याण, चेंबूर, चौल, मानदाह, तगर, नासिक, भेडसा, कऱ्हाड, कोल्हापूर इत्यादि शहरांचा व बंदरांचा उदय याच काळात होऊन व्यापार वाढला. कार्ला, कान्हेरी, नासिक, वेरूळ येथील काही लेणी आणि सांचीचे एक तोरण, अमरावती, नागार्जुनकोंडा येथील स्तूपांवरील शिल्पे यांचीही निर्मिती सातवाहनकाळातच झाली. या महापराक्रमी घराण्यामुळे निर्माण झालेला शालिवाहनशक आज आपला राष्ट्रीय

शक आहे. त्याचा पहिला दिवस म्हणजे चैत्र शु. प्रतिपदा होय. शास्त्रकारांनी या दिवसाला साडेतीन मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा म्हणून मान्यता दिलेली आहे.

वैशाख शु. ३ हा आणखी साडेतीन मुहुर्तांपैकी एक महत्त्वाचा सण प्राचीन रूढी व परंपरा दर्शविणारा आहे. या दिवशी स्नान, दान, तप, जप, तर्पण इत्यादि जे काही पुण्यकर्म केले जातें ते अक्षय्य टिकते म्हणून या तिथीला अक्षय्य तृतीया असेही नाव आहे. शाकल शहरातील कोणा धर्म नावाच्या एका वाण्याने या दिवशी पितर आणि देवता यांना तर्पण करून उदकाने भरलेले कुंभ दक्षिणेसहित दान केले. हीच प्रथा आजही सर्वत्र चालू आहे. छत्री, जोडे, गाय, सुवर्ण, वस्त्रे, पात्रे, थंडगार पाण्याने भरलेले कलश यशाशक्ती दान करण्याची प्रथा अजूनही आहे. उन्हाळा संपण्यास अजून अवकाश असल्याने या जलकुंभांना महत्त्व आले असावे. काही ठिकाणी वसंतमाधवाची पूजा करूनही हे कुंभदान देण्यात येते. हा दिवस वसंतोत्सवाचा म्हणूनही मानतात. वसंतगौरीचा उत्सव देवीच्या मंदिरांतून होतो. कित्येक घरांतही चांगली आरास करून देवीला झोपाळ्यावर बसवून सुवासिनींना हळदीकुंकू व थंड पेये देण्याची चाल आजही आहे. मथुरा, वृंदावन, अयोध्या, काशी, द्वारका इत्यादि ठिकाणी हा दोलोत्सव भव्य प्रमाणात होत असतो. हा दिवस आखेती म्हणूनही प्रसिद्ध असून या दिवशी नांगरून, कुळवून ठेविलेल्या जमिनीत नवे बी पेरण्याचा समारंभ होत असतो. वसंत ऋतूच्या आगमनाबरोबर वृक्षांना कोवळी पालवी फुटते. आंब्याच्या झाडांना सुगंधी मोहोर येतो. बारीक फळे लगटतात. वृक्षवेली आणि धरित्री नवीन बीजधारणेस उत्सुक बनलेली असल्याने यौवनापाठोपाठ मातृत्वाचा पदरव जाणवतो. कुमारीअवस्थेत माहेरी आलेल्या वसंतगौरी यौवनास्था प्राप्त होताच या दिवसापासून पतिगृही जाण्याला उत्सुक बनतात. तृषितांना पाणी देणे, वसंततोत्सव साजरा करणे, नवीन बीजांची पेरणी करणे या कार्यासाठी या दिवसाची प्रसिद्धी आजही आहे.

श्रावण शु. ५ मीचा नागपंचमी हा सण तर अबालवृद्धांना व सर्व जातिजमातींना प्रिय आहे. महाराष्ट्रातील वस्ती मुख्यता आर्य, द्रविड व

नाग यांच्या मिश्रणाची आहे. नाग अथवा सर्प ही एक मानव जमात होती. या दिवशी घरोघरी मातीच्या नागांची पूजा केली जाते. गारुड्यांनी आणलेल्या जिवंत नागांना हळदकुंकू,फुले व लाह्या वाहून पुरणाच्या दिंडांचा नैवेद्य वाढतात. 'सर्वांभूतीं भगद्भाव' म्हणून सर्प अथवा नाग हाही एक उपकारक प्राणी म्हणून भारतीय संस्कृतीने त्यांना या दिवशी पूजनीय स्थान दिले आहे. नागापासून संरक्षणाचीही कल्पना यामागे असावी. एखाद्या घराण्याचा वास्तुपुरुष म्हणून नाग असल्याची ख्यातीही अनेक ठिकाणी आहे. संपत्ती, पुत्रादिकांचा लाभ, संरक्षण इत्यादींशी व शिव, विष्णू, गणपती अशा देवांशीही नागांचा संबंध प्रसिद्ध आहे. भगवान श्रीकृष्णांनी कालिया नावाच्या नागसर्पाचा पराभव या दिवशी केला असल्यानेही हा दिवस आजही महत्त्वाचा मानला जातो. गोकुळात यमुनेच्या उत्तरतीरावर कालिया नावाचा एक महाभयंकर नरसर्प राहात असे. व्रजवासियांना त्रास देण्यासाठी तो यमुनेच्या पाण्यात विष कालवीत असे. गाईगुरे, माणसे यांना यापासून अपाय होई. कालियाची खोड मोडण्याचे श्रीकृष्णाने ठरविले. एके दिवशी एकाटाच तो गाई घेऊन यमुनातीरावर आला. कालियास त्याने दंड थोपटून आवाहन केले. डोहापासून कालियाही खवळून, रागाने डोळे लालीलाल करून श्रीकृष्णावर चालून आला. आपल्या प्रचंड शरीराने त्याने कृष्णास विळखा घातला. नाकातोंडातून विषारी फूत्कार कालिया करू लागला. श्रीकृष्णाने प्रसंग ओळखून चपळाई केली व कालियाचे नरडेच पकडले. कालिया– कृष्ण यांच्या झगड्याची हकीगत गोकुळात समजली. नंदयशोदेसह सर्व गवळी यमुनेच्या तीरी आले. कालियाच्या बायकाही भयभीत झाल्या. श्रीकृष्णाने नरडेच पकडल्यावर कालियाचे विळखेच सैल झाले. कृष्ण त्याच्या डोक्यावर प्रहार करू लागला. कालियाच्या बायकापोरांनी कृष्णाची प्रार्थना करून कालियास जिवंत सोडण्यासाठी विनंती केली. कालियाने येथून निघून जावे, पुनः गोकुळवासी लोकांना त्रास देऊ नये या अटीवर श्रीकृष्णाने त्यास जीवदान दिले. कालियानेही कृतज्ञ भावाने श्रीकृष्णास शरण येऊन गोकुळ सोडले. श्रीकृष्णाचा हा पराक्रम नागपंचमीच्या दिवशी आठवायला हवा.

नागपंचमीच्या सणाशी आणखीही काही थोडा कथाभाग गुंफलेला

दिसेल. बंगालमध्ये मणिपूर येथे एका शेतकऱ्याने पंचमीस आपली जमीन नांगरली. नांगराचे फाळ लागून त्यातील वारुळातील नागिणीची पिले दगावली. नागिणीला अतिशय राग येऊन तिने त्या शेतकऱ्याच्या घरातील सर्वांना कडकडून दंश केला व ती त्याच्या मुलीस दंश करण्यासाठी मुलीच्या नवऱ्याच्या घरी गेली. परन्तु मुलगी नागाची पूजा करीत होती. नागिण हे पाहून प्रसन्न झाली. तिने तेथे कोणासच दंश केला नाही, इतकेच नव्हे तर मुलीच्या विनंतीवरून नागिणीने बापाच्या घरातील सर्व लोकांनाही जिवंत केले. शेतकऱ्यास नागपंचमीचे महत्त्व समजून आले. या प्रसंगानंतर नागपंचमीची पूजा रूढ झाली. बंगालमध्ये अजूनही सर्पापासून रक्षण व्हावे म्हणून 'मनसा' नावाच्या देवीची पूजा करतात. ही मनसा शेष नागाची बहीण मानली आहे. हिच्या भक्तीमुळे हिचे विष कोणासच बाधत नाही. म्हणून हिला 'विषहरा' असेही नाव आहे. नागांची पूजा आजही सर्वत्र दिसते. पाटावर नागनागिणीची चित्रे काढून त्यांची पूजा केली जाते. कधी नाग मातीचे करतात. दुपारी प्रत्यक्ष जिवंत नागासही पूजाद्रव्य अर्पण केले जाते. अनंत, वासुकी, शेष, पद्मनाभ, कबल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक, कालिया ही प्रमुख नागांची नावे पुराणांतून अनेकदा येतात.

नागपंचमीच्या सणाकडे आणखी एका दृष्टीने पाहून त्यामधील सामाजिक आशयही समजावून घेण्यासारखा आहे. आर्य व नागद्रविड यांच्या वारंवार होणाऱ्या संघर्षाची व मैत्रीची एक खूण म्हणजे नागपंचमी सण असावा. नाग तक्षकाने परीक्षित राजाचा खून केला. दोन जमातींत भयंकर झगडा सुरू झाला. तो मिटविला ज्याची आई नागकन्या व पिता आर्य अशा आस्तिक ऋषींनी. नाग व आर्य यांच्या आंतरजातीय विवाहामुळे या झगड्यास वेगळे वळण लागले. नागांची कलारसिकता, नगररचना, कुशलता आर्यांनी उचलली. नागांच्या संतोषासाठी नागपंचमीचा सण रूढ झाला असावा. पुराणांतूनही नागमाहात्म्य आढळते. पृथुराजाचा सर्वाधिकारी शेष नावाचा नाग होता. पृथ्वीचा भार नागाच्या मस्तकावर आहे. विष्णूचे शयनासन शेष आहे. रामाचा बंधू लक्ष्मण हा शेषाचा अवतार मानतात. शिवाच्या गळ्यात सदैव नाग असतो. गणपतीच्या कमरेस नागाचा विळखा दिसतो. आर्य व नागद्रविड यांच्या संघर्षाचा-मीलनाचा

हा सामाजिक इतिहास मनोरंजक आहे. गोदावरीच्या उत्तरतीरावर आर्य व दक्षिण तीरावर नागद्रविड समजून आजही नदीच्या दोनही तीरांवरील अशिक्षित बायका लुटीपुटीची शिवीगाळ करून जुन्या संघर्षाची व एकत्र येऊन उंच झोपाळ्यावर बसून, गाणी म्हणताना फेर धरून जुन्या मीलनाची स्मृती कायम ठेवताना दिसतात.

श्रावणी पौर्णिमा ही पोवती पूर्णिमा म्हणून ओळखली जाते. पवित्रारोपण हा एक धीर्मिक विधी आहे. कापसाच्या सुताची पोवती तयार करून, त्यांना कुंकू वगैरे लावून सोम, अग्नी, नाग, सूर्य, शिव, ब्रह्म, विष्णू इत्यादि देवतांना अर्पण करून मग घरातील सर्वांच्या हातात किंवा गळचात ती बांधण्यात येतात. कोणत्याही शत्रूपासून बाधा होऊ नये या हेतूने हा विधी प्रचारात आला असून उत्तरेतील रजपूतपरंपरेत 'रक्षाबंधन' या नावाने हा अद्यापही चालू आहे. रजपूत स्त्रिया नवऱ्याच्या शत्रूच्या गोटात जाऊन त्याच्या हातात राखी बांधून वंधुत्वाचा व प्रेमाचा विश्वास संपादन करीत. परस्परमीलनाचा वा सामंजस्याचा हा विधी आजही भारतात सर्वत्र नव्याने अकार धारण करीत आहे. या राखी पौर्णिमेस नाना प्रकारांनी सजविलेल्या राखी बाजारात येत आहे. वरुण देवतेसाठी समुद्राची पूजा करून त्यास नारळ अर्पण करण्याची प्रथा आजही समुद्रकाठी चालू आहे. दोनअडीच महिन्यांच्या पावसाचा जोर कमी झालेला असतो. खवळलेला समुद्र शांत व्हावा म्हणून त्याची पूजा, प्रार्थना प्राचीन काळी होत असे. नव्या सागरी व्यापाराच्या योजना चालू करण्यासाठी हीच वेळ व्यापाऱ्यांना सोयीची असते. सागरावर सत्ता गाजविणारा देव वरुण. म्हणूनच 'भगो वरुणो मित्रः' भाग्य देणारा वरुण मित्र असे याच्यासंबंधाने म्हटले आहे. 'संपत्ती मिळविण्याची हाव धरणारे व्यापारी ऊष्ण निःश्वास टाकणाऱ्या नौकेवर आरूढ होऊन सफर करण्यासाठी समुद्रमार्ग मोकळा करतात.' अशा प्रकारचा उल्लेख ऋग्वेदातही आहे. भारतीयांच्या सागरविक्रमाच्या कथा रामायण, बृहत्संहिता, बौद्धजातके, रत्नावली, दशकुमार अशा नाना प्रकारांच्या वाङ्मयांवरून उपलब्ध होतील. नौकाबंधनाचा शास्त्रशुद्ध विचार 'युक्तिकल्पतरू' या नावाच्या ग्रंथात झालेला आहे. ब्रह्मदेश, सयाम, मलाया, बोर्निओ, सुमात्रा, जावा, कंबोडिया, फिलीपाईन्स बेटे इत्यादि देश

आणि जपान, मंगोलिया, चीन, मध्य अमेरिका असे दूरचे देश यांच्याशीही प्राचीन भारतीयांचे समुद्रमार्गे दळणवळण होते. नंतरच्या काळात कोणी-तरी समुद्रगमन निषिद्ध मानले तरी भारतीयांचा सागरसंचार आश्चर्य-कारक होता. याची खूण आज नारळीपौर्णिमेच्या समुद्रपूजनात दिसते.

श्रावणी अमावास्येस शेतकऱ्यांचा अतिशय महत्त्वाचा सण म्हणजे पोळा किंवा वृषभोत्सव हा होय भारतासारख्या शेतीप्रधान देशात हा सण फार पूर्वीपासून चालत आला आहे. या दिवशी शेतकरी आपल्या बैलांना चांगली आंघोळ घालतात. त्यांची पूजा करतात, त्यांस नटवतात, सजव-तात, त्यांची मिरवणूक काढतात. या वृषभोत्सवास बेंदूर असेही नाव असून स्थानपरत्वे हा कधी आषाढात, तर कधी भाद्रपदातही साजरा करतात. गाय, बैल हे आर्यांचे धनच होते. आर्यांच्याही आधीपासून हडप्पा संस्कृतीत वृषभास देव मानले गेले आहे. वृषभाच्या म्हणजे बैलाच्या चित्रांच्या मुद्रा तेथे पुष्कळ सापडल्या आहेत. शक्तीचे प्रतीक म्हणून वृषभाची पूजा रूढ झाली असावी. शिवाचे वाहन नंदी असल्यानेही वृषभास महत्त्व आले. दूधदुभत्यासाठी गाई व शेतीच्या कामासाठी बैल यांना आर्य व द्रविड यांनीही संपत्ती म्हणून मान द्यावा लागला आहे. ओझ्याची गाडी ओढ-णाऱ्या बैलास आजही खेड्यातून महत्त्व आहे.

भाद्रपद महिन्याच्या प्रारंभापासूनच गणपतीच्या आगमनाची चाहूल लागते. बाजारात गणपतीच्या सुंदर सुंदर लहानमोठ्या मूर्ती दिसू लाग-तात. सार्वजनिक गणेशोत्सवाचे कार्यक्रम ठरू लागतात. दिव्यांच्या आरा-सीचे बेत होतात. नाना देखाव्यांची मांडणी कशी करावी यांची योजना होते. टिळकांनी सुमारे सत्तर वर्षांपूर्वी गणपतीच्या उत्सवास सार्वजनिक स्वरूप दिल्यानंतर सर्वत्र रस्त्यावर व चौकाचौकातून आजही गणेशाची स्थापना होत असताना दिसते. गणेश हा सुखकर्ता दुःखहर्ता असून विद्या व संपन्नता यांचा देव असल्याने अनेकजण याची उपासना आजही करतात. शुक्ल पक्षातील वरद अथवा विनायकी चतुर्थी व वद्य पक्षामधील संकष्ट चतुर्थी असे व्रत अनेकांच्या घरी आजही आहे मंगळवारी येणाऱ्या अंगा-रकी चतुर्थीचे माहात्म्य मोठेच सांगितले जाते कोणत्याही धार्मिक कार्याच्या वा मंगल प्रसंगाच्या प्रारंभी गणपतीचे पूजन सुपारीच्या प्रतीकाने कर-

ण्याची प्रथा आजही आहे. 'वक्रतुण्ड महाकाय' हे नित्य पठणाचे स्तोत्र आजही घरोघरी प्रिय आहे. भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासून अनंत चतुर्दशीपर्यंत साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाचे सार्वजनिक स्वरूप आजही वाढत्या प्रमाणावर आहे. कमळे, तांबडी फुले, शमी, मंदार, दूर्वा, नाना प्रकारची पत्री, गूळ, खोबरे, मोदक, इत्यादिनिशी घरीदारी गणेशाच्या स्वागताची तयारी उत्साहाने सर्वत्र असते.

फार प्राचीन काळापासून गणेश हे दैवत आर्य व द्रविड यांना सारख्याच प्रमाणावर प्रिय झाले आहे. गणेशाची उपासना सर्व भारतभर, इतकेच नव्हे तर भारताबाहेरही पसरलेली दिसते. त्याची सोंड, त्याचे विशाल कान, त्याचे मोठे पोट, त्याचे वाहन उंदीर, त्याला प्रिय असणाऱ्या दुर्वा इत्यादीविषयी कुतूहलजनक कथा सांगितल्या जातात. गणेश किंवा गणपती हा शिवपार्वतीचा मुलगा. याच्या जन्माच्याही अनेक कथा सांगितल्या जातात. पार्वती एकदा स्नान करीत होती. दाराशी तिने आपल्या अंगावरील उटण्याची मळी काढून त्याचा एक पुतळा करून ठेविला व परवानगीशिवाय कोणास आत सोडू नकोस अशी आज्ञा त्याला केली. या पुतळ्याने शंकरासच प्रतिबंध केल्यानंतर रागावून शंकराने या पुतळ्याचा-पुरुषाचा वध केला. पार्वती या कृत्याने फार रागावली. नारदांच्या मध्यस्थीने शंकराने असे ठरविले की, जो कोणी प्रथम आपल्या गणांस भेटेल त्याचे मुंडके आणून या मृत पुरुषास जिवंत करावे. गणांनी गजासुर नावाच्या राक्षसाचे मुंडके आणून पार्वतीनिर्मित पुरुषाच्या धडास लाविले. हा पुरुष जिवंत झाला. हा दिवस भाद्रपद शु. ४ चा होता. गजासुर हा महिषासुराचा मुलगा. शंकराने वर दिल्यावर हा मत्त होऊन लोकांना पीडा देऊ लागला. सर्व देवांनी श्रीगणपती या आराध्य देवतेची प्रार्थना केल्यावर 'मी लौकरच अवतार धारण करून गजासुराचा नाश करीन, असे आश्वासन दिल्यावर श्रीगणपतीने वरीलप्रमाणे अवतार धारण करून गजासुराचा नाश केला.

आणखीही काही कथा गणपतीच्या जन्माच्या सांगितल्या जातात. ब्रह्मदेवाच्या जांभईतून एक तेजस्वी पुरुष निर्माण झाला, त्याचे नाव सिंदूर होते. 'ज्याला तू आलिंगन देशील तो मरण पावेल' असा या सिंदूराला वर

मिळाला. सिंदूर ब्रह्मदेवासच आलिंगन द्यायला निघाला. त्याने प्रत्यक्ष शंकर व पार्वती यांनाही त्रास दिला. पार्वतीने श्रीगणेशाची आराधना करून अभय मागितले. सिंदुरासुराचा नाश करण्यासाठी मी तुझ्या पोटी अवतार घेतो असे आश्वासन गणेशाने पार्वतीस दिले. पार्वतीच्या उदरी गर्भ वाढू लागला. सिंदुराने तिच्या गर्भाचे मस्तक छेदून नर्मदा नदीत फेकून दिले ! म्हणून नर्मदा नदीचे पाणी व दगडगोटे लाल बनले आहेत. योग्य वेळ येताच पार्वती प्रसूत झाली, पण मुलाला डोके नव्हते. इंद्राच्या ऐरावताचे मस्तक विष्णूने कापून आणून त्या मुलाला लावले. या मुलाचे नाव सार्थपणे 'गजानन' असे झाले. अशा प्रकारे गणेश, गणपती, गजानन, विनायक यांच्या अवतारांच्या अनेक कथा सांगितल्या जातात.

गणपती हा ऋद्धिसिद्धीदाता, सकलमंगलकर्ता, विद्या देणारा, यश देणारा म्हणून सर्वांना प्रिय आहे. सर्व ग्रंथकार या गणपतीस प्रथम नमन करतात. इतकच काय पण व्यासांचे महाभारतही याच गणपतीने लिहिले असल्याचे सांगतात. महाराष्ट्रात तर या गणपतीस सर्वत्र आदराचे स्थान आहे पेशव्याचे दैवत म्हणून याची प्रतिष्ठाही मोठी आहे. आजही प्रत्येकाच्या घरी मंगल कार्य निघाले की पत्रिकेवर 'श्रीगजानन प्रसन्न' लिहिले जाते. थेऊर, ओझर, रांजणगाव, मढ, पाली, मोरगाव इत्यादि ठिकाणच्या अष्टविनायकांची प्रसिद्धी आजही मोठ्या प्रमाणावर आहे. 'सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची नुरवी' अशी आरती आजही घरोघरी म्हटली जाते. 'मंगलमूर्ती मोरया,' 'गणपतीबाप्पा मोरया' अशा घोषणा आजही सार्वजनिक व घरगुती गणपत्युत्सवात वारंवार होताना दिसतात. गणपतीचे प्रणवस्वरूप वर्णन करून सांगतांना 'अकार चरण युगुल। उकार उदर विशाल ।। मकार महामंडल। मस्तकाकार' असे मोठे बहारीचे वर्णन श्रीज्ञानेश्वरांनी केले आहे. 'गणानां त्वा गणपतिं हवामहे' असा मंत्र आजही घरोघरी उच्चारला जात आहे. चिंचवडचे मोरया गोसावी, धरणीधर, गोसावीनंदन, निरंजन, चिंतामणि देव इत्यादि थोर गाणपत्यांच्या परंपरा आजही सांगितल्या जातात.

गणपतीला दुर्वा का आवडतात ? यासंबंधीही एक कथा सांगितली जाते. ऋषींच्या विनंतीवरून गजाननाने अनलासुर नावाच्या दैत्याला भक्षण

केले. त्यामुळे गजाननाच्या अंगाची आग होऊ लागली. अनेक शीतोपचार उपयोगी पडेनात. परंतु सहजासहजी अमृतमयी दूर्वांकुर देवाच्या मस्तकावर ठेविल्यावर मात्र त्याच्या अंगाचा दाह थोडा कमी झाला. म्हणून दूर्वांच्या जुडयाच्या जुडया गणपतीच्या मस्तकावर वाहण्याची प्रथा सुरू झाली. गणेश चतुर्थीस चंद्राचे दर्शन घ्यायचे नसते याचीही एक कथा सांगितली जाते. गणपतीचे विक्राळ रूप पाहून चंद्राने वारंवार 'तुझे तोंड हत्तीच्या सोंडेचे का ?' अशी चौकशी केली. तेव्हा गणपतीने रागावून शाप दिला की, 'माझ्या जन्मदिवशी तुझे दर्शन ज्यांना होईल त्यांना संकट प्राप्त होईल-त्यांच्यावर चोरीचा आळ येईल.' चंद्राने यानंतर गणपतीची स्तुती केल्यावर गणपतीने त्याला सांगितले 'तू माझ्या भालप्रदेशी राहशील आणि वद्य चतुर्थीला तुझे दर्शन घेऊनच माझ्या व्रताची सांगता लोक करतील. त्याआधी द्वितीयेसही तुझी कोर पाहून तुला नमस्कार करतील.' प्रत्यक्ष श्रीकृष्णावरही गणेशचतुर्थीस चंद्र पाहिल्यामुळे चोरीचा आळ आला होता. यासंबंधीची स्यमंतक मण्याची कथा प्रसिद्धच आहे. अशा या समर्थ गणपतीची आराधना व उपासना आजही सर्वत्र वाढत्या प्रमाणावर सुरू आहे. गणपत्यथर्वशीर्षाची आवर्तने आजही घरोघरी होताना दिसतात.

आश्विन महिन्यातील नवरात्रामधील शारदोत्सव व विजयादशमीचा सण यांचेही माहात्म्य आज कमी झालेले नाही. देवीची उपासना सर्वत्र घरोघरी केली जाते. दुर्गा, पार्वती, महालक्ष्मी, महासरस्वती, महाकाली, भुवनेश्वरी, जोगेश्वरी, भवानी, अंबाबाई, यमाई, एकवीरा अथवा रेणुका अशा विविध नावांनी देवीची प्रसिद्धी असून कोल्हापूर, औंध, मातापूर, तुळजापूर, आंबेजोगाई, चांदा, वणी, प्रतापगड इत्यादि देवीस्थाने महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. शिवाजीराजे व समर्थ रामदास यांनी वाढविलेले भवानीदेवीचे माहात्म्य आजही ध्यानात येण्यासारखे आहे. या देवीचे नवरात्र आजही घरोघरी व मंदिरांतून आश्विन शु. १ पासून ९ पर्यंत चालू असते. दुष्ट शक्तींच्या वा मत्त असुरांच्या नाशासाठी दुर्गेने अथवा देवीने अनेक अवतार धारण केले आहेत. या अवतारकथांचे श्रवण-पठण सप्तशतीच्या पाठाच्या निमित्ताने केले जाते. घटाची स्थापना, पूजा केली जाते. त्यांना रोज फुलांची नवी माळ बांधिली जाते. नवीन येणाऱ्या धान्याचे

प्रतीक म्हणून घटाभोवती उगवणाऱ्या सुरवरची देखभाल केली जाते. शारदा, दुर्गा, काली या नावांनी देवीचे उत्सव महाराष्ट्र व बंगालमध्ये मोठ्या प्रमाणावर होत असतात. रक्तमांसाचा नैवेद्यही अनेक ठिकाणी अर्पण केला जातो.

नवरात्र संपले की दसरा उजाडतो. विजयादशमी हा एक फार मोठा सण विजयाचा, पराक्रमाचा मानला जातो. पावसाळा संपल्यानंतर मराठ्यांच्या फौजा पराक्रमासाठी या दिवशी बाहेर पडून सिमोल्लंघन करीत असत, सुवर्णाची लूट आणीत असत. शस्त्रांची पूजा करून नव्या शौर्यासाठी उत्साहित होत असत. अशा या शौर्याची वा पराक्रमाची खूण आजही विजयादशमीच्या दिवशी आपण पाळतो. घोडे, हत्ती, राजचिन्हे, ग्रंथ, शस्त्रे इत्यादींची पूजा या दिवशी आपण करतो. गावाच्या सीमेवर जाऊन शमी अथवा आपटयाच्या झाडाची पाने पूजून ते सोने म्हणून वाटतो. घरी आल्यावर बहीण भावास ओवाळते. आपटयाच्या काडीने पाटावर तांदुळांनी काढलेल्या शत्रूच्या, दैत्याचा आपण नाश करतो. वडील माणसांना आपटयाची पाने सोने म्हणून देऊन नमस्कार करतो. पूर्वी मोठमोठ्या संस्थानांतून विजयादशमीची भव्य अशी राजेशाही मिरवणूक निघत असे.

विजयादशमीचे महत्त्व सांगणाऱ्याही अनेक कथा आहेत. रामचंद्राचा पणजा रघुराजा याच दिवशी सर्व दिशांना असणाऱ्या राज्यांना जिंकण्यासाठी स्वारीवर निघाला. रावणाच्या वधासाठी रामचंद्रानेही याच दिवशी लंकेकडे प्रयाण केले. पांडवांनी अज्ञातवासात असताना आपली शस्त्रे अरण्यात शमीच्या झाडावर ठेविली होती. अज्ञातवास संपताच आश्विन शु. १० याच दिवशी त्यांनी शमीचे व शस्त्रांचे पूजन केले. सोने लुटण्यासंबंधीही कथा सांगितली जाते. पैठण येथे देवदत्त नावाच्या ब्राह्मणाचा मुलगा कौत्स वेदाभ्यास करण्यासाठी वरतंतू ऋषीकडे राहिला. सकल शास्त्रांत तो प्रवीण झाल्यावर काही गुरुदक्षिणा घ्यावी म्हणून अतिशय आग्रह करू लागला. म्हणून एकाजवळूनच चौदा कोटी मुद्रा आणण्यास गुरूने सांगितले. कौत्स रघुराजाकडे आला. रघुराजाने नुकताच विश्वजित यज्ञ करून आपल्या भांडारातील सर्व संपत्तीचे दान केले होते. रघुराजाने इंद्रावर स्वारी केली. इंद्राने आपटयाच्या व शमीच्या झाडांवर सुवर्णमुद्रांच

वर्षाव कुबेराकरवी केला. रघुराजाने त्या मुद्रा कौत्सास दिल्या. वरतंतू ऋषींनी त्यातील फक्त १४ कोटीच मुद्रा घेतल्या. उरलेल्या सुवर्णमुद्रा एकदा दान दिल्या म्हणून रघुराजाही परत घेईना. शेवटी त्या शमी व आपट्याच्या झाडाखाली ठेवून लोकांना लुटण्यासाठी आवाहन करण्यात आले. हा दिवस आश्विन शु. १० हाच होता ! सोने समजून आपट्याची पाने लुटण्याची प्रथा या प्रसंगावर पडली ती अजून चालू आहे. महिषासुर नावाच्या दैत्याने सर्व लोकांना फार त्रास दिला होता. अष्टभुजा देवीने त्याच्याशी नऊ दिवस युद्ध करून त्याला दहाव्या दिवशी ठार मारले. या विजयाचे स्मारक म्हणूनही विजयादशमीचा उत्सव चालू झाला असेही मानतात.

आपला सर्वांत मोठा सण दीपावलीचा किंवा दिवाळीचा. दिवाळी म्हणजे दीपावली, दिव्यांची ओळ किंवा रांग. आश्विन व॥ १३ पासून चार-पाच दिवस रात्री सर्वत्र दिव्यांची आरास करून दिवाळी साजरी केली जाते. अंधाऱ्या रात्री चमकणाऱ्या दिव्यांचा हा अतिशय मोठा सण अनेक दृष्टींनी आपल्या प्राचीन इतिहासाशी संबंधित आहे. वसुबारसेपासून या सणास सुरुवात होते. या दिवशी सवत्स गाईची पूजा करतात. धनत्रयो-दशीस गुळाधन्याचा नैवेद्य देवास दाखविला जातो. या दिवसाची एक कथा पुराणात सांगितली आहे. एकदा यमराजाने आपल्या दूतांना विचारिले, 'प्राण हरण करताना तुम्हांस कधी कोणाची दया आली काय ?' या प्रश्नाचे उत्तर देताना दूतांनी सांगितले, 'एकदा हंस नावाचा राजा मृगया करीत असताना तहान, भूक व श्रम यांनी व्याकुळ झाला. तेव्हा जवळच्या हैम नावाच्या राजाच्या घरी तो गेला. हैम राजाने हंस राजाचे स्वागत चांगले केले. हैम राजास यावेळी पुत्र झाल्यामुळे तो आनंदात होता. त्याच्या घरी षष्ठीपूजन असल्यामुळे षष्ठीदेवीने प्रकट होऊन राजास सांगितले की, 'हा तुझा मुलगा लग्नानंतर सर्पदंशाने चौथ्या दिवशी मरण पावेल' राजास अत्यंत वाईट वाटले. हैम राजाचे दुःख पाहून हंस राजाने मुलास वाचविण्याचा उपाय केला. यमुनेच्या डोहात एक उत्तम प्रासाद बांधून त्या मुलाच्या राहण्याची सोय केली. परंतु पुढे लग्न झाल्यानंतर चौथ्या दिवशी राजपुत्र सर्पदंश होऊन मरण पावला. यमराजा, अशा

आनंदाच्या प्रसंगी त्या मुलाचे प्राण हरण करताना आम्हांस फार वाईट वाटले. असा अपमृत्यू न यावा म्हणून काय करावे ?' दूतांच्या या प्रश्नास उत्तर देताना यमाने सांगितले, 'आश्विन व. १३ पासून जो कोणी पाच दिवसपर्यंत दीपोत्सव साजरा करील त्यास अपमृत्यू येणार नाही.' म्हणून दीपोत्सवात सुरुवात धनत्रयोदशीपासून होत असते.

दीपोत्सवाचा दुसरा दिवस नरकचतुर्दशीचा. या दिवशी लोक पहाटे उठतात. अंगाला सुगंधी तेले, उटणी लावून मंगलस्नान करतात. दिव्यांची आरास करतात. लहान मुले फटाके वाजवून आनंद व्यक्त करतात. घरात अनेक प्रकारचे गोडधोड पदार्थ केलेले असतात. नरकचतुर्दशीच्या दिवसाचा संबंध एका फार मोठ्या ऐतिहासिक सत्कृत्याशी आहे. पूर्वी भौसासुर अथवा नरक नावाचा एक दैत्य मत्त होऊन प्राग्ज्योतिषपूर येथून सर्वांना त्रास देत असे. सोळा हजार कुमारिकांना याने कैदेत ठेविले होते. त्यांना त्रास द्यावा, त्यांची परदेशात विक्री करावी असा त्याचा उद्योग सुरू झाला. श्रीकृष्णास ही हकीकत समजल्यावर त्याने नरकासुरावर हल्ला करून त्याचा वध केला. सोळा सहस्र कुमारींची त्याने मुक्तता केली. त्यांचे पालकत्वही श्रीकृष्णाने पत्करले. त्यांची लग्ने योग्य वर पाहून लावून दिली. श्रीकृष्णाने नरकासुराचा वध केला तो आश्विन व. १४ चा होता. या महान विजयासाठी नरकचतुर्दशीचा दिवस पहाटे उठून मंगलस्नाने करून आपण पाळतो.

दीपावलीचा तिसरा दिवस लक्ष्मीपूजनाचा आणि चौथा दिवस बलिप्रतिपदेचा. लक्ष्मी प्रसन्न व्हावी म्हणून तिची पूजा या दिवशी केली जाते. यासंबंधीही एक कथा सांगितली जाते. पूर्वी बळी नावाचा एक राजा अतिशय सामर्थ्यसंपन्न होऊन देवादिकांना सतावू लागला. देवांच्यासह त्याने प्रत्यक्ष लक्ष्मीसही बंदिवासात ठेविले. या बळीस शासन करण्यासाठी विष्णूने वामनावतार धारण करून त्रिपाद भूमिदानाचे निमित्त करून साऱ्या पृथ्वीवर स्वामित्व मिळविले. लक्ष्मीची सुटका केली. हा दिवस अमावस्येचा होता. याची स्मृती आजही लक्ष्मीपूजन करून आपण कायम ठेवीत आहोत. व्यापारी लोक वर्षाचा अखेरचा दिवस म्हणून आपल्या हिशेबाचा आढावा घेऊन लक्ष्मीचे पूजन थाटाने करतात. दुसरा दिवस

पाडव्याचा अथवा बलिप्रतिपदेचा. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त. वामनाचे तिसरे पाऊल उचलून बळीस पाताळात दडपले तरी त्याची भक्ती व सत्प्रवृत्ती पाहून वामनरूपी विष्णूने त्याला वर दिला; 'कार्तिक शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी लोक तुझे स्मरण आनंदाने करतील.' याप्रमाणे बलीचे स्मरण आपण कायम ठेविले आहे. काही ठिकाणी बलीचे चित्र त्याच्या स्त्रीसह काढून त्याची पूजा करण्यात येते. याच दिवशी विक्रम संवताची सुरुवात असल्याने हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी पतिपत्नी एकमेकास भेटी देतात. या नंतरचा दिवस यमद्वितीयेचा किंवा भाऊबीजेचा. यमराजाने स्वतःची बहीण यमुना हिच्या घरी जाऊन तिला वस्त्रे, अलंकार दिले. तिच्या घरी भोजन केले. बहिणीने भावास ओवाळण्याची व भावाने भाऊबीज देण्याची प्रथा आजही चालू आहे.

प्राचीन संस्कृतींशी वा इतिहासाशी संबंधित असे आणखीही काही सण आज आपण पाळतो. त्रिपुरी पौर्णिमा, मकरसंक्रान्त, रथसप्तमी, हुताशनी अथवा होळी हे सण आपल्या परिचयाचे आहेत.

सूर्याचे एका राशीतून दुसऱ्या राशीत जाणे हे संक्रमण असले तरी ईश्वराने देवीच्या रूपाने संकासुर दैत्याचा वध करून लोकांना सुखी केले म्हणून हा संक्रातीचा सण एकमेकास तिळगूळ देऊन पाळतात. रथसप्तमीस सूर्य रथावर बसून मार्ग आक्रमण करतो अशी आपली समजूत आहे. नवसासायासाने झालेला मुलगा रोगमुक्त व्हावा म्हणून कांबोज देशाच्या यशोवर्मा नावाच्या राजाने याच दिवशी सूर्याची पूजा केली होती. अलीकडे हुताशनी अथवा होळीमधील ग्राम्य व हिडिस स्वरूप कमी होत असले तरी होळीचे शास्त्रयुक्त पूजन सर्वत्र होत असते. ढुंढा नावाची राक्षसीण लहान मुलांना फार त्रास देते; तिला शिव्या देऊन हाकून देण्यासाठी अभद्र भाषा या दिवशी वापरली जात असावी. आणखीही एक या दिवसाची कथा सांगितली जाते ती अशी : तारकासुर नावाचा एक राक्षस मातून सर्व देवांना फारच त्रास देत होता. देव परमेश्वरास शरण गेले. शंकरास षडानन नावाचा जो मुलगा होईल त्याकडून तारकासुराचा वध होईल असे परमेश्वराने सांगितले. परंतु शंकर ध्यानमग्न अवस्थेत ! शेवटी कामदेव आपल्या रती नावाच्या स्त्रीसह उपस्थित झाला. कामदेव


शंकराच्या व रती पार्वतीच्या शरीरात गेल्यानंतर उभयतांत प्रीती निर्माण झाली. परंतु कामदेवाने आपली तपश्चर्या भंग केली म्हणून आपला तिसरा डोळा उघडून त्यातील अग्नीने शंकराने कामदेवास अथवा मदनास जाळून भस्म केले. या मदनदहनाची आठवण आज होळीच्या रूपाने शिल्लक आहे.

* * *

# ६ : व्रते आणि कुलाचार

आज आपले जीवन अतिशय गतिमान झाले आहे. कुटुंब छोटे बनत चालले आहे. आपली घरेही लहान दोनतीन खोल्यांची बनत आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोणाच्या प्रभावामुळे जुन्या देवधर्मावरील विश्वास आपला कमी होत आहे. परंतु धावपळीच्या, दगदगीच्या, संघर्षाच्या जीवनास आपण आधारही शोधीत आहोत. कर्मकांडास व व्रतवैकल्यास नावे ठेविता ठेविता आपण पुनः त्यांच्याकडे वळत आहोत. नव्या अंधश्रद्धा उदयास येत आहेत. गुरुपरंपरा उदयास येत आहेत. जुन्या व्रतांचे नवे अवतार प्रकटत आहेत. जुन्या दोऱ्यांना नव्या धाग्यांचे पीळ बसत आहेत. शनिवार, चतुर्थी, सोमवार, गुरुवार, मंगळवार इत्यादि उपासांबरोबर त्या त्या दैवतांचे माहात्म्य वाढत आहे. सत्यनारायणास नवे रूप येत आहे. मंगलागौरीचा उत्सव थाटाने साजरा होत आहे. याचे कारण असे की, मनुष्य हा अगतिक आहे, श्रद्धाळू आहे, जुन्या परंपरेच्या दोऱ्यास भक्कम धरून ठेवणारा आहे,

ज्येष्ठी पौर्णिमेला आता कदाचित मोठ्या शहरांत सुवासिनी स्त्रियांना गावाबाहेर वडाच्या वृक्षाचा शोध घेता येणार नाही. पण त्या घरातच वडाच्या झाडाची फांदी आणतील, चित्र आणतील व वडाची पूजा करतील. सत्यवानसावित्रीची कहाणी ऐकतील. जमल्यास याच नावाचा पौराणिक चित्रपट पाहतील. जन्मोजन्मी हाच पती मिळावा



म्हणून नवस बोलतील. लहान गावी वडाच्या झाडाभोवती या दिवशी सुवासिनी स्त्रियांचा वेढाच असतो. गावचा ब्राह्मण पूजाकथा सांगतो. कारण आजच्या स्त्रियांना माहीत आहे की, फार फार वर्षांपूर्वी कोणा सावित्री नावाच्या पुण्यवान साध्वीने आपल्या मृत पतीचे, सत्यवानाचे प्राण यमापासून परत आणले होते.

हा प्राचीन धागा त्यांच्या मनात बळकटपणे दृढ झाला आहे. मद्र देशाचा राजा अश्वपती. ब्रह्मदेवाची स्त्री सावित्री हिची आराधना केल्यावर त्याला एक सुलक्षणी कन्या झाली, ही सावित्री. हिने शाल्वदेशाचा राजा आंधळा द्युमत्सेव याचा पुत्र सत्यवान यास पसंत केले होते. नारदांनी या निवडीमधील दोष सांगितला. मुलगी एक वर्षात विधवा होणार होती ! तरी सावित्रीने आपला बेत बदलला नाही. ठरल्याप्रमाणे सत्यवान एकाएकी मरण पावला. यमधर्म नित्याप्रमाण सत्यवानास घेऊन जाण्यासाठी आला. सावित्रीने आपल्या पतीस घेऊन जाणाऱ्या यमाचा पाठलाग केला. मोठ्या निष्ठेने ती त्याच्या मागोमाग जाऊ लागली. चातुर्याने तिने तीन वर मागून घेतले. आणि सत्यवानाचे प्राण परत आणले. सावित्रीने प्रत्यक्ष यमधर्मावर, मृत्यूवर विजय मिळविला. सुवासिनी स्त्रियांना ही सावित्री अजूनही प्रिय आहे. ज्या वडाखाली सावित्रीचा पती मरण पावला व पुन: जिवंत झाला तो वडही सावित्रीबरोबर पूजनीय झाला.

स्त्री-पुरुषांना आजही आवडणारे आणखी एक व्रत म्हणजे एकादशीचे. प्रत्येक महिन्यातील शुद्ध व वद्य पक्षातील एकादशीस उपवास करणारे कितीतरी लोक आजही दिसतात. आषाढ, कार्तिक, माघ व चैत्र या महिन्यांतील एकादशींना तर फारच महत्त्व असून पंढरपूरला मोठमोठ्या यात्रा या महिन्यांत भरतात. एकादशी ही एक देवता असून तिच्यासाठी शैव व वैष्णव असे दोघेही उपवास करतात. आषाढी एकादशीस भगवान श्रीविष्णू निजतात म्हणून ही शयनी एकादशी. या दिवसापासून चातुर्मास्याचा काळ सुरू होतो. कार्तिकी एकादशीस विष्णू जागा होतो म्हणून ही बोधिनी एकादशी. आज सर्वत्र प्रचलित असलेल्या एकादशीचा संबंध थेट महाभारतापर्यंत जडलेला आहे. एकादशीचे व्रत केल्यास ब्राह्मणाच्या वधाचे पातक दूर होईल असे श्रीकृष्णाने पांडवांस सांगितले होते.

या एकादशीच्या निर्मितीची एक कथाही सांगितली जाते. मृदुमान्य नावाच्या एका दैत्याने तपश्चर्या करून शंकरास प्रसन्न करून घेतले. फक्त एका स्त्रीच्याच हातून तू मरशील असा वर त्याला मिळाला होता. यामुळे हा दैत्य देवांनाही सतावू लागला. त्याने विष्णूलाही जिंकले. ब्रह्मा, विष्णू व महेश या देवांना या दैत्याच्या भीतीने पर्वताच्या गुहेचा आश्रय घ्यावा लागला. काही दिवसांनी या देवांच्या श्वासांतून एक देवी निर्माण झाली. हीच एकादशी होय. या देवीने त्या मत्त दैत्याचा वध केला. याच देवीचे व्रत पुढे पांडवांनी चालू ठेविले. रुक्मांगद, अंबरीष इत्यादि श्रेष्ठ पुरुषांनी या एकादशीचे माहात्म्य वाढविले. भागवत धर्मीय संतांनी पुढे या एकादशीस फारच महत्त्व दिले.

आजही लग्न झालेल्या मुली लग्नानंतर पाच वर्षे मंगलागौरीचे व्रत मनोभावे करतात. हौसमौज आणि उत्सवप्रियता यात असली तरी मंगलागौरीची पूजा भटजी बोलावून यथासांग होते. धोतरा, शेवंती, जाई, जुई, दुर्वा, जास्वंद इत्यादि फुलझाडांची पत्री जमा केली जाते. पूजेचे साहित्य तयार होते. आरती होते. कथाकहाणीचे श्रवणपठण होते. रात्री खेळ, नृत्य, करमणूक होऊन मंगलागौर जागविलीही जाते. सौभाग्यवर्धक व पुत्रादिकांचा लाभ देणारे हे व्रत आजही लोकप्रिय आहे.

याही व्रताची एक कथा सांगितली जाते. कुंडिन शहरातील एक धर्मपालक नावाचा ब्राह्मण पोटी पुत्रसंतान नसल्याने दुःखी होता. या निपुत्रिकाची भिक्षाही कोणी घेत नसे. कोणा एका योग्याचे सांगण्यावरून या पतिपत्नींनी एका देवीची उपासना सुरू केली. 'सुस्वरूप पण अल्पायुषी पुत्र होईल' असा वर देवीकडून मिळाला. मुलाचे नाव शिव ठेवण्यात आले. मुलगा वयाने वाढत होता. धर्मपालक आपल्या मुलासह काशीस असताना सुशीला नावाची कोणी एक मुलगी आपल्या आईच्या मंगलागौरीच्या व्रतासंबंधाने सांगतांना त्याला दिसली. हे व्रत माहीत असलेल्या घराण्यातील मुलगी सून म्हणून आल्यास ती स्वतःचे व कुळाचे सौभाग्य टिकवील असे धर्मपालकास वाटले. त्याने सुशीलेस आपली सून म्हणून घरी आणले. मंगलागौरीच्या सूचनेवरून व पुण्याईने शिवाचे म्हणजे तिच्या पतीचे प्राण वाचले. प्रत्यक्ष मंगलागौरीने यमदूतांशी लढून सुशीलेचे सौभाग्य राखले.

म्हणूनच आजही मंगलागौरीची प्रार्थना करतांना सुवासिनी म्हणतात, 'पुत्रान्देहि धनं देहि सौभाग्यं देहि मंगले'. गौरीस १६ प्रकारची पत्री वाहतात; सोळा वातींनीं आरती करतात.

श्रावणी अमावस्येस स्त्रिया पिठोरीचे व्रत सौभाग्य व संतती यांच्या प्राप्तीसाठी आजही करतात. देवासमोर ६४ सुपाऱ्या योगिनींच्या स्वरूपात मांडून त्यांची पूजा करतात. ऐश्वर्य व पुत्रप्राप्तीसाठी हे व्रत सांगितले आहे. 'अतिथी कोण ?' असा पुकारा याच दिवशी घरी केला जातो व त्यास घरातील प्रत्येकाने साद द्यायची असते. या व्रताचीही एक कथा सांगितली जाते. श्रीधर व सुमित्रा हे एक ब्राह्मण कुटुंब. वडील मुलगा शंकर व सुनेचे नाव विदेहा. विदेहा दरवर्षी श्रावणी अमावस्येस प्रसूत होई. पण मूल जगत नसे. म्हणून तिला घरातून हाकून देण्यात आले. अरण्यात एका देवतेची व तिची भेट झाली. देवतेने तिला ६४ देवतांची पूजा करण्यास सांगितले. ब्राह्मीं, कौमारी, वैष्णवीं, वाराही, इंद्राणी, महेश्वरी, चामुंडा या देवतां-बरोबर प्रेताक्षी, डांकिनीं, निशाचरी, रुद्रवेताली, निरूपाक्षीं, नरभोजना, कलहप्रिया, दुर्मुखी इत्यादि उग्र देवतांनाही तिने प्रसन्न केल्यावर तिची मुले जगू लागली. भाद्रपद शु. ३ रोजी मुली व सुवासिनी हरतालिकेचे व्रत साजरे करतात. शिव, पार्वती व तिची सखी अशा तिघांची चित्रे मांडून त्यांची पूजा केली जाते. दिवसभर उपवास केला जातो. पार्वतीने हे व्रत केले म्हणून तिला शंकरासारखा पती मिळाला. आपले लग्न शिव-शंकराशी व्हावे म्हणून अरण्यात जाऊन भाद्रपद शु. ३ या दिवशी पार्वतीने शंकराच्या वाळूच्या लिंगाची पूजा केली. पार्वतीच्या मनाप्रमाणे घडून आले. म्हणूनच मनासारखा पती मिळण्यासाठी बायका हे व्रत आजही करताना दिसतात.

आणखी एक स्त्रियांचे व्रत म्हणजे ऋषिपंचमीचे होय. भाद्रपद शु. ५ रोजी स्त्रिया आजही मनोभावे ऋषींची पूजा करताना दिसतात. विटाळ गेल्यानंतर हे व्रत करायचे असते. स्वच्छ स्नान केल्यावर सोवळे वस्त्र नेसून पाटावरील कश्यप, अत्री, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नी, वसिष्ठ व अरुंधती अशा सुपाऱ्यांची पूजा केली जाते. ब्राह्मणास वायन व दक्षिणा दिली जाते. या दिवशी बैलांच्या श्रमाचे खायचे नसते. या व्रताची

कथा श्रीकृष्णाने युधिष्ठिरास सांगितली आहे. पूर्वी इंद्र व वृत्र यांचे युद्ध होऊन वृत्र मारला गेला. इंद्राला ब्रह्महत्येचे पाप लागले. म्हणून तो ब्रह्मदेवाला शरण गेला. ब्रह्मदेवाने त्या पातकाचे चार भाग करून त्यांतील एक स्त्रीच्या रजात ठेविला. म्हणून रजस्वला अशुद्ध मानली गेली. रजस्वलेचे पाप दूर होण्यासाठीं हे व्रत करतात. आणखीही एक कथा सांगितली जाते. विदर्भात सुमित्र नावाचा एक ब्राह्मण राहत असे. त्याची भार्या जयश्री. घरीं मोठी शेतीवाडी. गोठ्यात पुष्कळ गाई, बैल. एकदा जयश्रीस दुर्बुद्धी झाली आणि रजस्वला असतानाच तिने घरातील सर्व कामे स्वयंपाकासहित केली. त्यामुळे तिला पाप लागले. मरणोत्तर जयश्री कुत्री झाली व सुमित्र बैल झाला. योगायोगाने हे दोघे स्वत:च्याच मुलाच्या घरी आले. त्यांचा मुलगा सुमती मोठा धर्मनिष्ठ होता. वडिलांच्या श्राद्धाच्या दिवशी केलेल्या खिरीत एका सर्पाने विष टाकले. कुत्रीने ते पाहिले. कुत्री त्या खिरीच्या पातेल्यास शिवली. खीर विटाळलेली पाहून सुनेने जळक्या लाकडाने कुत्रीस मारले. कुत्रीस त्या दिवशी खायला काहीच मिळाले नाही. रात्रीं कुत्री व बैल यांचे भाषण ऐकल्यानंतर सुमतीस सारा प्रकार समजला. त्याने आपल्या आईबापांस ओळखले. आपल्या मातापित्यास अशी अवस्था का प्राप्त झाली ? या प्रश्नाचे समाधान करताना सर्वतपा नावाच्या ऋषीने रजस्वलेच्या विटाळामुळे हे घडले असे सांगितले व यातून मुक्त होण्यासाठी ऋषिपंचमीचे व्रत करण्यास सुचविले. सुमतीने भाद्रपद शु. ५ हे व्रत करून आपल्या आईबापांना मुक्त केले म्हणून आजही हे व्रत चालू आहे.

बहुतेक व्रते स्त्रियांना सांगितली आहेत. काही स्त्री-पुरुषांना मिळूनही आहेत. आज भाद्रपद शुद्ध १४ या दिवशी कित्येक पुरुष अनंताचे व्रत करतात. चौरंगावर तांब्या मांडून त्यावरील पात्रात अनंताची प्रतिमा अथवा शालिग्राम ठेवतात. चौदा गाठींचा तांबडा दोराही पूजतात व तोच पूजा झाल्यावर हातात बांधतात. चौदा वर्षे अनंतव्रत केले की, इच्छित हेतू सफळ होतात. गुरुचरित्रात अनंतव्रताची कथा आलेली आहे. महाभारतातही याचा संदर्भ आलेला आहे. या व्रताचा महिमा श्रीकृष्णाने युधिष्ठिरास सांगितला आहे. सुमंत नावाच्या ब्राह्मणाची सुशीला नावाची

मुलगी सावत्र आईच्या छळास कंटाळून लग्न होताच आपल्या पतीबरोबर, कौंडिण्याबरोबर अरण्यात निघून गेली. अरण्यात तिला काही स्त्रिया लाल रंगाची वस्त्रे नेसून कलशपूजा करतांना दिसल्या तिने त्यांच्यापाशी चौकशी करून स्वतःही हे अनंतव्रत केले. तिला वैभव प्राप्त झाले. चौदा ग्रथींच्या दोऱ्यामुळे हे वैभव आले हे तिचे मत तिच्या पतीस पसंत पडले नाही. त्याने अनंतव्रताचा दोरा फेकून दिला. पुनः त्या जोडप्यास गरिबी आली. मग पतीला अनंताचेच वेड लागले. त्याच्या शोधार्थ तो भटकत राहिला, पण अनंताने कृपा केल्यावरून तो पुढे संपत्तिमान झाला. अशाच धनसंपत्तीच्या हेतूने हे अनंतव्रत आजही केले जाते.

कार्तिक शु. १४ हा दिवस वैकुंठ चतुर्दशी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी रात्री प्रथम विष्णूचे व पहाटे शंकराचे दर्शन घेतात; कारण पूर्वी श्रीविष्णूने काशीस येऊन सहस्रकमले वाहण्याचा संकल्प केला होता. पूजा चालू असताना शंकराने मध्येच एक कमळ डावलले, तेव्हा विष्णूने कमला ऐवजी आपला एक डोळा काढूनच काशीविश्वेश्वरास अर्पण केला. शंकराने प्रसन्न होऊन विष्णूला आपले चक्रायुध दिले. हरिहरांच्या मीलनाचा दिवस म्हणजे वैकुंठ चतुर्दशीचा. शैव व वैष्णव यांच्या ऐक्यवाढीस मदत व्हावी म्हणून हे व्रत वाढले असावे. माघ व. १४ हे एक शिवाचे व्रत महाशिवरात्र म्हणून प्रसिद्ध आहे. कोणा एका व्याधास चुकून शिवस्मरण व पूजन घडले व भोळा शंकर त्यावर प्रसन्न झाल्याची कथा शिवलीलामृतात आहे. याच स्मृतीचा धागा रक्षण करण्यासाठी आपण आजही या दिवशी उपवास करतो. बिल्वपत्रे वाहून शिवाची पूजा करतो. बारा ज्योतिर्लिंगांस या दिवशी मोठी यात्रा भरते.

अशा प्रकारची कितीतरी व्रते नाना निमित्तांनी रुढ झाली आणि आजही ती पाळली जातात. ही बहुतेक सर्व व्रते काम्य म्हणजे कोणती ना कोणती तरी ऐहिक इच्छा मनात धरून केलेली आहेत. धन, संपत्ती, आरोग्य, पुत्र, इत्यादींच्या प्राप्तीसाठी या व्रतांची चलती झाली. प्रत्येक व्रतास पुराणात आधार एखाद्या कथेचा सापडतोच. अगतिक अवस्थेत माणसे आजही या व्रतांच्या पसाऱ्यात आहेत. नाना देव, नाना ऋषी, नाना देवता यांचे माहात्म्य सांगितले गेले, त्यांच्या पूजेचे प्रकार, त्यांचे

मंत्र, त्यांचे नैवेद्य, त्यांची श्रवणकथा; असे एक कर्मकांडच बनून गेले. चतुर्वर्गचितामणीसारखा ग्रंथ याच व्रतांवर निर्माण झाला. रोज तीनतीन चारचार व्रते सांगण्यात आली. जितक्या माणसाच्या आशाआकांक्षा तितकी व्रते निर्माण झाली. संकष्टचतुर्थी, शीतलाष्टमी, प्रदोष, पंचरात्र, श्रीव्रत, लक्ष्मीव्रत, सूर्यव्रत, मातृकाव्रत, निंबसप्तमी, शर्करासप्तमी, कदलीव्रत, रंभाव्रत, दशहरावत, कोकिलाव्रत, पद्मनाभव्रत, कोजागिरी, सोळा सोमवार अशी हजारो व्रते निर्माण झाली. अधिकमास, संक्रांती, निरनिराळे वार, प्रायश्चितासाठी अशा अनेक कारणांनी व्रतांची संख्या वाढली. नाना रोगांच्या परिहरासाठी व्रते उदयास आली. त्यांच्या कथाकहाण्या तयार झाल्या. माणसाची हौसमौज भागविणारी व महत्त्वाकांक्षा टिकवून धरणारी काही व्रते कालमानानुसार टिकून राहिली आहेत.

व्रतांपैकी काही व्रते वंशपरंपरेने आलेली असतात. तर काही निमित्ताने नव्याने घेतलेली असतात. वंशपरंपरेने आलेल्या व्रतांतून कुलाचार व इतर धार्मिक चालीरीती यांची निर्मिती होत असते. असे धार्मिक कुलाचार आजही अनेक ठिकाणी आपणांस कुलदेवतेस अनुसरून चालू असलेले दिसतील. नवी येणारी सून प्रभावी व्यक्तिमत्वाची असेल तर काही चालीरीती ती माहेरहूनही आणू शकते. देवीचे, खंडोबाचे नवरात्र पुष्कळ घरांतून आजही चालू असलेले दिसून येईल.आश्विनाच्या पहिल्या नऊ दिवसांत श्रीमहाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती यांच्या स्वरूपात नवदुर्गांची स्थापना करण्यांत येते. घटस्थापना, त्याच्या भोंवती गव्हाचे अंकुरारोपण, अखंड नंदादीप, कडक सोवळे, सप्तशतीचा पाठ, घटासाठी रोज फुलांची माळ इत्यादि कुलाचार सर्वत्र थोडयाफार प्रमाणात दिसून येतील. आश्विन शु. ५ स उपांगललिता देवीची पूजा काही घरी होत असतें. मार्गशीर्ष शु. ६ हा दिवस मल्हारी मार्तंड अथवा खंडोबाच्या स्मृतीसाठी पाळावयाचा असतो. तळी उचलणे, जेजुरीच्या खंडोबाला ओवाळणे, भंडारा कपाळाला लावणे असे काही आचार या वेळी आजही टिकून राहिले आहेत. ‘ येळकोट येळकोट चांगभले ’चा उच्चार आजही होत राहतो.

मातापित्यांचे स्मरण एकदा तरी व्हावे म्हणून श्राद्धाचा विधी सांगितला आहे. तोही थोडयाफार प्रमाणात आज होत असताना दिसतो.

भाद्रपद व. १ पासून ३० पर्यंतच्या पंधरवड्यास पितृपक्ष असेच नाव आहे. या पंधरा दिवसांत तिथी ध्यानात घेऊन आपल्या पितरांचे श्रद्धापूर्वक स्मरण आजही केले जाते. महालयश्राद्ध म्हणून याची प्रसिद्धी आहे. केव्हा किती ब्राह्मण बोलावायचे, सुवासिनी किती बोलवायच्या हे ज्या त्या कुलाचाराप्रमाणे ठरलेले असते. ग्रामदैवताच्या संदर्भातही काही कुलाचार तयार होतात. कुळातील श्रेष्ठ पुरुषामुळे काही कुलाचार आलेले असतात. लग्नमुंजीसारख्या प्रसंगी या कुलाचारांची आठवण आजही हमखास आपणांस होते. गोंधळ घालण्याची प्रथा आजही कटाक्षाने पाळली जाते. देवी, खंडोबासारख्या आपल्या दैवतांबरोबर इतरही दैवतांना आवाहन करून, त्यांची स्तुती गाऊन देवाचा 'उदो उदो' करावयाचा असतो. कोकणस्थात 'बोडणा'चा कुलाचार आजही न विसरता केला जातो. मंगल कार्यानंतर कुळदेवतेच्या प्रीत्यर्थ हा विधी आज केला जातो. चार सुवासिनी व एक कुमारिका यांना बोलावून त्यांच्याकडून परातीत घातलेले पुरणावरणाचे अन्न कालवून घेतात. या अन्नात देवी ठेवतात. असे अनेक कुलाचार आपण पूर्वसंदर्भानुसार पाळीत आहोत.

आजही बहुतेकांच्या घरी कार्तिक शु. ११ पासून १५ पर्यंत दरवर्षी तुळशीचा विवाह केला जातो. दारातील तुळशीचे वृंदावन चांगले सारवून, रंगवून सुशोभित करतात. बाळकृष्णाला व तुळशीला मुंडावळ्या बांधून त्यांचा विवाह लावला जातो. या प्रथेसही एक जुना आधार सांगितला जातो. जालंधर नावाचा एक महाप्रतापी योद्धा होता. त्याने देवांनाही पराजित केले. त्याची पतिव्रता वृन्दा हिच्यामुळे त्याचा पराक्रम सार्थ होत असे. वृंदेचे पातिव्रत्य भंग पावल्याखेरीज जालंधराचा नाश होणार नव्हता. म्हणून विष्णूने कपट करून जालंधराचा वेष धारण करून एक मस्तक व धड असे दोन वेगळे करून वृंदेपुढे दोन वानरांकडून ठेविले. जालंधर युद्धात मरण पावला अशी तिची समजूत करून देण्यात आली. तिचा शोक सुरू झाला. एक साधू मंत्रसामर्थ्याने जालंधरास जिवंत करीत असताना श्रीविष्णूने जालंधराचे रूप धारण केले. वृंदेने त्याला आनंदाच्या भरात मिठी मारली. तिचे पातिव्रत्य कमी झाल्याने खऱ्या जालंधरास अपयश आले. रणांगणावर त्याचा अंत झाला. वृंदेला विष्णूचे कपट समजले. तिने


त्याला शाप दिला. ‘ तुलाही पत्नीचा वियोग होईल व मर्कटांचे साह्य घेण्याची पाळी तुझ्यावर येईल. ’ एका साध्वीला आपण फसविले याबद्दल विष्णूला पश्चात्ताप झाला. अग्नीप्रवेश केलेल्या वृंदेच्या राखेजवळ तो सारखा बसून राहिला. पुढे विष्णूचे हे वेड घालविण्यासाठी पार्वतीने वृंदेच्या रक्षेवर स्मशानभूमीत तुळस, आवळी व मालती यांची रोपे लावली. पुढे ही वृंदाच रुक्मिणी झाली. वृंदा, रुक्मिणी व तुळस ही अशा रीतीने एक झाल्यामुळे प्रतिवर्षी आजही आपण तुळस व बाळकृष्ण यांचा विवाह साजरा करीत असतो. कृष्णास, विठ्ठलास तुळस का प्रिय हेही यावरून ध्यानात येण्यासारखे आहे.

* * *

# ७ : जयंती आणि पुण्यतिथी

सर्वसामान्यपणे मनुष्य कृतज्ञ असतो. ज्यांच्यामुळे आपणांस आजचे हे वैभव प्राप्त झाले आहे त्यांचे विस्मरण त्याला सहसा होत नाही. मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह इत्यादि नऊ अवतारी पुरुषांनी संस्कृतिरक्षणाचे जे कार्य केले आहे त्याची आठवण या पुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करून मनुष्य आजही कायम राखीत आहे. धोम, निरानरसिंगपूर इत्यादि ठिकाणी नृसिंहाची स्थाने जागृत असल्याची श्रद्धा आजही आहे. चिपळूणचा परिसर परशुरामक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. रामाची, कृष्णाची, हनुमंताची, शिवाची, विठ्ठलाची, देवीची देवळे गावोगाव निर्माण झाली. नित्याची पूजा-अर्चा, उत्सवसमारंभ, कथाकीर्तन इत्यादींच्या मदतीने पौराणिक व ऐतिहासिक श्रेष्ठ पुरुषांची स्मृती आपण कायम ठेवीत असतो.

नव्या वर्षाचा दुसराच दिवस मत्स्यजयंतीचा म्हणून आजही ओळखला जातो. दशावतारांतील मत्स्य हा पहिला अवतार. ब्रह्मदेवाने निर्माण केलेले वेद म्हणजे ज्ञान हयग्रीव नावाच्या दैत्याने पळवून नेले. या वेदांची मुक्तता श्रीविष्णूने मत्स्याचा अवतार घेऊन केली. सत्यव्रत नावाचा त्यावेळचा एक तपस्वी राजा कृतमाला नदीत स्नान करीत होता. ओंजळीतील पाण्याने अर्घ्य देत असता त्याच्या हातात एक मासा 'माझे रक्षण कर' म्हणत आला. त्या लहान माशाला राजाने कमंडलूत ठेविले व घरी आणले. त्याचा देह वाढू लागला. कमंडलूतून विहिरीत, विहिरीतून सरोवरातही



तो मावेनासा झाला. या मत्स्याची अधिक चौकशी राजाने केली. तेव्हा पुढील प्रलयाची हकीकत त्याला समजली. प्रलयकालातही मत्स्यभगवानांच्या कृपेने सत्यव्रत राजा सप्तर्षींसह नौकेत चढल्यामुळे वाचला. प्रलयकाळाच्या शेवटी मत्स्यभगवानाने हयग्रीव दैत्याला मारिले व वेदांची सुटका केली. सत्यव्रताला मत्स्याने जे ज्ञान दिले ते आपणांस आजही मत्स्यपुराणात वाचावयास मिळते.

भगवानांचा दुसरा अवतार कूर्माचा म्हणजे कासवाचा. समुद्रमंथनाच्या कथेशी या अवताराचा संबंध आहे. देव अतिशय उंच व सुवर्ण शृंगांनी वेढलेल्या मेरू पर्वतावर राहात असत. त्यांना अमृतप्राशनाची इच्छा झाली. देव व असुर यांनी समुद्राचे मंथन करून अमृत मिळवावे असे ठरले. देव व असुर यांच्या युद्धाच्या वेळी असुरांनी देवांची सारी संपत्ती व मौल्यवान वस्तू समुद्रात फेकून दिल्यामुळे समुद्रमंथनाची आवश्यकता होती. मंदार पर्वताची रवी केली. वासुकीचा दोर केला. मंथनाच्या वेळी मंदार पर्वत समुद्राच्याच्या तळाशी जाऊ लागला. सर्वांनी नारायणाची प्रार्थना केल्यावर त्यांनी कूर्माचा अवतार घेऊन मंदार आपल्या पाठीवर धारण केला. समुद्रमंथन यामुळे शक्य झाले. सूर्य, चंद्र, लक्ष्मी, कौस्तुभ इत्यादि चौदा रत्नांची संपत्ती देवांना परत मिळवून देण्यासाठी कूर्मावतारात जे साह्य झाले त्याची स्मृती आज आपण वैशाख शु. १४ या दिवशी कायमची राखून ठेविली आहे. भाद्रपद शु. ३ या दिवशी भगवानाच्या तिसऱ्या अवताराची, वराहाची आठवण आपण करतो. पृथ्वी जलमय होती. कमळांच्या देठांना लागून चिखल असावा. तो एकत्र करून पृथ्वीचा, जमिनीचा भाग अलग व एकत्र करावा असा प्रयत्न सुरू झाला. परंतु हिरण्याक्ष नावाचा दैत्य पृथ्वीस पाण्याबाहेर काढण्याच्या प्रयत्नात अडथळे आणीत होता. भगवानांनी वराहाचे म्हणजे डुकराचे रूप धारण करून आपल्या दातांनी पृथ्वी पाण्याच्यावर काढून शेषाच्या मस्तकावर ठेवून दिली. ज्या ठिकाणी हा संग्राम झाला व वराहरूपाने पृथ्वी वर आणली ते स्थान वराहतीर्थ म्हणून बंगालमधील त्रिवेणी नदीच्या काठी आहे.

आपल्या दशावतारांतील चौथा अवतार नृसिंहाचा किंवा नरसिंहाचा. या अवताराची कथाही सर्वप्रसिद्ध अशी आहे. हिरण्यकशिपू नावाचा एक

दैत्य प्रबळ होऊन तप, यज्ञ, वेदपाठ यांना विरोध करीत होता. देवादिकांना त्रास देत असे. त्याचा पुत्र प्रल्हाद हा विष्णुभक्त असल्याने त्याने केलेली भक्तीही हिरण्यकशिपूस आवडत नसे. यानेच रागाने आपल्या हातातील गदा खांबावर मारली तेव्हा त्यातून भगवान नरसिंहरूपाने प्रकट झाले. त्यांनी हिरण्यकशिपूचे पोट चिरून वध केला. ईश्वर सर्वत्र भरून राहिला आहे. पापाचरणाचे प्रायश्चित केव्हा ना केव्हा तरी आपणांस मिळतेच; अशी शिकवण देणारा हा नृसिंहाचा अवतार व भक्त प्रल्हादाची भक्ती यांचे स्मरण आजही आपणांस आहे. बळी राजास शासन करणारा पाचवा वामनावतार आपणांस माहीत आहेच. भाद्रपद शु. १२ हा दिवस वामनावताराच्या स्मृतीसाठी आपण राखून ठेविला आहे. वैशाख शु. २ हा दिवस परशुरामजयंतीचा म्हणून आपण पाळतो. दशावतारांतील हा सहावा अवतार. भृगुकुळातील जमदग्नीचा मुलगा परशुराम. खांद्यावर परशू घेऊन हिंडणारा व अन्याय करणाऱ्यांना शासन करणारा धर्मरक्षक असा हा अवतार. सहस्त्रार्जुन नावाच्या एका पराक्रमी पुरुषाने वसिष्ठांच्या आश्रमास त्रास दिला. जमदग्नींच्या आश्रमातील कामधेनू पळवून नेली. जमदग्नीचाही वध केला. परशुरामाचा संताप अनावर होऊन त्याने क्षत्रियांच्या नाशाची प्रतिज्ञा केली. आणि त्याप्रमाणे त्याने अन्याय करणाऱ्या क्षत्रियांचा वारंवार पराभव केला. अशा या पराक्रमी परशुरामाची स्मृती आजही आपण राखीत आहोत.

राम आणि कृष्ण ही तर भारतीय परंपरेची दोन मोठी दैवते. रामकृष्णांच्या पराक्रमी स्मृतींनी आपल्या आजच्याही जीवनातील उभे व आडवे धागे विणले गेले आहेत. रामाची मंदिरे गावोगाव दिसतील. रामकथांची पारायणे आजही घरोघर होतात. सत्यवचनी, एकपत्नी, दुष्टसंहारक असा हा दशरथपुत्र राम आपण विसरू शकत नाही. या रामाचा जन्म मोठ्या उत्साहाच्या भरात आजही चैत्र शु. ९ स साजरा होतो. राम सत्यवचनी होता, पितृभक्त होता. एकपत्नीव्रताने वागणारा होता, प्रजावत्सल असा राजा होता; पण रावणादिकांसारख्या दुष्ट व अन्यायी राजवटीचा नाश करणारा तो होता म्हणून त्याचे स्मरण आपण करतो. राज्य असावे रामासारखे, बाण असावा रामाच्या बाणासारखा, बंधुप्रेम

असावे रामलक्ष्मणासारखे असे आजही आपण मानतो. मंदिरांतून आजही रामजन्माचा सोहळा मोठ्या थाटाने साजरा होत असतो.

श्रावण व. ७ व ८ हे दोन दिवस श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाचे म्हणून आपण आज मोठ्या उत्साहाने साजरे करतो. मथुरेचा राजा वसुदेव, त्याची पत्नी देवकी, त्यांच्या कारावासाची हकीकत, तेथेच श्रीकृष्णाचा जन्म, यमुना ओलांडून श्रीकृष्णास गोकुळात आणल्याचा प्रसंग, नंदयशोदा यांच्या घरी श्रीकृष्णाच्या लीला, त्याच्या अवखळ खोड्या, दह्यादुधांचा त्याने केलेला रबडा, गोपांची त्याने केलेली थट्टा, गोवर्धनधारण व कालियामर्दन यांसारखे त्याचे पराक्रम, कंस, जरासंघ, नरकासुर, शिशुपाल इत्यादि दुष्टांचा त्याने केलेला संहार, धर्मसंस्थापनेचे त्याचे कार्य, त्याने केलेली पांडवांची जपणूक, त्याने अर्जुनास सांगितलेली भगवद्गीता; अशा कितीतरी संदर्भांत श्रीकृष्ण आज आपल्यांत सजीव होऊन वावरतो आहे. गोकुळाष्टमीस तर गावोगावी आजही प्रत्यक्ष गोकुळच अवतरते. नाना वेषधारी गोपाळ जमा होतात. श्रीकृष्ण तयार होतो. त्याच्या भोवती फेर धरला जातो. रस्त्यारस्त्यातून दहीहंडी लटकलेली असते. 'गोविंदा, गोविंदा' करून नाचत नाचत, बेभान होत होत ही दहीहंडी फुटते. दही-काल्याच्या प्रसाद सर्वजण भक्षण करून फार प्राचीन काळी गोकुळात जे सुख श्रीकृष्णाच्या सौंगड्यांनी अनुभवले त्याची आजही अनेक ठिकाणी आवृत्ती आहे.

थोर दैवी पुरुषांची आपण जयंती वा जन्मदिवस साजरा करून आठवण कायम ठेवितो. त्यांच्या सद्गुणांचा वारसा आपण चालू ठेवितो. पौराणिक अथवा ऐतिहासिक काळात झालेल्या थोर व्यक्ती, त्यांची सत्कृत्ये आपण आदरभावाने आठवीत असतो. श्रावण व. ८ आपण कृष्ण-लीलांची आठवण करतो तर मार्गशीर्ष शु. ११ रोजी आपण गीताजयंतीचा दिवस आजही मोठ्या प्रमाणावर साजरा करतो. अर्जुनासारखी मोहग्रस्त अवस्था आपली वारंवार होत असते. त्यावेळी आपण गीतेचा आसरा घेतो. ऐन युद्धाच्यावेळी अर्जुनाच्या मनात 'कश्मल' निर्माण झाले. लक्षावधी वीर आपलेच आप्त, पितामह, आचार्य, शालक, बंधू यांच्याशी का लढायचे? यांच्या रक्ताने माखलेल्या सिंहासनावर बसायचे?' अशा विचाराने

क्षत्रिय अर्जुन हतवीर्य झाला. त्याने हातातील धनुष्य टाकून दिले. कारुण्याने त्याच्या अंगास कंप सुटला. मी युद्ध करणार नाही. असा आपला निश्चय त्याने जाहीर केला. क्षत्रियाने आपला धर्म सोडल्यावर त्याला स्वधर्माची, उचित अशा क्षात्रवृत्तीची आठवण करून देण्यासाठी श्रीकृष्णांनी गीता सांगितली. शिवाय मी अर्जुन या कौरवांना मारणार, हा अज्ञानग्रस्त मोह दूर करणे भाग होते. म्हणून श्रीकृष्णांनी उपदेश केला. 'अर्जुना, तुझ्यासारख्या क्षत्रियाला हे योग्य नव्हे. धर्मयुक्त युद्धाखेरीज तुला दुसरी गोष्ट इष्ट नाही. सुखदुःख, लाभालाभ, जयाजय यांची पर्वा न करता तू युद्धास तयार हो. आणि लक्षात ठेव की, जेथे योगेश्वर श्रीकृष्ण व धनुर्धर पार्थ आहे तेथे विजश्री निश्चित मिळणार.' श्रीकृष्णाने केलेल्या या उपदेशाची स्मृती नित्य स्फुरणदायी असल्यामुळे गीताजयंतीस त्यास उजळा दिला जातो. भगवद्गीतेचा हा थोर उपदेश ज्या व्यासांनी ग्रथित केला व ज्यांनी महाभारतासारखे ग्रंथ लिहिले त्या व्यासांना गुरुस्थानी मानून त्यांच्याबद्दल आदर दाखविण्यासाठी आजही गुरुपौर्णिमा वा व्यासपौर्णिमा हा दिवस आषाढी पौर्णिमेला आपण साजरा करतो. ज्ञान, विद्या देऊन आपणांस पुनर्जन्म देणाऱ्या गुरूचे स्मरण याच कृतज्ञेपोटी करावयाचे असते. मार्गशीर्ष शु. १५ रोजी दत्तात्रेयांच्या अवतारी कृत्यांची आठवण आपण करीत असतो.

अशाच प्रकारे आपण हनुमान, गौतमबुद्ध, महावीर, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, शिवराय, गांधी, इत्यादि पुण्यपुरुषांची जयंती साजरी करतो. या एकेका श्रेष्ठ पुरुषाच्या गुणांचा गौरव नव्या पिढीसाठी करण्याची हीच संधी असते. वेद, उपनिषदे, गीता, पुराणे हे सर्व धर्मग्रंथ संस्कृत भाषेत असल्यामुळे इतरेजनांना त्यांचा उपयोग नसल्यासारखे झाले होते. वैदिक धर्मातही बाह्य कर्मकांड व यज्ञीय हिंसा यांची वाढ होत होती. वर्णधर्माची चौकट पक्की होऊन जातिभेदास उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर महावीर व गौतमबुद्ध यांच्या कार्याचे महत्त्व मोठे आहे. चैत्र शु. १३ या दिवशी आपण महावीरांचे व त्यांच्या कर्तृत्वाचे स्मरण करतो. जैनांच्या या चोवीसाव्या तीथकराने शुद्ध आचरण, अहिंसा, वैराग्य, साधेपणा इत्यादि गुणांचा विकास साधणारी धर्मपद्धती परिपुष्ट केली. या दिवशी महा-

वीरांच्या कार्याचा गुणगौरव करून जैनक्षेत्रस्थानी उत्सवसमारंभ सुरू होतात.

संबंध आशिया खंडास अहिंसेचा, सत्याचा, अपरिग्रहाचा, संदेश देणाऱ्या बौद्ध धर्माचा संस्थापक भगवान गौतम बुद्ध यांच्यासाठी आपण आश्विन शु.१० हा दिवस आजही पाळतो. दशावतारांत गौतमबुद्धाला आपण नवव्या अवताराचे स्थान दिले आहे. लोकांच्या भाषेत गौतमबुद्धाचे उपदेश आहेत. शेकडो धर्ममठ, विहार, चैत्य, स्तूप यांच्या दर्शनाने गौतमाच्या धर्माचे दर्शन सदैव ताजेतवाने राहते. आंबेडकरांनी लक्षावधी अनुयायांसकट बौद्ध धर्म स्वीकारल्याने व भारतीय शासनाने बौद्ध धर्माची प्रतीके राष्ट्रीय दृष्टीने स्वीकारल्यामुळे बुद्ध व त्याचे अनुयायी यांची स्मृती आता नित्य होण्या-सारखी आहे. वैशाखी पौर्णिमेसही गौतमाचा जन्मदिवस व निर्वाण दिवस मानतात. 'आषाढस्य प्रथम दिवसे' या प्रसिद्ध ओळीचा आधार घेऊन आजकाल हा दिवस भारताचा महाकवी कालिदास याचा आपण मानतो. कविकुलगुरू म्हणून ज्याची किर्ती आहे त्याचे शाकुंतल, मेघदूत, कुमार-संभव, ऋतुसंहार इत्यादि विविध प्रकारचे वाङमय भारतीय काव्याची श्रेष्ठता पटवून देण्यास समर्थ आहे. 'स्वर्ग आणि पृथ्वी यांचे मधुर मीलन जर कोठे पाहावयाचे असेल, आणि तारुण्याची टवटवी व परिपक्वतेची फळे जर कोणास एका स्थळी असलेली बघावयाची असतील तर मी शाकुंतला-कडे बोट दाखवीन' असे जर्मन कवी गोएट् म्हणतो. मग आम्ही त्याला कसे विसरावे ?

प्राचीन व अर्वाचीन काळातील असे शेकडो द्रष्ट पुरुष आहेत, ऋषि-मुनी आहेत, साधुसंत आहेत, देशवीर व राष्ट्रपुरुष आहेत, त्यांची जयंती वा पुण्यतिथी म्हणजे त्यांच्या उदात्त व गुणसंपन्न चरित्रांचे दर्शन. कृतज्ञेने केलेल्या स्मरणातून त्यांचे मार्गदर्शन घेण्यासाठी सर्वजण उत्सुक असतात. ज्ञानेश्वर, कबीर, एकनाथ, तुकाराम, मोरोपंत, अक्कलकोटचे स्वामी, अहल्या-बाई होळकर, श्रीशिवराय, बाजीराव, राणी लक्ष्मीबाई, माधवराव पेशवे अशा विविध क्षेत्रांतील थोर पुरुषांचे स्मरण आपण जयंती, पुण्यतिथी, स्मृतिदिन अशा निमित्ताने आज करीत असतो. विजयनगरला राज्यस्थापना झाली, शिवरायांना रायगडावर राज्याभिषेक झाला; अशा संस्मरणीय

घटनांचीही स्मृती आपण प्रतिवर्षी ठेवितो. शिवशकाची मोजदाद आजही आपण कधीकधी व कोठे कोठे करीत असतो. टिळक, गांधी अशा राष्ट्र-पुरुषांसाठी कृतज्ञतेने आपण पुण्यतिथी वा जयंती साजरी करीत असतो. पंथीय वा सांप्रदायिक लोक आपापल्या नेत्यांचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करतात. ज्ञानेश्वरांची जयंती व पुण्यतिथी मोठ्या प्रमाणावर साजरी होते. तुकारामबीजेस वारकरी मंडळी तुकोबांच्या चरित्राचे व कर्तृत्वाचे स्मरण श्रद्धेने करतात. फाल्गुन व. ६ हा दिवस नाथषष्ठी म्हणून प्रसिद्ध आहे. या दिवशी जनार्दन स्वामींचा जन्म, जनार्दनस्वामीस दत्त-दर्शन, जनार्दनस्वामींचा नाथांवर अनुग्रह, जनार्दनस्वामींचा देहत्याग, नाथांचा देहत्याग इत्यादि महत्त्वाच्या घटनांमुळे या दिवसास महत्त्व आहे. प्रयत्न, प्रबोध, प्रचीती, प्रपंच व परमार्थ यांचा शुद्ध बोध इत्यादि तत्त्वांचे स्मरण आपण माघ व. ९ स समर्थांच्या बरोबर करतो. याच दिवशी कोंडाणा किल्ल्यावरील तानाजीचे आत्मार्पण असल्याचेही आपण प्रतिवर्षी लक्षात ठेवितो.

दर वर्षीचा एक ऑगस्ट आला की आपणांस टिळकांची करारी मुद्रा आठवते. त्यांचा प्रखर ध्येयवाद व त्याग आठवतो. त्यांची विद्वत्ता आठवते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' या त्यांच्या स्वरा-ज्याच्या मंत्राची आठवण आपणांस होत असते. ब्रिटिशांच्या विरुद्ध असं-तोष पसरवून लोकांना स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी ज्यांनी जिवाचे रान केले त्या टिळकांच्या पन्नास वर्षांपूर्वीच्या निधनाचे निमित्त करून आपण त्यांचे गुण सतत आठवीत असतो. दोन ऑक्टोबरचा दिवस आला की महात्मा गांधीचा शांत व प्रसन्न चेहरा डोळ्यांसमोर येतो. सत्य, अहिंसा, अपरिग्रह या जुन्या मूल्यांबरोबरच असहकार, कायदेबंदी, सत्या-ग्रह या नव्या मूल्यांची आठवण आपणांस होते. खादी, सूतकताई, आश्रम-वास, साधी राहणी, दीनदुःखिताबद्दल कणव, शांतता, बंधुत्व या मानवी गुणांचे स्मरण आपण गांधींच्या जयंतीच्या निमित्ताने करीत असतो. फुले, आंबेडकर यांसारख्या श्रेष्ठ पुरुषांचे स्मरण त्या त्या थोर तत्त्वा-साठी आपण करीत असतो. ९ ऑगस्ट हा दिवस आला की आपणांस ९ ऑगस्ट १९४२ या दिवशी सुरू झालेल्या स्वातंत्र्याच्या अखेरच्या

लढ्याचे स्मरण होते. १५ऑगस्ट म्हटले कीं एक रोमांचकारी व स्फूर्तिदायक पर्व आपणांस आठवते. आपण रौप्य महोत्सव, हीरक महोत्सव, अमृत-महोत्सव, जन्मशताब्दिमहोत्सव साजरा करतो, याचा अर्थ असा की, अभिमान वाटेल अशा व्यक्तींशी वा प्रसंगांशी आपणांस आजही संबंध जोडायचा असतो. जुन्या भक्कम दोऱ्यांचे धागे नव्या काळातही आपणांस धरून ठेवायचे असतात.


* * *

# ८ : असे देव-अशी दैवते

मनुष्य कितीही नास्तिक असला, देव न मानणारा असला तरी त्याला आयुष्यात कधी ना कधी तरी देवाची आठवण होते. अरे देवा, देवा रे देवा असा शब्दप्रयोगही तो करतो. आपले आजचे जीवनही या देवकल्पनेने भारावलेले आहे. आजही आपल्या घरांतील तजबिरी पाहा, सुंदर रंगांतील पुतळे पाहा, कॅलेंडर्सवरील चित्रे पाहा. त्यांवर देवत्वाचा प्रभाव दिसेल. आपल्या देवघरात जरा नजर टाकावी. आपल्या अत्याधुनिक अशा नव्या वास्तूतही पूजाघर अथवा देवघर आपण ऐसपैस मांडीत असतो. पूजेचे अवडंबर आपणांस आज नको, वेळ घेणारे कर्मकांडही नको. परंतु रोज सकाळी आणि संध्याकाळी मनोभावे देवाचे स्मरण आपण केले तर आपले मन प्रसन्न राहते. सांजवात लावून धूपदीप दाखविला की मनास बरे वाटते. कुलदेवतेची पूजा, नित्य आणि नैमित्यिक प्रसंगी आपण आजही करीत असतो. आपले हे देव आणि दैवते फार प्राचीन काळापासून आपणांसाठी उपयुक्त आहेत. यांचा आधार आजही आपणांस वाटतो.

चला, आपल्या देवघरात जरा नजर टाकू या. आपला सर्वांत आवडता देव म्हणजे गोपालकृष्ण. डाव्या गुढघ्याने रांगणारा, एका हातात लाडू घेतलेला, पायात साखळ्या, हातात कडी असणारा लंगडा बाळकृष्ण प्रत्येकाच्या घरी असतो. याची नित्य पूजा आपण करीत असतो. याच्या गोकुळातील लीला आपण चविष्टपणे ऐकतो. याचे पराक्रम आजही आपण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
नोंदणी क्रमांक 80080 दि: ...
क्रमांक 2220 नोंद दि: 26/3/63



गातो, याचा तुळशीसी विवाह दर वर्षी आपण लावतो. गोकुळअष्टमीस याच्या जन्माचा उत्सव आपण दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा करतो. मथुरा, गोकुळ, वृंदावन, द्वारका इत्यादींचा संदर्भ आज आपणांस याच कृष्णासाठी ताजातवाना वाटतो. लग्न नीटपणे जमावे म्हणून याची व रुक्मिणीची स्वयंवरकथा वयात येणाऱ्या मुली आजही वाचतात. 'स्वयंवर' 'सौभद्र,' 'कृष्णार्जुनयुद्ध' अशासारखी नाटके आजही आपणांस आवडतात. संगीत, कला, दुष्टांचे दमन, क्रीडा, प्रजारक्षण, तत्त्वप्रतिपादन इत्यादि बाबतींत आपण आज ह्याच आदर्श डोळ्यांपुढे ठेवतो. याच्याच मुखातून प्रकट झालेल्या 'गीतामृता'वर जगतील विचारवंत आजही संतुष्ट झाले आहेत. गोवर्धनधारी कृष्ण, कालियामर्दन करणारा कृष्ण, कंस, शिशुपाल, नरकासुर इत्यादींचा वध करणारा श्रीकृष्ण, गीता सांगणारा श्रीकृष्ण, अत्यावश्यक अशी कपटनीती आचरणारा श्रीकृष्ण, युक्तीच्या चार गोष्टी सांगणारा, प्रसंगी शिष्टाई करणारा, आपल्या शिष्याचेही सारथ्य करणारा, श्रीकृष्ण आपणांस अजूनही किती प्रिय आहे! लोणीखडीसाखर, दूध घालणारी गौळण, मयूरपिच्छ, मुरली, सुंदर गायी, नृत्यामधील हास्य, विनोद, गोपींची भक्ती असे कितीतरी विषय आपणांस आजही श्रीकृष्णाचे स्मरण करून देणारे आहेत. कृष्णाची, मुरलीधराची मंदिरे गावोगाव दिसतील.

श्रीकृष्णाइतकाच त्याच्याही आधीचा राम आपणांस प्रिय आहे. एकवचनी, एकबाणी, एकपत्नीव्रती म्हणून रामाचा आदर्श आजही आपण ठेवीत असतो. आजही आपण ठिकठिकाणी रामाचा जन्मोत्सव साजरा करीत असतो. राम आणि सीता व त्यांच्या समोर हनुमान यांची मंदिरे गावोगाव आहेत. समर्थ रामदास व गोस्वामी तुळशीदास यांनी रामभक्तीचा प्रसार करून साऱ्या भारतात राम, मर्यादापुरुषोत्तम राम, लोकांपुढे सतत सजीवपणे उभा केला आहे. रामाचा आदर्श सर्व बाबतींत असावा असा आपला आदर्श आहे. त्यांचे पितृप्रेम, त्याचे बंधुप्रेम, त्याचे पत्नीप्रेम, त्याचे प्रजाप्रेम, त्याचे दुष्टसंहाराचे कार्य यांविषयी आपणांस अतिशय आदर आजही आहे. रामायणाच्या अनुवादाचे पठणनिरूपण आजही अनेक ठिकाणी होत असते. रामाच्या धनुष्यबाणाचे पराक्रम आजही आपण गातो.

त्याच्या राज्यव्यवस्थेचा आदर्श आजही आपण ठेवितो. कृष्ण काय, राम काय, हे देव आपलेच आहेत. यांच्याशी आपल्या परंपरेचा धागा जडला गेला आहे. कृष्ण व राम हेच दोन प्रभावी अवतार विष्णूचे आपण मानले. नृसिंह, परशुराम इत्यादींचीही उपासना आहे. पण 'हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हरे कृष्ण हरे कृष्ण कृष्ण कृष्ण हरे हरे' हा मंत्र आजही जगात सर्वत्र दुमदुमून आहे.

याच रामाचा, विशेषतः कृष्णाचा संबंधित म्हणून पंढरपूरचा विठ्ठल तरी आपणांस आज किती जवळचा वाटतो. प्रेमाच्या या पुतळ्यावरून जीव ओवाळून टाकणारे लाखो स्त्रीपुरुष आजही आहेत. पंढरीच्या या विठ्ठलास स्नान घालावे, त्याला अबीरबुक्का लावावा, त्याच्या कपाळावर चंदनाचा टिळा लावावा, त्याच्या गळयात तुळशीची माळ घालावी, त्याच्या समचरणांवर डोके ठेवावे, त्याला कडकडून भेटावे म्हणून कोण हौस आजही मराठी मनास आहे. अशी ही 'विठ्ठल माऊली कृपेची कोंवळी' आज सर्व स्त्रीपुरुषांना हवी आहे. फार फार पूर्वी केव्हा तरी रुसलेल्या रुक्मिणीच्या शोधात हा भगवान विष्णू बाळकृष्णाच्या रूपात भिवरेच्या काठी दिंडीरवनात आला. पुंडलीकाच्या मातृभक्तीस हा भुलला. त्याने फेकलेल्या विटेवर हा उभा राहिला. अजूनही तो तसाच उभा राहून कटीवर हात ठेवून भक्तांचे रक्षण करतो आहे. याच्याच भेटीसाठी अनेक कष्ट सहन करून, अनेक यातना पत्करून लाखो माणसे पंढरपुरास वर्षातून दोनदातिनदा जमतात. 'विठ्ठोबारखुमाई'च्या गजरात तल्लीन होतात. 'ग्यानबातुकाराम,' 'पुंडलीकवरदा हरि विठ्ठल' अशा घोषात एक दिव्य वातावरण आजही तयार होते. 'जयजय रामकृष्ण हरी' अशा मंत्राचा प्रभाव आजही जनमानसावर मोठाच आहे. अनेकांना हा मदनाचा पुतळा वाटतो, हा राजससुकुमार वाटतो, हा पीतांबरधारी वाटतो. याच्यापुढे चंद्रसूर्यांची प्रभा फिकी वाटते. याच्या गळ्यातील वैजयंती माळ, कानांतील मकराकार कुंडले, अंगावर चंदनाची उटी, कपाळावर कस्तुरीचा मळवट पाहून 'कोटि सूर्यांचा झळाळ' कमी वाटावा असे याचे 'सुंदर तें ध्यान। उभे विटेवरी' अनेकांनी पाहिले आहे. हा 'विठू घननीळ सावळा। लावण्यें मदनाचा पुतळा' पाहून अनेकांचे देहभान आजही हारपून जाते.

'नेत्र विशाल भाळ। दंत हिरया ज्योति' अशा याच्या रूपाची मोहिनी आजही अनेकांवर पडते. मराठी माणसाचा हा एक देव म्हणजे ध्यानाचे ध्यान, ज्ञानाचे ज्ञान, भावाचा भाव, देवाचा देव, वैकुंठीचा राव, कामाचा काम, योगीयांचा विश्राम, धामांचा धाम, वैराग्याचे वैराग्य, मुक्ताचे माहेर, भोळीयाचा भोळा, ज्ञानीयाचा डोळा नित्य स्मरणीय असा आहे. 'मुकुट कुंडलें वनमाळा। टिळक रेखिला पिवळा।। कर्णी कुंडलें मकराकार। गळां शोभे वैजयंतिहार। नेत्र आकर्ण सुकुमार' असा हा विठ्ठल भक्तांच्या आवडीसाठी अठ्ठावीस युगे झाली तरी अद्यापही विटेवर उभा आहे.

शिव हा आणखी एक आपला महत्त्वाचा देव. रुद्र, शंकर, महादेव अशा अनेक नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या देवाचे आजही लक्षावधी अनुयायी आपल्यांत आहे. ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली. विष्णूने तिचे पालनपोषण केले. शिवाने आपला तिसरा डोळा उघडून तिचा नाश केला. या नाशातून नव्या सृष्टींचा जन्म झाला. याच शिवशंकराची मंदिरे स्मशानाशेजारी, नदीच्या तीरावर गावोगावी दिसतील. शंकर, पार्वती, नंदी, शंकराच्या गळयातील सर्प, मस्तकावरील जटेतील गंगा व चंद्र या सर्वांची आठवण आज आपणांस आहे. शिव-उमा यांचा विवाह, दक्ष आणि शिव यांचे वैर, शिवाचे विषप्राशन अशा अनेक कथा या दैवताच्या आजही आपण ऐकतो, वाचतो. महायोगी, भैरव, दिगंबर, धूर्जटी भूतेश्वर अशी अनेक नावे याची आहेत. याचे तांडव नृत्य आजही आपल्या परिचयाचे आहे. याची पाच मुखे, चार हात, गौरवर्ण, कपाळावरील तिसरा नेत्र, त्यावरील चंद्रकोर, जटेत गंगा, गळयात रुंडमाळ व नागांचे विळखे, हालाहल विषप्राशनामुळे निळा झालेला कंठ, याच्या हातातील अजगव धनुष्य, डमरू, खट्वांग, अंगावर व्याघ्रचर्म; हे याचे रूप आजही आपल्या परिचयाचे आहे. याच्या लिंगाची पूजा सतत चर्चेचा व कुतूहलाचा विषय आहे. सोमनाथ, मल्लिकार्जुन, महाकाल, ओंकारमांधाता, केदार, भीमाशंकर, विश्वेश्वर, त्र्यंबकेश्वर, वैजनाथ, नागनाथ, रामेश्वर, घृष्णेश्वर ही याची बारा रूपे द्वादशज्योतिर्लिंग म्हणून प्रसिद्ध आहेत. महायोगी, गायनपटू व नाट्यकुशल म्हणून याची ख्याती आजही आहे. म्हणूनच याला नटराज अथवा नटेश्वर म्हणतात. याच्याच डमरूतील सूत्रांपासून पाणिनीस

व्याकरणाची प्रमुख तत्त्वे प्राप्त झाली. याच्याच उपासनेचा शैव पंथ आजही प्रबळ आहे. वाममार्ग, अघोरी, परमहंस, सरभंगी, पाशुपत, लाकुलिन, कापाल, कालामुख, वीरशैव अथवा लिंगायत हे याच शैव पंथाचे उपभेद होत. मराठी संतांच्या कर्तृत्वाच्या उगमस्थानी असणारा नाथ पंथ हा शिवपूजक असून वैष्णव धर्मास प्रचलित करणारा झाला. शिव-विष्णू यांचे ऐक्य हे महाराष्ट्रातच अभिप्रेत आहे.

ब्रह्मा, विष्णू, महेश यांचे संमीलन आपणांस आज दत्तात्रेय या देवात आढळते. दत्त अथवा दत्तात्रेय या दैवताची उपासना आजही जोरात चालू आहे. आपल्या देवघरात आजही दत्ताची त्रिमुखी मूर्ती असते. दत्ताची तसबीर घरोघरी आजही आहे. गुरुवारचा उपवास, पूजाअर्चा, आरती, भजन, गुरुचरित्र–पारायण इत्यादींनी दत्ताचे माहात्म्य आजही टिकून आहे. अत्री, अनसूया, दत्तात्रेय यांच्या कथा सांगणारे वाङ्मय मोठ्या प्रमाणावर आजही नव्याने तयार होत आहे. माहात्म्ये, चरित्रे, स्तवने, पदे, अभंग, स्तोत्रे अशा विविध प्रकारांनी दत्ताचा महिमा आजही सर्वत्र गर्जत आहे. अलर्क, प्रल्हाद, यदू, सहस्रार्जुन या दत्तात्रेयांच्या शिष्यांचीही कथा सांगितली जाते. त्रिमूर्ती, रुद्राक्ष, भस्मधारण, औदुंबर इत्यादींच्या माहात्म्यासंबंधीच्या कथा आजही लोकप्रिय आहेत. श्रीपादयती व नृसिंहसरस्वती, एकनाथ, टेंबेस्वामी, रंग अवधूत, अक्कलकोटनिवासी स्वामी इत्यादि अनेक दत्तावतारांच्या व दत्तभक्तांच्या कथा आजही सांप्रदायिकांत प्रसिद्ध आहेत. गाणगापूर, नृसिंहवाडी, औदुंबर, माहूर, गिरनार, माणिकनगर अशी अनेक दत्तस्थाने प्रसिद्ध असून रोज नव्यानेही निर्माण होत आहेत. काही ठिकाणी हिंदू व मुसलमान यांचीही परंपरा दत्तोपासनेत एकवटलेली दिसते. कलियुगात तात्काळ फळ देणारे, साक्षात्कार घडवून आणणारे, मनोकामना पूर्ण करून इच्छिलेली वस्तू देणारे हे दैवत फारच लोकप्रिय आहे. या दैवतासाठी गुरुवार करणारे, गुरुचरित्राचे पारायण करणारे कितीतरी उपासक आजही दिसतात. 'तीन शिरें सहा हात। तया माझें दंडवत,' 'नमन माझें गुरुराया। महाराजा दत्तात्रेया,' 'दत्त दत्त म्हणतां नित्य,', 'माझी देवपुजा देवपुजा' अशी अनेक भजने गुरुवारी आजही म्हटली जातात.

ब्रह्मा, विष्णू, महेश, राम, कृष्ण, दत्तात्रेय इत्यादी प्रमुख देवांवर

जशी आज आपली भक्ती आहे तशीच ती आपल्या कुलदेवतेवरही आहे. कुलाचार आणि व्रतवैकल्ये यांसाठी आपण कुलदैवत व ग्रामदैवत यांना अजूनही महत्त्व देत आहोत. शिवाची पत्नी देवी ही अनेकांची कुलदेवता आहे. देवीच्या मूर्तीचा थाट अजूनही आपण नवरात्रात वाढवितो. महालक्ष्मी, महासरस्वती, महाकाली अशा विविध स्वरूपांत आपण देवीची उपासना करतो. देवीतत्त्वाच्या अथवा मातृत्वाच्या कल्पनेचा इतिहासही फार प्राचीन काळापासून आपण जपून ठेविला आहे. सज्जनांच्या रक्षणासाठी दुष्टांचा नाश व्हावा म्हणून देवी अनेक अवतार धारण करिते हा आजही आपला समज आहे. हीच आदिशक्ती, आदिमाता, आदिमाया, अंबा, दुर्गा, भवानी, जया, चंडिका, शांभवी, शिवदूती, कराली, इत्यादि विविध नावांनी प्रसिद्ध आहे. हिच्याही उपासनेचा पंथ प्रसिद्ध आहे. घरोघरी आजही हिची उपासना केली जाते. सप्तशती, देवी भागवत इत्यादींचे पारायण आजही सर्वत्र होते मंगळवार वा शुक्रवार हे हिचे वार आजही आपण पाळतो. हिच्यासाठीच आजही आपण ' आईचा जोगवा जोगवा मागेन ' म्हणत जोगवा मागीत असतो.

याच देवीच्या नाना पराक्रमकथा ऐकून आजही आपण उत्तेजित होतो. वेदातील उषासूक्तात अथवा रात्रिसूक्तात आपण याच देवीचे वर्णन केले आहे ' श्रीसूक्ता ' मधील हिरण्यमयी लक्ष्मीचे रमणीय वर्णन आजही आपणांला पसंत आहे. ही देवी ब्रह्मस्वरूपिणी आहे. मंद हास्याने शोभत आहे. ही सुवर्णाकृती असून आर्द्रा नक्षत्रावर जन्मलेली आहे. हिची कांती उज्ज्वल आहे, ही कमलासनस्थ आहे. भक्तांचे मनोरथ पूर्ण करणारी आहे. असा हिचा गुणगौरव आजही केला जातो. विष्णुपत्नी, क्षमादेवी, माधवी, माधवप्रिया, अच्युतवल्लभा अशी हिचीच नावे असून ऋण, रोग, दारिद्र्य, पाप, भूक, तहान, अपमृत्यू, भय, शोक, मनस्ताप यांपासून हीच आपले रक्षण करते अशी आपली श्रद्धा आहे. संपत्ती, वर्चस्व, आयुष्य, आरोग्य, धन, धान्य, पशू, बंधू, बहुपुत्रलाभ, उदंड आयुष्य यांसाठी आजही आपण हिची आराधना करतो. हिचा उत्सव साजरा करतो. कोल, महिष, चंड, मुंड, दैत्य, असुर कालक, कंबू इत्यादी दैत्यांचा नाश हिने केल्यावरूनच हिला निरनिराळी नावे मिळाली आहेत. तुळजापूर, मातापूर, आंबे

जोगाई, औंध, कोल्हापूर, उमरावती, चांदा, पुणे, मुंबई इत्यादि ठिकाणी हिचे वास्तव्य असून हिचा जयजयकार सर्वत्र होत असतो, उत्सव होत असतात. ' दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी ' ही देवीची आरती आजही घरोघरी रोज म्हटली जाते. देवीप्रमाणेच गणेश अथवा गणपती हे आणखी एक आपले कुलदैवत, सर्व कार्यांत आधी याचे पूजन आपण करतो. याच्या कितीतरी कथा आपणांस माहीत आहेत. शिवपार्वतीचा हा मुलगा याचे थोडे चमत्कारिक रूप, याचा खाजगी व सार्वजनिक उत्सव, याच्याविषयी विपुल वाङ्मय इत्यादीमुळे गणेशाचा महिमा आजही टिकून आहे अष्ट-विनायकांची यात्रा आजही लोकांना फलदायी वाटते.

मल्हारी मार्तंड अथवा खंडोबा हे आणखी एक आपल्यांपैकी पुष्कळांचे कुलदैवत. म्हाळसाकांत, खंडोबा अथवा मल्हारी हा खऱ्या अर्थाने लोकदेव म्हणावा लागेल. सर्व जातिजमातींचे लोक याचे भक्त असून अनेक घरी याची पूजा होत असते. याच्या शौर्याच्या अनेक कथा सांगितल्या जातात. मणिमल्ल राक्षसांचा संहार करणारा हा देव म्हणून याचे नाव मल्लारी. हा एक शंकराचाच अवतार होय. खंडोबा म्हणजे स्कंदाचेच रूप असून त्याची महती जेजुरी, पाली इत्यादि स्थानी विशेष आहे. महाराष्ट्रात आण-खीही अनेक देवस्थाने या देवाची म्हणून आहेत. खंडोबा, त्याची धर्मपत्नी म्हाळसा अथवा महालसा, धनगरकन्या बाणाई, खंडोबाचा प्रधान हेगडे, त्याचा घोडा व कुत्रा, खंडोबाचे भक्त, वाघे व मुरळ्या अशी काही रूपे आजही प्रचारात आहेत. खेटे घालणे, कावडी वाहणे, जागरण घालणे, वारी अथवा जोगवा मागणे, तळी उचलणे, बघाड घेणे, पवाड करणे असे काही कुलाचार खंडोबासंबंधी आजही चालू आहेत. भंडारा, बेलदवणा, तिळ-वणाचा हंडा, चंपाषष्ठीचे नवरात्र, कांद्यावांग्यांची कोशिंबीर, भरीत-रोडग्याचा नैवेद्य इत्यादि स्वरूपात खंडोबा आपल्यांत आज उपस्थित आहे. ' अहं वाघ्या सोहं वाघ्या प्रेमनगारा वारी ' अथवा ' रामनाम जपतो महा-देव । त्याचा अवतार हा खंडेराव ' अशी काही गाणी आजही म्हटली जातात. गोंधळाच्या वेळी वाघ्यामुरळ्यांची ही गाणी म्हणण्याची प्रथा आहे. ' काखेला कोकरू बाणु जाती मेंढवाड्या, देव मल्हारी गावड्या,' ' मुख दावुन बानु ग गेली । स्वारी देवाची ग वेडी झाली ' इत्यादि लोकगीतांतही

खंडोबा लोकप्रिय झाला आहे. कुत्रा, कांदा, दिवटी, बुधली, खोबरे, पोवते, तळी, ध्वज, कोटंबा, घोळ इत्यादि शब्दांतील अर्थांचा संदर्भ मल्हारी मार्तंडाचे गुणकथन करणारा आहे. प्रेमपूर, नलदुर्ग, पाली, जेजूरी, निंबगाव, शेगुड, मंगसुळी इत्यादि ठिकाणी खंडोबाची स्थाने आहेत.

ज्योतिबा हा आणखी एक आपला देव. 'येळकोट येळकोट' हा गजर जसा खंडोबाचा तसा 'चांग भला' हा ज्योतिबाचा होय. दक्षिण काशी म्हणून ज्याचे वर्णन केले जाते त्या कोल्हापूरजवळच्या वाडी रत्नागिरी नावाच्या डोंगरावर ज्योतिबाचे स्थान आहे. याही रत्नागिरीची कथा पुराणांतून आहे. अगस्ती आणि लोपामुद्रा यांचा आश्रम येथेच असल्याचे सांगतात. पौगंडऋषी व त्यांची पत्नी विमलांबुजा यांच्या तपश्चर्येस पावून हिमालयातील बद्रिकेदारनाथांनी अवतार धारण केला तो हा ज्योतिबा होय. या ज्योतिबाने आपल्या भैरवगणांच्या मदतीने अनेक राक्षसांचा नाश केला वाणी येथील रत्नासुरासही त्याने मारले. देवाळे, दानोळी, कोथळी, केसापूर, कुभोज, सादळे, मादळे, विशाली इत्यादि गावांची नावेही या संग्रामखुणांची साक्ष देणारी आहेत. ज्योतिबाला साह्य करणारी रेणुका अथवा यमाई अथवा यल्लाम्मा हिचेही माहात्म्य विशेष आहे. रेणुकेचे पती जमदग्नी हे ज्योतिबाचे सद्‌गुरुनाथ होत. केदारनाथ, रवळनाथ, नागनाथ, भैरवनाथ, आदिनाथ, अशा अनेक नावांचा संदर्भ ज्योतिबाशी जोडला जातो स्फूर्ती व पराक्रम यांसाठी ज्योतिबाची प्रसिद्धी आहे.

या प्रमुख देवांखेरीज आणखी किती तरी लहानमोठे देव गावोगाव आपणांस दिसतील ते आर्य की आर्येतर असा भेदही आता राहिलेला नाही जो नवसाला पावेल, सुखी ठेवील, रक्षण करील त्यावर लोकांची भक्ती जडते आपापल्या रुचीप्रमाणे भक्त लोक देवांना पोषाख करतात, सजवतात, नैवेद्य अर्पण करतात, त्यांचे यात्राउत्सव अजूनही साजरे करतात. साऱ्या गावाचे रक्षण करणाऱ्या ग्रामदेवतांची महती अजूनही टिकून आहे. हौसमौज, नवससायास, नाचगाणे, कथाकीर्तने, तमाशेनाटके इत्यादि प्रकारांतून आजही आपली देवदैवते जागृत असलेली दिसतात. बहिरोबा, मारुती, नागनाथ, रामनाथ, शिवनाथ, वाघदेव, नागोबा, नरसोबा, सिदोबा, म्हशा, वेताळ, म्हस्कोबा, येडोबा, ढेगूमेगू, वेताळ असे अनेक देव आजही


खेड्यांतील लोकांना दिलासा देणारे वाटतात. जोगुबाई, जोरबाई, मरीआई, मेसना, वाघेश्वरी, सटवाई, तुकाई, काळुबाई, जानाई, धानाई, मंगळाई, संताई, वागजाई, तामजाई, अंगलाई अशा अनेक देवता लोकमानसात आजही रुजून आहेत.

* * *

# ९ : भारतीय क्षेत्रे आणि तीर्थे

काशीपासून कन्याकुमारीपर्यंत व द्वारकेपासून जगन्नाथपुरीपर्यंत भारताचा प्रवास तीर्थक्षेत्रांना भेटी देण्यासाठी केला तर भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचे एक भव्य दर्शन आपल्या डोळ्यांपुढे उभे राहील. प्रत्येक क्षेत्रात वा तीर्थस्थानावर उभे राहताच तेथील देवमूर्ती, मंदिरे, जलप्रवाह, घाट, आश्रम, मठ, वृक्ष आणि वेली आपणांस जुना इतिहास सहस्र मुखांनी सांगतात. त्यावेळी आपण आजच्या काळात नसतोच. आपण त्या त्या काळातील कथा ऐकण्यात, माहात्म्य श्रवण करण्यात दंग होतो. प्राचीन इतिहासच आपण अनेक अंशांनी आजही जगतो. जुन्या वातावरणाचे व काळाचे धागेदोरे आपल्या हातांत असतात. कुरुक्षेत्र म्हटले की सबंध महाभारत आपल्या डोळ्यांपुढे येतें. कौरवपांडवांचे वैमनस्य, त्यातून उद्‌भवलेले युद्ध, याप्रसंगी श्रीकृष्णाच्या मुखातून प्रकटलेली गीता व गीतेने निर्माण केलेली सांस्कृतिक परंपरा आपणांपुढे उभी राहते. नुसत्या शब्दोच्चाराने हा अनुभव येत असेल तर प्रत्यक्ष स्थळदर्शनाने आपण त्या काळाचा इतिहास, जगत राहू यात नवल नाही.

हरिहरक्षेत्र, प्रभासक्षेत्र, रेणुकाक्षेत्र, भृगुक्षेत्र,पुरुषोत्तमक्षेत्र, सूकरक्षेत्र, अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, द्वारका, प्रयाग, रामेश्वर इत्यादि तीर्थक्षेत्रे म्हणजे भारताच्या सांस्कृतिक इतिहासाचे वस्तुपाठच आहेत. रजतपीठ, कुमारपर्वत, कुंभकोण, ध्वजेश्वर, गोकर्ण, कोकण अशी



क्षेत्रे जुन्या पुराणांतील कथा सांगून इतिहास सजीव करतात. गंगा, यमुना, गोदावरी, सरस्वती, नर्मदा, सिंधू, कावेरी, इत्यादि नद्यांच्या जलांतून भारतीय संस्कृतीचाच ओघ वाहताना दिसेल. हिमालय, सह्याद्री, गंधमादन विंध्य, सातपुडा, माल्यवान्, पारियात्रिक, हेमकूट, महेन्द्र, मलय, शुक्तिमान ऋक्ष इत्यादि पर्वतशिखरांवरून वाहणारे वारे प्राचीन भारताच्या सांस्कृतिक इतिहासाची कथा आजही सांगतील. 'सर्वेषां सर्वतीर्थानि पापघ्नानि सदा नृणाम्' अशी आपली आजही श्रद्धा असल्यामुळे लाखो लोक तीर्थयात्रा करीत असताना दिसतात. प्राचीन इतिहासात रमून जातात.

'अयोध्या' नाव उच्चारताच रामायणातील कितीतरी प्रसंग उभे राहतात. पाचसहा हजार वर्षांपूर्वी या नगरीची स्थापना करणारा मनू आपणांस आठवतो. इक्ष्वाकू, परंजय, मांधाता इत्यादि प्राचीन राजांबरोबरच अयोध्येचा प्रसिद्ध राजा हरिश्चंद्र व त्याचे सत्यपालनाचे व्रत आठवते. सगर आणि भगीरथ यांचे पराक्रम आपल्या डोळ्यांपुढे उभे राहतात. दिलीप, रघुराज यांची दानशूर परंपरा अयोध्येच्या निमित्ताने आपणांस आठवते. दशरथाचा पुत्रकामेष्टी यज्ञ, रामचंद्र, भरत, लक्ष्मण, शत्रुघ्न यांचा जन्म आठवून सबंध रामायण डोळ्यांसमोर येते. रामचंद्राचे राज्यारोहणपर्व, कैकयीचा जळफळाट, रामचंद्राचे वनवास-गमन, दंडकारण्यातील निवास, रावणादिकांचा वध, पुन: अयोध्येस येणे; यासारख्या घटना 'अयोध्या' हा शब्दच आपल्यापुढे उभ्या करतो. प्रत्यक्ष अयोध्येस आपण गेलो तर तेथील शरयू नदीचे पाणी व वृक्षवेलीही साऱ्या रामकथा सांगतील. पुढे सूर्यवंशाकडून या नगरीचे राज्य यादवांकडे आले. या नगरीचा राजा उग्रसेन, त्याचा मुलगा कंस, बहीण देवकी. देवकीचा पती वसुदेव, वसुदेव-देवकीचा कारावास, कारागृहातील कृष्णाचा जन्म, कृष्णाचे गोकुळात गमन इत्यादि कथाभाग भारतीयांच्या परिचयाचा असला तरी त्याचे साक्षात दर्शन मथुरेत होते. कंस व जरासंध यांचा वध श्रीकृष्णास करावा लागला; परंतु पुढे यादवांच्या सुरक्षिततेसाठी कृष्णास द्वारकेस राजधानी न्यावी लागली. कृष्णाचे जन्मगाव म्हणून मथुरेला फार महत्त्व आहे. पुढे बौद्ध व जैन धर्मांचे एक मोठे केंद्र म्हणून मथुरेची प्रसिद्धी झाली. परंतु असंख्य भारतीयांना मथुरा आठवते ती कृष्णजन्मासाठी. पुढल्या

इस्लामी आक्रमणात या पुराणनगरीची अनेकदा वाताहत झालेली पाहून मन विषण्ण होते. तरी या पडत्या काळात अनेक वैष्णव साधुसंतांनी व आचार्यांनी मथुरेचे महत्त्व कायम राखले. निंबार्क, स्वामी हरिदास, रूप आणि सनातन गोस्वामी, जीव गोस्वामी इत्यादींनी वैष्णवधर्माची जोपासना याच परिसरात केली. मधुवन, तालवन, कुमुदवन, कामवन, बेलवन, वृंदावन इत्यादि बारा उपवने मथुरेभोवती असल्याची साक्ष आजही पटते. गोकुळ व गोवर्धन ही स्थाने याच नगरीच्या आसपासची. उत्तानपादाचा मुलगा ध्रुव याने उग्र तपश्चर्या लहान वयातच करून नारायणास प्रसन्न करून घेतले. हे मधुवन स्थान. या ध्रुवाची स्मृती मथुरेचा ध्रुव घाट पाहून होते.

श्रीकृष्णाची राजधानी द्वारका पुराणांतील व इतिहासातील अनेक कथा सांगणारी आहे. मनू – ययाती – अनार्त – रेवत यांचा संबंध या द्वारकेशी असला तरी तिला महत्त्व आले ते कृष्ण मथुरेहून सौराष्ट्रात द्वारकेस आला तेव्हापासून. या द्वारकेची चित्ताकर्षक वर्णने पुराणांतून आहेत. याच द्वारकेचे यादव कृष्णाच्या देखत भांडण करून 'यादवी' माजवू लागले. प्रभास क्षेत्रात अनेकजण मरण पावले. याच क्षेत्राच्या आसपास कृष्णाचे निर्वाण एका पिंपळाच्या झाडाखाली झाले. त्याच्या मरणानंतर सुवर्णनगरी द्वारका समुद्रात बुडून गेली. या द्वारकेचा शोध घेण्याचे कार्य हाती घेण्यासाठी पुराणवस्तुसंशोधक अजूनही उत्सुक आहेत. गोमतीच्या तीरावरील त्रिलोकसुंदर द्वारकाधीशाचे मंदिर पाहाताच श्रीकृष्णाचे चरित्र व द्वारकेचे वैभव डोळ्यापुढें उभे राहाते. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, ज्ञानेश्वर, बंगालचे गोविंदस्वामी, वल्लभाचार्य, चैतन्यप्रभू, मीराबाई, नृसिंह मेहता इत्यादि आचार्यांनी व साधुसंतांनी द्वारकेस भेट दिली होती. वल्लभाचार्यांच्या संप्रदायाचे एक आद्यपीठ म्हणून द्वारकेस महत्त्व आहे. याच नगरीजवळ बेटात मत्स्यावतारी विष्णूने शंखासुराचा वध केला. जवळचेच पिंडारक क्षेत्र श्रीकृष्णपुत्र सांबाची कथा सांगेल. गोमती, गोमय, गोदान, गोपीचंदन, गोपीनाथदर्शन इत्यादीमुळे द्वारका सर्वांनाच प्रिय बनली आहे.

मथुरेपासून सहा मैलावर असलेल्या वृंदावनाचा उल्लेख वर आला आहेच. वृंदावन म्हणजे श्रीकृष्णलीलांचे स्थान. अनेक कवींना व कला-

कारांना स्फूर्ती देणारे हे स्थान. गाईंना चरण्यासाठी सुरेखसे कुरण, नयनरम्य वृक्षलता, गोवर्धनाचे सान्निध्य, यमुनेचा संथ प्रवाह यांनी अनेकांच्या स्फूर्तीस चालना दिलेली आहे. ‘ राधामाधवयोर्जयन्ति यमुनाकूले रहः केलयः’ या शब्दांत जयदेवाने राधा–कृष्ण-यमुना यांचा गौरव केला आहे. वृषभानू व कलावती यांची कन्या व अनयाची पत्नी राधा ही एक भारतीय भक्तिमार्गातील अद्वितीय अशी विचारधाराच आहे. श्रीकृष्णाच्या अगोदर हिचे नाव उच्चारले जाते. हिच्या नावे संप्रदायही सुरू झाल्याचे दिसते. विष्णूची एक प्रभावी शक्ती म्हणूनही राधेचे वर्णन केले जाते. गोविंददेव, राधावल्लभ, गोपीनाथ, जुगलाकिशोर, मदनमोहन इत्यादींची मंदिरे जुना इतिहास सांगणारी आहेत. श्रीकृष्ण-गोपी यांची गाजलेली रासलीला याच वृन्दावनातील. गोपीवस्त्रहरणप्रसंगाची आठवण देणारा चीरहरणघाट येथलाच. याच वृन्दावनातून श्रीकृष्णाच्या मुरलीतून उमटणारा मधुर ध्वनी अजूनही भारतीयांच्या कानांत गुंगत राहिला आहे. येथील माकडे व मयूरही कृष्णकथा अभिमानाने सांगतील. सूरदास–मीराबाईपासून आजच्या प्रतिभावंत कवीपर्यंत वृन्दावनाचे वेड सर्वांनाच लागून राहिले आहे.

काशी व काशीविश्वेश्वर यांची ओढ हिंदू मनास आजही फार मोठी आहे. प्रत्यक्ष जाणे जरी घडले नाही तरी ‘काशीस जावे नित्य वदावे’ असा रिवाज आजही दिसतो. ‘काशीनाथ’ हे नाव आजही सर्वत्र दिसते. शंकराचे हे प्रसिद्ध स्थान वाराणशी, आनंदकानन, अविमुक्तक इत्यादि नावांनी प्रसिद्ध असून वारणा आणि अशी या दोन नद्यांच्या काठांवर वसले आहे. गंगा नदी व शिवशंकर यांच्यामुळे काशीक्षेत्राची महती उभ्या भारतात पसरली असून काशीपुराणाच्या काशीखंडात या क्षेत्राचे माहात्म्य विस्ताराने वर्णन करण्यात आले आहे. येथील काशीविश्वेश्वराच्या ज्योतिर्लिंगाचा महिमाही फार मोठा व पुरातन काळापासून चालत आलेला आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी हे एक महत्त्वाचे स्थान असून हिंदूंचे सर्वांत पवित्र तीर्थक्षेत्र आहे. जीवितात केव्हा तरी एकदा काशीयात्रा करावी असा प्रत्येक हिंदूचा संकल्प असतो. काशीविश्वेश्वर, अशी-गंगासंगम अथवा लीलार्कचे सूर्यमंदिर, केशवमंदिर, पंचगंगाघाट, येथील बिंदुमाधवाचे मंदिर, दशाश्वमेधघाट, मणिकर्णिका घाट इत्यादि प्रसिद्ध स्थाने काशीचे वैभव पुनः पुनः

वर्णन करून सांगतील. या मणिकर्णिकाचीही एक कथा पुराणांतून सांगितली जाते. विष्णूने आपल्या चक्राने भूमींवर एक खड्डा खणला व तो तप करू लागला. त्याच्या घामाने तो खळगा भरून गेला. विष्णूचे तप पाहून शिवाने कौतुकाने मान डोलाविली, तो त्या कानातील रत्नखचित भूषण खड्डयात पडले. म्हणून ह्या सखल भाग मणिकर्णिका बनला. या मणिकर्णिकेत स्नान केल्यानंतर सर्वांची पापे नष्ट होतात.

उत्तरेस काशीविश्वेश्वर जसा प्रसिद्ध तशी दक्षिणेस रामेश्वराची प्रसिद्धी आहे. रामेश्वर हेही बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक प्रसिद्ध ठिकाण होय. रामाने या शिवस्थानाची स्थापना सीतासंशोधनाच्या वेळी केली म्हणून हे रामेश्वर. किंवा रावणादिकांच्या हत्त्येच्या पातकातून मुक्त होण्यासाठी रामाने या शिवलिंगाची स्थापना केली असेही सांगितले जाते. शिवाची मूर्ती आणण्यासाठी हनुमान कैलासाकडे गेला तो परत लौकर येईना. तेव्हा मुहूर्त साधण्यासाठी सीतेनेच वाळूचे एक लिंग तयार केले आणि रामाने या ज्योतिर्लिंगाची स्थापना ज्येष्ठ शु. १० या दिवशी केली. हनुमंताने उशिरा आणलेले लिंगही स्थापन करण्यात आले. रामाच्या इच्छेनुसार या शिवलिंगाचे दर्शन अगोदर घेतले जाते. काशीची गंगा रामेश्वरास आणणे आणि रामेश्वराच्या सेतूची वाळू काशीस विश्वेश्वरास अर्पण करणे एक पुण्यकर्म मानले गेले आहे. पूर्वी तर ही यात्रा पायी करून जीवनाचे सार्थक मानीत. रामेश्वराजवळ सेतुमाधवाचेही मंदिर आहे. सेतुमाधव हा विष्णूचा अवतार.

काशीरामेश्वरांप्रमाणेच हिंदू माणसास प्रयाग येथील त्रिवेणी संगमात स्नान केल्याने समाधान होते. या ठिकाणी प्रजापती अथवा ब्रह्मदेव याने मोठी तपस्या केली होती. त्याने केलेल्या या यज्ञावरूनच या स्थानास प्रयाग हे नाव मिळाले. म्हणून याला प्रजापतिक्षेत्र असेही नाव आहे. गंगा, यमुना व गुप्त झालेली सरस्वती यांच्या संगमामुळेही या स्थानास अनन्यसाधारण महत्त्व आले आहे. याचे त्रिवेणी हे नावही यामुळे सार्थ आहे. रामाच्या वनवासयात्रेच्या प्रारंभी गुह नावाच्या नावाड्याची भेट या क्षेत्राच्या जवळ झाली. या गुहाच्या मदतीनेच रामाने गंगा पार केली.. त्या वेळी प्रयाग अरण्यमय होते. येथेच भारद्वाज ऋषींचा आश्रम होता. या ऋषीच्या मार्गदर्शनाने रामचंद्र चित्रकूट येथे आले. कौरवपांडवांच्या युद्धानंतर

युधिष्ठिराचे मन अतिशय कष्टी झाले. दुर्योधनादि कौरव, भीष्म, द्रोण, कर्ण इत्यादींची हत्या झाली म्हणून युधिष्ठिर दुःखी होता. मार्कंडेय प्रयाग मुनीच्या सांगण्यावरून मनःशांतीसाठी धर्मराजाने प्रयागची तीर्थयात्रा केली. क्षेत्राच्या माहात्म्याच्या अनेक कथा आपणांस ऐकावयास मिळतील. येथे भरणाऱ्या कुंभमेळ्यामुळे लक्षावधी यात्रेकरूंना प्रयागाची ओढ लागते. या कुंभाचीही एक हकीकत कुंभमेळ्याच्या वेळी आठवण्यासारखी आहे. समुद्र-मंथनातून निघालेला अमृतकुंभ घेऊन देवांचा गुरू बृहस्पती धावू लागला. नाशिक, उज्जैन, हरद्वार व प्रयाग या ठिकाणी या अमृतकुंभातील बिंदू पडले; म्हणून या स्थानांचे महत्त्व वाढले. पितरांना पिंडदान करण्याचे हे ठिकाण असल्यामुळे बहुसंख्य हिंदूंचा लोभ या क्षेत्रावर जडला आहे.

एक प्रसिद्ध विष्णुतीर्थ म्हणून गयेची प्रसिद्धी आहे. याच ठिकाणी गौतम बुद्धास आत्मसाक्षात्कार झाला म्हणून बौद्ध धर्मीयांना या स्थानाची महती वाटते. गयेस गेल्यावर येथील अस्तित्वाचीही एक कथा सांगण्यात येते. गय नावाचा एक असुर विष्णूच्या आशीर्वादाने फार मत्त झाला होता. देव भयभीत झाले. शेवटी शिव, विष्णू, ब्रह्मा यांच्या एकजुटीने गयासुराचा पराभव झाला. येथील धर्मशिलाही आपली कर्मकथा सांगेल. धर्माची एक गुणी मुलगी धर्मशिला. हिचे मूळचे नाव धर्मवृत्ता असे होते. अनुरूप वर मिळावा म्हणून हिने तपश्चर्या केली तेव्हा मारिची ऋषींनी हिचा पत्नी म्हणून स्वीकार केला. एकदा काही चूक हातून झाल्यामुळे तिला 'तू दगड होशील' असा त्यांनी शाप दिला. त्याप्रमाणे ती 'धर्मशिला' बनली. हिने देवाकडून एक उःशाप असा मागितला की, धर्मशिलेवर जे कोणी पिंड ठेवतील त्यांचे पितर मुक्त होतील. अशा रीतीने श्राद्ध, पिंडदान यांसाठीही गयेची प्रसिद्धी आहे. बौद्ध धर्मीयांत बुद्धगयेचे महत्त्व वाढत आहे. गयेपासून बुद्धगया सात मैलांवर आहे.

ओरिसा किंवा उत्कलमधील यज्ञपूर हे पार्वतीक्षेत्र, काणोर्क हे सूर्यक्षेत्र, भुवनेश्वर हे हरक्षेत्र आणि पुरी हे विष्णुक्षेत्र अथवा पुरुषोत्तमक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. पुरीचा जगन्नाथ हा कृष्णासाठी प्रसिद्ध असून श्रीमंदिरात श्रीकृष्ण, बलराम आणि सुभद्रा यांच्या मूर्ती लाकडाच्या आहेत. इंद्रद्युम्न

राजाच्या प्रयत्नाने व पुरुषोत्तमाच्या प्रेरणेने या मूर्ती अस्तित्वात आल्या. पुरीच्या जगन्नाथाची रथयात्रा साऱ्या भारतात प्रसिद्ध आहे. जगन्नाथ हा भेदभाव न पाहता सर्व लोकांना समानत्वाने प्रसन्न होणारा देव आहे. शंकराचार्यांचे गोवर्धनपीठ याच पुरीत असून इतर अनेक वैष्णवांनी पुरीची यात्रा केलेली दिसते. कबीर व चैतन्य यांचा संबंध जगन्नाथपुरीशी आहे.

पुरी हे विष्णुतीर्थ तर भुवनेश्वर हे शिवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. कोणा ययाती केसरी नावाच्या एका शिवभक्त राजाने आपली राजधानी येथे आणली व कृत्तिवास अथवा लिंगराज याचे मंदिर बांधण्यास सुरुवात केली. त्याचा नातू ललतेन्दू केसरीने हे भुवनेश्वराचे मंदिर पूर्ण केले. भुवनेश्वराला शेकडो देवळे आणि मंदिरे आपली पुराणकथा सांगायला उत्सुक आहेत. पुरीच्या जगन्नाथाचे दर्शन घेण्याआधी येथील लिंगराजाचे दर्शन घेण्याची प्रथा आहे. याही स्थानाच्या निर्मितीची एक मजेदार कथा आहे. काशीपेक्षा शिवाला हे स्थान प्रिय असल्याचे पार्वतीच्या ध्यानात आले. गोपालिनीच्या वेषात ती एकदा गाईच्या मागोमाग येथील अरण्यात आली. या वनातील कृत्ती आणि वास या दोन राक्षसांनी तिच्यावर भाळून तिच्याशी लग्न करायचे ठरविले. त्यांनी तिला आपल्या खांद्यांवरून नेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा या आदिशक्तीच्या भाराने ते दोनही राक्षस चिरडले गेले या प्रकारानंतर पार्वतीस तहान लागली. शिवाने तिच्यासाठी बिंदुसागर निर्माण केला. सर्व तीर्थांच्या बिंदूंनी हे तीर्थ निर्माण झाले. या सागरात स्नान करून लिंगराजाचे दर्शन घेण्यात येते. अनंत वासुदेव, राजाराणी, मुक्तेश्वर, केदारेश्वर, सिद्धेश्वर, परशुरामेश्वर इत्यादींची मंदिरे ओरिसाची स्थापत्यकला आणि सांस्कृतिक इतिहास आपल्या डोळ्यांसमोर उभा करतात. भुवनेश्वरापासून तीन मैलांवर उदयगिरी, खांडगिरी या शिखरांवरील लेणी इतिहासातील व पुराणांतील अनेक पाने वाचून दाखवितात.

सोरटी सोमनाथला तुम्ही कधी गेलात तर तेथील नवे मंदिर पाहून हर्ष होईलच; पण सोमनाथची निर्मितिकथा आणि मुसलमानांनी याचा केलेला विध्वंस यांची हकीकत ऐकून मनावर हर्षामर्षांचे तरंग उमटतात. सोमनाथाचे स्थान फार पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. दक्षाच्या सत्तावीस मुलींशी सोमाने म्हणजे चंद्राने विवाह केला होता. परंतु याचे लक्ष

फक्त रोहिणीवर असे. यामुळे बाकीच्या कष्टी झाल्या. त्यांनी दक्षपित्याकडे तक्रार केली. दक्षाने संतापून चंद्रास क्षयी होशील म्हणून शाप दिला. दक्षाच्याच सूचनेवरून चंद्रास समजले की, या शापातून मुक्त होण्यासाठी शिवाची उपासना करायला हवी. चंद्र व रोहिणी प्रभासक्षेत्री अंडाकृती शिवलिंगाची उपासना करण्यास आले. शेकडो वर्षे त्यांची तपश्चर्या चालू होती. शिवशंकर प्रसन्न झाले व चंद्रास शुक्लपक्षात प्रकाश मिळाला. ही घटना या प्रभास क्षेत्री घडली. ब्रह्मदेवाच्या सूचनेवरून चंद्र आणि रोहिणी यांनी येथे सोमनाथाची स्थापना केली. सोमनाथ व त्याचे भव्य मंदिर यांची रोमहर्षक कथा आजही प्रत्येकाच्या स्मरणात आहे. सन १०२५ मध्ये गझनीच्या महमूदाने या देवळाचा विध्वंस करून अगणित लूट नेली. भीम व भोज या राजांनी याची दुरुस्ती केली तरी पुनः पुनः मुसलमानांची या मंदिरावर वक्रदृष्टी फिरे. सन १७०१ मध्ये औरंगजेबने याचा नाश केला व सन १७८३ मध्ये अहल्यादेवीने त्याचा पुनरुद्धार केला. शेवटी भारतसरकारच्या काही नेत्यांच्या प्रेरणेने जुन्याच ब्रह्मशिलेवर या ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. सौराष्ट्रातील हे शिवस्थान बारा ज्योतिर्लिंगांपैकी असल्याने व इतिहासातील अनेक बरे वाईट प्रसंग त्याने पाहिल्याने महत्त्वाचे आहे.

अशा रीतीने भारताच्या पूर्वेस व पश्चिमेस तीर्थस्थानांची दाटी आहे. उत्तरेस व दक्षिणेसही तीर्थक्षेत्रांचा महिमा कमी नाही. मद्रासजवळचे कांची हे क्षेत्र असेच पुराणकाळापासून प्रसिद्ध आहे. शिव आणि विष्णू यांचे मीलन साधणारे हे क्षेत्र या दोनही नावांनी आज ओळखले जाते. एकदा सारीपट खेळताना शिवपार्वतीचे भांडण झाले. शिवाच्या शापामुळे पार्वती कुरूप झाली व विष्णूच्या कृपेसाठी येथेच तप करू लागली. विष्णूच्या कृपेने हिला पुनः सौंदर्य प्राप्त होऊन ही कामाक्षी बनली. हिच्या तपाची परीक्षा पाहाण्यासाठी शिवाने हिच्या मार्गात आपल्या जटेतील गंगेचे लोट सोडले. तेव्हा हिने घाबरून शिवास मिठी मारली. शिव संतुष्ट झाला. ज्या आंब्याच्या झाडाखाली पार्वती तपस्या करीत होती तेथेच शिव एकाम्रनाथ होऊन कायमचा स्थिरावला. शेजारीच कामाक्षीचे मंदिर आहे. याच कामकोटी अंबिकेची उपासना आद्य शंकराचार्यांनी केली. मंदिराबाहेर हिने आपल्या परवानगीशिवाय पडू नये अशी विनंती शंकराचार्यांनी केली

होती. आजही देवीची मिरवणूक निघते तेव्हा मंदिरातील शंकराचार्यांच्या मूर्तीपुढे अंबिकेची मिरवणूक थांबविली जाते, आचार्यांची परवानगी घेतल्यावर मग मिरवणूक मंदिराबाहेर जाते. येथेच शंकराचार्यांचे कामकोटीपीठ होते. शिव आणि विष्णू यांच्या सख्यत्वाच्या अनेक कथा शिवकांची व विष्णुकांची येथे ऐकावयास मिळतात.

मदुरा हे आणखी एक प्रसिद्ध असे दक्षिणेकडील क्षेत्र. सुंदरेश्वराच्या रूपात शिव व मीनाक्षीच्या रूपात पार्वती या ठिकाणी अनेक कथांचे निवेदन करताना दिसतील. ही देवी खरे म्हणजे कदंबवनवासिनी होय. कदंबांच्या वनामुळे तिला हे नाव मिळाले. या वनात एकदा इंद्र स्वयंभू शिवलिंगाची पूजा करताना धनंजय नावाच्या एका धनाढ्य व्यापाऱ्याने पाहिला. पांड्य राजा कुलशेखर यास ही वार्ता त्याने सांगितली. सुंदरेश्वराच्या रूपात शिवाने त्याला स्वप्नात दर्शन दिले. शिवाच्या जटेतून त्या ठिकाणी अमृताचे बिंदू पडले. अमृताच्या माधुर्यामुळे हे स्थान मधुरा नावाने प्रसिद्धीस आले. याचेच पुढे मदुरा झाले. पांड्य राजा मलयध्वज याची मुलगी म्हणजे ती मीनाक्षी देवी मानली जाते व शिव म्हणजे सुंदरेश्वर होय. तमीळ भाषा व वाङ्मय यांत मोलाची भर भक्तिरसात्मक काव्याची घालणारे कवी याच क्षेत्रातील मीनाक्षीचे उपासक आहेत. सतराव्या शतकातील तिरुमल नायकाचा राजवाडा येथून जवळच असून त्या काळातील कलेचे ऐश्वर्य सांगणारा आहे. मत्स्याप्रमाणे डोळे असणारी ही मीनाक्षी देवी आपल्या भक्तांचे संरक्षण अद्यापही 'कटाक्षा'ने करीत आहे.

चिदंबरम् हे दक्षिणेकडील आणखी एक प्राचीन शिवस्थान असून याच्या यात्रेसाठी साऱ्या भारतातून लोक जमतात. दक्षिणेकडील शिवलिंगासंबंधी अशी एक आख्यायिका आहे की, पृथ्वी, आप, तेज, वायू व अग्नी या पाच महाभूतांपासून पाच शिवलिंगे उदयास आली. पृथ्वीपासून कांचीचे शिवलिंग तयार झाले. जंबुकेश्वराचे स्थान पाण्यापासून, तिरुवन्नमलईचे तेजापासून, कालहस्तीचे वायूपासून आणि या चिदंबरम्‌चे आकाशापासून निर्माण झाले. या मंदिरातील शिव नटराजाच्या रूपात आहे. कोणी एक व्याघ्रपाद नावाचा भक्त या स्थानावर शिवासाठी बेलफुले वेचीत पायी भटकत होता; त्याचे पाय दुखू नयेत म्हणून शिवाने प्रसन्न होऊन

त्याला वाघाचे पाय दिले. आदिशेषाचाच अवतार म्हणजे ऋषी पतंजली होय. या दोघांची स्थापना चित्सभामध्ये झाली असून त्यांच्यासमोर शिवाने नटराजाच्या रूपात नृत्य केल्याची आख्यायिका आहे. चिदंबराचे दर्शन घेताना आपणांस त्याचा एक हीन यातीचा भक्त नंदनार याची आठवण होते. याला नीट दर्शन व्हावे म्हणून स्वतःच्या पुढल्या नंदीस जरा बाजूला होण्यासाठी नटराजाने आज्ञा केली. आजही हा नंदी अशाच अवस्थेत आहे.

त्रिचनापल्लीजवळ श्रीरंगम् येथे श्रीरंगनाथाच्या रूपात भगवान श्रीविष्णू आपल्या भक्तांना अभय देण्यासाठी शेषावर पहुडलेला आहे. स्वर्गलोकी ब्रह्मदेवाने श्रीरंगनाथाची पूजा केली. या रंगनाथास इक्ष्वाकू राजाने अयोध्येस आणले. याच्या वंशजांनी याची मनोभावे पूजा केली. लंकेच्या रावणाच्या वधानंतर रामचंद्रास अयोध्येस राज्याभिषेक झाला. याप्रसंगीं लंकेचा अधिपती बिभीषण उपस्थित होता. तो परत लंकेत जाण्यासाठी निघाला तेव्हा रामचंद्राने आपला कौटुंबिक देव श्रीरंगनाथ त्याच्याबरोबर दिला. मुख्य अट अशी होती की, त्याला कोठे जमिनीवर ठेवायचा नाही. परंतु नाइलाजाने बिभीषणास श्रीरंगम येथे त्याला ठेवावे लागले, तेव्हापासून रंगनाथ श्रीरंगमचा झाला. या स्थानावर एकादशीचे माहात्म्य मोठे असून दर एकादशीस असंख्य भक्त श्रीरंगनाथाच्या दर्शनास येतात. या एकादशीचीही कथा येथे स्मरण्यासारखी आहे. मुरा नावाच्या राक्षसाने विष्णूसहित सर्व देवांना फार त्रास दिला. तेव्हा विष्णू हिमालयातील बदरीस सिंहावती नावाच्या गुहेत झोपून राहिला. गुहेच्या दाराशी त्याची योगमाया त्याचे संरक्षण करण्यासाठी सिद्ध झाली. या ठिकाणी मुरा आला तेव्हा योगमाया एकादशी देवीच्या स्वरूपात अवतीर्ण झाली व तिने मुरा राक्षसाचा वध केला, व विष्णूचे रक्षण केले. या एकादशीच्या स्मृतीसाठी जे लोक हिचा दिवस उपवास करून पाळतील त्यांची सर्व पापांतून मुक्तता होईल असा आशीर्वाद श्रीविष्णूने दिला. तो अद्यापही सर्वत्र प्रचारात असल्याचे दिसून येईल. दक्षिणेकडील अळवार संतांनी श्रीरंगनाथाची उपासना करून वैष्णववाङ्मयात मोलाची भर घातली आहे.

शंकराचार्यांच्या थोर कार्याची आठवण करून देणारे शृंगेरी हे तीर्थक्षेत्र दक्षिणेत तुंगभद्रेच्या तीरावर आहे. या शृंगेरीशी कश्यपविभांडक

ऋषीचा मुलगा ऋष्यशृंग याच्याशी संबंध आहे. विभांडक ऋषी एकदा स्नान करीत असता त्यांच्या दृष्टीस उर्वशी नावाची अप्सरा पडली. ऋषीचे मन चलित झाले. त्यांचे वीर्य नदीत गळून पडले. याच सुमारास एक हरिणी पाणी पिण्यासाठी नदीवर आली. तिने पाण्याबरोबर हे वीर्यबिंदू पिऊन टाकले. पुढे तिला माणसाच्या आकाराचे पण डोक्यावर शिंग असलेले मूल झाले. ऋष्यशृंग असे याचे नाव पडले. त्याची माता देवकन्या असून शापामुळे हरिणी बनली होती. मूल जन्मास येताच ती मरण पावली. विभांडक ऋषीने आपल्या या मुलास सर्वप्रकारची विद्या शिकविली. डोक्यावरील शिंगांमुळे हा मुलगा लाजाळू व संकोची निघाला. फारसा आश्रमाबाहेर पडत नसे. एकदा रोमपाद नावाच्या राज्यात अवर्षणाने भयानक दुष्काळ पडून लोक त्रस्त झाले. पुण्यवान ऋष्यशृंग जर राज्यात येईल तर पाऊस पाणी भरपूर होईल असे राजास समजले. कोणा एका अप्सरेच्या मदतीने ऋष्यशृंग अंग देशात आल्याबरोबर पावसाचा वर्षाव सुरू झाला. रोमपाद राजा आनंदित झाला. व त्याची भक्ती ऋष्यशृंगावर जडली. या ऋष्यशृंगाचे जन्मस्थान म्हणून शृंगेरीस महत्त्व आहे. याच टेकडीवर विभांडक ऋषी शिवाची उपासना मल्लिकार्जुनाच्या स्वरूपात करीत असे. याच ठिकाणी आद्य शंकराचार्यांनी श्रीशारदांबेची स्थापना केली. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः' अशा संदेशाने साऱ्या भारतवर्षात नाव कमावणाऱ्या व वैदिक धर्माची पुनः संघटना करणाऱ्या शंकराचार्यांचा शृंगेरीस एक प्रमुख मठ आहे. पुढे इतिहासकाळात हैदरअल्ली व टिपू यांचाही आदरभाव या देवस्थानाबद्दलचा दिसून येतो.

दक्षिणेकडे आंध्र प्रदेशात आणखी एक मल्लिकार्जुन प्रसिद्ध आहे तो श्रीशैलपर्वतावरील. श्रीशैलपर्वताची प्रसिद्धी दक्षिणेकडील कैलास अशी असून येथील कृष्णानदी पाताळगंगा म्हणून ओळखली जाते. गर्द झाडीत व डोंगरमाथ्यावर असणारे हे मल्लिकार्जुनाचे स्थान ज्योतिर्लिंगांपैकी असून अनेक जातिजमातींच्या भक्तांना आकर्षून घेणारे आजही आहे. याही ज्योतिर्लिंगाची एक कथा आहे. या प्रान्तातील कृष्णेच्या काठी चंद्रगुप्तपुरम् नावाचे एक शहर. तेथील राजाची मुलगी चंद्रावती. हिचा पिता प्रवासातून अनेक वर्षांनी घरी आला व आपल्याच वयात आलेल्या मुलीच्या

...९

प्रेमात सापडला. या आपत्तीतून सुटण्यासाठी चंद्रावतीने एकदा आपले घर सोडले व ती शैलपर्वतावर येऊन राहू लागली, तिच्यापाशी अनेक गाई होत्या. त्यांतली एक चांगली गाय दूध मुळीच देत नाही असे तिच्या ध्यानात आले. तिने शोध केला तेव्हा तिच्या ध्यानात आले की, ही गाय एका विशिष्ट ठिकाणी आपल्या स्तनांतून दूध सोडते.या ठिकाणी शिवाचे स्वयंभू लिंग होते. तेव्हा चंद्रावतीने या लिंगावर प्रथम देऊळ बांधले व ती जाईच्या फुलांनी त्याची पूजा करू लागली.जाईची फुले 'मल्लिका' या नावाने ओळखली जात असल्याने हे शिवलिंग मल्लिकार्जुन नावाने ओळखले जाऊ लागले. या श्रीपर्वताचे माहात्म्य आपल्या पुराणांतून अनेक ठिकाणी वर्णन केले गेले आहे.बौद्ध तांत्रिकाचे हे स्थान म्हणून सांगितले जाते. नाथपंथीयांचेही या ठिकाणी वास्तव्य होते. दत्तावतारी नृसिंहसरस्वती याच ठिकाणच्या पाताळगंगेवरून निजानंदी विलीन झाले. येथील शिवाजीगोपूर शिवरायांची एक हृद्य आठवण सांगत राहाते दक्षिणेकडील दौऱ्यावर असताना शिवाजीराजे श्रीशैलावर मल्लिकार्जुनाच्या दर्शनास आले. त्यांच्या मनास हा निसर्गरमणीय एकान्तवास मानवला व येथेच राहाण्याचा त्यांनी निश्चय केला. बेभान होऊन आपले मस्तक शिवास अर्पण करण्याचे कार्य करीत असताना त्यांच्या अंगात एकदम शिवाचा संचार झाला आणि 'मुला, तुज ये कर्मी मोक्ष नाहीं' अशी जाणीव मिळाली !

भारतातील सर्वांत धनाढ्य देवस्थान म्हणजे तिरुपती हे असून लक्षावधी यात्रेकरू तिरुपतीच्या श्रीनिवासाचे अथवा बालाजीचे दर्शन घेण्यासाठी येतात. या व्यंकटेशावर अनेकांची मनापासून भक्ती आहे. शेषाचल पहाडावर हा तिरुपती अथवा व्यंकटेश बालाजी कसा आला याची एक कथा येथे आठवते. प्राचीन काळी मनूने एक यज्ञ आरंभिला होता. यज्ञप्रसंगी ब्रह्मा, विष्णू व महेश यांत श्रेष्ठ कोण असा वाद ऋषिमुनींत सुरू झाला. याचा शोध घेण्याचे काम भृगू ऋषीवर आले. त्याने प्रथम कैलासाकडे धाव घेतली. प्रथम नंदीने त्याला प्रवेशच दिला नाही. कसातरी प्रवेश करून भृगू पाहातो तो शंकरपार्वती प्रेमात दंग असल्याने त्यांनी भृगूकडे लक्षच दिले नाही. भृगू ब्रह्मदेवाकडे गेला; तेंव्हा त्यानेही या ऋषीकडे लक्ष दिले नाही. भृगू नंतर विष्णूकडे आला. तेव्हा विष्णू झोपी गेलेला होता. आता मात्र भृगूस राग आला व त्याने विष्णूच्या छातीवर एक लाथ

मारली. विष्णूस जाग आली. न रागावता त्याने भृगूस विचारले, 'ऋषिवर्या, तुझ्या पायास लागले तर नाही ना? जगाचे रक्षण करायचे सोडून मी झोपलो हे बरे नव्हे.' विष्णूची ही वृत्ती पाहून भृगू संतुष्ट झाला. भृगूचा लत्ताप्रहार खूण म्हणून विष्णू वत्सलांछन म्हणून मिरवीत असतो. भृगूने विष्णूचा असा अपमान केला हे लक्ष्मीला मात्र सहन झाले नाही. ती त्याच्याशी भांडून निघून गेली. एकाकी विष्णूला वैकुंठात करमेनासे झाले व तो एकटाच शेषाचलावर आला. भृगूच्या पदचिन्हास लक्ष्मीने स्थान मिळाल्यामुळे या विष्णूच्या रूपास महत्त्व आले. तोडमन नावाच्या राजाने तिरुपती येथील श्रीनिवासाचे अथवा व्यंकटेशाचे मंदिर बांधले.

अशी शेकडो नव्हे हजारो तीर्थक्षेत्रे भारताच्या भूमीवर आज विद्यमान असून जुना पौराणिक व ऐतिहासिक काळ जिवंत स्वरूपात आपणांसमोर उभा करीत आहेत. शिवाच्या आणि विष्णूच्या अनेक अवतारकथा भक्तवात्सल्यासहित आपणांस पुरविण्याचे कार्य या तीर्थक्षेत्रांच्या दर्शनाने आजही होत आहे. प्रत्येक क्षेत्राची निर्मितिकथा समजावून घेताना आपण प्राचीन काळ जगतो. उज्जैन, केदारनाथ, बद्रिनाथ, पुष्कर, खजुराहो, कामाख्य, अमरनाथ (काश्मीर), नडिया अथवा नवद्वीप, हरद्वार, शुचिंद्रम, चित्रकूट, तंजावर, अमरकंटक, विजयानगर, गिरनार, सारनाथ, चितोड, इंद्रप्रस्थ, कपिलवस्तू, भडोच अथवा भृगुकच्छ, पाटलीपुत्र, माऊंट आबू, अरुणाचल, डाकोर, मिथिला, हस्तिनापूर, उडपी, कालडी, नालंदा अशी शेकडो पौराणिक व ऐतिहासिक तीर्थक्षेत्रे आपल्या जन्मकथा सहस्र मुखांनी सांगून आज आपणांस प्राचीन काळात नेतात. या तीर्थांच्या व क्षेत्रांच्या सहवासात आपण प्राचीन काळच जगत असतो. गंगा, यमुना, सरस्वती, गोदावरी, नर्मदा, कावेरी, तापी, कृष्णा, तुंगभद्रा, महानदी, सिंधू, सतलज, शरयू, भीमा, क्षिप्रा, ब्रह्मपुत्रा, साबरमती, चंबळा, कोसी, चिनाब, झेलम, रावी, ताम्रपर्णी अशा शेकडो नद्या भारताच्या अंगाखांद्यावरून वाहात आहेत. यांच्या काठांनी थोडा तरी प्रवास केला तरी भारताच्या प्राचीन इतिहासाचे एक एक पान उलगडले जाईल.

अनेक देव व दैवते असलेला हा भारतवर्ष सांस्कृतिक दृष्टीने एकत्वाचा साक्षात्कार घडविणारा आहे हा बोधही या तीर्थक्षेत्रांच्या

सहवासात होतो. भारताचा हा महान् सांस्कृतिक ठेवा जतन करण्यासारखा आहे. कारण यातूनच आपणांस प्राचीन संस्कृतीचे नित्य नवे दर्शन होत असते.


जुने धागेदोरे आजही प्रकट करणाऱ्या आणखी एका क्षेत्राची कथा ऐकून आपण या विषयाचा निरोप घेऊ. रावणाची आई सतत शिवपूजनात दंग असे. मातीचे लिंग पूजीत असलेली आई पाहताच मातृभक्त रावणाने आईसाठी कैलासासहित प्रत्यक्ष शंकरच आणण्याची प्रतिज्ञा केली. त्याने कैलासपुरास गदगदा हालविण्याचा प्रयत्न केला. शंकराने प्रसन्न होऊन त्यास सर्व वासना तृप्त करणारे आत्मलिंग दिले व लंकेस पोचेपर्यंत या लिंगास जमिनीवर न ठेवण्याविषयी शिवाने बजाविले. रावण द्रुतवेगाने लंकेस येण्यासाठी निघाला. रावणाची शक्ती वाढली की देवादिकांना त्रास होणार म्हणून विष्णूने सूर्याआड आपले सुदर्शनचक्र धरून संध्याकाळ झाल्याचा भास निर्माण केला. गणेश बालरूपाने रावणाच्या जवळ उभा राहिला. सायंसंध्येची वेळ टळू नये म्हणून रावणाने आत्मलिंग गणेश फसविणार नाही या खात्रीने त्याच्याजवळ दिले. लिंग जड झाले तर मी तीन वेळा तुला हाका मारीन व तू आला नाहीस तर मी ते खाली जमिनीवर ठेवीन, अशा कबुलीने गणपतीने ते आत्मलिंग हातात घेतले. रावण संध्या करण्यात गर्क झाला. गणपतीस ते लिंग पेलवेना. त्याने तीन हाका मारिल्या तरी रावण आला नाही. शेवटी गणपतीने ते लिंग खाली भूमीवर ठेविले. रावण थोड्या वेळात आला आणि जमिनीवरचे लिंग पाहून कष्टी झाला. त्याने आपल्या विशाल बाहूंनी लिंग उचलण्याची खटपट केली पण भूमिसहित हालणारे ते लिंग रावणाच्या हातात आले नाही. या ओढाताणीत लिंगाचा आकार गाईच्या कानासारखा झाला. महाबळी रावणाने त्यास हा असा आकार दिल्यामुळे या आत्मलिंगास गोकर्ण महाबळेश्वर हे नाव पडले. याही शिवस्थानाचा लौकिक मोठा असून अनेक भक्तांच्या आख्यायिका गुरुचरित्रासारख्या ग्रंथांतून वाचावयास मिळतात.

* * *

# १० : महाराष्ट्रीय क्षेत्रे आणि तीर्थे

आज आपण अतिशय गतिमान व संमिश्र युगात वावरत आहोत स्पर्धा, धावपळ, घाईगर्दी यांनी आपले जीवित यंत्रवत बनले आहे. सेकंदा-सेकंदाचे कार्यक्रम आपल्या पाठीशी आहेत. खोटी प्रतिष्ठा, मानसन्मानाच्या वृथा कल्पना, मानसिक ताण, चिंताजनक परिस्थिती इत्यादींच्या भोवऱ्यात भोवती भौतिक सुखाची समृद्धी असूनही आपण गटांगळ्या खात आहोत. आजच्यापेक्षा उद्या आपण एका पावलाने स्पर्धेत पुढे आहोत यासाठी आपली अखंड धडपड चालू आहे. वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिफोन वहातुकीची जलद साधने, व्यापारी उलाढाल इत्यादींच्या जंजाळातून, रोजच्या गति-मान दिनक्रमातून, नित्याच्या करमणुकीतून आपणांस क्षणोक्षणी मुक्त व्हावेसे वाटते. कोठेतरी, एकांतात, रमणीय शांततेचा अनुभव घेण्यासाठी आपले मन आजही आसुसते. मग आपण रामेश्वर, मदुरा, म्हैसूर, बंग-लोर, द्वारका, सोरटी सोमनाथ, काशी, हरिद्वार, हृषीकेष, जगन्नाथपुरी अशा पौराणिक अथवा चितोड, प्रतापगड, गोवळकोंडा, सिंहगड, दौलता-बाद जशा ऐतिहासिक ठिकाणी जाण्यासाठी योजना आखू लागतो. या पौराणिक आणि ऐतिहासिक स्थळांच्या सान्निध्यात आणि कधी स्मरणातही आपण आजही जुने धागेदोरे बळकटपणे पकडून ठेवून सुखासमाधानाचा एक नवा अनुभव घेत असतो.

पंढरपुरच्या परिसरात आलो की आपण आपल्या नित्याच्या कटकटी



विसरतो, व्यवसायाच्या गोष्टी विसरतो, आणि आजही जुन्या पौराणिक आठवणींनी गहिवरून जातो. पांडुरंगाच्या दर्शनाने मन प्रसन्न होतें. या विठ्ठलाच्या पायांवर, समचरणांवर किती साधूसंतांनी डोके ठेविले असेल; असा विचार मनात येऊन जातो. ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी इत्यादि संतांची आपणांस आठवण होते. चालू युगातील आपण एकदम तेराव्या शतकाच्या अखेरच्या काळात वावरतो. हा पांडुरंग नामदेवावर किती प्रेम करतो. 'सुंभाचा करदोटा रकटयाची लंगोटी। नामा वाळुवंटीं कीर्तन करी' अशा थाटातील नामदेव देवाने दूध प्यावे म्हणून हट्ट करणारा आपणांस आठवतो. 'नाचूं कीर्तनाचे रंगीं। ज्ञान दीप लावूं जगीं' म्हणून कीर्तनभक्तीचा संदेश देणारे नामदेव आपल्या डोळयांसमोर उभे राहतात. या 'नाम'देवांची व आळंदीच्या 'ज्ञान'देवांची भिवरेच्या तीरावर जी हितगुजाची बैठक झाली तिची आपणांस आठवण येते. या दोन श्रेष्ठ देवांच्या चरणस्पर्शाने पवित्र झालेली ही भूमी आणि चंद्रभागेचे पाणी यांचे आपणांस मोठेंच आकर्षण वाटते. 'ज्ञानराज माझी योग्यांची माउली,' 'तूं माझी माऊली मी वो तुझा तान्हा', 'उडाली पक्षिणी गेली अंतराळी,' 'तूं अवकाश मी भूमिका। तूं लिंग मी साळुंका' अशा नामदेवरायांच्या गोड अभंगांची स्मृती होऊन आपण भक्तीच्या सजल धारांनी न्हाऊन निघतो.

रोजच्या धावपळीत या सुखास आपण पारखे असतो. हातून निसटलेले हे सुख आपणांस पंढरपुरसारख्या क्षेत्राच्या ठिकाणी सहजासहजी मिळते. येथे आपण पाऊल टाकले की किती साधुसंत आणि त्यांच्या गोष्टी आपल्या डोळयांसमोर येतात ! नामदेवांच्या घरी झाडलोट करणाऱ्या दासी जनीची आपली भेट येथेच होते. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, नामदेव, विठ्ठल यांच्या भेटीची, यांच्या चर्चेची किती आस्थेने ही जनी कोपऱ्यात उभी राहून नोंद करते ! 'भीमा आणि चंद्रभागा। तुझ्या चरणींच्या गंगा' ही जनाबाईची ओळ चंद्रभागेचे माहात्म्य पटविणारी वाटते. 'गंगा गेली सिंधूपासी। तेणें अव्हेरिलें तिसी। तरी तें सांगावें कवणाला। ऐसें बोलें गा विठ्ठला' म्हणून कळवणारी ही दमा आणि करुंड या हीनयातीय दांपत्याच्या पोटी जन्मास आलेली पोर दासी म्हणून झाडलोट करीत असली तरी

अभागी कशी म्हणावी ? हिचे केस विठाबाई माऊली मोकळे करून विंचरते, 'माझे जनीला नाहीं कोणी । म्हणोनि देव घाली पाणी' असा हिचा अनुभव. दळण दळताना हा देव हिला मदत करून तिचा शीण दूर करतो. रानावनांत, उन्हापावसात हा हिच्यामागे शेण्या वेचण्यासाठी जातो. जनाबाईच्या या अद्‌भुत वाटणाऱ्या नवलकथा सूक्ष्म रसिकतेने ध्यानी घ्यायला हव्यात. विठ्ठलाच्या अखंड नामस्मरणाने तिला परिश्रम वाटेनासे झाले आणि प्रत्यक्ष देवाने मला साह्य केले असे तिने म्हटले तर लगेच या साऱ्या भाकडकथा म्हणून निकालात काढण्याचा करंटेपणा आपणांस करावासा वाटत नाही तो या पंढरपुरातच. 'वैकुंठींचा हरी । ताऱ्हा येशोदेच्या घरीं,' 'कां गा न येसी विठ्ठला। ऐसा कोण दोष मला ?', 'आंधळ्याची काठी। अडकली कवणे बेटीं ?', 'विवेकसागर। सखा माझा ज्ञानेश्वर,' 'माझा शीण भाग गेला। तुज पाहतां विठ्ठला,' 'पक्षी जाय दिगंतरा। बाळकांसी आणी चारा,' 'अशा शेकडो ओळी आठवून आपण जनाबाईची व तिच्या प्रेमळ वाणीची आठवण आजही पंढरपुरात काढतो.

हे पंढरपुर म्हणजे साधुसंतांचे आगर. शिवाचा उपासक नरहरी सोनार येथलाच. येथेच याला शिव– पांडुरंग एक असल्याचा थोर साक्षात्कार झाला. 'शिव आणी विष्णु एकचि प्रतिमा' असा अनुभव देवाला करदोटा बांधण्याच्या प्रसंगी येथेच त्यांना आला. 'नाम फुकाचें फुकाचें । देवा पंढरीरायाचें' अशा भक्तीच्या वाणीने येथूनच याने नामभक्तीचा महिमा सांगितला. 'देवा, तुझा मी सोनार' म्हणून 'नामाचा व्यवहार' करणारा, 'देहाची बागेसरी' करणारा, त्रिगुणाची मूस, अंतरात्म्याचे सोने, जीवशिवाची फुंकणी, विवेकाचा हातोडा, मनबुद्धीची कातरी, ज्ञानाचा ताजवा, रामनामाचे सोने, करून व्यवसाय करणारा नरहरी सोनार याच पंढरीत आपणांस आठवतो. आणि हा 'जोहार मायबाप जोहार' म्हणून दीन वाणीने कोपऱ्यात उभा राहणारा चोखा महार ? 'विठ्ठल विठ्ठल गजरीं । अवघी दुमदुमली पंढरी' म्हणून हा गजर करतो. 'टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हीं चालावी पंढरीची' म्हणून याचे मार्गदर्शन आठवते. याच्या मनात येते की आपण एकदा विठ्ठलाची प्रत्यक्ष भेट घ्यावी. त्याच्या अंगसंगाचे सुख भोगावे अशी याच्या मनात आशा वाटते. तो त्याप्रमाणे विठ्ठलास

भेटण्याचा प्रयत्न करतो. विठ्ठलास कडकडून भेटतो. या भेटीत विठ्ठलाच्या गळ्यातील हार चोखोबाच्या गळ्यात येतो. या पुराव्यानिशी हा भगवद्-भक्त मंदिराबाहेर आल्यावर बडवे मंडळी त्याला देव बाटविला, म्हणून मारझोड करतात. याच पंढरीच्या रस्त्यातून फरफटत नेतात; आणि मग चोखोबा, 'धांव घालीं विठू आतां चालूं नको मंद। बडवे मज मारिती ऐसा कांहीं अपराध अशी तीव्रतेने आरोळी ठोकतो. हा आर्त आणि करुण पुकार आजही आपणांस ऐकू येतो. या सामाजिक दुखण्याचा बीजमोड आजही झालेला नाही. 'उस डोंगा परी रस नोव्हे डोंगा। चोखा डोंगा परी भाव नोव्हे डोंगा' हे स्पष्टीकरण ऐकण्यासाठी कोण भानावर होते त्यावेळी ?

पंढरपुरातील सारेच वातावरण प्राचीन काळातील पौराणिक व संतविषयक घटनांनी भारावलेले आहे. येथील प्रत्येक वास्तू प्राचीन काळच्या खुणांनी आजही नटलेली आहे. पार्वतीची तहान भागविण्यासाठी शंकरांनी आपल्या हातातील त्रिशूळाने भूमीस छिद्र पाडून पाणी तयार केले ते लोहदंडतीर्थ पुंडलीकाच्या समोरच आजही दिसते ! प्रत्यक्ष इंद्रानेही या तीर्थात स्नान करून आपले पातक दूर करून टाकले. त्रिपुराशी युद्ध खेळून शिवशंकर श्रमले. त्यांच्या अंगातून जी स्वेदगंगा निघाली तीच भीमा अथवा चंद्रभागा पंढरीस पावनकारी ठरली. दैत्यांशी युद्ध करून थकलेल्या मुचकुंदाने येथेच विश्रांती घेतली. आणि याच मुचकुंदाचा अवतार भक्तश्रेष्ठ पुंडरीक अथवा पुंडलीक याच लोहदंडतीर्थापाशी वास्तव्य करून होता. येथेच रुक्मिणीच्या शोधार्थ भगवान कृष्ण बाळवेषात आले आणि पुंडलीकाची मातृपितृभक्ती पाहून संतुष्ट झाले आणि विटेवर समचरण अवस्थेत उभे राहिले.

या विठ्ठलाच्या पायांखालची वीट नीट पाहा. वृत्रासुराच्या शापाने दग्ध झालेला इंद्र म्हणजे ही वीट होय. या विटेवर हा विठ्ठल 'युगे अठ्ठावीस' झाली तरी अजून आपल्या भक्तांसाठी वात्सल्यप्रेम मनात बाळगून उभा आहे. या पांडुरंगाचे स्तवन किती जणांनी केले असेल ? शंकराचार्यांपासून गौरांगप्रभूपर्यंत सर्व साधुसंतांनी याची स्तुती केली आहे. निवृत्तीनाथांपासून दासगणूपर्यंत सर्व साधुसंतांनी याचे गुणगान

अवीटपणे केले आहे. ‘ चला पंढरीसी जाऊं। रुक्मादेवीवरा पाहूं । डोळे निवतील कान । मना तेथें समाधान ’ अशी अवस्था व ओढ मनाची आजही अनेकांची यामुळे असते. या महाक्षेत्रातील महाद्वारासमोरची चोखोबांची समाधी, नामदेवपायरी, द्वारमंडप, मुखमंडप, महामंडप, सभामंडप, सोळखांबी मंडप, चौऱ्याशीचा शिलालेख, गरुडहनुमंत, रुक्मिणीमंदिर आणि प्रत्यक्ष पांडुरंग आपणांस शेकडो रसाळ कथा ऐकवील. तशा भाविक अंतःकरणाने मात्र या पंढरीत वावरले पाहीजे.

चंद्रभागेचे स्नान हा एक थोर सात्त्विक अनुभव आजही भक्तांना वाटतो. पुंडलीकमंदिर, लोहदंडतीर्थ, विष्णुपद, गोपाळपूर, पद्मावती, लखूबाई, श्रीधरस्वामींची समाधी, व्यासमंदिर, उद्धवस्थान, नाना मठपतींचे मठ आणि फडकऱ्यांची स्थाने यांच्या दर्शनाने आपण एका वेगळ्याच पौराणिक वा ऐतिहासिक काळात वावरत असतो. नामदेव, एकनाथ, तुकाराम, निळोबाराय यांच्या स्तवनांनी सगुण झालेला विठ्ठल पाहताच आपले देहभान हारपते. आपला सर्व शीणभाग संपतो. या विठ्ठलाचे रूप काय वर्णन करावे ? मराठी साधुसंतांनी आपल्या अवीट वाणीने या सावळ्या व सुंदर देवाचे मनापासून वर्णन केले आहे ‘ रूप पाहतां लोचनीं । सुख जालें वो साजणी ’ या ओळीतील भावार्थ जुनापुराणा कसा होणार ? ‘ सुंदर तें ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनिया ’ या अनुभवास शिळेपणा कसा येणार ? ‘ तुझे चरण देखोनी हरली भवव्यथा । पुढती एक चिंता वाटे थोर ।। म्हणी मज मुक्ति देसी पांडुरंगा । मग मी संतसंगा पाहू कोठे ?’ या ओळीतील तीव्रता आजही ताजी टवटवीत आहे ! ‘ पंढरीचा देव बहुत कोंवळा। सगुण सावळा सारथी हा ’ हा पुकार आजही लक्षावधी भाविकांच्या अनुभवाचा नाही काय ? ‘ तुळशीमाळा गळां कर ठेवुनि कटीं । कांसे पीतांबर कस्तुरि ललाटीं ’ अशा या रूपवान विठ्ठलाने आजही हजारो भक्तांना आपल्या नादी लाविलेले नाही काय ? या विठ्ठलाने आपल्या शिरोभागी शिवलिंग धारण करून शिवविष्णूच्या ऐक्याची ग्वाही दिलेली आहे. या विठ्ठलाच्या कानांत मकराकार कुंडले आहेत. गळ्यात कौस्तुभ मण्यांचा हार आहे. पाठीवर शिदोरीचे शिके असून हृदयावर भक्तलांछनाचे चिन्ह आहे. कमरेस कमरबंद आणि

मनगटावर मणिबंध आहे. या साऱ्या देहखुणा पांडुरंगाच्या कीर्तीच्या व गुणलीलांच्या ध्वजाच होत.

आपण पुण्याजवळच्या आळंदीला गेलो की ज्ञानेश्वरांच्या जीवनातील अनेक रोमहर्षक व करुण कथा आपणांला आठवतात. याच आळंदीत इंद्रायणीच्या काठी आपेगावच्या विठ्ठलपंतांनी सिधोपंत कुलकर्णी यांच्या मुलीशी लग्न केले. सिद्धेश्वराच्या देवळाजवळील सुवर्ण पिंपळाखाली ध्यानधारणेत निमग्न झालेले विठ्ठलपंत, त्यांना झालेले दृष्टान्त, त्यानुसार झालेले त्यांचे लग्न, विठ्ठलपंतांची विरक्ती, त्यांची काशीयात्रा, त्यांनी घेतलेला संन्यास, येथें आळंदीस रुक्मिणीबाईने केलेली सुवर्णपिंपळाची सेवा, त्यांची व विठ्ठलपंतास संन्यास देणाऱ्या यतीची भेट, विठ्ठलपंतांचे पुनः गृहस्थाश्रमात पदार्पण, त्यांना झालेली चार गोजिरवाणी मुले, त्यांचा छळ, विठ्ठलपंत-रुक्मिणीबाई यांनी केलेला देहत्याग, या लहान पोरांची झालेली अवहेलना, नेवासे येथील ज्ञानेश्वरीकथन, ज्ञानेश्वरादि भावंडांचे त्यांच्या दिव्य समाधिकाळापर्यंतचे असामान्य कर्तृत्व आपल्यासमोर आळंदीस ताजेटवटवीत होऊन उभे राहते. आळंदीस येताच ज्ञानेश्वरांच्या महान् जीवनातील साऱ्या घटना जिवंत होतात. देऊळवाडा, हैबतबावांची पायरी, सभामंडप, समाधीचा गाभारा, गणेशमूर्ती, मुक्ताबाईचा मंडप, ज्ञानेश्वरांच्या समाधीचे स्थान, अजानवृक्ष, सिद्धेश्वराचे देऊळ, केसरीनाथ, लक्ष्मीनाथ, भोजलिंग काका अशा साऱ्या आजच्या खुणा ज्ञानदेवांच्या कथा सहस्र मुखांनी सांगण्यास तत्पर अशा आहेत. महादेवबाबापादुका, गरुडमंडप, दीपमाळ, हरिहरेंद्र स्वामींचा मठ, दत्तमंदिर, पुंडलीकाचे देऊळ, मल्लाप्पा वासकरांची समाधी, नृसिंहसरस्वतींचा मठ, गोपाळपुरा, सिद्धबेट, ज्ञानेश्वरांनी चालविलेली भिंत, भैरवनाथाचे मंदिर, पद्मावती मंदिर, विश्रांती वड, विष्णुमंदिर या साऱ्या वास्तु ज्ञानेश्वरांच्या वैभवाच्या खुणा आजही सांगतील. ' आळंदी हें गांव पुण्यभूमि ठाव। दैवताचे नाव सिद्धेश्वर ' या नामदेवांच्या वचनाची साक्ष आजही पटते.

असाच महिमा पैठणचा, त्र्यंबकेश्वरचा आहे. एकनाथ महाराजांच्या चरित्रातील साऱ्या कथा पैठणाला गेल्यावर आठवतात. त्यांच्या वैराग्याच्या व साधुत्वाच्या गोष्टी पैठणमधील कण अन् कण सांगण्यास तत्पर आहेत.

त्र्यंबकेश्वरला जाताच भगवान शिवशंकरांचा महिमा आठवतो. अगस्ती, भार्गव इत्यादी ऋषींचे हे तपश्चर्यास्थान. रामचंद्राच्या वास्तव्याने पवित्र झालेले हे स्थान, अध्यात्मजीवनास परिपुष्ट करणाऱ्या गोदावरीचे हे जन्मस्थान, सातवाहन व गोरक्षनाथ यांच्या विक्रमाच्या खुणा सांगणारे हे स्थान आपल्या आवतीभोवतीच्या परिसराने व पौराणिक कथांनी समृद्ध आहे. जवळच अंजनी मातेने तपश्चर्या करून हनुमंतासारखा पराक्रमी पुत्राचा लाभ करून घेतला ते अंजनेरी गाव आहे. ब्रह्मगिरीच्या दर्शनाने पुराणातील अनेक कथा आठवतात. येथील गोरखनाथाच्या गुहेने ज्ञानेश्वरांच्या गुरुपरंपरेच्या कितीतरी हकीकती अनेकांना सांगितल्या असतील. गोरक्षनाथांचा शिष्य गहिनीनाथ. याच गहिनीनाथांनी निवृत्तिनाथांना याच परिसरात नाथपंथीय तत्त्वज्ञानाचा उपदेश केला. येथेच गंगासागर तलावापाशी ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी निवृत्तिनाथांची समाधी जरा कान दिला तर ही सारी कथा आजही सांगण्यास उत्सुक आहे. येथील कुशावर्त तीर्थाचा महिमा विशेष सांगितला जातो.

जवळच असणारे नासिक तर रामायणकाळातील अनेक खुणा आज आपणांस सांगणारे आहे. सातवाहन राजांच्या पराक्रमाच्या शलाका आजही या परिसरात दृष्टीस पडतात. पांडवलेण्यांतील अनेक मूर्ती आणि लेख प्राचीन गौरवगाथा सांगतील. लेणे क्र. तीन आपणांस हळूच सांगत राहील, ‘ राजमाता गौतमीस सत्य आवडत असे. दानधर्मात तिला सुख वाटे. सहिष्णुता हाच तिचा स्वभाव. प्रत्येकाच्या जीवनाकडे ती आदराने पाही. तपश्चर्येत ती सदा निमग्न असे. तिच्या मनावर तिचा ताबा विलक्षण होता. शरीर व आत्मा शुद्ध राखण्यासाठी ती नेहमी उपास करी. हिच्या पुत्राने महाराष्ट्राचा राजकीय इतिहास प्रथम घडविला. माझा पुत्र शातकर्णी सर्व विद्यांचा आधार व सत्पुरुषांचा आश्रय आहे. राम, केशव, भीम, अर्जुन यांच्यासारखा तो पराक्रमी आहे. याच्या पराक्रमामुळेच मला ‘ राजर्षीवधू ’ हे अभिमानास्पद नाव मिळते आणि सत्यवचन, दान, क्षमा, अहिंसा अशा थोर गुणांत वावरता येते ’ असा मोठा अभिमानी इतिहास ही पांडवलेणी आपणांस सांगतील. दक्षिणापथातील गंगा म्हणजे गोदावरी. तिच्या काठचा हा परिसर अत्यंत रमणीय व प्रभू रामचंद्राच्या वास्तव्याने

पुनीत झालेला. दक्षप्रजापतीच्या यज्ञात सती नष्ट झाली. तिच्या शवाचे नाना अवयव शिवाने क्रोधाने सर्वत्र विखरून टाकले. नासिका येथे पडल्यामुळे हे शहर नासिक झाले. रामाच्या प्रेरणेने शूर्पणखेचे नाक लक्ष्मणाने येथे कापले म्हणूनही हे 'नासिक' बनले. याच ठिकाणी अगस्ती, गौतम, वसिष्ठ यांच्या वास्तव्याने पवित्र बनलेले हे ठिकाण रामचंद्रांच्या निवासामुळे अधिकच पावन बनले. रामकुंड, लक्ष्मणकुंड, काळाराममंदिर, सुंदर नारायणमंदिर, नारोशंकराचे मंदिर, पंचवटीचा परिसर, सीतागुंफा, समर्थांची तपोभूमी टाकळी अशा अनेक स्थळांना नुसते विचारा, जरा श्रद्धेने पुसा, की सारा इतिहासकाळ आपल्या डोळ्यांसमोर ती उभा करतील. सातवाहनापासून वीर सावरकरांपर्यंतच्या श्रेष्ठ पुरुषांच्या कथा सांगण्यास ही स्थाने उत्सुक आहेत.

आपल्या देशातील अशी शेकडो नव्हे हजारो आजची स्थाने कालचा इतिहास सांगणारी आहेत. या पवित्र स्थानांच्या परिसरात गेल्याबरोबर आपण वर्तमान काळ विसरून भूत काळात प्रवेश करतो. पुसदपलीकडची पैनगंगा नदी ओलांडली की आपण मातापूर अथवा माहूरच्या परिसरात येतो. दुरूनच महानुभावांच्या देवदेवेश्वराचे स्थान दिसू लागते. जगन्माता रेणुकेचे, दत्तात्रेयांचे आणि अनुसयेचे शिखर पाहण्यास मिळाले की आपला वर्तमानकाळ संपतो. आपण थेट प्रवेश करतो हजारो वर्षांपूर्वीच्या अत्री ऋषींच्या आश्रमात. पैनगंगा, प्रणिता, प्राणहिता या नदीच्या व सिंहाद्रीच्या शिखरांच्या आश्रयाने अनेक ऋषिमुनींचा व देवदेवतांचा निवास या पवित्र व कोऱ्या भूमीत झालेला आहे. अत्री, भृगू, दत्तात्रेय, परशुराम, रेणुकामाता यांची स्मृती जागृत होते. रेणुका ही परशुरामाची आई. जमदग्नी ऋषींची पत्नी. इक्ष्वाकुवंशातील रेणू राजाची ही कन्या रेणुका. हिचे रुमण्वान्, सुषेण, वसू, विश्वावसू व परशुराम हे तिचे पाच पुत्र. नर्मदातीरावरील हैहय कुलातील सहस्रबाहू कार्तवीर्याने जमदग्नींच्या आश्रमावरच हल्ला केला. त्यांची कामधेनू पळवून नेली. कार्तवीर्याच्या पुत्रांनी जमदग्नीचा वध केला. रेणुकेने सती जाण्याची तयारी केली. परशुरामाने यावेळी बाण मारून तयार केलेले 'सर्वतीर्थ' आजही येथे आहे. रेणुकेच्या निवासस्थानाजवळील 'मातृतीर्थ' आजही प्रसिद्ध आहे. शेजारीच रेणुका सती गेली ते

'मूळझरी' नावाचे स्थान आहे. परशुराम व दत्तात्रेय यांची भेट जेथे झाली ते अमृतकुंडही येथेच आहे. सर्व जगाला पावन करणारी रेणुकामाता आज गडाच्या शिखरावर पूर्वेस तोंड करून अभयदान देण्यासाठी तत्पर आहे. जमदग्नी, परशुराम यांचीही स्थाने तेथून जवळच आहेत. देवीच्या उपासकांना या 'मूळपीठा'ची महती विशेष आहे.

याच रेणुका मातेची स्तवने आणि गीते गाऊन आधुनिक काळात या मातेची वात्सल्यपूर्ण उपासना करणाऱ्या श्रीविष्णुदासांची समाधी पायथ्याशी मातृतीर्थाजवळ आहे. याच माहुरच्या पहाडावर दत्तात्रेयांचे निद्रास्थान आहे. एकमुखी दत्त, शिवलिंग, अनसूया, विठ्ठलरखुमाई, इत्यादींची भेट याच परिसरात होते. महानुभावांचा देवदेवेश्वर श्रीचांगदेव राऊळ व श्रीचक्रधर यांच्या कितीतरी कथा सांगेल. फलटणकडील श्रीचांगदेव राऊळांनी शके १०७२–११४२ च्या काळात माहुरची यात्रा केली. याच वेळी त्यांना दत्तात्रेयांचे दर्शन झाले. या चांगदेवांचे शिष्य गुंडम राऊळ होते. यांचे शिष्य महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्रीचक्रधर प्रभू. याच महानुभावीय दत्तप्रभूच्या लीला 'सह्याद्रिवर्णन' नावाच्या एका महानुभावीय ग्रंथात आहेत. दासोपंतांची, एकनाथांची कुलदेवता म्हणूनही माहूरच्या रेणुकेचे माहात्म्य सांगितले जाते. याच रेणुकेस विष्णुदासांनी 'माझी रेणुका माऊली। कल्पवृक्षाची साऊली' म्हणून भक्तिभावाने आळविले आहे.

अशी देवस्थाने किती म्हणून सांगावीत? कोल्हापूर, तुळजापूर, कवळे, आंबेजोगाई, चांदा, अमरावती, मुंबई इत्यादि अनेक ठिकाणची देवीस्थाने देवीच्या पराक्रमाच्या कथा सांगतील. तुळजापूरची भवानी ही तर मराठ्यांच्या पराक्रमाची स्फूर्तिदेवता. शिवरायांना हिनेच स्फूर्ती दिली. 'तुझा तूं वाढवी राजा शीघ्र आम्हांसि देखतां' अशी प्रार्थना समर्थांनी याच देवीची केली होती. भोसल्यांच्या या कुलदेवतेने अनेक रोमहर्षक प्रसंग पाहिले. होळकर, पवार, गायकवाड, निंबाळकर, जाधव, पंतसचिव इत्यादि वीरपुरुषांनी या देवीची आराधना केली. हिच्याच आशीर्वादाने व कृपेने अनेक संग्रामांत मराठ्यांना जय मिळाला. 'श्रीस्थल तुळजापूर हे मुख्यपीठ बहुत जागृत देव व स्वामीचें कुलदैवत येथील पुजा उछाह ताम्राचे धामधुमे करीता चालत नाही म्हणोन श्रीचे पुजकांनी येउन वीदीत

केले त्यारून मनास आणीता हे राज्य श्रीच्या वरदेचे आहे, तेथील पुजा उछाह सांग चालिला पाहिजे या करीता '—क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शिव छत्रपती यांनी काही व्यवस्था केली असल्याची नौद इतिहासपत्र सांगेल. शहाजी, बाळाजी बाजीराव, थोरले माधवराव, महादजी शिंदे, काशीबाई, आनंदीबाई, अहल्याबाई इत्यादि ऐतिहासिक स्त्रीपुरुषांची निष्ठा तुळजा-भवानीपाशी जडली होती.

तुळजाभवानीचे पौराणिक माहात्म्यही येथील वास्तव्यात डोळयांसमोर उभे राहते. कृतयुगातील कर्दम ऋषी व त्यांची पत्नी अनुभूती यांचा सुरेख गृहस्थाश्रम चालत होता. कर्दम ऋषी दिवंगत झाल्यावर अनुभूती सती जाण्यास निघाली. परंतु पोटी लहान मूल असल्याने व इतर ऋषि-मुनींच्या सांगण्यावरून तिने सती जाण्याचा बेत रद्द केला. ती मंदाकिनीच्या काठी आश्रम बांधून तप करू लागली. याच सुमारास कुकुर नावाच्या दत्याने तिची अवहेलना केली. सतीच्या या अपमानामुळे प्रत्यक्ष अष्टभुजा महिषासुरमर्दिनी तेथे प्रकट झाली. आणि तिने कुकुराचा वध केला. अनु-भूतीच्या हाकेला देवी त्वरित धावून आली म्हणून ती त्वरिता, तुरजा, तुळजा बनली व पुढे तिने अनेकांना प्रोत्साहन दिले. हीच रामवरदायिनी माता होय. रामचंद्रप्रभू सीतेच्या शोधात हिंडत होते. शोकाने वृक्षवेलींना आलिंगन देत होते. याच सुमारास देवी सीतेचे रूप घेऊन पुढे आली, पण प्रभू सावध होते. त्यांनीं तिला विचारिले, ' येथे तू का आई ?' म्हणून ही माता तुकाईही बनली.

अशीच आंबेजोगाईची योगेश्वरी अथवा जोगेश्वरी माता. आजही तुम्ही तेथे गेलात तर तुम्हांस योगेश्वरी, मुकुंदराज, दासोपंत, खोलेश्वर इत्यादींच्याच कथा ऐकायला मिळतील. दंतासुर नावाच्या एका दैत्याच्या वधासाठी योगेश्वरीचा अवतार झाल्याची कथा आपणांस येथे समजेल. दासोपंताच्या देवघरातील देवांचे दर्शन त्यांच्या 'पासोडी' इतकेच उत्साह-वर्धक आहे. कोलासुराचा वध करणारी श्रीअंबा कोल्हापुरास स्थिरावली असल्याचे समजून येईल कोलासुराचा मुलगा करवीर असल्यानेही या शहरास आज करवीर नगरी म्हणतात. राष्ट्रकूट, शिलाहार इत्यादि राजघराण्यांची हीच कुलस्वामिनी आहे. याच प्राचीन देवीची स्तुती

आजही केली जाते. ‘ चला जाऊं पाहूं, कोल्हापुरीं राहूं। ओवियांत गाऊं अंबाबाई’ अथवा ‘विष्णुशक्ति आदिमाये वससि करवीरीं। जगज्जननि नाम तुझें त्रिपुरसुंदरी’ अशी वाक्पूजा आजही आंबाबाईची बांधिली जाते. याच महालक्ष्मीची धाकटी बहीण त्र्यंबुली वा टेंबलाई असून तिचेही माहात्म्य सांगितले जाते. त्र्यंबुली, कात्यायनी यांनी देवीस असुरवधाच्या कामी फार मदत केल्याचे सांगतात. त्र्यंबुली महालक्ष्मीपासून तीन मैलांवरील एका टेकडीवर आहे. हिचा रुसवा काढण्यासाठी आजही महालक्ष्मी नवरात्रात पंचमीच्या दिवशी स्वतःच टेंबलाईकडे जाते. बावड्याच्या पाटलाची कुवार मुलगी देवीपुढे कोहळा कापून आजही कोलासूर मारल्याची साक्ष पटविते. महालक्ष्मीने कोलासुराचा वध ज्या ठिकाणी केला तो ज्योतिबाचा डोंगर जवळच आहे. गोमंतकातील म्हार्दोळ येथील महालसा नेवासे येथून आली असावी. अमृतमंथनाच्या वेळी देवांना अमृत मिळवून देण्याच्या कामी मदत करणारी ही देवी मोहिनी तथा म्हाळसा म्हणून प्रसिद्ध आहे. महालसा, शांतादुर्गा, सांतेरी अशा अनेक देवतांच्या कथा त्या त्या स्थानावर आपणांस समजतात व आपणांस त्या त्या काळात घेऊन जातात.


अशी आणखी कितीतरी जुनी तीर्थक्षेत्रे आपणांस भूतकाळातील संस्कृतीचे धागेदोरे स्पष्ट करणारी आहेत. नृसिंहसरस्वतींचे गंधर्वपूर अथवा गाणगापूर, मोरया गोसाव्यांचे चिंचवड, तुकोबांचे देहू, रामदासस्वामींचा सज्जनगड, परशुरामाचे परशुरामक्षेत्र, औंढा नागनाथाचा नागनाथ, रामटेकचा सीताराम, मोरगाव, थेऊर, रांजणगावचा गणपती, भीमाशंकरचा ज्योतिर्लिंग, बार्शीचा भगवंत, औदुंबर, नरसोबा वाडीचा दत्तात्रेय, देऊळगाव राजा अथवा वाशिम येथील बालाजी, पुण्याची पर्वती व चतुःशृंगी, कार्ल्याची एकवीरा, शिंगणापूरचा महादेव अशी अनेक देवदैवतें आजही महाराष्ट्रात इतकी प्रसिद्ध आहेत की त्या स्थानी जाताच त्या त्या काळातच आपण वावरत असतो. मुंबईस मलबार हिलवर तुम्ही गेलात तर त्या स्थानाचे वाळकेश्वर हे नाव ध्यानात ठेवा. भगवान परशुरामाने आपल्या बाणाने येथील बाणगंगेची व वालुकेश्वरची निर्मिती केली असल्याची कथा तुम्हांस समजावून घ्यावी लागेल.

आपल्या देशात जशी पौराणिक क्षेत्रे प्राचीन संस्कृतीचा धागा जिवंत ठेवणारी जशी आहेत तशीच अनेक ऐतिहासिक वास्तू इतिहास काळातील पराक्रम आजही नव्या पिढीस सांगण्यास उत्सुक आहेत. सोरटी सोमनाथ म्हटल्याबरोबर प्राचीन काळच्या सोमनाथाची आठवण यावी. गझनीच्या महंमदाने या प्रसिद्ध देवस्थानाचा नाश केल्याची दुःखद घटना आठवावी. पुनः अलीकडे भारत सरकारच्या प्रेरणेनें या मंदिराचा जीर्णोद्धार झाल्याची सुखद वार्ताही उत्साह वाढविणारी आहे. देवगिरी अथवा दौलताबाद म्हटल्यावरोबर यादव राजे, हेमाडपंत, शंकरदेव यांची आठवण होते. अल्लाउद्दीन खिलजीची स्वारी आठवते. यादवांच्या राज्याचा नाश स्मरतो. जनार्दनस्वामींचे तेथील वास्तव्य स्मरते. प्रतापगडाचे नाव उच्चारताच शिवरायांच्या जीवनातील एक रोमहर्षक प्रसंग मूर्तिमंत होऊन डोळयांपुढे उभा राहतो. रायगड म्हटले की या स्वराज्याच्या पहिल्या राजधानीचे वैभव डोळयांसमोर येते. शिवरायांच्या सिंहासनापुढे मान लवते. हिरकणी बुरुजावरून हिरकणीचे मातृवात्सल्य ध्यानात येते. पेशवाईच्या शेवटच्या काळात बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई असताना मराठयांनी किल्ला लढविताना केलेली पराक्रमाची शर्थ आठवतें. सिंहगडाचे नाव उच्चारताच तानाजी मालुसरे यांच्या आत्मबलिदानाची कथा उभी राहते. आग्र्याचा किल्ला पाहताच शिवरायांची अद्भुतरम्य सुटका आठवते. पुण्याच्या पर्वतीवर गेलें की नानासाहेब पेशव्यांचे चरित्र आठवते. अशा शेकडो ऐतिहासिक स्थानांना भेटी दिल्या की प्राचीन व ऐतिहासिक जुन्या व नव्या आठवणींचे धागेदोरे पक्के बनतात.

* * *

# ११ : चालती बोलती संस्कृती

संस्कृती म्हणजे जुनी इतिहासजमा झालेली वस्तू असे आपण समजतो. पण तशी वस्तुस्थिती नाही. संस्कृतीचे प्रवाह आजही आपल्या नसानसातून व श्वासाश्वासातून वाहताना दिसतात. अनुभवास येतात. ज्या ज्या वस्तूवर माणसाने संस्कार केला आहे ती ती वस्तू संस्कृतीच्या कक्षेत येत राहिली. हा संस्कार कधी मनात प्रकट होणाऱ्या विचारांवर, विकारांवर असेल वा शरीराकडून होणाऱ्या बाह्य क्रियेवरील असेल. माणसाच्या मनावर सुसंस्कार करून त्याची मलीनता व विकारवशता कमी करण्यासाठी, त्याच्यातील पशुत्व जाण्यासाठी, त्याला माणुसकीचे धडे देण्यासाठी जे जे आचारविचार प्रवर्तित झाले ते सर्व संस्कृती या नावाने ओळखले जातात. आणि या मानवी संस्कृतीचे धागेदोरे फार फार जुन्या काळाच्या कानाकोपऱ्यांत दडलेले असतात. देव, धर्म, सण, उत्सव, यात्राजत्रा, ज्ञानविद्या, राजकारण, समाजकारण, तत्त्वज्ञान, आत्मविचार इत्यादि सारे विषय संस्कृतीच्या ठेव्यात येत असून त्यांचा संबंध आजही आपल्याशी निगडित असू शकतो. सबंध मानवाची एक संस्कृती या तत्त्वाला काही अर्थ आहेच. परंतु प्रत्येक देशाची म्हणून एक वेगळीच संस्कृती ठरून गेलेली असते. भूप्रदेशरचना, सागरसान्निध्य, हवामान, सुखवस्तुपणा, उद्योगधंदे इत्यादि भिन्नभिन्न घटकांमुळे देशादेशांची संस्कृति-संस्कार करण्याची पद्धतीही वेगवेगळी ठरून गेलेली असते. महाराष्ट्राची संस्कृती याच अर्थाने आपल्या



वैशिष्टचाने पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. तिचा बनाव केव्हा व कसा झाला; कोणते अंतःप्रवाह तिच्यामध्ये दिसून येतात, याचा विचार येथे करावयाचा नाही देव–धर्मावर ही संस्कृती आधारलेली होती. आणि आजही बऱ्याच अंशांनी ती तशी दिसते. पारतंत्र्यातील गुलामगिरीच्या काळात लोकांना निवारा जर कोणी दिला असेल तर संस्कृतिप्रसार करणारे साधुसंत यांनीच. चौदाव्या शतकाच्या प्रारंभीच महाराष्ट्राचा स्वातंत्र्यसूर्य अस्त पावला. त्यापूर्वीच महाराष्ट्रात एक क्रांतिकार्य सुरू झाले होते. सर्व विद्या, सर्व तत्त्वज्ञान, सर्व पारमार्थिक विचार ‘ संस्कृत ’ भाषेत असल्यामुळे बहुजन-समाजास हा भाग सर्वथैव अपरिचित होता. या आपल्या बांधवांना हे ज्ञान त्यांच्या भाषेत प्रभावीपणाने सांगण्यास प्रारंभ ज्ञानदेवांनी केला. प्रस्थापित रूढीविरुद्ध हे एक बंडच होते. आणि ‘ या बडचा बंडवाल्यांत ज्ञानदेव नामे पहिला ’ होता. त्यांनीच भागवत धर्माची संघटना करून त्यास तत्त्वज्ञानाची बैठक प्राप्त करून दिली. या भागवत धर्माच्या देवालयावर तुकारामबोवांनी कळस चढविला. शेतकऱ्याच्या झोपडीपर्यंत या परम भागवताने ‘ ब्रह्मविद्या ’ नेऊन पोचती केली. पुढील शेदीडशे वर्षेपर्यंत महाराष्ट्रात स्वराज्य नांदत होते.

संस्कृतीचा प्रसार करणारे मराठी काव्य आता पांडित्याकडे आणि विद्वत्तेकडे झुकले होते. वामन, रघुनाथपंडित, मोरोपंत यांच्या पारमार्थिक काव्याचा आस्वाद फक्त वरचा वर्गच घेऊ लागला. कथाकार, पुराणिक, हरदास यांची कीर्तने, प्रवचने वरिष्ठ वर्गापुरतीच मर्यादित होऊ लागली. श्रीधर आणि महीपती हे दोन अपवाद सोडून दिले तर बहुजनसमाजास सहज समजेल असा दुसरा ग्रंथकार सहसा नव्हता. आणि स्वराज्याच्या काळी, विशेषतः त्याच्या उतरत्या काळी संस्कृतिप्रसाराची आवश्यकता होती. अत्यंत सोप्या भाषेत, सरळ पद्धतीने आणि रसाळ वाणीने संस्कृति-प्रसाराचे कार्य होणे अति आवश्यक होते. शाहिरी काव्य हे कार्य मर्यादित अर्थाने करीत होते या स्वराज्याच्या काळी सर्वत्र जागृती निर्माण होत होती. शिवरायांच्या अलौकिक सामर्थ्याने महाराष्ट्रात नवचैतन्य खेळू लागले होते.

रायगड, सिंहगड, प्रतापगड, पन्हाळा, शिखर शिंगणापूर, सप्तशृंगी, त्र्यंबकेश्वर, अंबरनाथ. कनकेश्वर, नरनाळा, गोविलगड इत्यादि अनेक

गडकोटांतून व पर्वतराजींतून स्वातंत्र्याचे ध्वनी उमटू लागले होते. गोदावरी, तापी, भीमा, कृष्णा, पयोष्णी ( पूर्णा ) वइनगंगा, वरदा ( वर्धा ) इत्यादि नद्यांतून पवित्र असे स्वातंत्र्योदक खेळू लागले होते. कार्ले, भाजे, कन्हेरी, जोगेश्वरी, घारापुरी येथील पुरातन लेण्यांचे वैभव वाढीस लागले होते. करवीर, कऱ्हाड, वाई, पुणे, आळंदी, औंध, तुळजापूर, माहूर, चिपळूण, थेऊर, जेजुरी, पैठण, औंढ्या नागनाथ, गाणगापूर, पंढरपूर इत्यादि पवित्र क्षेत्रींची सारी दैवते जागृत झाली होती; आणि सर्व महाराष्ट्रात ‘ उदंड झालें पाणी स्नानसंध्या करावया ’ अशी परिस्थिती निर्माण झाली. स्वधर्म आणि स्वराज्य यांचे राखणदार निर्माण झाले; आणि याचीच परिणती मराठ्यांचा भगवा झेंडा थेट उत्तरेकडे अटकेपर्यंत फडकण्यात झाली. ऐहिक व पारमार्थिक वैभव एकमेकास शोभा देऊ लागले.

भारतीयांच्या आणि पर्यायाने राष्ट्राच्या नसानसांतून एकच कार्यकारी प्रेरणा होती आणि ती धर्माचीं होती. आणि यात वावगे काहीच नव्हते. विवेकानंदानी एके ठिकाणी म्हटले आहे; ‘मानवजातीची उन्नती साधण्यासाठी अत्यंत बलवती अशी धर्मशक्ती ही एकच समर्थ आहे. सर्व प्रकारच्या समाजरचनेच्या मुळाशी कोठेतरी याच शक्तीचे कार्य चालू असते. ज्या प्रेरणेमळे मनुष्ये संघ करून राहू लागली त्या प्रचंड प्रेरणेचा उगमही याच शक्तीपासून झाला आहे. कुलाच्या, हवामानाच्या, अथवा वंशाच्या बंधनापेक्षा धर्मबंधन अधिक शक्तिमान असल्याचा प्रत्यय पुष्कळ प्रसंगी येतो... आपली दानत तुम्हांस बनवावयाची असल्यास, जगात काही महत्त्वाचे कार्य करावयाचे असल्यास, शांती मिळवून देणार असाल तर आणि स्वतःही शांती मिळवू पाहात असला तर या गोष्टी साधण्यास धर्मबळावाचून दुसरे बळ उपयोगी पडणार नाही ’

अशी ही कार्यकारी धर्मशक्ती आहे. हिच्या आधारावरच महाराष्ट्र. संस्कृतीची उभारणी आणि जोपासना झालेली आहे. या धर्मसंस्कृतीचे शिक्षण समाजाच्या अगदी खालच्या थरापर्यन्त नेऊन पोचविणारे प्रचारक पूर्वीपासून महाराष्ट्रात होते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या साधुसंतांनी सर्वत्र ‘ ब्रह्मविद्येचा सुकाळ ’ करून महाराष्ट्रास कर्तव्यतत्पर केले होते. आणि हेच पारमार्थिक ज्ञान प्रत्येकाच्या घरोघर

पोचते करून मनोरंजनाच्या द्वारे संस्कृतिप्रसार करणारा एक वर्ग होता. हा वर्ग म्हणजे गोंधळी, भुत्ये, वासुदेव, वाघ्या–मुरळी इत्यादि लोकांचा होय. ऐतिहासिक काळात खऱ्या अर्थाने समाजशिक्षणाचे कार्य करणारे हे श्रेष्ठ दर्जाचे शिक्षक होते. आज समाजास 'साक्षर' करण्याचे आटोकाट प्रयत्न चालू आहेत. ते योग्यच आहेत. परंतु खऱ्या अर्थाचे 'शिक्षण' काही निराळेच आहे.त्याला धर्माची जोड असणे जरूर आहे.या धर्मनिरपेक्ष राज्यातील 'धर्मा'चा अर्थही समजावून घेतला पाहिजे. धर्म म्हणजे Religion नव्हे. या शब्दाचा अर्थ–The performance of our duties of love and obedience towards God असा आहे. व्यक्तीच्या जीवनात या 'धर्मा'लाही अर्थ आहेच. पण समाजाची धारणा ज्यामुळे होते तो धर्म असा अर्थ 'धर्म' या कल्पनेत अपेक्षित आहे. इतिहासाचार्य राजवाडे याचे वर्णन असे करतात, 'धर्म म्हणजे सर्वजनहितैषी असे वर्तन, कर्तव्य म्हणून करावयास लागणारा कायदा,...संसाराचा कायदा, नित्यकर्माचा कायदा, शुचिर्भूतपणे वागण्याचा कायदा, स्त्री-पुरुषसमागमाचा कायदा, दानाच कायदा, अध्ययन-अध्यापनाचा कायदा, प्रजोत्पादनाचा कायदा, . धर्मराज्य, धर्मराज्य म्हणतात ते हेच--रामराज्य म्हणून जे गातात ते हेच. सौराज्य म्हणतात ते हेच.'

या धर्माचा आणि संस्कृतीचा प्रसार गोंधळी, वासुदेव, भुत्या हे लोक करीत आले आहेत. आज हे लोक भिकारी झालेले दिसतात. 'भिक्षा' हाच आमचा धंदा असे ते सांगतात. स्वकर्तव्याची जाणीव त्यांची त्यांनांच नाही, तर सामान्य लोकांना ती कोठून राहणार ? आचारविचार, दैवते, तीर्थयात्रा, मूळपुरुष, यासंबंधीही या लोकांपाशी माहिती आता कमी प्रमाणात व विपर्यस्त प्रकारची मिळते. या लोकापैकीं काही तर मोलमजुरी करून पोट भरू लागले आहेत. दैन्यावस्थेत आज उपेक्षितपणे आयुष्य कंठणारा हा एक 'भिक्षेकऱ्यांचा' वर्ग आहे. परंतु धर्माचे रक्षण करणे व बहुजनसमाजास 'शिक्षित' करणे हे महत्त्वाचे काम या वर्गाने ऐतिहासिक काळात केले आहे. त्याची ओळख करून घेणे बोधप्रद आहे. छापण्याची कला उपयोगात आलेली नव्हती,त्यासमयी Preservation and spread of culture हे महत्त्वाचे शिक्षणाचे अंग याच वर्गाने संभाळून

धरले होते. निरक्षर असणाऱ्या, अज्ञानामध्ये जीवित कंठणाऱ्या, आणि आपली शेती व आपले खेडे सोडून न जाणाऱ्या शेतकरीवर्गास त्याच्या घरी जाऊन त्याच्या देवदैवतांची आठवण करून देणे, त्यास रोजची तिथी, रोजचा वार, रोजचे नक्षत्र व सण यांची स्मृती करून देणे हे एक महत्त्वाचे सामाजिक कार्य या वर्गाने केले आहे. लोकरंजन आणि लोकशिक्षण यांचे कार्य धर्मसंस्कृतीच्या द्वारे समाजाच्या खालच्या वर्गात करणारे हे प्रचारक होते. गोंधळी, भुत्या, वाघे, मुरळी, वासुदेव, योगी, कानफाटचा, बाळसंतोष सरोदा (पिंगळा), कुडमुडचा जोशी, कोल्हाटी, डोंबारी, खेळिया, फकीर, भराडी, पांगूळ, आंधळे, जागले, नानकपंथी, मानभावी, भोपे, आराधे, दरवेशी, वैदू, बहुरूपी, चित्रकथी, कडकलक्ष्मी, नंदीबैलवाले, इत्यादींची मूळ रूपे आणि वास्तविक कार्य समजावून घेणे अगत्याचे आहे. नुसती 'भिक्षा' हाच यांचा धंदा नव्हता. थोडचा जागेत काही प्रमुखांचा परिचय करून देत आहे.

### गोंधळी

गोंधळी ही सामाजिक संस्था नक्की केव्हा आणि कशी निर्माण झाली याची नोंद इतिहासात नाही. तरी आपल्या इष्ट कार्याच्या सफलतेसाठी सर्व देवदेवतांना आवाहन करणे ही गोंधळात असणारी मूळ कल्पना वैदिक काळातही होती. गणपती, इंद्र, वरुण, अग्नी, वसिष्ठ, अरुंधती, यम, निरुती, कुबेर, शुक्र, अंगार, गुरू, यक्ष, गंधर्व, किन्नर, गायित्री, सावित्री, सरस्वती, श्री, श्रद्धा, मेधा, गंगा, यमुना, शिव, विष्णू इत्यादि दैवतांना वैदिक मंत्रांनी आमंत्रण देण्याची प्रथा आजही प्रचारात आहे. गोंधळामध्ये हाच प्रकार असतो. 'गोंधळ' या शब्दाचा अर्थ देवीच्या कुळधर्मात देवी-प्रीत्यर्थ गोंधळी लोकांकडून करावयाचे गाणे, नाचणे, कीर्तन, भजन, स्तुती असा सापडतो. आणि व्युत्पत्तीच्या दृष्टीने गुध्–खेळणे, गुंदल–एका वाद्याचा आवाज असेही अर्थ निघतात. ज्ञानेश्वर–नामदेवांच्या काळात गोंधळाची प्रथा होती. पण त्यापूर्वीचाही पुरावा उपलब्ध आहे. भा. इ. सं. मंडळाच्या त्रैमासिकाच्या विसाव्या अंकात श्री. वि. वि. देशपांडे यांनी 'गौडली नृत्य' नावाचा एक माहितीपूर्ण लेख लिहिला आहे. त्यात स्कंदपुराणांतील चौति-साव्या 'गौंडली नृत्य' नावाच्या अध्यायाचे विवरण आहे. दीपिका, माळ,

मातृवाद्य, टाळ, शंखवाद्य, मृदंग, दिवटद्या, कपर्दिकांची माळ इत्यादि वस्तूंची नोंद तेथे आहे. यावरून पुराणकाळींही 'गोंधळा'ची चाल असावी. एकनाथांच्या वाङ्मयांत तर 'गोंधळा'वर पुष्कळच पदे सांपडतात. "स्वर्ग मृत्यु पाताळ, त्याचा मंडप घातला हो! चार वेदांचा फुलवरा बांधिला हो" या थाटात एकनाथ गोंधळाचे वर्णन करतात. स्वराज्यकाळी वीररसाचे पोवाडे गाण्यात गोंधळीच पुढे असत. इंग्रजी राजवटीत विसाव्या शतकाच्या प्रारंभी Edthnographical survey of Bombay Presidency चे प्रमुख R. E. Enthoven यांनी "The tribes and castes of Bombay Presidency या त्रिखंडात्मक ग्रंथात गोंधळी, भुत्ये, वासुदेव यांची सविस्तर माहिती दिली आहे. जमदग्नी आणि रेणुका यांपासून आपली परंपरा आहे असे गोंधळी सांगतात. हे लोक माहूरतुळजापूरहून महाराष्ट्रात आले. आणि अंबाभवानीची कीर्ती त्यांनी देशात फैलाविली. आडिवरे, चतुर्सिंगी, करमाळे, केळशी, कोल्हापूर, मुंबई, तुळजापूर, वज्रेश्वरी, औंध, माहूर इत्यादि देवीची क्षेत्रे प्रसिद्ध आहेत. गोंधळी हे देवीउपासक आहेत. गोंधळाच्या वेळी, गोंधळी पालीचा खंडोबा, पंढरपूरचा विठोबा, औंधची यमाई, शिंगणापूरचा महादेव, नाशिकचा राम या दैवतांना आवाहन करीत असतो. उगाई, जोखाई, तुकाई इत्यादि 'अनार्य' दैवतेही त्याच्याकडून पाचारिली जातात. गोंधळ ऐकणारांना वाटते. आपले दैवत आहे या स्थानी, आणि या वाटण्याचा उपयोग समाजसंघटनेसाठी होत होता. "The simple songs of Gondhalis tikled the fancy, gratified the pride and roused the patriotism of the unlettered mountaineers of the Western Ghats" असा अभिप्राय एन्थोवेननेही व्यक्त केला आहे.

संतवाङ्मयात 'गोंधळा'वर बरीच रूपके सापडतात. 'सुदीन सुवेळ। तुझा मांडिला गोंधळ हो। पंचप्राण दिवटे। दोनी नेत्रांचे हिलाल हो–' अशा अर्थाचे तुकारामाचे अभंग पुष्कळ सापडतात. एकनाथाचे 'भारुड' तर या वर्गाचा मोठाच ठेवा होता.

## वासुदेव

हे लोक आपली उत्पत्ती एका ब्राह्मण ज्योतिषास एका कुणबी स्त्रीपासून झालेल्या सहदेव नावाच्या मुलापासून सांगतात. असे सांगतात की,

ही जात द्वारकेहून महाराष्ट्रात आली. खेड्यांतून कुंभाराच्या घरी यांचा मुक्काम असतो. तो कुंभार "काका" असतो. त्याच्यावर वासुदेवाचा फार विश्वास असतो. परवा एका वासुदेवाने मला सांगितले, "आमच्यापैकी एखादी बाई रात्री चुकलीमाकली, आणि ती दुसऱ्या दिवशी कुंभाराच्या घरी सापडली तरच ती आमची, नाही तर आम्ही संबंध सोडून देतो." अशी श्रद्धा या वासुदेवांची असते. वासुदेव मोठे कृष्णभक्त म्हणून प्रसिद्ध आहेत. आजही पहाटेच्या वेळी चिपळ्यांच्या आणि टाळांच्या मधुर नादात कृष्णाची गाणी म्हणत आणि नाचत नाचत ते फिरत असतात. अज्ञानी समाजास ते 'जागृत' करीत असतात. सोनारीचा बहिरोबा हे त्याचे कुलदैवत असले तरी तुळजापूरची देवी, जेजुरीचा खंडोबा, पुण्याची फिरंगाई यांचीही पूजा ते करतात. विष्णू, विठ्ठल यांचीही उपासना वासुदेव करतात. "हातात पोवा घेऊन पाठीला शिदोरी बांधून आणि गाईचे खिल्लार पुढे घालून बालवयाचा कृष्ण रानात जात असे. आपला वासुदेव याच कृष्णाचे अनुकरण करीत असतो. मोरपिसांची टोपी तो घालतो. शेला नाही म्हणून तांबडे अलवणच अंगावर घेतो; आणि अलगुजाला साथ व्हावी म्हणून पायात चाळ बांधतो.....त्याची पदे मनापासून ऐकल्यास शंकराचार्यांचा वेदान्त व अत्यंत मधुर अशी कृष्णभक्ती यांचा एक मोठा गमतीदार संयोग यात दिसून येतो. उंच तत्त्वज्ञान आणि प्रेमळ कृष्णभक्ती अगदी शेतवाडीपर्यंत पोचती करण्याचे काम हा वासुदेव करीत असतो." (प्रा. श्री.म. माटे)

## वाघ्या-मुरळी

हे खंडोबाचे भगतगण होत. मूल होत नसल्यास अगर मरत असल्यास ते खंडोबास वाहण्याची चाल असे. असा देवाला वाहिलेला मुलगा वाघ्या होतो आणि मुलगी मुरळी बनते. हिचे लग्न खंडोबाबरोबर होते. एन्थोवेनने खंडोबा-मुरळीच्या लग्नाचे सविस्तर वर्णन दिले आहे. खंडोबा, बहिरोबा, ज्योतिबा आणि सटवाई ही यांची प्रमुख दैवते. खंडोबा हे तर मराठ्यांचे वीररसाचे दैवत आहे. वनस्पतीवर्गात, भंडारात खंडोबाचे स्थान मानतात. प्राणिवर्गात कुत्रा खंडोबाची निशाणी समजतात. खंडोबा म्हणजे 'स्कंद'. स्कंदपुराणात अशी कथा आहे की, मणिमल्ल दैत्यांच्या नाशासाठी महादेवाने खंडोबाचा अवतार घेतला. 'रघुविरनामस्मरणें हृदयीं शंकर

नीवाला। तो हा मदनान्तक अवतार झाला!' असे रामदासांनी खंडोबाच्या आरतीत म्हटले आहे. मार्गशीर्ष महिन्याचे पहिले सहा दिवस खंडोबाच्या नवरात्राचे असतात. पाली आणि जेजुरी ही खंडोबाची स्थाने प्रसिद्ध आहेत. वाघे-मुरळ्या यांनी सर्व महाराष्ट्रात खंडोबाची भक्ती पसरवून या शूर दैवताची आठवण ताजी ठेवली. वाघ्या-मुरळी यांवर एकनाथांची भारूडगीते प्रसिद्ध आहेत.

"अहं वाघा सोहं वाघा प्रेमनगरी वारी। सावध होऊन भजनी लागा देव करी कैवारी" असा संदेश वाघ्या देत असतो.

"निःसंग मुरळी झालें। या मालूचें घर रिघालें।
गळा भक्तीची भांडारी। भावाचा कोटंबा करीं।
वाजे वैराग्य तुणतुणें। तें कदा नव्हे बा सुनें।
मन घुंगरु वाजे छुनछनुं। नाचत जेजुरी गेलें।
गड देखिला जेजूरी। आत्मा नांदितो मल्हारी।
जाउनी बसलें मी मांडिवरी। एका जनार्दन बोले।"

असे मुरळीचे वर्णन एकनाथांनी केले आहे.

वाघे-मुरळ्यांनी सर्व महाराष्ट्रात खंडोबाची भक्ती पसरवून खंडोबा या शूर देवताची स्मृती कायम ठेवली. खंडोबाचे भक्त भंडार उधळतात. गळ्यात पिवळे वस्त्र अडकवून हातात कोटंबा म्हणजे वाडगा घेतात. देवाला भरीत, रोडग्याचा नैवेद्य करतात, पोत पाजळून येळकोट केल्यावर खंजिरी-मंजिरीवर भजन अथवा पोवाडे गातात.

## भुत्या

हाही मूळचा देवीचाच भक्त. याचे ठिकाण तुळजापूर हे होय. याचा प्रमुख कदम नावाचा एक भगत आहे. तो तिथलाच. दर शुक्रवारी व मंगळवारी हे भवानी देवीच्यासाठी पाच घरे भिक्षा मागतात. नवरात्रात सर्व महाराष्ट्रभर यांचा संचार असून देवीची गाणी हे आजही म्हणतात. यांच्या अंगात तेलाने माखलेला एक काळाकुट्ट अंगरखा असून गळ्यात कवड्यांची

माळ असते. तिलाच एक अंबाबाईचा टाक लोंबकळत ठेवलेला असतो. यांच्या हातात मशाल, तुणतुणे इत्यादि साहित्य असते. या देवीभक्तांखेरीज आणखीही लोक महाराष्ट्रात संस्कृतिप्रसाराचे कार्य करीत असतात. यल्लामाचे जोगती व जोगतीण, मरिआईचा पोतराज, पांगूळ, बाळसंतोष, चित्रकथी, नंदीबैलवाला, बहुरूपी, डौरी इत्यादि पंथीयांची आता दर्शने कमीकमी होत चालली आहेत. नाथपंथाचे योगी घरोघरी जाऊन गोपीचंद-मैनावतीची गाणी कोळ्याच्या सुरावर गाणारे अजूनही कुठेकुठे दिसतात. धर्मनाथापासून यांची परंपरा असावी. निरनिराळ्या वेषांतील गोसावीही मधून मधून दिसतात. जागल्या किंवा पाईक यांची कामगिरी जुन्या गाव-गाड्यात महत्त्वाची होती,

या सर्व मंडळींचा यथायोग्य गौरव ऐतिहासिक काळातील त्यांच्या कामगिरीचा उल्लेख करताना तरी करावयास हवा. विद्येच्या, ज्ञानाच्या प्रसाराची विविध साधने जेव्हा विपुल प्रमाणात नव्हती, छापील पोथ्या पुस्तके, पंचांगे नव्हती, वृत्तपत्रे नव्हती, शाळा विपुल प्रमाणात नव्हत्या त्या वेळेस या संस्कृतिप्रसारकांनी मोठेच कार्य केले आहे, यात शंका नाही. यांच्या वरवर ओबडधोबड दिसणाऱ्या कलेने एके काळी मराठी मनाचे जोपासन व पोषण निष्ठेने केले आहे. मराठी साधुसंतांचे परमार्थविवरण व वेदान्तविवरण मठांतून, मंदिरांतून, वरिष्ठांच्या वाड्यांतून होत असे. रामकृष्णादिकांच्या कथाही सर्वांना अवीट वाटणाऱ्या अशा होत्या. परंतु ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत बहुतेक साधुसत्पुरुषांनी समाजाच्या सर्व थरां-तून भटकणाऱ्या व मोकळेपणाने वावरणाऱ्या या प्रचारकांचे साह्य घेतलेले दिसते. गोंधळी, वासुदेव, वाघ्यामुरळी यांची रूपके ज्ञानेश्वरांपासून सर्व संतांनी उपयोगात आणली आहेत.एकनाथांचे भारुडवाङ्मय हे खऱ्या अर्थाने मराठीचे प्रारंभीचे लोकवाङ्मय असून त्यात असणाऱ्या गोंधळी, वासुदेव इत्यादींच्या स्फुट पदातून लोकजागृतीचे व सांस्कृतिक उद्बोधनाचे उत्कृष्ट चित्रण आजही दृष्टीस पडते.

साधुसंतांच्या यासारख्या प्रयत्नांनी देवाधर्माची शिकवण मराठी लोकांच्या मनात सतत रुजत राहिली. या शिक्षणाचा परिणामही मराठी लोकमनावर तीव्रतेने उमटलेला दिसेल. भवानीदेवी, वासुदेव, पोतराजा

यल्लमा, गोंधळी, वाघ्यामुरळी यांची अनेक गाणी गीते म्हणून आता प्रसिद्ध होत आहेत. महाराष्ट्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या 'एक होता राजा' या लोकवाङ्मयाच्या संग्रहात 'जेजुरी नगरी' नावाचे एक चांगले गीत प्रसिद्ध झाले आहे.


'त्या बाई जेजुरी नगरात। कोऱ्या चांदणी महालात।
म्हाळसा बानाई भांडती। ऐकून मल्हारी हासती।
सवती सवतीचे भांडण। भोळया भक्ताचे कांडण।
दोघी मुरळी नाचती। बघून मल्हारी हासती।
पंढरीचे आहे रखुमाई। येथे म्हाळसा बानाई।
तेथे विटेवरी उभा। येथे घोड्यावर शोभा।
तेथे पुंडलिक निधान। येथे हेगडी प्रधान।
तेथे बुक्याचे रे लेणे। येथे भंडार भूषणे।
तेथे वाहे चंद्रभागा। येथे जरी वाहे गंगा।
तेथे मृदंग विन टाळ। येथे वाघ्या मुरळीचा घोळ।।

* * *

# १२ : संस्कारांतून इतिहासदर्शन

वर्तमान काळातील अनेक आचारविचारांची व वर्तनप्रकारांची मुळे भूतकाळात खोलवर कोठे रुजली आहेत याचा तपास आपण घेत आहोत. आजही आपल्या मनावर जुनेच प्राचीन काळचे ठसे कसे आहेत हे आपण पाहिले. आता वैयक्तिक आयुष्यातील महत्त्वाच्या संस्कारांचेही मूळ वैदिक काळापर्यंत कसे जाते हे थोडक्यात पाहू. गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकरण, निस्क्रमण, अन्नप्राशन, चौल, उपनयन, समावर्तन, विवाह इत्यादि सोळा संस्कार आपणांस माहीत आहेत. यांतील काही महत्त्वाचे संस्कार आपण अजूनही काही थोडाफार फरक करून पाळीत आहोत.

आपले संस्कार हे मुख्यतः आपल्या आचरणशुद्धतेसाठी आहेत.एखाद्या वस्तूचे वैगुण्य दूर करून ती शुद्ध करणे, चांगली करणे, बलवान करणे हा संस्कार शब्दाचा अर्थ आहे. मनुष्य जन्मतः शूद्र असतो, परंतु संस्कारांमुळे त्याला द्विजत्व येते. ‘ जन्मना जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते ’ असे आपण मानतो. श्रेष्ठपदाच्या या प्राप्तीसाठी पूर्वजांनी गर्भात असल्यापासून जीवाच्या अंतापर्यंत नाना प्रकारचे संस्कार सांगितले आहेत. या संस्कारांमुळे आपले पाप नाहीसे होते, आचरण शुद्ध बनते, स्वाध्याय, वेदांचे अध्ययन, होम, पंचमहायज्ञ, ज्योतिष्टोमादि यज्ञ यांमुळे पुण्यसंचय होऊन ब्रह्मप्राप्तीचा मार्ग सुकर होतो अशी आपल्या मनाची धारणा



आजही आहे. आपल्या धर्मपरंपरेत ४८ संस्कार सांगितले आहेत. पुढे ही संख्या रोडावून पंचवीस अथवा सोळापर्यंत स्थिरावली. गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकरण, अन्नप्राशन, चौल, उपनयन, विवाह असे काही संस्कार आजही कोठे कोठे शिल्लक आहेत. उपनयन व विवाह हे दोन महत्त्वाचे संस्कार अद्याप टिकून आहेत. दया, क्षमा, अनसूया, शौच, अनायास, मंगल, अकार्पण्य आणि अस्पृहा हे आठ आत्मगुणाचे संस्कार पुढे दैवी संपत्तीत आलेले दिसतात. यांतील काही संस्कार स्त्रियांचे, काही पुरुषांचे, काही उभयतांचे आहेत. शूद्रांनाही काही संस्कार सांगितले आहेत.

ज्या संस्कारांचे अवशेष थोडेफार शिल्लक आहेत अशांतला एक संस्कार म्हणजे गर्भाधान हा होय. हा वैदिक संस्कार अजूनही कोठे कोठे चालू आहे. यालाच गर्भलंभन असेही नाव आहे. ज्या कर्माने गर्भाचा लाभ व्हावा वा ज्यात बाहेर येत राहिलेले रेत म्हणजे वीर्य वाया जात नाही त्यास गर्भलंभन म्हणतात. पत्नीच्या ऋतुप्राप्तीनंतर चौथ्या रात्री किंवा पुढल्या कोणत्याही शुभ रात्री हा संस्कार होतो. शृंगारलेल्या, सुगंधित अशा शय्येवर गळ्यात सुगंधित पुष्पमाला धारण करून पत्नी उताणी निजलेली असते. ओल्या दूर्वा अथवा अस्कंधाची मुळी यांचा रस त्या स्त्रीच्या नाकपुडीत मंत्र म्हणत ओतावा आणि शृंगारचेष्टा करीत करीत मंत्र म्हणून तिच्याशी भोग भोगावा. असा या गर्भाधान संस्काराचा मुख्य अर्थ आहे. 'विष्णुर्योनिं', 'अमूहमस्मि', 'अहंगर्भं', 'तां पूषन्' इत्यादि वैदिक मंत्रांनी हा संस्कार संपन्न होतो. गृहस्थधर्माचे यथार्थपणे पालन, सुप्रजाजनन, पितृऋणातून मुक्तता असे मोठे उदात्त हेतू या संस्कारामागे सांगितले गेले आहेत. धान्य पेरण्यापूर्वी जमिनीची नीट मशागत व्हावी लागते, त्याचप्रमाणे स्त्रीच्या इंद्रियक्षेत्राची शुद्धी करण्याचे तत्त्व या संस्कारात आहे. म्हणूनच 'क्षेत्रसंस्कार' असेही नाव याला आहे. भावी संतती सत्त्वगुणसंपन्न, निरोगी, दैवी, पराक्रमी व्हावी अशा संकल्पांनी हा संस्कार दृढ झालेला दिसतो. स्त्रीच्या इंद्रियाच्या ठिकाणी पुरुषाने केलेली वीर्यरूप बीजाची पेरणी असाच सरळ अर्थ गर्भाधान संस्कारात असला तरी त्यामागचा हेतू मोठा उदात्त दिसतो.

आज समंत्रक असा संस्कार होत नसला तरी त्याला थोडेफार सोहळयाचे रूप प्राप्त झाले आहे. न्हाणवलीच्या मखरांचा प्रकार अजूनही कोठेकोठे होत असावा. गर्भाधानापासून मधुचंद्रापर्यंतचा हा प्रवास मोठा लक्षणीय असला तरी सुप्रजाजनन,गुणवर्धन हा हेतू महत्त्वाचा आहे. या सर्व विधीचे वा संस्काराचे अतिशय काव्यात्मक व रोमांचकारी वर्णन वीर सावरकरांनी आपल्या 'कमला' या अप्रतीम खंडकाव्यात केले आहे. होमदीप्ती स्वच्छधूम, आहूतिगंध, श्रुतिमंत्र, अभ्यंगस्नान, अंगस्पर्श, आहेर, विडे, उखाणे, फुलसेज अशा विविध उपचारांनी सोत्कंठ झालेली ती नायिका 'लोटिली ती सख्यांनी तों बळेंचि पतिमंदिरी.' आता यानंतर काही कसासा वाटणारा केवळ देहधर्म नाही. आता येथे जीवनाची स्वर्गंगा प्रकट होणार असून तिला तीर्थांचे माहात्म्य प्राप्त होणार आहे. आता येथून पुढल्या दिव्य पेरणीतून कोण कोण महात्मे जन्मास यणार आहेत याचे मोठे दिव्य व भव्य असे चित्र सावरकरांनी आपल्या प्रतिमेच्या सामर्थ्याने रगविले आहे. गर्भाधानसंस्कारावरील हा महान्मंगल काव्यभाग मुळातूनच वाचावयास हवा. या पेरणीतून गर्भधारणा होते. हा गर्भ पुत्ररूपाचा असावा म्हणून 'पुंसवन' नावाचा आणखी एक संस्कार सांगितला आहे. गर्भधारणेपासून तिसऱ्या अथवा चौथ्या महिन्यास पुनर्वसू नक्षत्र असेल त्या दिवशी हा संस्कार करतात. या दिवशी पती अग्नीवर विधिपूर्वक असा भात शिजविती. नंतर एकाच रंगरूपाचे वासरू असलेल्या गाईच्या दुधाचे दही स्त्रीच्या उजव्या तळहातावर घातले जाते. शिश्नस्वरूपाचा एक सातूचा दाणा त्यावर ठेवतात. दोन अंडस्वरूपाचे म्हणून उडदाचे दोन दाणे सातूच्या दाण्याच्या बाजूस ठेवतात, पुरुषत्वाचे हे चिन्ह प्राशन करीत असता 'हे तू काय पीत आहेस ?' असा प्रश्न पती विचारतो व 'हे मी पुंसवन पीत आहे' असे पत्नी सांगते. या संस्कारामुळे गर्भ गळून पडत नाही, नासत नाही. विकृत होत नाही. स्त्रीच्या गर्भात वाढणारा जीव हा पुत्ररूपाचा निपजावा हा या संस्कारामागचा हेतू स्पष्ट आहे. पुत्रप्राप्तीसाठी करावयाचे नाना उपचार आज या 'पुंसवना'चेच अवशिष्ट भाग समजण्यास हरकत नाही.

सीमंतोन्नयन हा आणखी एक संस्कार सांगितला आहे. सीमंत म्हणजे

भांग यात उंबराची फळे, साळीचे पीस व कुश यांनी भांग काढावयाचा असतो. गर्भस्थ जीवास स्वतंत्र रीतीने श्वसनक्रिया तालुमध्यापर्यंत म्हणजे सीमंतापर्यंत सुलभ रीतीने करता यावी म्हणून हा विधी आला. चौथ्या, सहाव्या अथवा सातव्या आठव्या महिन्यातही हा संस्कार करतात. या विधीत वीणेच्या सुरांवर स्तोत्रगायन करायचे असल्याने यास उत्सवाचेही स्वरूप प्राप्त होते. आता असे समारंभ डोहाळे अथवा 'अगुळे' या रूपांनी शिल्लक आहेत. या नंतरचा विधी म्हणजे जातकर्म हा होय. पित्याने किंवा वडील माणसाने या संस्कारात सोन्याच्या अंगठीने नवजात मुलाच्या तोंडाला मध लावायचा असतो. पिता या प्रसंगी मुलाची टाळू हुंगतो, त्याला कुरवाळतो, त्याच्या खांद्याला स्पर्श करतो. पळसाच्या पानाच्या पोकळ नळीने मुलाचे मंत्रपूर्वक कानही यावेळी फुंकले जातात. यानंतर 'नामकरण' या नावाचा विधी आजही बाराव्या दिवशी केला जातो. या आधी सटवीची पूजा, बळिराण्याची पूजा असेही विधी केले जातात. या दिवशी समारंभपूर्वक अशा पद्धतीने मुलाचे नाव ठेवितात. एक व्यावहारिक अथवा आवडते नाव व दुसरे अभिवादनीय; अशी दोन नावे मुलाची ठेवतात. यानंतर तीनचार महिन्यांनी मुलाला बाहेर देवाला नेण्याचा समारंभ करतात. हाच 'निष्क्रमण' विधी म्हणून जुन्या काळी होता. सहाव्या अथवा सातव्या महिन्यात 'अन्नप्राशन' अथवा 'उष्टावण' हा सस्कार आजही आपण करतो. मुलात चांगली बुद्धी यावी, त्याची शक्ती वाढावी म्हणून दूध, दही, तूप, मध यांनी मिश्रित अशा भाताचा घास यावेळी प्रथमच भरविण्यात येतो. अन्न पचविण्याची मुलाला सवय व्हावी व त्याची शक्ती वर्धित व्हावी अशी योजना या लहानशा संस्कारामागे आहे. यानंतर चौलकर्म म्हणजे मुलाचे जावळ काढणे, कान टोचणे असेही विधी समंत्रक केले जातात. चौलकर्मानंतरची पुढली कपाळावरील शेंडी मुंजीच्या प्रसंगी मागे जाते.

यानंतर आजही टिकून राहिलेला सर्वांत महत्त्वाचा संस्कार म्हणजे उपनयन या नावाचा आपणांस माहीत आहे. यासच मौजीबंधन, व्रतबंध अशीही नावे आहेत. 'उपनयन' म्हणजे विद्या शिकण्यासाठी गुरूजवळ जाणे. पूर्वी विद्या देणाऱ्या ऋषिवर्यांचे आश्रम रानावनांत असत. तेथे मुलांना

सातव्या वर्षानंतर शिक्षणासाठी जावे लागे. 'येन कर्मणा यस्मिन्वा कर्मणि आचार्यसमीपं नीयते कुमारस्तदुपनयनम्'। म्हणजे ज्या कर्मामुळे कुमार आचार्याजवळ विद्येच्या प्राप्तीसाठी नेला जातो ते कर्म म्हणजे उपनयन होय. या संस्कारात काही व्रते पाळावयाची असल्याने यास व्रतबंधही म्हणतात. यात कुमाराने आपल्या कमरेस मुंज अथवा मोळ नावाच्या तृणाची तिपेडी दोरी बांधावयाची असल्याने यास मौंजीबंधन असेही नाव आहे. याचीच आपण 'मुंज' शब्दाशी सांगड घालून दिलेली आहे. वेदांचे अध्ययन व त्यामुळे वेदार्थज्ञान सपादन करण्याचा अधिकार कुमारांना प्राप्त करून देणारा हा महत्त्वाचा संस्कार आजही पुष्कळ अंशी शिल्लक आहे. आईवडील शरीराच्या रूपाने पहिला जन्म देतात. पण आचार्य अथवा गुरुदेव उपनयनप्रसंगी बटूस दुसरा जन्म देतात. वेदमाता गायित्रीच्या पठणामुळे त्यास 'द्विज' अशी संज्ञा खऱ्या अर्थाने प्राप्त होते. 'शरीरमेव माता-पितरौ जनयतः। स हि विद्यातस्तंजनयति तच्छ्रेष्ठं जन्म' असे याचे स्वरूप आहे. 'उपनयनं विद्यार्थस्य श्रुतितः संस्कारः' याचा अर्थ असा की, वेदविद्यारूपी धनाची प्राप्ती करून घेण्यासाठी कुमाराने आचार्याजवळून घ्यावयाचा सस्कार.

कुमाराच्या वेदाध्ययनास आता सुरुवात होते. आचार्य प्रवचन करून विद्यार्थ्यास वेदार्थाचे ज्ञान देतात. गुरूच्याजवळ सतत राहणारा हा विद्यार्थी त्यांचा अंतेवासी म्हणून ओळखला जातो. हा विद्यार्थी यापूर्वी बटू, कुमार असतो. पण तो विद्या घेतो आचार्यापासून. आचार्य म्हणजे तरी कोण ? 'यस्माद्धर्मानाचिनोति स आचार्यः' म्हणजे ज्याच्यापासून कुमारास धर्मविषयक आचारविचार समजतो तो आचार्य. उपनयनसंस्कारात नंतर काही हौसेच्या व मौजेच्या गोष्टी शिरल्या असल्या तरी मुहूर्त पाहणे, गणपतीचे पूजन, कुलदेवतेचे पूजन, पुण्याहवाचन इत्यादि प्राथमिक विधी आजही महत्त्वाचे आहेत. होमहवनाची पद्धतही आज सर्वत्र रूढ आहे. होमाचे स्थंडिल, अग्नीची प्रस्थापना, स्थंडिलाभोवतीचे परिसमूहन (दोन तीन अंगुळे रुंदीची जागा स्वच्छ करणे), परिस्तरण (प्रत्येक दिशेला चार चार दर्भ ठेवणे), पर्युक्षण (स्थंडिलाभोवती झारीने अथवा हाताने पाणी शिंपडणे), असे सर्व उपचार आजही पूर्वपरंपरेनुसार घेतात. प्रोक्षणी (द्रोण)

दर्वी (पळी), प्रणीतापात्र (द्रोण), आज्यपात्र (द्रोग), इध्म (पेटवण अथवा समिधा), र्बाहि (टीचभर लांबीचे मूठभर दर्भ) असे सर्व दृश्य आजही या प्रसंगी दिसते. 'ॐ प्रजापतये स्वाहा,' 'ॐ अग्नये स्वाहा' आणि 'इदं न मम' असा घोष आजही होतो. संस्थाजप, गायत्री मंत्राचा उपदेश, मेधाजनन, आशीर्वाद ग्रहण हे विधी आजही उपनयनविधीत महत्त्वाचे आहेत.

यावेळी बटूच्या गळयात जानवे अथवा यज्ञोपवीत येते. त्याला काळया हरणाच्या कातडयाचा एक लहानसा तुकडा बांधलेला असतो. हा तुकडा म्हणजे पूर्वीच्या मृगाजिनाचा शिल्लक राहिलेला अंश होय. त्या बटूच्या कमरेला मुंज नावाच्या गवताची मेखला येते. त्याच्या हातात पळसाचा अथवा बेलाचा दंड येतो, या संस्कारापासून बटू विद्याजर्नास प्रारंभ करतो. सकाळ, संध्याकाळ तो संध्या करू लागतो. 'ॐ भवति भिक्षां देहि' हा मंत्र याच समयाचा. गुरूची सेवा करणे, समिधा आणणे, अध्ययन करण असा मोठा उदात्त हेतू या संस्कारामागे आहे आणि त्यांची नोंद आजही दिसून येते. योग्य वयात उपनयन न झाले तर मुलगा 'व्रात्य' होतो. त्याला शुद्ध करून घेण्यासाठी व्रात्यस्तोम नावाचा विधी करावा लागतो.

यानंतर आणखी महत्त्वाचा टिकून राहिलेला संस्कार म्हणजे विवाह हा होय. स्त्रीपुरुषांच्या आकर्षणाला एक मर्यादा घालून वैयक्तिक विकास, समाजस्थैर्य व पारलौकिक कल्याण साधणारा हा संस्कार आजही आपण वैदिक मंत्रांनुसार करीत असतो. विवाहसंस्कारात नंतर रूढीमुळे आणि हौसेमौजेमुळे अनेक नव्या नव्या गोष्टी आल्या तरी त्याचे मूळ स्वरूप अजूनही उदात्त वाटते. पत्रिका पाहाणे. गोत्र पाहाणे, हे पूर्वापार प्रकार आजही चालू आहेत. 'धर्मप्रजा संपत्तिः प्रयोजनं दारसंग्रहस्य' धर्म, संपत्ती व प्रजा यांच्या प्राप्तीसाठी विवाह असे सांगितले आहे. 'विवाह' या शब्दाचा अर्थ पित्याच्या घरून आपल्या घरी मुलगी नेणे असा आहे. आकाश व पृथ्वी यांच्या विवाहाची कथा वैदिक वाङमयात येते. हे दोनही लोक प्रथम एकत्र होते; पण पुढे दूर गेले. तेव्हा ते एकमेकास म्हणू लागले की, 'आपण, एकत्र येऊन विवाह करू' ही वैदिक कल्पना 'आकाशाशी जडले नाते धरणी मातेचे' या आधुनिक काव्यपंक्तीतही व्यक्त झाली आहे. उपक्रम,

संकल्प, पुण्याहवाचन, कन्यादानाच्या वेळचे संकल्प, वधूवरांचे सत्कार, प्रत्यक्ष कन्यादान, होमविधी, पाणिग्रहण, लाजाहोम, प्रदक्षिणा, अश्मारोहण सप्तपदी, संस्थाजप, अभिषेक असे अनेक प्रकारचे विधी विवाहाच्या प्रसंगी आजही होत असताना दिसतात.

पाणिग्रहणात वधूचा हात वराने आपल्या हातात घ्यावयाचा असतो. अग्निपरिणयनात वधूसह वराने होमाग्नीस प्रदक्षिणा घालावयाची असते. या महत्त्वाच्या संस्काराचा हेतू पूर्वाचार्यांनी फार उदात्त स्वरूपाचा सांगितला आहे. 'धर्मे चार्थे च कामे च इयं नातिचरितव्या' असे वराला उद्देशून म्हटल्यानंतर वराने 'नातिचरामि' असे म्हणावयाचे असते. धडपणे होणाऱ्या धर्माचरणासाठी पत्नीची आवश्यकता पूर्वीपासून मानली गेली आहे. सप्तपदीमधील मंत्रांत फार मोठा अर्थ आहे. आपणां दोघांना भरपूर अन्न मिळावे म्हणून वधू, तू माझ्याबरोबर एक पाऊल टाकावेस. शरीर-सामर्थ्यासाठी तू दुसरे पाऊल टाक, धनवृद्धीसाठी तू तिसरे पाऊल टाक, सौख्यवृद्धीसाठी चौथे पाऊल टाक, प्रजेच्या वृद्धीसाठी तू पाचवे पाऊल टाक, वसंतादि ऋतू आनंददायी व्हावेत म्हणून तू सहावे पाऊल टाक आणि अतिशय सौख्यासाठी तू सातवे पाऊल टाक, हे सप्तपदीमधील आदेश आजही उच्चारले जातात.

विवाहसंस्कारामधील सर्व प्रार्थना वैदिक परंपरेतील आहेत. आजही वधूवर सप्तर्षी व अरुंधती यांना उद्देशून प्रार्थना करतात. 'हे ताऱ्या तू 'ध्रुव' आहेस. तू या ठिकाणी अढळ होऊन राहिला आहेस. ध्रुवा, अढळ असा तू माझे शत्रूपासून रक्षण कर' अशी ध्रुवताऱ्याची प्रार्थना आजही केली जाते. विवाहानंतर गृहप्रवेशाच्या वेळी वर म्हणतो, 'कल्याणरूप अशा या घरात या नववधूसह मी आनंदाने प्रवेश करतो. पराक्रमी पुत्रांचा नाश न करणाऱ्या, शूर अशा पुत्रांनी गजबजून राहणाऱ्या, तशाच पुत्रांना जन्म देणाऱ्या, अन्नोदकाचा प्रवाह सतत वाहता ठेवणाऱ्या या माझ्या घरात मी स्त्रीसह आनंदाने राहीन. हे वधू, माझ्या या कुलात तुझ्या मनाची आवड तुला होणाऱ्या संततीसह वाढीस लागो. गृहिणी या नात्याने या रास स्वकर्तव्याविषयी तू नेहमी जागृत राहा.' अशा अर्थाचे मंत्र आजही प्रसन्न-कारक वाटतात. याच पवित्र भावनेने उंबरठ्यावर ठेविलेले माप लवंडून

नववधू आत येते; वडील मंडळींना नमस्कार करते. गृहप्रवेशानंतर महालक्ष्मीचे पूजन आजही होते. घरी आलेल्या वधूचे नाव लक्ष्मीस शोभेल असेच आजही ठेविले जाते.

यानंतर भारतीय पद्धतीप्रमाणे गृहस्थाश्रम सुरू होतो.चार वर्ण, चार आश्रम या कल्पना आज कालबाह्य वाटत असल्या तरी पूर्वी आपल्या समाजात यांना फार मोठे स्थान होते. नाना प्रकारच्या नित्य व नैमित्यिक संस्कारांनी व कर्मांनी मानवी जीवित नियमितपणे विकसनशील राहिले. आजही अनेक ठिकाणी श्रावणात श्रावणी करून नवे यज्ञोपवीत धारण केले जाते. ब्रह्मचारी मुलांनी व गृहस्थाश्रमी पुरुषांनी करावयाचा हा मंत्रोच्चारपूर्वक विधी आहे. शरीरशुद्धीसाठी पंचगव्याचे ( दूध, तूप, दही, शेण व मूत्र ) प्राशन करणे, होमात दधिसत्तूच्या आहुती देणे, नवे जानवे धारण करणे, मृतपितरांना तिलोदक अर्पण करणे; असे महत्त्वाचे विधी या श्रावणीत आहेत. श्रावणी म्हणजे विद्यार्थ्यांच्या नव्या शैक्षणिक सत्रास प्रारंभच म्हणानात.

ाद्धपक्षाचे विधीही अजूनही कोठे कोठे चालू आहेत. गर्भधारणेपासून अंतकाळपर्यंत नाना विधींनी व संस्कारांनी आपले जीवन अजूनही पूर्वपरपरेच्या धाग्यादोऱ्यांत बद्ध झालेले आहे. मरणानंतरही शरीरावर करावयाचे संस्कार आपण आज पूर्वपरंपरेनुसार करतो. स्मशानामधील सर्व विधी व मंत्र वैदिक परंपरेतील आहेत दाहविधी, यमादिकांची प्रार्थना, जलांजलिदान, अस्थिसचय, पिंडप्रदान इत्यादि आजही होणाऱ्या विधींचे गांभीर्य समजावून घेण्यासारखे आहे. 'ज्ञान आणि धन देणाऱ्या हे जातवेद अग्ने ! तू जरी या जीवाच्या पंचभौतिक स्थूल देहाला जाळून टाकलेस तरी त्याच्या सूक्ष्म शरीराला, कीर्तीला जाळू नकोस.' अशी यमाची प्रार्थना गांभीर्याने समजावून घेण्यासारखी आहे. 'पृथ्वी शांत होवो, अंतरिक्षातील देवता आमचे कल्याण करोत, आम्हांस अभय प्राप्त होवो, जल आणि वीज आमचे सर्व बाजूंनी रक्षण करोत.' अशा अर्थाच्या मंत्रांनी गोळा केलेल्या अस्थी आपणांस भयप्रद कशा वाटतील ? अशा प्रसंगी कर्म करणारा दक्षिणेकडे तोंड करून बसतो; कारण दक्षिण दिशा यमाची आहे. एऱ्हवी ही दिशा आपण शुभकार्यास निषिद्ध मानतो. श्राद्धाच्या वेळचे विधी व मंत्र

समजावून घेण्यासारखे आहेत. याच दिवशी आपण पानांवर मीठ वाढीत नाही, उलटचा दिशेने राखेची वा भस्माची रांगोळी काढली जाते; या सर्व गोष्टी इतर दिवशी आपण अशुभ समजतो. यांतील पूर्वपरंपरेचा धागा समजावून घेण्यासारखा आहे.

असे आपले आजचे जीवन प्राचीन संस्कार व विधी यांनी आजही समृद्ध आहे. काही संस्कार लुप्त झाले, काहींच्यांत रूढींची भर पडली, तरी काही महत्त्वाच्या संस्कारांत चिरकाल टिकणारी तत्त्वे असल्यामुळे त्यांचा धागा अद्यापही बळकट आहे. ब्रह्मचारी बटूस केलेला 'सत्य वद। धर्म' चर।' असा उपदेश कोणत्याही कारणांमुळे शिळा होणार नाही. असा हा नित्य स्फुरणदायी व उपकारक उपदेश आहे.


'सत्य भाषण कर. धर्माप्रमाणे वाग. अध्ययनाविषयी प्रमाद करू नको. सत्याविषयी प्रमाद करू नको. धर्माविषयी प्रमाद करू नको. आपले कुशल व्हावे यासाठी कर्मे करण्याविषयी प्रमाद करू नको. भूतमात्रासाठी कर्माविषयी प्रमाद करू नको. स्वाध्याय व प्रवचन यांविषयी प्रमाद करू नको. देवकार्य व पितृकार्य यांविषयी प्रमाद करू नको मातेला देवाप्रमाणे समज. पित्याला देवाप्रमाणे समज. आचार्याला देवाप्रमाणे समज. अतिथीला देवाप्रमाणे समज. जी कर्मे निंद्य नाहीत त्यांचेच आचरण करावे; इतर कर्मांचे आचरण करू नये. आमची (गुरूंची) जी सत्कर्मे असतील, त्यांचेच तू आचरण करावेस; इतर कर्मांचे आचरण करूं नये. जे आमच्यांहून श्रेष्ठ ब्राह्मण असतील, त्यांना आसन देऊन त्यांच्या श्रमाचा परिहार करावा. जे काही द्यावयाचे ते श्रद्धेने द्यावे. अश्रद्धेने देऊ नये. मर्यादायुक्त, भीतियुक्त द्यावे. ओळख करून घेऊन द्यावे. ( अध्ययन पुरे झाल्यावर ) आचार्याला प्रिय असे धन देऊन गृहस्थाश्रमाचा उपभोग घे.' हा उपदेश कोणत्याही काळात शिळा होणारा नाही.

* * *

## १३ : अशी आपली प्रतीके

आजच्या या अणुयुगातही तुम्ही आपल्या घरात इतरत्र अशी जरा नजर टाका. तुम्हांस एखादा नटराजाचा पुतळा दिसेल, चित्र दिसेल. कमलासनस्थ लक्ष्मी दिसेल. अजिंठ्याचा पद्पाणी बुद्ध दिसेल. स्वस्तिक या नावाने सुरू होणाऱ्या एखाद्या कंपनीचे वा कारखान्याचे कॅलेंडर दिसेल. त्रिमूर्तीचा एखादा पुतळा तुमच्या नजरेस पडेल. रेघारेघांनी वा ठिपक्या ठिपक्यांनी सरस्वती काढून देण्याविषयी घरातील लहान मूल कधी तुमच्यापाशी हट्ट धरून बसेल. नटराज, कमल, स्वस्तिक, त्रिमूर्ती, सरस्वती, गजलक्ष्मी, कलश, शंख, घंटा या वस्तू दिसायला वस्तू असल्या तरी त्यांच्या रूपांनी आपणांस कित्येक शतकांच्या संस्कृतीचा अर्थ ध्यानात येतो. एखादी श्रेष्ठ व्यक्ती, एखादा श्रेष्ठ विचार प्रकट करणारे अथवा त्याची आठवण करून देणारे हे चिन्ह म्हणजे प्रतीक होय. प्रतीक म्हणजे चिन्ह, खूण होय. रोज नित्याच्या आपल्या वर्तनातही या प्रतीकांचा संबंध येतो. अतिपरिचयाने त्यांच्या पोटातील भावार्थ आपल्या नजरेत भरत नाही, पण जरा हळुवारपणे चौकशी करा की मग —

'ॐ' हे एक अक्षरच एका ग्रंथाची पाने भरतील एवढे तत्त्वज्ञान सांगेल. 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म'– ॐ हे एकाक्षरच ब्रह्म असल्याचे आपणांस समजून येईल. खरे म्हणजे हे एक अक्षर नव्हे. अ + उ + म् या तीन वर्णांचा समुदाय ॐमध्ये आहे. या ॐलाच ब्रह्म मानले आहे. याचेच स्वरूप प्रणवाचे



मानले जाते. गणेश ही देवता ॐकाररूपी असल्याची प्रसिद्धी आहे. ॐ म्हणजेच प्रत्यक्ष ईश्वर आहे. ॐ हा सच्चिदानंदाचा गाभा मानला गेला आहे. याच एकाक्षराची व्याप्ती सर्व विश्वाला भरून राहणारी आहे. ॐच्या जपाने मनास शांतता लाभते, वृत्ती स्थिर होतात. अंतरात्म्याशी ऐक्य पावून समाधान होते. म्हणून अनेक प्रार्थनांच्या प्रारंभी ॐचा उल्लेख असतो. अशा प्रकारे आपल्या प्राचीन संस्कृतीमधील तत्त्वाचा अथवा आत्मविचाराचा एक भक्कम धागा आपण या ॐच्या रूपाने घट्ट पकडून ठेविला आहे. याच ॐला 'प्रणव' अथवा 'उद्‌गीथ' असे नाव असून या दोनही शब्दांचा अर्थ उत्तम प्रकारची स्तुती असाच आहे. देवांनी असुरांचा पराभव करण्यासाठी उद्‌गीथाचा उपयोग केला होता आणि असुरांचा नाश केल्याची कथा पुराणांतून आहे. वाणी आणि प्राण या दांपत्याची मिळणी होऊन ॐकाराचा जन्म झाला असल्याचे मानतात. बृहस्पती अथवा बुद्धिदाता गणेश याचे ॐकार रूप वर्णन करताना ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे, 'अकार चरणयुगुल। उकार उदर विशाल। मकार महामंडळ। मस्तकाकारें' अशा रीतीने या ॐची महती आहे. 'ओंकारप्रभवा: देवा: ओंकारप्रभवा: स्वरा: ओंकारप्रभवं सर्वं त्रैलोक्यं सचराचरम्' असा महिमा उपनिषदांतून ॐकाराचा गाईलेला आहे.

नटराजाची पूजा आजही नृत्यनाटयाच्या प्रारंभी केली जाते. शिवतांडवांचे अनेक प्रकार सांगितले जातात. त्यातील एक 'नादन्त नृत्य' या नावाचे आहे. चिदंबरम् अथवा तिलईच्या रंगभूमीवर भगवान शंकरांनी हे नृत्य प्रथम केले तेव्हा ते नटराजाच्या स्वरूपात अवतीर्ण झाल्याची कथा आहे. वाममार्गी उपासकांना नीट मार्गावर आणण्यासाठी नटराजाचा आविर्भाव असल्याचेही सांगितले जाते. या नटराजाच्या अनेक सुंदर मूर्ती दक्षिण भारतात दिसतात. त्याच्या विशिष्ट तालबद्ध पवित्र्यामुळे त्याची कीर्ती कलाप्रांतात साऱ्या जगात पसरली आहे. दोनही पायांचे बांक, चारही हातांची विशिष्ट ठेवण, उजव्या पायाखालील 'मुयलक' नावाचा राक्षस, त्याच्या खालचे कमल; यासर्वांना नटराजाच्या कथेत अर्थ आहे. पाखंडी शाक्तांनी नटराजावर एक ठेंगू पुरुष, ढाण्या वाघ व एका फणीचा सर्प अशांचा मारा केला होता. उजव्या पायाखालील 'मुयलक' अथवा

अपस्मार म्हणजेच तो कुरूप असा ठेंगू दानव होय. याच्याच जवळ एक सर्प आहे कमलपीठिकेतून नटराजाभोवती एक प्रभावळ निर्माण झालेली दिसते. या प्रभावळीच्या विविध टोकांतून अग्नीच्या ज्वाळा निघतात नटराजाचे हे जणु संरक्षणकवचच. आपण आपल्या घरात नटराज पाहतो तेव्हा त्यामागील ही सारी कथा ध्यानात घ्यावयास हवी.

'त्रिमूर्ती' मधील ब्रह्मा, विष्णू, महेश यांचे दत्तात्रेयांच्या स्वरूपातील ऐक्य समन्वयाचा प्रयत्न सांगणारे आहे. कधी रुद्र, शिव आणि उमा यांच्या ऐक्याची 'त्रिमूर्ती' असू शकते. घारापुरी येथील प्रसिद्ध त्रिमूर्तींची प्रतीके तुम्ही अनेकदा पाहिली असतील. रुद्र म्हणजे रडविणारा, शिव म्हणजे शांत राहून शुभकल्याण करणारा,उमा सौंदर्यवती आहे.सौंदर्य, कोमलता, निर्मिती या स्थायी भावनांचे प्रतीक म्हणजे हे त्रिमूर्तींचे शिल्प होय. विद्या देणारी सरस्वती व धनसंपत्ती देणारी लक्ष्मी यांची किती तरी चित्रे, प्रतीके तुम्ही पाहिली असतील. आपली मुले सरस्वतीच्याच पूजनाने विद्येचा आरंभ करतात.पाटीवर सरस्वतीचे चित्र काढून आजही तिची पूजा करतात. या सरस्वतीच्या सामर्थ्याच्या कथाही आपल्या परंपरेत आहे. मयूर हे तिचे वाहन, तिच्या हातातील वीणा व पुस्तक, तिचे शुभ्र वस्त्र इत्यादींचे वर्णन 'याकुंदेन्दुतुषारहारधवला' या प्रसिद्ध श्लोकात दिसून येते.तिची बैठक पांढऱ्या कमळाची सांगितली आहे. शुभ्र हंस हेही तिचे वाहन सांगितले जाते. धनसंपदेचे प्रतीक लक्ष्मी हिचीही आपण पूजा करतो. घरात नव्याने आलेली पहिली सुनबाई हीस आपण लक्ष्मी याच अर्थाने मानतो. हिचेही आसन कमळाचे आहे. कमळ, अमृतपात्र, शंख, बेलफळ ही तिच्या हातांतील आयुधे होत. बेलवृक्षाचा आणि लक्ष्मीचा संबंध सांगणारी कथाही पुराणात सापडते. लक्ष्मीचा जन्म सागरापासून झाला. श्रीविष्णूची ही पत्नी झाली. या लक्ष्मीची धनसंपत्तीसाठी प्रार्थना आजही आपण मन लावून करतो. भारतीय परंपरेतील अनेक लेण्यांतून वा शिल्पांतून सरस्वती व लक्ष्मी या प्रतीकांचा आविष्कार झाला आहे.

आपण इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळविल्यानंतर आपली लोकसत्तात्मक अशी राज्यपद्धती ठरली. भारतीय सरकारचे राजचिन्ह अशोकाच्या स्तंभावरील चौमुखी सिंहाचे आहे. त्याच्याच खाली असणाऱ्या चक्राने आपल्या

राष्ट्रध्वजावर मान मिळविला आहे. अशोकाने बुद्धाच्या प्रेरणेने आपल्या स्तंभावर चित्रित केलेले धर्मचक्र आपल्या धर्मनिरपेक्ष संघराज्याचे राष्ट्रीय प्रतीक ठरावे हे एक नवलच म्हणावयास हवे. अशोकाच्याही पूर्वी भगवान बुद्धाने आपले पहिले धर्मप्रवचन सारनाथ येथील 'मृगदाव' या वनात केले. बौद्धपरंपरेत या प्रसंगास 'धर्मचक्रप्रवर्तन' असे नाव मिळून यास गती मिळावी म्हणून त्याचीच आठवण चक्ररूपाने शिल्लक राहिली. कालचक्र, सुदर्शनचक्र यांच्याही कथा आपल्या पुराणांतून मिळतील. योगातील षट्चक्रे, जैनांची सिद्धचक्रे ही सारी इतिहास व संस्कृती यांनी समृद्ध असलेली प्रतीकेच होत.

स्वस्तिक, कमळ, कलश ही अशीच संस्कृतिगर्भ प्रतीके परंपरेची महती सांगणारी आजही आपल्यासमोर आहेत. चांगले मंगलदायक, कल्याणकारक अस्तित्व असण्याची भावना स्वस्तिकात आहे. 'स्वस्ति न इंद्रो' या प्रसिद्ध वैदिक सूक्तात स्वस्तित्वाची वा स्वतिकाची कल्पना अभिप्रेत आहे. 'थोर कीर्तीचा इंद्र आमचे कल्याण करो, विश्वाचे ज्ञान असलेला पूषा आमचे कल्याण करो, अरिष्टनेमी तार्क्ष्य आमचे मंगल करो, बृहस्पती आमच्या ठिकाणी कल्याणाची भावना दृढ करो' अशी प्रार्थना आपण कोणत्याही मंगल प्रसंगी करीत असतो. आजही आपल्या घरासमोर रांगोळीने आपण स्वस्तिक काढतो. वधूवरांमधील अंतरपाटाच्या मध्यभागी आपण अजूनही स्वस्तिक काढतो. अशा या स्वस्तिभावनेत विकास, शोभा, मांगल्य, कल्याण, सौंदर्य यांची एकरूपता आढळते. या महत्त्वाच्या प्रतीकामधील उभी रेखा ही ज्योतिर्लिंगाची प्रतिनिधी व आडवी रेखा सृष्टीच्या विस्ताराची प्रतिनिधी मानण्यात आली आहे. ख्रिस्ती धर्माचा क्रॉस आपल्या या मूळ स्वस्तिकाच्या कल्पनेसारखा असून त्याही पाठीमागे एखादी कथा आहेच. स्वस्तिकाच्या रेषा डाव्या वा उजव्या बाजूस वळतात त्याप्रमाणे डावे व उजवे असे त्याचे दोन प्रकार होतात. डाव्या भुजांचे स्वस्तिक नारीतत्त्वाचे प्रतीक मानले आहे. उजव्या भुजांचे स्वस्तिक गणेशाचे प्रतीक मानले जाते. या स्वस्तिकाच्या प्रतीकाचाही अर्थ विश्वोत्पत्तीच्या संदर्भात सांगितला जातो. जैन व बौद्ध धर्मीयांनाही स्वस्तिक पूज्य वाटते. इतकेच नव्हे तर आर्यत्वाच्या अभिमानामुळे हिटलरनेही स्वस्तिकाचे मानचिन्ह स्वीकारले होते.

मांगल्य, सौंदर्य, तेज, कोमलता यांचे प्रतीक म्हणजे आपले कमळ. कमलासारखे डोळे कमलासारखे पाय ही भाषा आजही आपण वापरतो. उपासमारीने हैराण झालेल्या एका व्याधदंपतीने आपल्याजवळील कमळे एका वारांगनेस फुकट दिली. त्यांच्या या औदार्यावर श्रीविष्णू प्रसन्न झाले आणि त्यांनी त्यांचे दारिद्र्य दूर केले; अशी कथा आढळते. कमल विष्णूला व लक्ष्मीला प्रिय. विष्णूच्या नाभिकमळातूनच ब्रह्मदेवाची आसनपद्धती असल्याचे आपणांस माहीत आहेच. आपल्या पुराणांतून कमलाची प्रशस्ती आहे. चैत्र शु. ७ स कमलसप्तमी असे नाव असून सुवर्णाच्या कमलावर सूर्याची प्रतिमा काढून त्याचे दान करायचे असते. सूर्य हाही कमलापतीच मानला गेला आहे. त्याच्याच स्पर्शाने कमल फुलते. हाच सूर्य पुढे विष्णुरूपाने ओळखला जाऊ लागला. या विष्णूची आयुधे शंख, चक्र, गदा व पद्म अशीच झाली. शंख हे ज्ञानाचे प्रतीक, भगवान विष्णूने ध्रुवबाळाच्या गालास शंखाचा स्पर्श करून त्याला ज्ञानसंपन्न केले. गदा दुष्टांचा संहार करण्यासाठी वापरली जाते म्हणून ती दुर्जनसंहाराचे प्रतीक मानली गेली आहे. कमलाविषयी आणखीही काही कथा आपणांस मिळतील,

कलशाची पूजा आपण प्रत्येक धार्मिक विधीच्या प्रारंभी आजही करतो. आपल्या शुभकार्याच्या आरंभीचे पुण्याहवाचनाचा विधी कलशाच्या पूजेने होत असतो. कलशाच्या मुखात विष्णू व कंठात रुद्र असल्याची भावना आपली आहे. या लहानशा कलशात सप्त सागर, सप्त सरिता, सप्तद्वीपा धरित्री, चार वेद, गायत्री, व सावित्री इत्यादींना एकत्र करून त्यांना मांगल्यासाठी आवाहन असते. वास्तुशास्त्रातही कलश अथवा कळस महत्त्वाचा आहे. कळसउभारणी म्हणजे शुभकार्याची सांगता होय अशी आपली कल्पना आहे. एखादे चांगले कार्य यथासांग झाले की अगदी कळस झाला असे आपण म्हणतो. भागवतधर्माच्या मराठी इमारतीवर ‘तुका झालासे कळस’ असे बहिणाबाई म्हणते तेव्हा तिच्या उद्‌गारातील भावार्थ तरी हाच आहे.

वटवृक्ष, बिल्ववृक्ष, तुळस, पिंपळ, बोधिवृक्ष असे काही वृक्ष व वनस्पतीही आपण प्रतीकासाठी मानल्या आहेत. आणखीही अनेक वस्तू आपण प्रतीकात्मक मानतो. मंदिरातील कासव हे संकोचून अवयव चोर-

णारे व आपल्या पिलांचे प्रेमदृष्टीने दूरूनच रक्षण करणारे म्हणून आपणांस पूर्वीपासून माहीत आहे. संयमाचा धडा शिकविणारे हे प्रतीक. राष्ट्रांची, राज्यांची मानचिन्हे ही प्रतीकात्मक असून जुनी परंपरा दाखविणारी असतात. उद्योगधंद्यांचे ट्रेडमार्क प्रतीकात्मकच असतात. आपली प्राचीन संस्कृती व परंपरा यांचे दर्शन घडविणाऱ्या अनेक प्रतीकांचा त्यांच्या अर्थांसहित शोध घेणे मोठे मनोरंजक काम आहे.

प्रतीके ही कधी निर्जीव नसतात. या प्रतीकांच्या मागे हजारो वर्षांचा इतिहास आहे. अनेक चांगल्या, अभिमानास्पद व गौरवशाली घटनांची नोंद प्रतीके करतात. निशाण हे राष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असल्यानेच त्याचा मान राखण्यासाठी अनेक वीरपुरुष प्राणांचेही बलिदान करतात. 'पाहे पां ध्वजेचें चिरगूट। राया जतन करितां कष्ट' या एका चांगल्या अभंगात ज्ञानेश्वर महाराज चिरगुटापासून बनलेल्या निशाणाचे, म्हणजे एका प्रतीकाचेच माहात्म्य सांगताना दिसतात. मराठ्यांचा भगवा झेंडा काय किंवा आपले राष्ट्रीय निशाण काय, त्याच्या फडफडण्यातून शेकडो बलिदानांच्या कथा साकार होतील. सुवासिनीच्या कपाळावरील कुंकवाची टिकली, गळ्यातील मंगलसूत्र, हातातील बांगडी, अनेक भावार्थांची कहाणी सांगणारी ही प्रतीकेच. पुरुषांच्या कपाळावरील उभे वा आडवे गंधही त्यांच्या धर्मपंथाची आठवण करून देणारे आहे. अशोकवनातील सीतेपुढे जेव्हा प्रभुरामरायाची आंगठी आली असेल तेव्हा तिने कितीतरी करुणरम्य हकीकती सीतेस सांगितल्या असतील. उलट 'राम' नसलेला रत्नहार हनुमंतास कस्पटासमान वाटला. विष्णू, शिव, ब्रह्मा, दत्तात्रेय यांची आयुधे व यांच्या परिसरातील वस्तू म्हणजे प्रतीकेच असून प्रत्येक प्रतीक आपली कथा अर्थांसहित सांगण्यास उत्सुक आहे. भरताने रामाच्या पादुका सिंहासनावर ठेविल्या यातील मर्म ध्यानात घेण्यासारखे आहे.

एखादा शुचिर्भूत ब्राह्मण डोळ्यांसमोर आणा. कपाळावर, दंडावर भस्माचे पट्टे दिसतील. गळ्यात रुद्राक्षांची माळ दिसेल. भस्माचे पट्टे आणि रुद्राक्षांची माळ हीच केवळ शुचिर्भूतपणाची लक्षणे नसली तरी अंगावर चर्चिलेले भस्म अनेक कथा सांगून जाणारे आहे. वैराग्य, सात्त्विकवृत्ती यांचे प्रतीक म्हणजे भस्म असून गुरुचरित्रात याची महती सांगणारा

अध्याय आहे. वामदेव नावाचा कोणी एक योगी, ब्रह्मज्ञानी व विरागी असा सत्पुरुष सर्वांगाला भस्म लावून क्रौंचारण्यात आला, आणि नरभक्षक राक्षसांच्या तावडीत सापडला, त्या वामदेवास स्पर्श करिताच त्याच्या अंगाचे भस्म ब्रह्मराक्षसाच्या अंगाला लागून त्याचे पूर्वीचे पाप नष्ट झाले. वामदेवाने त्याला भस्ममाहात्म्य सांगताना एक कथा सांगितली. द्रविड देशात एक आचारविहीन आणि तस्करवृत्तीने राहणारा ब्राह्मण होता. एकदा चोरी करताना त्याने एका शूद्राला ठार केले आणि त्याचे प्रेत गावाबाहेर टाकून दिले. त्यावेळी एक कुत्रे सहज भस्माच्या ढिगाऱ्यावर बसले होते. ते त्या प्रेताचे लचके तोडण्यास गेले तेव्हा त्याच्या अंगाचे भस्म प्रेतास लागले. या भस्मधारणेमुळे ते प्रेत यमपुरीस न जाता कैलासास गेले. मग हे भस्मधारण करणारे कोण कोण होते, भस्म मंत्रित करण्याचा विधी कोणता, भस्माचे सामर्थ्य कोणते इत्यादि माहिती वामदेवाने ब्रह्मराक्षसास दिली व त्याचे शरीर भस्मधारणेने सुंदर आणि तेजस्वी करून दिले.

रुद्राक्ष अथवा त्यांची माळ यांचीही प्रतीके अनेक रहस्यांचा शोध घेणारी आहेत. रुद्राक्षांच्या माळेमुळे हृदयविकार होत नाही अशी एक समजूत असून याविषयी संशोधन चालू आहे. मोठ्या भक्तीने रुद्राक्षाची कुंडले कानांतही घालतात. या रुद्राक्षाच्या माहात्म्याचीही एक कथा आहे. काश्मीर देशाचा राजा भद्रसेन व त्याच्या मुलाचे नाव सुधर्म. राजाच्या मंत्रीसुताचे नाव तारक. दोघेही एकमेकांचे मित्र व शिवभक्त होते. त्यांच्या गळ्यात रुद्राक्षांची माळ असे. एकदा पराशर ऋषीने या दोन पुत्रांची हकीकत राजास निवेदन केली. नंदी नावाच्या नगरीत एक सुंदर व श्रीमंत वेश्या रहात होती. तिच्याकडे नेहमी नृत्य व गायन होई. तिच्या दारात तिने एक कोंबडा व एक माकड पाळली होती. त्यांची नावे सदाशिव असून त्यांच्या गळ्यात रुद्राक्ष बांधले होते. या वेश्येच्या घरी एक मोठा धनिक भस्मचर्चित व रुद्राक्षमाळ गळ्यात घालणारा असा आला. काही अटीवर या धनिक वैश्याने आपल्या हातांतील शिवलिंग तिच्याजवळ दिले होते, ते तिने आपल्या नाट्यमंडपातील खांबावर अडकवून ठेवले. मंडपास एकाएकी आग लागली. तीत शिवलिंग व मार्कट व कुक्कुट यांची जोडी

जळून गेली. वैश्य या प्रकारने घाबरला व प्राण देण्यास तयार झाला. ती वेश्याही पत्नीधर्मास अनुसरून सती जाण्यास तयार झाली. अग्नि-कुंडात उडी टाकता क्षणीच भगवान सदाशिव प्रकट झाले. तेच वैश्यरूपाने आले होते. पराशरांनी सांगितले नाट्यमंडपात दग्ध झालेला मर्कटराजा भद्रसेनच्या उदरी आला व कुक्कुट मंत्र्याच्या पोटी आला. पूर्वजन्मी अज्ञानामुळे का होईना रुद्राक्ष धारणेमुळे यांची अशी प्रवृत्ती झाली. मग या मुलांच्या अल्पायुष्याची चर्चा ऋषीने केली. रुद्राभिषेकाच्या तीर्थसिंचनान त्याच्या प्राणाचे रक्षण झाले. शिवदूतांनी यमदूतांस मागे फिरविले. असा हा रुद्राक्षाचा व रुद्राभिषेकाचा महिमा.

पिंपळ, वड, तुळस, बेल इत्यादि वृक्षही आपणांस संस्कृतीच्या काही कथा सांगतील. दत्तात्रेयांना औदुंबराची छाया प्रिय आहे. या औदुंबराचे वा उंबराचे माहात्म्य वाढले त्याचे कारण असे. हिरण्यकशिपूच्या वधासाठी भगवंताने नृसिंहाचा अवतार घेतला. वधानंतर त्या दैत्याच्या पोटातील विषामुळे नृसिंहाच्या हाताच्या बोटांचा दाह होऊ लागला. हा दाह कमी होण्यासाठी नृसिंहाने औदुंबर वृक्षाची फळे खाल्ली तेव्हा त्याला आराम वाटला. तेव्हापासून औदुंबर वृक्षास कल्पवृक्षाचा महिमा प्राप्त होऊन दत्तोपासकांना तो प्रिय झाला. या वृक्षाखाली दत्तगुरूंचे निवासस्थान असते अशी कित्येकांची श्रद्धा आहे. दत्तोपासकांचे एक क्षेत्र औदुंबर या या नावानेच प्रसिद्ध आहे.

* * *

# १४ : भूपाळी ते शुभं करोति

सकाळी उठल्यापासून ते रात्री बिछान्यावर अंग टाकून झोपण्या-पर्यंतचा आजचा एकाद्या सर्वसामान्य कुटुंबाचा दिनक्रम साधारणपणे पाहावा. प्राचीन परंपरांच्या अनेक धाग्यादोऱ्यांनी आजचे आपले दैनिक आचारविचार बद्ध झालेले दिसतील. एकाच घरात एकाच वेळी वावर-णाऱ्या जुन्यानव्या पिढ्यांत थोडा फरक दिसेल तेवढाच ! घरात जुन्या पिढीतली आजी, आजोबा असतील तर ते पहाटे लौकर उठून स्वतः मागच्या व पुढच्या दारापुढली झाडलोट करतील. सडा टाकतील. घरा-तील प्रमुख स्त्री सुरेखशी रांगोळी काढेल. 'उठा उठा हो ! वेगेंसी चला जाऊं पंढरीसी' अशी एखादी भूप रागातील ओळ भूपाळीच्या स्वरूपात कानांवर येईल. 'घनश्याम सुंदरा ! श्रीधरा अरुणोदय झाला' ही होनाजी बाळाची भूपाळी अमर होऊन बसली आहे. 'उठा उठा हो सकळिक। वाचें स्मरा गजमुख', 'उठोनियां प्रातःकाळीं। जपा रामनामावळी,' 'जागिये रघुनाथकुंवर', 'जागरे जाग बापा' अथवा 'उठि गोपालजी ! जाई धेनू-कडे' अशा प्रसिद्ध भूपाळ्यांच्या चरणांमधून देवाला, स्वतःच्या हृदयातील परमेश्वराला जागे करण्याचा उपक्रम आजही अनेक घरांत दिसून येईल. राम, कृष्ण, संत, गंगा, विठ्ठल यांच्या स्मरणाने दिवस सुरू व्हावा अशी योजना असे. दिवसाचा पहिला प्रहर हा 'रामप्रहर' असे. अजूनही मंदिरां-तून काकडआरती होत असते. 'उठा उठा हो साधक, साधा आ पुलालें हित,



भक्तीचिये पोटीं बोध-काकडा ज्योती,' 'उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळा'; अशा काकडआरतींच्या चरणांनी पहाटेचे वातावरण प्रसन्न होऊन गेलेले असते.

आजही उजाडताच आपल्या घरातील रेडिओवर प्रभातवंदन असते. नव्या येणाऱ्या दिवसाचे स्वागत सनईच्या मंगल स्वरांनी होत असते. रोजची तिथी भारतीय शकाप्रमाणेही सांगितली जाते. जसा वार असेल त्या प्रमाणे शिवशंकराचे, देवीचे, दत्ताचे अभंग सुरेल स्वरांत ऐकविले जातात. विशेष दिवशी भूपाळच्या, पदे, आरत्या, अष्टके यांचीही योजना असते. ज्ञानेश्वरांचा, एकनाथांचा, तुकोबांचा, मीराबाईचा एखादा गोड अभंग मन उन्नत करून जातो. सुब्बलक्ष्मीचे व्यंकटेशस्तोत्र मन प्रसन्न करते. याच सुमारास लहान मुले जागी होतात. अवखळपणा वाढलेला असला, बेशिस्त जास्त असली तरी कित्येक घरांत अजून उठल्याबरोबर 'कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती। करमूले तु गोविंदः प्रभाते करदर्शनम्' अशा श्लोकाने करदर्शनाचा विधी आपोआप होतो. लक्ष्मी, सरस्वती, गोविंद यांच्या स्मरणाने व दर्शनाने आपला दिवस सुरू होतो. भूमीवर आपण पाय देतो, झोपतो, घाणेरडे पदार्थ टाकतो. पण ती क्षमाशील धरत्रीमाता रागावत नाही. तिच्याबद्दलही आपल्या मनात कृतज्ञतेची भावना आहे. तिलाही वंदन करून आपण म्हणत असतो, 'समुद्रवसने देवि पर्वतस्तनमण्डलं। विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे' यानंतर लहान मुलांचे मुखमार्जन होते. मग देवापाशी जाऊन मुले म्हणतात, 'वक्रतुण्ड महाकाय कोटिसूर्यसमप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा'. अशा रीतीने प्रभातकाळची सुरुवात परमेश्वराच्या स्मरणाने, पारंपारिक स्तोत्रपठणाने होते. 'गणनाथसरस्वतीरविशुक्रबृहस्पतीन्' अशा पाच दैवतांचे स्मरण केले जाते. 'शान्ताकारं भुजगशयनं पद्नाभं सुरेशम्' या श्लोकामधून श्रीविष्णूचे स्तवन होते. 'मूकं करोति वाचालं' अथवा 'गुरुर्ब्रह्मा गुर्रुविष्णुः' अथवा 'ब्रह्मानंदं परमसुखदं' अशा श्लोकांनी पूर्वपरंपरेतील थोर विभूतींचे स्मरण केले जाते. पुण्यश्लोक अशा नळराजा, युधिष्ठिर इत्यादि थोर राजांचे स्मरण करण्यात येते. कर्कोटक नाग, दमयंती, नल, राजा ऋतुपर्ण, अश्वत्थामा, बळी, हनुमान, बिभीषण, कृप, परशुराम इत्यादींची स्मृती रोज सकाळी करावी

असा रिवाज आहे. अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी या पंचकन्यांचें स्मरण करून अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका या मोक्ष-दायिका पुरींचे स्मरण केले जाते. भारताची सांस्कृतिक एकता या प्रातः-स्मरणातून आजही राखली जाते. 'आदौ रामतपोवनादिगमनम्' या एका श्लोकातील रामायण, 'आदौ देवकिदेविगर्भजननम्' या एका श्लोकामधील भागवत स्मरणात आले की मग आचरण फारसे बिघडू नये अशी कल्पना असावी. 'उत्तिष्ठोत्तिष्ठ गोविन्द उत्तिष्ठ गरूडध्वज। उत्तिष्ठ कमलाकान्त त्रैलोक्यं मंगलं कुरु' या श्लोकात सांगितल्याप्रमाणे साऱ्या जगाच्या मांगल्या-चिंतनाने दिवस सुरू होत असतो.

मग स्नाने होतात. जशी सवड असेल तितक्या वेळात देवपूजा उर-कली जाते. स्नान करतांना 'गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति' म्हणून आपल्या हातून कळत न कळत झालेल्या पापापासून मुक्त करण्यासाठी गंगेची प्रार्थना आपण करतो. 'मातः शैलसुतासपत्नि वसुधाशृंगारहारावलिः'-सारखे एखादे गंगाष्टकही म्हटले जाते. लहान मुलांना सूर्यनमस्कारांची आवड असते. सूर्य ही शक्तिबुद्धी देणारी देवता यावेळी स्तविली जाते. 'ध्येयः सदा सवितृमंडलमध्यवर्ती' अशा प्रारंभाने ॐ मित्राय नमः, ॐ रवये नमः, ॐ सूर्याय नमः, ॐ भानवे नमः, ॐ खगाय नमः अशा सूर्याच्या बारा नावांनी बारा नमस्कार घातले जातात. नमस्कार पूर्ण झाल्यानंतर 'आदि-तस्य नमस्कारान् ये कुर्वन्ति दिने दिने। जन्मान्तरसहस्रेषु दारिद्रयं नोप-जायते॥ अकाल मृत्युहरणं सर्वव्याधिविनाशनम्। सूर्यपादोदकं तीर्थं जठरे धारयाम्यहम्' या श्लोकाचा उच्चार करून सूर्यदेवाचे तीर्थ घेण्याची प्रथा आजही आहे.

सूर्यनमस्कार मुले घालीत असतात, तर घरातील वडील मनुष्य देवाच्या पूजेत गुंतलेला असतो. गतिमान जीवनातही गंध, फूल, अक्षदा, धूपदीप एवढेतरी उपचार आज होतात. पूजा खरे म्हणजे आवाहन, आसन, पाद्य (पाय धुण्यासाठी पाणी) अर्घ्य (हात धुण्यास पाणी) आचमन, स्नान वस्त्रोपवस्त्र, यज्ञोपवीत, गंध, पुष्प, धूप, दीप, नैवेद्य, नमस्कार, प्रदक्षिणा, मंत्रपुष्पांजली अशा सोळा उपचारांनी करावयाची असते. परतु नव्या धाव-पळीच्या काळात नमस्कार, गंध, फूल, धूप इतके तरी टिकलेले दिसते.

घरात धार्मिक वातावरण टिकून असले तर तिलक व भस्मधारण, संध्या इत्यादि नित्यकर्मेही होतात. निदान संध्येतील ॐ केशवाय नमः, ॐ नारायणाय नमः, ॐ माधवाय नमः, ॐ गोविंदाय नमः अशी श्रीविष्णूची चोवीस नावे तरी माहीत असतात. अजूनही कित्येक चांगल्या घरांतून 'ॐ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि' असा गायत्रीमंत्र म्हटला जातो. तेजस्वी सूर्य आपल्या बुद्धीस प्रेरणा देतो, म्हणून त्याचे ध्यान या गायत्रीमंत्राने करावयाचे असते. पाणी, तेज, रस, अमृत, भूः इत्यादि लोक ब्रह्मस्वरूप असल्याची जाणीव या मंत्रात आहे.

एखाद्या दिवशी घरात काही विशेष असेल तर मग उपाध्याय बोलावून पूजा यथासांग होते. 'श्रीमन्महागणाधिपतये नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीगुरुभ्यो नमः। वेदाय नमः। वेदपुरुषाय नमः। इष्टदेवताभ्यो नमः। कुलदवताभ्यो नमः' अशा स्वरूपात देवदेवतांना वंदन केले जाते. आपण कोठे वावरत आहोत, कोणत्या काळात आहोत. चंद्रसूर्यांचे स्थान कोठे आहे यांचाही उच्चार पूजेच्या संकल्पात होत असताना दिसतो. 'श्रीमद्भगवतो महापुरुषस्य विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य अद्य ब्रह्मणोः द्वितीये परार्धे विष्णुपदे श्रीश्वेतावराहकल्पे वैवस्वतमन्वन्तरे भरतवर्षे भरतखंडे जंबुद्वीपे दंडकारण्ये गोदावर्याः दक्षिणेतीरे कलियुगे प्रथमचरणे...' अशा स्थलकालाच्या उच्चाराने सुरू झालेले धार्मिक विधी आपणांस आजही अनेक ठिकाणी दिसतील. संकल्पाच्या मंत्रांतून सारा सांस्कृतिक इतिहास जणू सजीव होऊन आपल्या समोर उभा राहतो. गणपतिवंदन, आसन व वातावरणशुद्धी, षडंगन्यास, कलशपूजा, शंखपूजा, घंटापूजा, दीपपूजा, मंडपपूजा, प्रोक्षण, ध्यानमंत्र, पंचामृतस्नान, वस्त्र, चंदन, सौभाग्यद्रव्य, परिमलद्रव्य, धूप, दीप, नैवेद्य, महानैवेद्य, पंचारती, प्रदक्षिणा, नमस्कार, मंत्रपुष्प इत्यादींच्या समर्पणाचा थाट आजही दिसतो. 'कलशस्य मुखे विष्णुः,' 'आगमार्थं तु देवानां,' 'भो दीप ब्रह्मरूपस्त्वं,' 'अपवित्रः पवित्रो वा,' 'नमो देव्यै. महादेव्यै,' ॐ सहस्रशीर्षापुरुषः' 'पयो दधि घृतं चैव,' ॐ आपो हिष्ठा मयोभुवस्ता' 'श्रीखंडं चंदनं दिव्यं,' 'हरिद्रा स्वर्णवर्णाभा,' 'माल्यादीनि सुगंधीनि,'अशा अनेक मंत्रार्थांनी पूर्वपरंपरा जागृतकेलेलीअसते.

आजचे आपले नित्याचे दैनिक आचारविचार परंपरागत धर्माशी

निगडित आहेत. प्रातःस्मरण, स्नान, संध्या, पूजा, प्रार्थना, यांप्रमाणेच भोजन घेण्याचीही एक पद्धत ठरून गेली आहे. अग्निपूजा अथवा वैश्वदेव आणि काकबली वा गोग्रास या प्रथा आज फारशा दिसत नसल्या तरी हे शब्दही संस्कृतीचे दर्शन घडवून जातात. ज्या अग्नीच्या कृपेने आजचे अन्न शिजले त्याची पूजा करून त्याला अन्नाच्या आहुती देण्याची प्रथा होती. या वैश्वदेवाचे मंत्रही ठराविक असत. अग्नी, वायू, सूर्य, प्रजापती या चारांना तरी आहुती दिली जाई. गाईसाठी घास काढून ठेविला जात असे. कावळ्यांसाठी 'काकबली' देण्यांची वहिवाट होती. कोणी अतिथी पाहुणा येतो की काय हे क्षणभर पाहून मग भोजनास बसण्यांची प्रथा होती. भोजनाचा प्रारंभही धार्मिक मंत्रांनी होई. आज शहरांतून टेबले आली असली तरी अजून अनेक ठिकाणी या जुन्या प्रथा शिल्लक आहेत. तुलसीपत्राने पाने प्रोक्षण करून अन्नसंतर्पण केले जाते. सारे भगवंतासाठी, ब्रह्मासाठी अशी भावना यात आहे. अन्नशुद्धी, पात्रप्रोक्षण, संतर्पण, संकल्प अशा पद्धतीने भोजनास सुरुवात होत असे. आपल्या धर्मशास्त्राप्रमाणे भोजन हा विधी एक यज्ञकर्माप्रमाणे आहे, उदरभरण अथवा जिव्हापोषणच फक्त नाही. 'अन्नपते, ईश्वरा, आम्हांला निरोगी व आरोग्यकारक, पराक्रमदायक व पुष्टिकारक अन्न द्या' अशी प्रार्थना असे. चित्राहुती घातल्या जात असत. प्रथम पंचप्राणांना आहुती देऊन मग भोजनास सुरुवात होई. आणि हे भोजन घेणारा दुसराच कोणी श्रेष्ठ आहे अशी भावना असे. 'अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः । प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम्'– मी वैश्वानररूप अग्नी होऊन प्राण्यांच्या देहात राहिलो असून प्राण व अपान यांनी युक्त होऊन, भक्ष्य, चोष्य, लेह्य व पेय असे चार प्रकारचे अन्न पचन करतो, अशी भगवंताच्या मुखातील ग्वाही या ठिकाणी स्मरायची असते. 'वदनि कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें' अशासारखे श्लोकही हीच पारंपारिक वृत्ती दाखवितात. 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' या भावनेने वा श्रद्धेने भोजनाचा कार्यक्रम आपला होत असे.आजही अनेक ठिकाणी मोठी पंगत बसली की, 'जनीं भोजनीं नाम वाचें वदावे,' 'मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें,' 'सदासर्वदा योग तूझा घडावा' यांसारखे श्लोक म्हटले जातात.

आपला भारतीय समाज अनेक जातिजमातींचा बनलेला आहे. जातिजमातींमधील उच्चनीचता कमी करण्याचे प्रयत्न होत आहेत. पण मनुष्य कोठल्याही जातीमधील असला तरी तो उठल्याबरोबर उगवत्या सूर्यनारायणाला वंदन करतो. त्याच्या घरात कोठला ना कोठला तरी देव असतो. अघोळ केल्यावर त्याला तो मनोभावे पाणी घालतो. गंध, अक्षदा, फूल वाहतो. माळकरी असेल तर चारदोन ज्ञानेश्वरीच्या ओव्या वाचतो, चारदोन अभंग म्हणतो. हरिपाठात रंगून जातो. तुळशींला पाणी घालतो. गोपीचंदनाचे टिळे लावतो. चारही दिशांना वर आकाशाकडे पाहून तो नमस्कार करतो. सोमवारी शिवलीलामृताचा अध्याय वाचील, गुरुवारी बावनश्लोकी गुरुचरित्र वाचील, शनिवारी शनिमाहात्म्य श्रद्धेने वाचील. कामास जाता येता शंकराचे, देवीचे, मारुतीचे, गणपतीचे, कृष्णाचे देऊळ लागले की मनोभावे दर्शन घेईल; प्रार्थना करील. अंगारा कपाळाला लावील, घरच्या मुलाबाळासाठी पुडीत तो बांधून घेईल, प्रसाद भक्षण करील. त्याच्या अंगवळणी पडलेले हे रोजचे वर्तन फार जुन्या काळापासून चालत आलेले आहे. आजोबा करीत होते, वडील करीत होते, आपणही केले पाहिजे अशी त्याची भावना आहे.

आज बायका पुष्कळ शिकल्या. नोकरी करू लागल्या; त्यांची श्रद्धा पूर्वीइतकी राहिली नसली तरी घरात मुलांना वळण लागावे म्हणून त्या परंपरा सांभाळताना दिसतील. घाईगर्दीत असणाऱ्या पुरुषास वेळ होत नाही म्हणून घरची पूजा स्त्रीच करीत असताना आज दिसते. तिला मंत्रतंत्र येत नसेल; पण देवघर स्वच्छ ठेवावे, देव लख्ख असावेत, विशेष प्रसंगी देवघरात आरास करावी, घरातील परंपरा व कुलाचार मुलांना माहीत व्हावा, त्यांना नीट वळण लागावे, यासाठी ती तत्पर असते. धर्म-परंपरेशी निगडित असणाऱ्या चालीरीतींना ती जपत असते. चातुर्मास्या-तील व्रतेवैकल्ये ती अजूनही करते. हरतालिका, मंगलागौर, वटपौर्णिमा, मकरसंक्रांत इत्यादि विशेष दिवशी तर ती पूर्णतः धार्मिक बनते. मुलांची प्रकृती थोडी जरी बिघडली तरी तिला कुळधर्मात आपण चुकलो नाही ना? पुरणावरणाचा नैवेद्य राहिला नाही ना ? अशी तिला शंका येऊन जाते. मग विश्वास वाढू लागतो. उपाध्यायास ती बोलावून घेते आणि उरलेले

ग्रंथ संग्रहालय, ... क्रमांक ९००९० ... दि: १७ 2220 ... नों: दि: २४।३।६३


सारे यथासांग करते. देवासमोर नाक घासते. नवससुद्धा करते. यजमानांच्या प्रतिष्ठेत वा अर्थसाधनेत बिघाड झाला की घरची स्त्री अधिक धार्मिक बनते. मुलांना शिकवण न विसरता देते. स्वतः रोज पोथीपुराण वाचते किंवा शक्य झाल्यास ऐकते. रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप, भक्तलीलामृत, संतलीलामृत, रामायण, महाभारत, इत्यादि ग्रंथांपासून कहाण्या व लोकगीतांपर्यंत तिची आवड वाढत राहते.

घरातील पारंपारिक व धार्मिक वातावरण जिवंत राखण्यात स्त्रीनेच मोठे साह्य केलेले दिसून येईल. मुले शाळेतून आली की, त्यांनी हातपाय धुवावेत, थोडे खेळावे, पण अंधार झाला की घरी यावे. देवापाशी बसावे दिव्याला पाहून नमस्कार करावा. 'शुभं करोति कल्याणं आरोग्यं धनसंपदा' अशी प्रार्थना करावी, अशी तिची अपेक्षा आजही आहे. आजही पुष्कळ घरी रामरक्षा स्तोत्र मनोभावे म्हटले जाते. द्वादश ज्योतिर्लिंगांचे श्लोक, नवग्रहस्तोत्र, तुलसीस्तोत्र, भीमरूपीस्तोत्र, संकष्टनाशनस्तोत्र इत्यादींचे पठण आजही रोज घरोघरी होत आहे. गणपतिअथर्वशीर्ष, चर्पटपंजरिका, पांडवगीता, व्यंकटेशस्तोत्र, शिवस्तुस्ती, करुणाष्टके, केकावली इत्यादींचे पठण रोज होत असते. वार पाहून देवादिकांच्या आरत्या आजही घरोघरी म्हटल्या जात आहेत. पदे, अष्टके, अभंग, भजन, श्लोक इत्यादींच्या मदतीने आजही प्राचीन परंपरेचा धागा सांभाळला जात आहे. 'आता विश्वात्मकें देवे' हे श्रीज्ञानेश्वरांचे पसायदान आजही घरोघरी म्हटले जाते. गीतेचा एखादा तरी अध्याय आपल्या मुलाला पाठ असावा अशी पालकांची इच्छा असते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादि संतांची अमृतवाणी आजही या नाही त्या निमित्ताने मुलांच्या कानांवर रोज जात असते. संध्याकाळी देवाची आरती मुलांना बरोबर घेऊन केली जाते. गणपती, देवी, शंकर, विठोबा या देवदैवतांच्या आरत्या वार पाहून आजही म्हटल्या जातात. ज्ञानदेव, तुकाराम यांच्या आरत्या रोज म्हटल्या जाताना दिसतात. 'करोनि आरती। चक्रपाणी ओवाळती' हा तुकोबांचा अभंग म्हटला जातो. 'घालिन लोटांगण वंदिन चरण' या नामदेवांच्या अभंगाने ईश्वरास प्रेमाने आलिंगन देण्याची मनोवृत्ती आजही प्रकटली जाते. 'त्वमेव माता च पिता त्वमेव,' 'कायेन

वाचा मनसैन्द्रियैर्वा,' 'अच्युतं केशवं रामनारायणम्,' 'हरे राम हरे राम राम राम हरे हरे,' 'पुंडलीकावरदा हरि विठ्ठल । ज्ञानदेव तुकाराम' अशा वाक्पुष्पांनी संपत आलेली आरती घरोघर आजही दिसून येते. निरनिराळ्या वारांची भजने आजही म्हटली जातात. आपले रोजचे जीवनही या प्रकारे पारंपारिक धर्मभावनेने भारावलेले आहे. सकाळच्या भूपाळीपासून रात्री अंथरुणाला पाठ लावताना 'आस्तिक आस्तिक काळभैरव' म्हणेपर्यंत आपल्या जीविताचे धागेदोरे प्राचीन संस्कृतीशी जुळलेले दिसतात.

* * *

१८०१८

REFBK-0018418

प्रभात
प्रकाशन

# प्रसाद रौप्यमहो

## य. गो. जोशी लिखित

**कादंबऱ्या**

- वहिनींच्या बांगड्या
- शेवग्याच्या शेंगा
- सुपारी
- श्रीकांत, त्रिदोष ( एकत्र )
- साहित्यिकांची सफर
- पडसाद
- होमकुंड
- अनंता परत आला
- हिरकणी

**मुलाखती**

- अनौपचारिक मुलाखती

**नाटके**

- श्रीमुखात
- भोळा शंकर } एकत्र
- बोलका सिनेमा }

**चरित्रात्मक**

- दुधाची घागर

**किंमत प्रत्येकी सात रुपये**

- **श्री हरिपाठ**
  ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर
- **कथारूप संक्षिप्त विष्णुपुराण**
  पं. दा. प्र. पाठकशास्त्री
- **संस्कार महिमा**
  स. कृ. देवधर
- **धर्म आणि व्यवहार**
  द. श्री. मराठे
- **जीवनातील अनेक नाती**
  चं. गु. जोशी
- **ज्ञानेश्वरांचे जीवनदर्शन**
  प्र. न. जोशी
- **सूर्यकांत**
  स. आ. जोगळेकर
- **स्वातंत्र्याची पंचवीस वर्षे**
  डॉ. प्र. चि. शेजवलकर
- **बिल्वदले**
  प्रफुल्ल दत्त
- **श्रीसमर्थ चरित्रवाङ्मय व संप्रदाय**
  न. र. फाटक
- **जुने दोरे नवे धागे**
  प्र. न. जोशी

**प्रसाद प्रकाशन, १८९२, सदाशिव, पुणे ३०**